(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ. शी. : कोल्हापूर शहरातील उजाळाईवाडी येथील विमानतळ रन-वे खराब झाल्याच्या कारणाने बंद असणे

मु. शी. : कोल्हापूर शहरातील उजाळाईवाडी येथील विमानतळ रन-वे खराब झाल्याच्या कारणाने बंद असणे यासंबंधी सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कोल्हापूर शहरातील उजाळाईवाडी येथील विमानतळ दि.16.6.2010 पासून रन-वे खराब झाल्याच्या कारणाने बंद असणे, रन-वे च्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी एम.आय.डी.सी.कडे असणे, रन-वे करण्याचे काम निकृष्ट दर्जाचे व अत्यंत संथ गतीने सुरु असणे, विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी आवश्यक असणारी भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण होणे, परंतु प्रत्यक्ष भूसंपादनाच्या कामाला अद्यापही सुरुवात न होणे, सदर व्यापारी, प्रतिष्ठित नागरिक आदींचे विमानसेवा बंद असल्याच्या कारणाने अतोनात हाल होणे, कोल्हापूरच्या वाढत्या औद्योगिकरणावर व विकासावर याचा गंभीर परिणाम होणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व कार्यवाही."

प्रा. फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, कोल्हापूर सारखे शहर जवळजवळ नाशिक, पुणे यांच्यानंतर विकसित होणारे सगळ्यात मोठे शहर मानले जाते. जून महिन्यापासून तेथील विमातळाची धावपट्टी खराब झाल्यामुळे जे मुंबई-कोल्हापूर एकमेव विमान होते ते बंद झालेले आहे. धावपट्टी खराब झाल्यानंतर ती दुरुस्त करण्याकरिता टेंडर काढण्यात आले आणि 12 लाख रुपये खर्च केले. 12 लाख रुपये खर्च करुन धावपट्टी नीट केल्यानंतर ज्यावेळी विमानतळ प्राधिकरणाचे लोक पाहण्यासाठी आले तेव्हा त्यांनी एखाद्या गावातील रस्त्यापेक्षा सुध्दा अतिशय खराब धावपट्टी केलेली आहे असे म्हणून त्या धावपट्टीवर विमान उतरविण्यास नकार दिला. विमानतळ प्राधिकरणाने अशा प्रकारे गावाकडील रस्त्यापेक्षा ही धावपट्टी खराब आहे असा शेरा मारला काय आणि त्यामुळे शासनाचे 12 लाख रुपये वाया गेले काय ? जानेवारी, 2011 च्या पहिल्या आठवड्यात विमानसेवा सुरु होईल असे निवेदनात म्हटले आहे. विमानतळाच्या विस्तारीकरणाची मागणी अनेक वर्षापासून सुरु आहे. 80 कोटी रुपये भूसंपादनासाठी मिळालेले आहेत. अजून किती वर्षे हे सगळे प्रकरण चालणार आहे ? विमानतळाचा विस्तार महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ करणार की केंद्र शासन करणार ? विमानतळाच्या विस्तारीकरणाचे काम केव्हापर्यंत होईल ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, यामध्ये दोन वेगवेगळे प्रश्न आहेत. पहिला प्रश्न विस्तारीकरण आणि त्यासाठी करावयाच्या भूसंपादनाबाबतचा आहे आणि दुसरा प्रश्न धावपट्टी दुरुस्ती विषयीचा आहे. धावपट्टी खराब झाली होती काय असा पहिला प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला. धावपट्टी खराब झालेली होती. ही धावपट्टी 1986-87 मध्ये तयार करण्यात आली होती आणि त्यानंतर डीजीसीएने इन्स्पेक्शन केले तेव्हा त्यांनी असे पत्र दिले की, आता नवीन टेक्निकल पध्दतीने नवीन 2 थर करुन 40 एमएम पीएमबी, 70 ग्रेड नसून 50 एमएम डीओसी आणि 50 एमएम एचडीओसी या पध्दतीने करण्याचे आदेश दिले. त्यामुळे मागे जे टेंडर करण्यात आले होतेते रद्द करण्यात आले आणि नवीन रिटेंडरींगची प्रोसेस करण्यात आली. त्याचा खर्च आता वाढलेला आहे. परंतु हे सर्व काम युध्द पातळीवर चालू आहे आणि जानेवारी, 2011 पर्यंत हे काम संपविणार आहेत असे त्यांचे म्हणणे आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न भूसंपादनाबाबत विचारला. भूसंपादनाची सगळी प्रक्रिया होऊन मोबदला वाटप करण्याचे काम चालू आहे. 42.78

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ....

कोटी रुपये वितरित झालेले आहेत आणि उपविभागीय अधिकारी यांच्या 1.12.2010 च्या पत्रान्वये असे कळविले आहे की, डिसेंबर अखेरपर्यंत ही सर्व प्रक्रिया पूर्ण होणाच्या पातळीवर आहे. त्यासाठी 20 कोटी रुपयांची पुरवणी मागणी एमआयडीसीकडे रिएंबर्स करण्याचे काम शासनाने केलेले आहे. शासन 80 कोटी रुपये देणार आहे. प्रत्येक वर्षी 20 कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, विमानतळाचा विस्तार कोण करणार आहे

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडियाबरोबर 15 वर्षाची लिस्ट करण्यात आली असून ती लिस्ट 21 तारखेपर्यंत संपणार आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, कोल्हापूरला जाण्यासाठी मुंबईवरुन केवळ एकच विमान आहे. जी विमाने पुण्याहून गोव्याला जातात त्यापैकी काही विमाने कोल्हापूर येथे थांबविण्याची विनंती राज्य सरकार केंद्र सरकारला करणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

श्री.सय्यद जमा : सभापति महोदय, माननीय सदस्य ने लक्षवेधी में पूछा है "रन-वे च्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी एम.आय.डी.सी. कडे असणे" और माननीय मंत्री महोदया ने भी जबाब में एम.आय.डी.सी. कहा है. मुझे यह जानना है कि यह एम.ए.डी.सी. (महाराष्ट्र एअरपोर्ट डिवलपमेंट कॉरपोरेशन) के पास है या एम.आय.डी.सी. के पास है ?

प्रा.फौजिया खान : यह एम.आय.डी.सी. के पास है.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

पृ. शी. : गोंदिया जिल्हयातील नवेगाव खूर्द फाट्याजवळ झालेल्या अपघातात 17 जणांचा मृत्यू होणे

मु. शी. : गोंदिया जिल्हयातील नवेगाव खूर्द फाट्याजवळ झालेल्या अपघातात 17 जणांचा मृत्यू होणे यासंबंधी सर्वश्री दिवाकर रावते, गोपीकिसन बाजोरिया, डॉ.नीलम गोऱ्हे व श्री.किसनचंद तनवाणी,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"गोंदिया जिल्हयातील तिरोडा तालुक्याअंतर्गत येणाऱ्या नवेगाव खुर्द फाटयाजवळ दि.१७/९/२०१० रोजी वा त्यासुमारास झालेल्या अपघातात १७ जणांचा मृत्यू होणे, २५ प्रवाशांनी खचाखच भरलेली काळी-पिवळी टॅक्सी, क्षमतेपेक्षा जास्त भरेलेले प्रवासी, खाजगी वाहतुकदार कोणत्याही नियमांची अंमलबजावणी न करणे, त्यांकडे पोलिसांचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी अपघातात होणारी वाढ व होणारी प्राणहानी, खाजगी वाहतुकीस शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असणे, परिणामी अपघाताचे प्रमाण वाढण्याची निर्माण झालेली शक्यता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, तिरोडा येथे हा भीषण अपघात झाला हे राज्यातील भीषण अपघातांपैकी हे एक उदाहरण आहे. कारण राज्यामध्ये असे अनेक भीषण अपघात होतात. त्याबाबत चिंता वाटत असल्यामुळे मी ही लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद येथील खंडपीठाने अवैध वाहतुकीला रोखण्यासाठी गाडीमध्ये कोणते फरक करावेत ते सांगितले आहे. गाडीचा मागील दरवाजा बॅण्ड करावा, अशाप्रकारच्या गाडयांमध्ये किती लोकांना घ्यावे हे सांगितले आहे. तरी सुध्दा अपघात होत आहेत. अपघात घडविणा-यांकडून ही अवैध वाहतूक चालू आहे. या अवैध वाहतुकीकडे वाहतूक पोलीस दुर्लक्ष करतात. परंतु अपघातात माणसे मेली की, शासनाला मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी लाख रुपये द्यावे लागतात. आत्महत्या करणा-या शेतक-यांच्या नातेवाईकास शासन लाखो रुपये देते, परंतु विषारी दारु प्यायल्यामुळे मरण पावलेल्या व्यक्तीच्या नातेवाईकास शासन काहीच मदत करीत नाही, हा विषय मी काही दिवसापूर्वी मांडला होता. काळी-पिवळी टॅक्सीमध्ये 27-28 प्रवाशांना घेतले जाते आणि या टॅक्सीचा अपघात झाला की, शासन अपघातग्रस्तांच्या नातेवाईकांना लाख-लाख रुपये देते. एक लाख रुपये देण्याबद्दल आमची तक्रार नाही, परंतु हे अपघात थांबविण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ? अशाप्रकारच्या अवैध वाहतुकीला रोखण्यासाठी आताचे जे कायदे आहेत ते व्यवस्थित नसल्यामुळे ते अपघात होत आहेत म्हणून शासन कडक कायदा सभागृहात आणणार काय आणि ज्या भागामध्ये असे भीषण अपघात होतात त्या भागातील वाहतुक विभागाच्या अधिका-यांना निलंबित केले जाईल काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी राज्यव्यापी प्रश्न विचारलेला आहे. या प्रश्नाबाबत विधानसभा व या सभागृहात वेळोवेळी चर्चा झालेली आहे. या विशिष्ट प्रकरणामध्ये शासनाने कायदेशीर कारवाई केलेलीच आहे. भविष्य काळामध्ये असे अपघात टाळावेत यासाठी रस्ते सुरक्षा समितीच्या माध्यमातून राज्य स्तरावर एक समिती गठित केलेली आहे, त्याचप्रमाणे जिल्हा स्तरावर सुध्दा समिती स्थापन केलेली आहे. हा विषय मोठा असल्यामुळे दिनांक 1 ते 15 जानेवारीपर्यंत रस्ते सुरक्षा समितीमार्फत मोहिम राबविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पोलीस खाते, परिवहन खाते, एनजीओ यांच्यामार्फत लोकांचे प्रबोधन करण्याचे काम सुरु आहे. अशा टॅक्सींमध्ये 5 + 1, 6 + 1 याप्रमाणे प्रवाशांना घ्यावे असे सांगितलेले आहे.

. . . B 4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील.....

त्यापेक्षा जास्त प्रवासी गाडीत घेतले जातात. आजपर्यंत यासंदर्भातील 9857 केसेस दाखल केलेल्या आहेत. त्यांच्याकडून जवळजवळ 5,98,800 रुपयांचा दंड गोळा करण्यात आला आहे. भविष्य काळातील अपघात टाळण्यासाठी आरटीओ विभाग, परिवहन विभाग व पोलीस यांच्यामार्फत ज्या ज्या उपाययोजना करावयास पाहिजेत त्या सर्व उपाययोजना केल्या जातील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्री महोदय नवीन आहे, ते सभागृहाला माहिती देत आहेत की, यासंबंधी कमिटी स्थापन केली आहे वगैरे वगैरे. जुने वाहन सापडले तर ते जप्त करुन तोडण्याची कारवाई केली जाते. एखाद्या वेळी 2-4 जादा प्रवासी समजू शकतो, परंतु कायद्याच्या बाहेर जाऊन 25-26 प्रवासी एकेका टॅक्सीत घेतले जातात. एवढया मोठया प्रमाणात प्रवाशांनी भरलेली गाडी सापडली तर ती गाडीच जप्त झाली पाहिजे. शासन अशा गाडया जप्त करणार काय आणि गाडी चालविणाऱ्यांना तुरुंगात टाकणार काय, अशाप्रकारची कारवाई केल्याशिवाय काहीच बदल होणार नाही. त्या भागातील परिवहन अधिका-यांना निलंबित केले जात नाही तोपर्यंत ते अधिकारी गांभीर्याने या विषयाकडे पहात नाहीत. हे सर्व प्रकार हप्त्यासाठी चालतात असे मी या सभागृहात बोलणे योग्य नाही. परंतु हे सर्व कसे चालते ते तुम्हाला आणि आम्हाला माहीत आहे. या अवैध वाहतुकीमुळे कोणाचे तरी खिसे भरतात, त्यात मरणारे मरतात, त्यामुळे शासनाला मृतांच्या नातेवाईकांना लाख लाख रुपये द्यावे लागतात. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे ज्या भागात असे भीषण अपघात होतील त्या भागातील परिवहन खात्याच्या अधिका-यास निलंबित करणार काय आणि त्याचप्रमाणे ती गाडीच तेथल्या तेथे जप्त करण्याची कारवाई करणार काय ? त्या गाडीचा परवाना जप्त केला जातो, हा नेहमीचा कारवाईचा भाग झाला, परंतु अशी गाडीच जप्त केली पाहिजे. निदान आपली रोजीरोटीच हातातून जाणार आहे असा त्यांच्यात धाक निर्माण होईल.

यानंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. सतेज पाटील : सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती आहे. या प्रकरणातील ड्रायव्हरवर 2 वेळा गुन्हे दाखल करण्यात आले होते. अवैध वाहतुकीच्या संदर्भात आकारण्यात येणा-या दंडाची रक्कम 100 रु. आणि 1000 रु. अशी आहे. दंडनीय रक्कम कमी असल्यामुळे अवैध वाहतूक करण्यास प्रोत्साहन मिळते. त्यासाठी कायद्यामध्ये बदल करण्याचा शासनाचा विचार आहे. कायदा कडक केल्यानंतर काही घटना घडल्या तर अधिका-यांवर कारवाई करण्याचा प्रश्न निर्माण होईल. परिवहन हा विषय केन्द्र शासनाच्या अखत्यारित असल्यामुळे कायद्यामध्ये सुधारणा करण्याच्या संदर्भात केन्द्राला शिफारस करावी लागेल.

श्री. दिवाकर रावते : परिवहन विषय हा घटनेच्या कन्करण्ट लिस्टमध्ये आहे. माणसे मरु द्या, असे केन्द्र शासन म्हणणार नाही. अपघातात मृत्यूमुखी पडणा-या व्यक्तींना राज्य शासन 1 लाख रु. मदत देते. मग असे अपघात होऊच नये यासाठी कन्करण्ट लिस्टमधील कायद्यामध्ये सुधारणा करण्याचे राज्य सरकारला अधिकार आहेत. या संदर्भात राज्य शासनाला अध्यादेश काढता येत नाही याची मला कल्पना आहे. कायद्यामध्ये सुधारणा करण्यासाठी आपल्याला फार तर संसदेकडे जावे लागेल आणि तो कायदा संसदेमध्ये मंजूर होऊन त्यावर राष्ट्रपतींची सही होऊन तो अंमलात येण्यासाठी पाच-सहा महिन्यांचा कालावधी लागेल. तेव्हा या अवैध वाहतुकीच्या संदर्भात शासन कायद्यामध्ये सुधारणा करणार आहे काय ?

श्री. सतेज पाटील : अवैध वाहतूक रोखण्यासाठी कायद्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. त्या सुधारणा निश्चितपणे केल्या जातील.

श्री. हेमंत टकले : राज्यातील वाहतुकीच्या संदर्भातील हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. राज्यातील सगळया रस्त्यांची असणारी अवस्था, परिवहन विभागामार्फत पुरविली जाणारी एस.टी.ची अपुरी व्यवस्था, रिक्षा आणि टॅक्सी चालकांकडून नियमांचे वारंवार होणारे उल्लंघन या सर्व बाबींचा विचार करता एकूणच वाढत्या प्रवासी संख्येच्या संदर्भात योग्य ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. यासाठी एस.टी.किंवा तत्सम संस्था यांच्यामध्ये सुसंवाद घडवून मोठ्या प्रमाणात होणा-या अवैध वाहतुकीला आळा बसण्यासाठी जे असंख्य बेरोजगार आहेत त्यांची बेरोजगारी दूर होण्यासाठी त्यांच्यासाठी वेगळी परवाना पध्दत काढून त्यांना प्रवासी वाहतूक करण्यासंबंधी परवानगी देण्याचा शासन प्रयत्न करील काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज पाटील : अवैध वाहतुकीच्या संदर्भात या ठिकाणी अनेकदा चर्चा झालेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे राज्य परिवहन महामंडळ आणि गृह खाते हे एकत्र बसून याबाबतीत योग्य तो तोडगा काढतील.

श्री. हुसेन दलवाई : या संदर्भातील कायदा होईल तेव्हा होईल. अपघातात मोठ्या प्रमाणावर होत आहेत. आजच मुंबई-गोवा महामार्गावर खेड येथे झालेल्या अपघात संपूर्ण खेतले कुटुंब ठार झाल्याची बातमी वर्तमानपत्रामध्ये आलेली आहे. हा मुंबई-गोवा महामार्ग अपघातप्रवणतेमध्ये संपूर्ण देशामध्ये क्रमांम एक वर आहे. तेव्हा या महामार्गावर आवश्यक तेथे रस्त्याचे रुंदीकरण करणे आवश्यक आहे. ते रुंदीकरण शासन करणार आहे काय ? वाळू वाहतुक करणारे ट्रक कोणत्याही नियमांचे पालन करीत नाहीत. अशा वाहतुकीला पोलीस देखील खूप मदत करीत असतात. पोलीस अशा वाहतुकीचे ट्रक अडवून त्यांच्याकडून पैसे वसूल करतात. तसेच टेल लाईट नसणारे ट्रक बाजूला सुरक्षित ठिकाणी उभे केले जात नसल्यामुळेही अपघात होतात. कोकणामध्ये अजूनही बैलगाड्या आहेत. पूर्वी या बैलगाड्यांना कंदील होते. या बैलगांडयांवर आणि काही वाहनांवर मागच्या बाजूला रिफ्लेक्टरर्स नसल्यामुळे अपघात होतात. अशा प्रकारे नियमांचे उल्लंघन केल्यामुळे हे अपघात होत असतात. तेव्हा हे अपघात होणार नाहीत यासाठी शासन कडक उपाययोजना करणार आहे काय ?

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-2.....

श्री.सतेज पाटील : सभापती महोदय, रस्ता सुरक्षा अभियान पुढील महिन्याच्या एक तारखेपासून राबविण्यात येणार आहे. त्या अभियानांतर्गत या सर्व सूचनांचे पालन करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या संदर्भात आपल्या दालनामध्ये बैठक घेण्यात यावी अशी आमची विनंती आहे. गेल्या संपूर्ण वर्षभरात राज्यात जवळजवळ 5 हजार नागरिकांचा रस्ते अपघातामध्ये मृत्यू झालेला आहे. रस्त्यावरील अपघातामध्ये नागरिकांचे मृत्यू व्हावेत अशी शासनाची अजिबात इच्छा नाही. परंतु या समस्येवर कायदा करण्याबाबत आपल्या दालनात बैठक आयोजित केल्यास त्या बैठकीला माननीय मंत्रीमहोदय, विभागाचे अधिकारी उपस्थित राहतील आणि पुढील अधिवेशनात निश्चितपणे नवीन कायदा सभागृहापुढे चर्चेला येईल.

उप सभापती : माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना मान्य करण्यात येत आहेत. अशा प्रकारची बैठक लवकरात लवकर आयोजित करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबई गोदी शहरातून हलविण्याबाबत सुरु असलेल्या हालचाली

मु. शी. : मुंबई गोदी शहरातून हलविण्याबाबत सुरु असलेल्या हालचाली यासंबंधी सर्वश्री रामदास कदम, परशुराम उपरकर, किरण पावसकर,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय बंदरे मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई पोर्ट ट्रस्टच्या शिवडीतील आवारात माहे जुलै, २०१० च्या सुमारास झालेल्या वायू गळतीचे निमित्त करुन राज्य शासनाकडून मुंबई पोर्ट ट्रस्ट म्हणजेच मुंबईची गोदी हलविण्याच्या हालचाली सुरु असणे, मुंबई हे शहर देशाची आर्थिक राजधानी असून जगातील कोणतेही आर्थिक केंद्र असलेले शहर हे समुद्राच्या किनारी म्हणजेच गोदीच्या किनारी असणे आवश्यक असणे, त्याचबरोबर मुंबईचे हे बंदर मुळातच एक नैसर्गिक बंदर असणे, हे बंदर नष्ट केल्यास, मुंबईचे महत्व आपोआपच कमी होण्याची निर्माण झालेली शक्यता, त्याचबरोबर तेथील कामगारांवर बेकारीचे संकट ओढवण्याचा निर्माण झालेला धोका, तत्कालीन ब्रिटीश प्रशासनाने कामगारांना घरे बांधून देण्यासाठी टिटवाळ्याला पोर्ट ट्रस्टच्या नावाने घेतलेल्या ७७ एकरजमिनीवर शासनाने काहीच निर्णय घेतला नसल्याने त्या जमिनीवर आता मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झालेली असणे, राज्य शासनाच्या धोरणामुळे सर्वसामान्य नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, मुंबई बंदर अबाधित ठेवण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मुंबई शहरातील सर्व मोकळ्या जागा संपल्या आहेत. अनेक मोकळ्या जागांवर टॉवर्स उभे राहिले आहेत. आता मुंबई गोदीच्या 1800 एकर जागेवर लोकांची वक्रदृष्टी दिसून येत आहे. मुंबई गोदी हलविण्याची प्रक्रिया शासनाने सुरु केली आहे का? तशा प्रकारचा प्रस्ताव सिंगापूर येथील कंपनीने शासनाला सादर केलेला आहे हे खरे आहे काय? टिटवाळा येथे ब्रिटिश काळात कामगारांच्या घरांसाठी 77 एकर जागा राखून ठेवण्यात आली आहे, त्या जागेवर मोठया प्रमाणात अतिक्रमणे होत आहेत. सदर जागेबाबत शासनाने विकास योजना तयार केली आहे काय?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय,माननीय सदस्यांनी ही लक्षवेधी सूचना विचारली आहे ती या तीनही प्रश्नांशी संबंधित आहे. या तीनही प्रश्नांची उत्तरे निवेदनात नमूद केलेली आहेत.

श्री.रामदास कदम : सिंगापूरच्या कंपनीने मुंबई गोदी त्या ठिकाणाहून हलविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे काय? या प्रश्नाचे उत्तर निवेदनामध्ये दिलेले नाही.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, मुंबई गोदी हलविण्याचा कोणताही प्रस्ताव शासनाकडे विचारार्थ नसल्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, टिटवाळा येथे 77 एकर जमीन मुंबई पोर्ट ट्रस्टने घेतली आहे. त्या जमिनीपैकी 2.5 एकर जमिनीवर अतिक्रमणे झालेली आहेत हे शासनाने मान्य केले आहे. ही जमीन कामगारांच्या गृहनिर्माण योजनेसाठी राखीव ठेवलेली नाही असे निवेदनात म्हटले आहे. हे जर खरे असेल तर ही 77 एकर जमीन कशासाठी घेतली आहे? मुंबई गोदी हलविण्याचा विचार नसेल तर ही 77 एकर जमीन कोणत्या कारणासाठी वापरण्यात येणार आहे? आज 2.5 एकर जमिनीवर अतिक्रमणे झाली असल्याचे शासनाने मान्य केले आहे. या जमिनीचा विनियोग कोणत्या कारणासाठी केला जाणार आहे?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, पोर्ट ट्रस्ट ही संस्था पूर्णपणे केंद्र शासनाच्या अखत्यारित आहे. मागील अधिवेशनात याच विषयावर लक्षवेधी सूचना विचारण्यात आली होती. लक्षवेधी सूचनेतील विषय पूर्णपणे केंद्र शासनाशी संबंधित असल्यामुळे ती लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आली होती. निवेदनातील पहिल्या परिच्छेदात स्पष्टपणे म्हटले आहे की, सदर लक्षवेधी सूचनेबाबत मुंबई पोर्ट ट्रस्टकडून जेवढी माहिती उपलब्ध झाली तेवढी माहिती याठिकाणी देण्याचा प्रयत्न झालेला आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे असे उत्तर मंत्रीमहोदय देतील याची मला पूर्ण कल्पना आहे. परंतु रस्ता रुंदीकरणासाठी मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जागेवर झालेली अतिक्रमणे हटविताना अतिक्रमिकांना राज्य शासनामार्फत मोफत घरे दिली जातात. पोर्ट ट्रस्टच्या जागेवर एखादे विकास काम करावयाचे असल्यास जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने विनंती केली तरी त्या विनंतीकडे पोर्ट ट्रस्टकडून दुर्लक्ष केले जाते. महाराष्ट्र शासनाच्या विकास योजनेसाठी पोर्ट ट्रस्टची जागा आवश्यक असेल तर ती जागा ताब्यात घेण्यात येईल काय? मुंबई पोर्ट ट्रस्टमध्ये जे हजारो कामगार काम करीत आहेत, त्यांनी घरे बांधण्यासाठी जागा मिळावी म्हणून शासनाकडे सातत्याने मागणी करुनही त्यांना जागा उपलब्ध करुन दिली जात नाही. कामगारांची मागणी शासनाच्या वतीने पूर्ण करण्यात येईल काय? तसा प्रस्ताव केंद्र शासनाला सादर केला जाईल काय?

(नंतर इ.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, मुळात लक्षवेधी सूचनेतील विषय हा केंद्रशासनाच्या अखत्यारित असताना देखील ती सभागृहात चर्चेला आलेली आहे. हा प्रश्न केंद्रशासनाच्या जागेशी निगडीत असून कर्मचाऱ्यांच्या गृहनिर्माणाशी नाही. ही जागा गोडावूनसाठी राखीव होती अशी माहिती आमच्याकडे उपलब्ध आहे. तसेच सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी प्रश्न विचारला की, केंद्रशासनाच्या जागेवरील झोपड्या उठवावयाच्या असल्या तरी राज्य शासनाला त्यासाठी पर्यायी जागा द्यावी लागते. मग केंद्रशासनाच्या विभागासाठी काही करावयाचे असेल तर, हा जर-तरचा प्रश्न असल्याने त्याचे उत्तर आपण देऊ शकत नाही. म्हणून यासंबंधी आज तरी या जागेबाबत शासनाने केंद्राकडे कुठलाही प्रस्ताव पाठविलेला नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मला जाणीव आहे की, मुंबई पोर्ट ट्रस्ट हा विषय केंद्राच्या अखत्यारित आहे. परंतु मुंबई शासनाने सन 1873 साली ही जागा मुंबई पोर्ट ट्रस्टला दिली होती त्यावेळेस कोणत्या अटी घातल्या होत्या काय ? त्या अटीमध्ये मुंबई शासनाचे अधिकार काय आहेत ? तसेच 12 नॉटिकल मैलापर्यंत पाण्याचे सर्व हक्क तसेच संरक्षण करण्याची सर्व जबाबदारी ही राज्यशासनाची आहे. असे असताना यामध्ये शासन जाबबदार नाही हे कोणत्या आधारावर शासन सांगत आहे ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, मुळात आपण जागा संपादित करुन देतो त्यानुसार सन 1873 मध्ये ही जागा संपादित करुन दिलेली आहे त्यामुळे त्यासंबंधीचे आपले अधिकार नाहीत. तसेच 12 नॉटिकल मैलापर्यंत राज्य शासनाचा अधिकार असतो पण अशा काही संस्था आहेत की त्यांच्या सभोवतालचा संपूर्ण परिसर व बांधकाम हे देखील केंद्राच्याच अखत्यारित आहे. तसेच एकूण 720 किलोमीटरच्या सागरी किनाऱ्यावर अन्य कोणत्याही भागात 12 नॉटिकल मैलाच्या पलिकडे सुध्दा केंद्रशासनाचाच अधिकार असतो, मुंबई पोर्ट ट्रस्टच्या परिसरात मात्र तशी परिस्थिती नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सभागृहात हाच प्रश्न दोन वेळा राखून ठेवलेला होता. सन 1873 मध्ये मुंबई राज्याने मुंबई पोर्ट ट्रस्टला जमीन दिली तेव्हा कोणता करार केला होता त्या करारातील अटी शासन पटलावर ठेवणार काय ?

श्री. नारायण राणे : महोदय, केंद्रशासन किंवा मुंबई पोर्ट ट्रस्टकडून ही माहिती उपलब्ध झाल्यास ती पटलावर ठेवण्यात येईल.

(...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : औद्योगिक परिसर महाड येथून होणाऱ्या प्रदूषणाचा पिण्याच्या पाण्यावर होणारा परिणाम

मु. शी. : औद्योगिक परिसर महाड येथून होणाऱ्या प्रदूषणाचा पिण्याच्या पाण्यावर होणारा परिणाम यासंबंधी सर्वश्री रमेश शेंडगे, ॲड. उषा दराडे, सर्वश्री हेमंत टकले, सतीश चव्हाण, अरुण गुजराथी, हुसैन दलवाई, संजय केळकर, विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उद्योगमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाड येथील औद्योगिक क्षेत्र परिसरातील कारखान्यांतून होणाऱ्या जलप्रदूषणामुळे महाडसह 30 गावांना दिनांक 3 नोव्हेंबर, 2010 पासून गावांतील नळांना लाल पिवळ्या रंगाच्या दूषित पाण्याचा पुरवठा होत असणे, यामुळे औद्योगिक परिसरात राहणाऱ्या नागरिकांत पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण, सदर प्रकरणी लोकप्रतिनिधींनी आंदोलनाचा इशारा देऊन सदर औद्योगिक परिसरातील नागरिकांना स्वच्छ शुध्द पाणीपुरवठा करण्याबाबत केलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करण्यांत येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. नारायण राणे (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, महाड शहर व आजूबाजूच्या बिरवाडी, खरवली अशा जवळपास 30 गावांमध्ये ऐन दिवाळीच्या वेळेस दूषित पाणी मिळाले आणि लोकांना आश्चर्याचा धक्का बसला. कारण ऐन दिवाळीत त्यांना मिळणाऱ्या पिण्याच्या पाण्यात रंगमिश्रीत पाणी यायला लागले. त्यासंदर्भात चौकशी केली असता अधिकारी देखील नीट उत्तरे देत नव्हती, कारण त्यांनाही काही माहिती नव्हते असे ते म्हणतात. ज्यावेळेस दिवाळीत दोन तीन दिवस अवकाळी पाऊस पडला तेव्हा पाऊस सुरु असतानाच काही रासायनिक कारखान्यांनी, रासायनिक पदार्थ त्यांच्या गोडावूनच्या बाजूला उघड्यावरच ठेवलेले होते. या कारखान्यांनी अशी रसायने उघड्यावरच का ठेवली होती ? तसेच पावसाळा सुरु होऊन चार-पाच महिने उलटले तरी देखील हे पदार्थ उघड्यावर का ठेवण्यात आले याचे कारण शोधून अशा कारखान्यांवर शासन कारवाई करणार आहे काय ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ....

ज्या कारखान्यांकडून पाण्याचे प्रदूषण झाले होते त्या कारखांन्याची नावे काय आहेत ? रंगमिश्रीत पाणी तपासण्यासाठी पाठविल्यानंतर ते पाणी पिण्यासाठी योग्य होते असे उत्तरात सांगण्यात आलेले आहे. त्यामुळे मला असे विचारावयाचे आहे की, रंगमिश्रीत पाणी पिण्यालायक असते काय ? या रंगमिश्रीत पाण्याच्या संदर्भात एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता श्री. नागपुरे यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी सांगितले की, "हे पाणी तपासण्यासाठी पाठविले होते व हे पाणी पिण्यासाठी योग्य आहे असा रिपार्ट आलेला आहे". त्यामुळे या सर्व प्रकाराला जबाबदार असणा-या अधिका-यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे काय ? तसेच ज्या कारखान्यांकडून पाण्याचे प्रदूषण झाले होते, त्या कारखान्यांवर काय कारवाई केली जाणार आहे ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जी लक्षवेधी सूचना दिलेली आहे, त्या लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. दि. 2 नोहेंबर, 2010 रोजी या ठिकाणी अवेळी पाऊस पडला होता. एमआयडीसीच्या आवारात किरकोळ कचरा तसेच द्रव्ये पडलेले असते. अवेळी पावसामुळे हे द्रव्य नाल्यात गेले. दि. 3 नोव्हेंबर, 2010 रोजीही रात्रीच्या एक वाजेच्या सुमारास अवेळी पाऊस झाल्यामुळे एमआयडीसीच्या आवारातील कचरा व द्रव्ये नाल्यात गेली व तेथून ते सावित्री नदीत गेली. वेगवेगळया द्रव्यांमुळे पाणी रंगमिश्रीत झाले होते. सावित्री नदीतील पाणी लिफ्ट करुन 30 गावांना दिले जाते. ज्यावेळेस अशा प्रकारच्या तक्रारी आल्या त्याच वेळेस सावित्री नदीतून जे पाणी लिफ्ट करुन 30 गावांना दिले जात होते ते पाणी लिफ्ट करण्याचे बंद करण्यात आले व वरच्या बाजूला बिरवाडी येथून पाणी लिफ्ट करण्याची सोय असल्यामुळे बिरवाडीवरुन या ठिकाणच्या गावांना पाणी पुरवठा करण्यात आला होता. जे सांडपाणी सावित्रीनदीत गेले होते ते साफ करण्यासाठी वेगवेगळी औषधे टाकून पाणी शुध्द करण्यासाठी एमआयडीसीतील असोशिएनच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात आला होता. 3 नोव्हेंबर रोजी संध्याकाळपर्यंत पाणी शुध्द करण्यात आले होते. 3 नोव्हेंबरच्या रात्री एक वाजता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9818....

श्री. नारायण राणे....

रंग मिश्रीत पाणी यावयास सुरुवात झाली होती व तक्रार मिळाल्यानंतर दुपारनंतर हे पाणी तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. 3 तारखेच्या दुपारनंतर घेतलेल्या पाण्याचे नमुने प्रायोग शाळेत पाठविले असता सदर पाणी रिपोर्ट पिण्यास उपयुक्त आहे असा अहवाल आला होता. त्याच्या अगोदर पाणी शुध्द करण्याचे काम विभागाकडून झाले होते. अवेळी पावसामुळे सांडपाणी नदीत आल्याचे समजल्या बरोबर सावित्री नदीचे पाणी लिफ्ट करण्याचे बंद करण्यात आले व बिरवाडीवरुन हे पाणी लिफ्ट करुन पाणी पुरवठा करण्यात आला होता. मधील काळात जे रंगमिश्रीत पाणी आले होते त्याचा अपवाद सोडता आताही व त्यावेळेलाही शुध्द पिण्याचे पाणी पुरवठा करण्याचे काम एमआयडीसीकडून होत आहे. एमआयडीसीने हा डॅम बांधलेला असून या ठिकाणच्या 30 गावांना पाणी पुरवठा करण्यात येत आहे. अशा प्रकारची तक्रार या ठिकाणी यापूर्वी कधीही आली नव्हती परंतु अशा प्रकारची तक्रार आल्याबरोबर या ठिकाणी शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा एमआयडीसी कडून करण्यात आलेला होता. शुध्द पाणी पुवठा करण्याचे काम या ठिकाणी अधिका-यांनी केलेले असल्यामुळे या ठिकाणच्या अधिका-यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे. कोकणामध्ये मोठया प्रमाणात औद्योगिकरण होत असल्यामुळे कोकण औद्योगिकरणाच्या बाबतीत अतिशय संवेदनशील झालेला आहे. कोकणातील हवेची व पाण्याची काळजी घेण्याची जबाबदारी शासनाची आहे. कोकणामध्ये मोठया प्रकल्पांना विरोध होत आहे. अशा ठिकाणी अशा कारणामुळे जर दूषित पाणी पुरवठा होत असेल तर ते योग्य होणार नाही. मला कल्पना आहे की, महाड येथील सीईपीटी सर्व व्यवस्था करीत असते.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

फक्त प्रक्रियेतून निर्माण होणारे द्रव्य, तसेच त्या परिसरात स्वच्छता राखणे, तेथील कचरा वेळच्या वेळ काढणे इत्यादी बाबी करण्याबाबत एम.आय.डी.सी. सी.ई.पी.टी.वर बंधन आणणार आहे काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सी.ई.पी.टी.च्या माध्यमातून ज्या बाबी अपेक्षप्रमाणे हाताळल्या गेल्या पाहिजेत तेवढ्या हाताळल्या जात नाहीत. म्हणून एम.आय.डी.सी.ने त्यांना मदत करावयाची आहे. जवळपास 26 कि.मी.अंतरावर पाईपद्वारे सांडपाणी डिस्पोझल केले जाते. त्याशिवाय सांडपाण्याचा निचरा चांगल्याप्रकारे व्हावा यासाठी शासनाचे सर्वतोपरी प्रयत्न सुरु आहेत. एम.पी.सी.बी.च्या अधिकाऱ्यांना आम्ही ही सर्व माहिती दिलेली आहे.

सभापती महोदय, कोकण भाग संवेदनशील होत चालला आहे आणि काही केला जात आहे. परंतु तो तसा राहू नये. कोकणात उद्योगधंदे यावयास पाहिजे परंतु त्याच बरोबर पर्यावरणाची काळजी घेतली पाहिजे असे मत सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी व्यक्त केले. आम्ही त्यांच्या मताशी सहमत आहोत.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी अतिशय सविस्तर उत्तर दिलेले आहे. अशाच प्रकारचा प्रश्न लोटे परशुराम एम.आय.डी.सी.परिसरात देखील झाला होता. तेथील विहिरींमध्ये रंग मिश्रित पाणी येत होते. याठिकाणची सी.ई.टी.पी. प्रक्रिया शास्त्रोक्त पध्दतीची नाही. दूषित पाण्यामुळे गावातील अनेक शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचे पत्र मी शासनाला दिले आहे. एकूण 211 शेतकऱ्यांचे 107.43 क्षेत्राचे नुकसान झालेले आहे. त्याबाबत अजून पंचानामा झालेला नाही. सी.ई.टी.पी. प्रक्रिया सदोष असल्यामुळे हे सर्व प्रकार होत आहे. तेव्हा सी.ई.टी.पी.प्रक्रियेमध्ये सुधारणा करणार आहात काय ? तसेच ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे त्यांना शासन नुकसान भरपाई देणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला नुकसान भरपाईचा विषय लक्षवेधी सूचनेमध्ये नाही. तरी सुध्दा त्यांनी निवेदन दिलेले आहे ही बाब तपासून पाहण्यात येईल. सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्यानुसार दूषित पाण्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले असेल तर त्या शेतकऱ्यांना मदत करण्याचा आम्ही विचार करु. सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी लोटे-परशुराम परिसरातील एम.आय.डी.सी.चा उल्लेख केला. दूषित पाण्यावरील प्रक्रिया आणखी चांगल्या पध्दतीने करण्याबाबत शासन प्रयत्नशील असून त्या दृष्टीने क्षमता वाढविण्याचा शासन प्रयत्न करीत आहे.जेणेकरुन भविष्यात शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही आणि पिण्याच्या पाण्यावर देखील परिणाम होणार नाही.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, याठिकाणी रंगीत पाणी पुरवठा झाला इतक्या पुरताच हा प्रश्न मर्यादित नसून ते पाणी रसायन मिश्रित होते. सुदैवाने माननीय मंत्री कोकणातील आहेत. कोकणातील लोकांची अशी भावना झालेली आहे की, कोकणात फक्त रसायनाचे कारखाने येत आहेत.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई.....

त्याबाबतीत शासानाकडून जी सजगता दाखावयास पाहिजे होती ती दाखवली जात नसल्यामुळे ब-याच प्रकल्पांना विरोध केला जातो ही बाब लक्षात घेतली पाहिजे. या बाबतीत दक्षता घेण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे. कोकणात सावित्री तसेच वशिष्टी, जगबुडी नदीमधील दूषित पाण्याचा प्रश्न वारंवार निर्माण झाला आहे. दर चार सहा महिन्यांनी या नदीतील मासे मरणे, गुरे मरणे, शेतीचे नुकसान होते हे पाणी प्यायल्यामुळे माणसांच्या आरोग्यावर परिणाम होणे असे प्रकार सातत्याने घडत असतात. त्या भागातील उद्योगपती बेफिकीर असल्यामुळे तक्रारी करुनही त्या तक्रारीकडे लक्ष देत नाहीत तेव्हा या बाबतीत शासन कडक धोरण स्वीकारणार आहे काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न विचारला आहे त्या प्रश्नाचे उत्तर मी थोडक्यात देऊ इच्छितो. कोकणातील शेती, कोकणातील जनावरे आणि माणसे यांची योग्य काळजी घेण्याच्या दृष्टीकोनातून कोकणामध्ये जे काही कारखाने येतील त्या कारखान्यातील सांडपाणी किंवा रासायनिक पदार्थ इत्यादीची विल्हेवाट योग्य प्रकारे लावण्याच्या दृष्टीने त्यांनी कार्यवाही करावी. कोणत्याही कारखान्यातील सांडपाणी, वायू इत्यादीच्या माध्यमातून कोणत्या माणसांच्या आरोग्यावर तसेच जनावरांच्या जीवनावर दुष्परिणाम होणार नाही याची काळजी घेण्यासाठी त्यांना प्रवृत्त करण्यात येईल आणि भविष्यामध्ये कोकणात जे काही उद्योग येतील त्यांच्याकडून अशा प्रकारची काळजी घेतली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यातील विविध रुग्णालयातून बुरखाधारी महिलेकडून लहान मुले चोरण्याचे घडत असलेले प्रकार

मु.शी. : राज्यातील विविध रुग्णालयातून बुरखाधारी महिलेकडून लहान मुले चोरण्याचे घडत असलेले प्रकार यासंबधी डॉ. नीलम गो-हे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

डॉ.नीलम गो-हे (विधान सभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मुंबईतील सांताक्रुझच्या व्ही.एन. देसाई रुग्णालयातून बुरखाधारी महिलेने बुरख्याचा फायदा घेऊन मुल चोरणे, या घटनेस महिना होत नाही तोच गोवंडी ,शिवाजीनगर येथील पालिकेच्या आरोग्य केन्द्रातून बुरखाधारी महिलेने दोन महिन्याचे मुल पळविणे, ऑक्टोबर महिन्यात छत्रपती शिवाजी टर्मिनस येथूनही बुरखाधारी महिलेने नवजात मुलाचे अपहरण करण्याची घटना घडणे यामुळे रुग्णालयाच्या प्रसुती विभागात बुरखाधारी महिलांबद्दल संशयाचें वातावरण निर्माण होणे, बुरखाधारी महिलांचीही कडक तपासणी करण्याची निर्माण झालेली आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची आणि शासनाची प्रतिक्रिया "

श्री.सतेज उर्फ बंटी डी. पाटील (गृह राज्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

= निवेदना नंतर -

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, बुरखाधारी महिलेने लहान मुलांचे अपहरण केल्याबद्दल वाकोला पोलीस ठाण्यामध्ये गु.र.नं.451/2010 नोंदविण्यात आला आहे. त्याचबरोबर गोवंडी येथे शिवाजी नगर पोलीस ठाण्यामध्ये गु.र.नं. 366/2010 आणि छत्रपती शिवाजी टर्मिनस येथील प्रकरणाबाबत गु.र.नं. 160/2010 नोंदविण्यात आला आहे. त्याचबरोबर मीना नेरुरकर यांच्या मुलाचे देखील अपहरण केले होते. दिनांक 16 नोव्हेंबर 2010 रोजी नगर येथे सुध्दा असाच प्रकार घडला होता अशा प्रकारे या चार पाच घटनांमध्ये लहान मूल चोरीस गेले होते त्यावेळी बुरखाधारी समाजकंटकाने या परिस्थितीचा गैरफायदा उचलला आहे. रुग्णालयाच्या सुरक्षिततेचा हा प्रश्न नसून काही गुन्हेगारी प्रवृत्तीची मंडळी ही मुले चोरुन विकत असतात "सिग्नल" नावाच्या चित्रपटात या विषयाकडे लक्ष वेधण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय तस्करी करणा-या टोळया बुरख्यांचा वापर करीत आहेत . याबाबतीत दैनिक सामना या वृत्तपत्राच्या अग्रलेखामध्ये देखील या भावना व्यक्त करण्यात आल्या होत्या. सुरक्षिततेच्या द्ष्टीकोनातून सुरक्षा रक्षकाने जर बुरखा बाजूला करुन पाहण्याचा प्रयत्न केला तर काही जणांच्या भावना दुखावतात म्हणून सुरक्षा रक्षक जरी महिला असली तरी त्यांना बुरखाधारी व्यक्तीची तपासणी कशी करावयाची असा प्रश्न पडतो. मतदानाच्या वेळीसुध्दा हेच प्रकार घडत असतात . तपासणी करुन घेण्यासाठी रुग्णालयामध्ये महिला येत असतात तेव्हा अशा प्रकारे जो संवेदनशील भाग आहेत त्या ठिकाणी बुरख्यावर बंदी आणण्याबाबत सरकार विचार करणार आहे काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी काही ठिकाणी अशा घटना घडल्याचे निदर्शनास आणले आहे. 2009 साली मुंबईतील लोकमान्य टिळक रुग्णालयामध्ये असा प्रकार घडला होता आणि त्या घटनेच्या पार्श्वभूमीवर माननीय हायकोर्टाने काही सूचना दिल्या आहेत .महानगरपालिका विशेषत: नगरपालिकाच्या दवाखान्यात मुले चोरण्याचे प्रकार होत असतात तेव्हा असे प्रकार होऊ नये यासाठी त्या ठिकाणी सीसीटीव्ही बसविण्याचा प्रयत्न करावा ,त्याचबरोबर डिसचार्ज देण्याची वेळ 12 ते 2.00 अशी असावी त्याचप्रमाणे मॅटर्निटी आणि पेडियाट्रीक वार्डमध्ये वेगळया प्रकारच्या उपाययोजना कराव्यात किंवा नवजात बालकाचे बायोमॅट्रीक घेण्यात यावे अशा प्रकारच्या सूचना माननीय हायकोर्टाने दिल्या आहेत त्या सूचनाची मुंबई महानगरपालिकेच्या दवाखान्यात अंमलबजावणी करण्यासाठी ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे :राज्यात इतरही ठिकाणी हे प्रकार घडत असतात

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : मुंबई महानगरपालिकेच्या दवाखान्यात या सूचनांची अंमलबजावणी करण्यास सांगण्यात आले आहेत त्याचबरोबर या सबंधीच्या सर्व उपाययोजना संपूर्ण राज्यातील सर्व रुग्णालयामध्ये लागू करण्यात याव्यात अशी गृह विभागातर्फे सार्वजनिक आरोग्य विभागाला विनंती करण्यात येईल .

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: भंडारा जिल्हयातील गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांनी "भीक मांगो" आंदोलन करुन व्यक्त केलेला संताप

मु.शी.: भंडारा जिल्हयातील गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांनी "भीक मांगो" आंदोलन करुन व्यक्त केलेला संताप यासंबंधी सर्वश्री एस. क्यू. जमा, विजय सावंत, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. एस. क्यू. जमा (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पुनवर्सन व मदत कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दिनांक २९/११/२०१० रोजी वा त्या सुमारास भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांनी शासनाविरुध्द "भीक मांगो" आंदोलन करुन व्यक्त केलेला संताप, सदरहू प्रकल्पग्रस्तांना घरटी एकाला रोजगार देण्याचे आश्वासन देऊनही गेल्या अनेक वर्षापासून त्याची पूर्तता करण्यात शासनास आलेले अपयश, परिणामी प्रकल्पग्रस्त बेरोजगारांची सातत्याने वाढत असलेली संख्या, अनेक प्रकल्पग्रस्तांची शासकीय नोकरीत प्रवेश करण्याची उलटून गेलेली वयोमर्यादा, प्रकल्पग्रस्तांना स्वयंरोजगारासाठी १० लाख रुपये वित्त सहाय्य देण्यात यावे, नोकरी मिळेपर्यंत रुपये ३,०००/- भत्ता देण्यात यावा, प्रकल्पग्रस्तांमधून शासकीय विभागातील रिक्त पदे भरण्यात यावीत, संबंधित कुटुंबांना पुनर्वसनाच्या सोयी व सुविधा द्याव्यात, कृती आराखडा तयार करुन बेरोजगारांना नोकरी व निवारा उपलब्ध करुन द्यावा, इत्यादी न्याय्य मागण्या या प्रकल्पग्रस्तांकडून करण्यात येणे आणि सदरहू मागण्यांच्या पूर्ततेसाठी शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही आणि याबाबतची शासनाची भूमिका."

श्री. प्रकाश सोळंके (पुनर्वसन व मदत कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, इस विषय पर बहुत चर्चा हो चुकी है. माननीय मुख्यमंत्री और उप मुख्यमंत्री इस विषय से पूरी तरह से अवगत हैं. लेकिन माननीय मंत्री महोदय ने जो जबाब दिया है, वह सेल्फ कॉन्ट्राडिक्ट्री है. मंत्री महोदय ने जबाब में कहा है कि दिनांक 10.05.2010 को माननीय मुख्यमंत्री की अध्यक्षता में बैठक हुई और उसमें 152 करोड़ रुपए का पॅकेज जाहिर किया गया है. लेकिन यह पॅकेज तो पहले ही डिक्लेअर हो गया था. पुनर्वसन प्राधिकरण ने 10.08.2010 के निर्णय में लिखा है कि पुनर्वसन का काम पूरा होने के बाद पानी का स्तर 239 पॉइंट तक ले जा सकते हैं. इसमें नागपुर के 11 गांव और भंडारा जिले के 3 गांव डूब रहे हैं. मंत्री महोदय ने माना है कि 14.10.2010 को डिवीजनल कमिश्नर ने यह प्रस्ताव शासन के पास भेजा है कि पुनर्वसन के कार्य में 1999 का महाराष्ट्र शासन का कायदा लागू होगा या भारत सरकार का आर. एन्ड आर. लागू होगा. मेरा पहला प्रश्न यह है कि गांव डूबने की प्रक्रिया पर रोक लगाकर क्या आप उच्च स्तर पर, माननीय मुख्यमंत्री या माननीय उप मुख्यमंत्री के स्तर पर मीटिंग बुलाकर इस बारे में जल्दी से जल्दी निर्णय लेंगे ?

सभापति महोदय, इस प्रकल्प को राष्ट्रीय प्रकल्प घोषित किया गया है और इसके लिए बहुत अधिक फंड केन्द्रीय सरकार की ओर से आएगा, इसलिए मेरा दूसरा प्रश्न यह है कि क्या आप डिवीजनल कमिश्नर या जिलाधिकारी की बजाय विशेष पुनर्वसन कमिश्नर अपाइंट करेंगे ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाच्या विषयावर याठिकाणी लक्षवेधी सूचना मांडली आहे. त्यांनी केल्या दोन सूचनांच्या बाबतीत निश्चितपणे वरिष्ठ स्तरावर बैठक बोलाविण्यात येईल. त्याचप्रमाणे त्यांनी आयुक्तांच्या पातळीवर विशेष अधिकारी म्हणून पुनर्वसन अधिकारी नेमण्यात यावा असे सांगितले आहे. सध्या नागपूर विभागाचे आयुक्त हे काम पहात आहेत. तरीसुध्दा माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा निश्चितपणे विचार करण्यात येईल.

श्री. विजय सावंत : सभापती महोदय, या प्रकल्पामध्ये एकूण किती प्रकल्पग्रस्त बाधित आहेत?

उपसभापती : माननीय सदस्यांनी मोठया आवाजात आपला प्रश्न विचारावा.

. . . I 3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (बसून बोलतात) : त्यांचा आवाज बारीक असला तरी त्यांचा आदर्शमध्ये फ्लॅट नाही....

उपसभापती : आज सकाळी विमानामधून येत असतांना माझ्या हातामध्ये दुकानदाराने दिलेली एक बॅग होती. त्यावर "आदर्श क्लॉथ स्टोअर" असे नाव लिहिले होते. त्यामधील "आदर्श" हे नाव मोठया टाईपमध्ये होते व इतर अक्षरे लहान टाईपमध्ये होती. इतर व्यक्तिंनी त्या बॅगेवरील "आदर्श" हे नाव वाचल्यानंतर मला विचारले की, डावखरे साहेब हे काय आहे? त्यावेळी मी त्यांना सांगितले की, ही बॅग सकाळी माननीय श्री. कन्हैय्यालाल गिडवाणी साहेबांनी पाठविली आहे.

श्री. विजय सावंत : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, गोसीखुर्द या प्रकल्पामुळे एकूण किती लोक बाधित झाले आहेत? त्यापैकी किती लोकांचे पुनर्वसन केले आहे व किती लोकांचे पुनर्वसन व्हावयाचे बाकी आहे?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यामध्ये नागपूर जिल्हयातील 11 गावे आणि भंडारा जिल्हयातील 2 गावे अशी एकूण 14 गावे बाधित झाली आहेत. त्यापैकी 9 गावांचे गावठाण स्थलांतरित करण्यात आले आहे. बाकीच्या लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी जल संपदा विभागामार्फत संक्रमण शिबिर उघडण्यात आले असून त्याठिकाणी 350 लोकांचे पुनर्वसन होऊ शकेल अशाप्रकारची व्यवस्था केली आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, गोसीखुर्द हा विदर्भामधील एक अत्यंत महत्वाचा असा प्रकल्प आहे. त्यामध्ये केंद्र सरकारने 90 टक्के सहभाग दर्शविला आहे आणि त्याप्रमाणे केंद्र सरकारकडून या प्रकल्पाला निधी मिळत आहे. या प्रकल्पामुळे प्रकल्पग्रस्तांची फार मोठया प्रमाणात अडचण निर्माण झाली आहे.

(यानंतर श्री. बरवड)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ...

या सगळ्या अडचणी या लक्षवेधी सूचनेव्दारे शासनाच्या निदर्शनास आणून देता येईल असा हा विषय नाही. त्या ठिकाणी पहिल्या टप्प्यापर्यंत भरावयास पाहिजे होते पण चुकीचा सर्व्हे झाला की काय हे माहीत नाही पण त्या ठिकाणी दुसऱ्या टप्प्यापर्यंत पाणी भरले गेले आणि त्या माध्यमातून बऱ्याच अडचणी, बरेच प्रश्न निर्माण झाले. म्हणून यासंदर्भात शासकीय स्तरावर सन्माननीय मंत्री महोदय एखादी बैठक घेऊन या सर्व प्रकल्पग्रस्तांच्या अडचणी दूर करतील काय? याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांची सूचना योग्य आहे आणि शासनाच्या स्तरावर हे सगळे प्रश्न दूर करण्यासाठी स्वतंत्र बैठक बोलविली जाईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : विविध मागण्यांसाठी माथाडी कामगारांनी केलेला संप

मु. शी. : विविध मागण्यांसाठी माथाडी कामगारांनी केलेला संप यासंबंधी ॲड. गुरुनाथ कुलकर्णी, सर्वश्री अरुण गुजराथी, हेमंत टकले, रमेश शेंडगे, सतीश चव्हाण, ॲड. उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" दि. 25 ऑक्टोबर, 2010 पासून माथाडी कामगारांनी केलला संप, मागील दहा वर्षापासून माथाडी कामगार आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी पाठपुरावा करीत असून शासनाकडून त्याकडे दुर्लक्ष करण्यांत येणे, संपावर गेलेल्या माथाडी कामगारांच्या नेत्यांना राज्याच्या मुख्य सचिवांनी बोलावून एक महिन्याच्या आत मागण्या मान्य करण्याचे आश्वासन देवून एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होवूनही त्यांच्या मागण्यांबाबत कोणताच निर्णय घेण्यांत न येणे, त्यामुळे माथाडी कामगारांत निर्माण झालेले निराशेचे वातावरण, याबाबत केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.

श्री. हसन मुश्रीफ (कामगार मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, गेल्या दहा वर्षापासून माथाडी कामगारांचे हे प्रश्न प्रलंबित आहेत. त्यामध्ये महत्वाचा प्रश्न घरकुलांबाबतचा आहे. कोपरखैरणे, घणसोली येथे 2500 घरे देणे, वडाळा व चेंबूर येथील घरकुल योजना पूर्ण करणे, माथाडी मंडळाची पुनर्रचना करुन विविध संघटनेच्या संख्येप्रमाणे त्याच्यात प्रतिनिधित्व देणे या चार बाबी अत्यंत महत्वाच्या आहेत आणि त्यासंदर्भात 31 हजार माथाडी कामगार संपावर होते. मुख्य सचिवांनी शब्द दिला की, एक महिन्याच्या आत हे पूर्ण करु. 25 ऑक्टोबरला बैठक झाली. अद्याप त्यासंदर्भातील निर्णय घेण्यात आलेला नाही. किती दिवसात हा निर्णय घेण्यात येईल आणि माथाडी कामगारांचा घरांच्या संदर्भात जो प्रश्न गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे तो शासन किती महिन्यात पूर्ण करणार ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, माथाडी कामगारांच्या जवळजवळ सात ते आठ मागण्यांसाठी त्यांनी संप केला होता. त्यावेळी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली. त्या बैठकीमध्ये एक महिन्याच्या आत हे सर्व निर्णय करु असे आश्वासन त्यांना देण्यात आले. 1999 साली 2500 घरे घणसोली आणि कोपरखैरणे येथे माथाडी कामगारांना द्यावयाची असा निर्णय झाला होता. ग्रोसरी बोर्डाबाबत माथाडी कामगारांसाठी 500 घरे आणि एक हजार भूखंड, मुंबई फळे, भाजीपाला कामगार असोसिएशन यांना 500 घरे आणि एक हजार भूखंड देण्याचा निर्णय झाला. ग्रोसरी बोर्डाने सिडकोकडून आवश्यक मूल्य भरुन 500 घरे ताब्यात घेतली. परंतु उर्वरित घरांचे पैसे न भरल्यामुळे सिडकोने हा निर्णय रद्द केला. आता या सगळ्या विविध माथाडी संघटनांची मागणी आहे ही 2500 घरे कामगारांच्या संख्येप्रमाणे वाटप करावीत. हा निर्णय मंत्रिमंडळापुढे प्रलंबित आहे. 1 नोव्हेंबरला बैठक झाली होती आणि 8 नोव्हेंबरला या राज्याच्या मंत्रिमंडळामध्ये बदल झाला त्यामुळे आपण एक महिन्याच्या आत निर्णय घेऊ शकलो नाही. परंतु गेल्या आठवड्यामध्ये विधानसभा सभागृहामध्ये हा विषय आला तेव्हा माननीय उपमुख्यमंत्र्यांनी महिना दोन महिन्याच्या आत मुंबईमध्ये ज्यावेळेला मंत्रिमंडळाची बैठक होईल त्यामध्ये आम्ही हा निर्णय प्राधान्यक्रमाने घेऊ असे सांगितलेले आहे. बोर्ड करणे वगैरे जे बाकीचे निर्णय आहेत ते आम्ही एक महिन्याच्या आत पूर्ण करीत आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप : सभापती, महोदय, हा प्रश्न आजचा नाही. माननीय मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले की, 1999 सालापासून प्रलंबित असलेला हा प्रश्न आहे. विधानसभा सभागृहामध्ये गेल्या पाच वर्षामध्ये या विषयावर कमीतकमी पाच वैळा लक्षवेधी सूचनेच्या माध्यमतून आणि विविध आयुधांच्या माध्यमातून चर्चा झाली आणि हे जे उत्तर आहे यामध्ये फक्त तारखांचा बदल केला आहे आणि बाकीचे उत्तर जसेच्यातसे या ठिकाणी देण्यात आलेले आहे. सभापती महोदय, आताच आपण आदर्शचा उल्लेख केला त्या फाईल्स खूप फास्ट मूव्ह झाल्या आणि ताबडतोब मंजुरी मिळाली. पण या कष्टकऱ्यांच्या घरांच्या बाबतीत शासनाची उदासिनता दिसून येते. ते पैसे खर्च करुन घेणार आहेत. ते काही मोफत मागत नाहीत. माथाडी आणि हा कष्टकरी कधीही कोणाकडे भीक मागणार नाही. मी माननीय मंत्री महोदयांचे स्वागत करीन की, ते मनापासून प्रयत्न करीत आहेत आणि हे सगळे निकाली काढण्याबाबत त्यांनी आश्वासित केले आहे. हा प्रश्न फक्त घरापुरताच तसेच कोपरखैरणेपुरताच मर्यादित प्रश्न नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप.....

कोपरखैरने व वडाळा या दोन्ही ठिकाणचा हा प्रश्न आहे. चेंबूरचे विकासक व या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.विजय सावंत येथेच बसलेले आहेत. त्यांना ज्या अडचणी येतात त्या शासन दूर करणार आहे काय, कारण त्या अडचणी दूर केल्याशिवाय माथाडी कामगारांसाठी घरे बांधता येणार नाहीत. या प्रश्नाशी केवळ कामगार विभागाचाच नाही तर नगरविकास विभागाचाही संबंध आहे. म्हणून त्याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय आणि माथाडी मंडळाची पुनर्रचना शासन करणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हा प्रश्न खालच्या सभागृहात आला होता त्यावेळी सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, या दोन्ही ठिकाणच्या घरांचा प्रश्न एक महिन्याच्या आत मंत्रिमंडळासमोर ठेवून हा प्रश्न निकालात काढण्यात येईल. माथाडी मंडळाची एक महिन्याच्या आत स्थापना केली जाईल.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, सिडकोने दिनांक 25.11.1994 रोजी माथाडी कामगारांना 3,000 घरे देण्याचा ठराव क्र.6520 मंजूर केलेला आहे. तेव्हापासून या माथाडी कामगारांना घरे देण्याची कार्यवाही पूर्ण होऊन घरे ताब्यात मिळालेली नाहीत. हे माथाडी कामगार 25-30 वर्षे काम करीत आहेत. एवढया कालावधीत त्यांनी अतिक्रमण करुन मुंबईत झोपडी बांधली असती तर त्यांना शासनाने घरे दिली असती. हे गरीब माथाडी कामगार गावाला राहतात आणि येथे कामासाठी येतात. त्यांना अद्याप घरे मिळालेली नाहीत. शासन त्यांना त्वरित घरे देणार आहे काय, या घरांचे वाटप करताना कोणत्याही संघटनेला डोळयासमोर न ठेवता, विविध संघटनेतील जे कामगार काम करीत असतील त्यांना सुध्दा घरे दिली जातील काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, वडाळा येथे आरक्षणाचा मुद्दा आहे. परंतु हे दोन्ही विषय मंत्रिमंडळासमोर नेण्यात येणार आहेत.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, माथाडी कामगारांना त्रास होत आहे. त्यांच्या घरासाठी शासनाने जागा दिलेली आहे. या माथाडी कामगारांना वन रुम किचनचे घर मी सव्वा तीन लाखात बांधून देत आहे. परंतु ही घरे बांधताना मला जो त्रास होत आहे तो येथे सांगणे आवश्यक आहे. शासनाने मंत्रिमंडळासमोर जाऊन या घरांसाठी जागा उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु एस.आर.ए.चे अधिकारी असे म्हणतात की, शासनाने तुम्हाला आदेश दिले असले तरी प्रॉपर्टी कार्डवर तुमचे नाव नाही. त्यांनी 10 ते 15 बिल्डर्सची एक स्किम मंजूर केलेली आहे. शासनाच्या आदेशाप्रमाणे एस.आर.ए.च्या अधिका-यांना काम करण्यास सांगितले जाईल काय ? माथाडी कामगारांना घरे मिळण्यासाठी शासनाने एस.आर.ए.च्या अधिका-यांना आदेश दिलेले आहेत तरी सुध्दा ते अधिकारी बिल्डर्सची कामे करीत आहेत. त्यामुळे माथाडी कामगारांना घरे मिळत नाहीत. याबाबत मंत्रिमंडळात निर्णय झालेला असताना अधिकारी मानत नाहीत. एस.आर.ए.चे अधिकारी बिल्डर्सच्या स्किम मंजूर करतात त्या थांबविल्या जातील काय ?

डॉ.दीपक सावंत : सन्माननीय सदस्य श्री.विजय सावंत यांच्याबद्दल पूर्ण आदर ठेवून मी असे विचारु इच्छितो की, त्यांना वैयक्तिक स्वरुपाचा प्रश्न सभागृहात उपस्थित करता येईल का ?

उप सभापती : एस.आर.ए. चे अधिकारी शासनाने घेतलेल्या निर्णयाची सुध्दा अंमलबजावणी करीत नाहीत. ते काही बाबतीत स्वत:च निर्णय घेत आहेत. मग त्याला कोणी सुपारी म्हणत असेल किंवा आणखी काही म्हणत असेल. परंतु सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे. त्यामुळे मंत्री महोदयांनी तो प्रश्न विचारात घ्यावा. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना सांगू इच्छितो की, आपण एस.आर.ए.चे कमी घोटाळे ऐकतो काय ?

श्री.विजय सावंत : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांचा गैरसमज झालेला आहे.

उप सभापती : दोन्ही सन्माननीय सदस्यांनी सभागृहाबाहेर जाऊन एकमेकांचे गैरसमज दूर करावेत.

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 8 बाबत</u>

उप सभापती : आजच्या कामकाज पत्रिकेवरील क्रमांक 8 वरील लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.सुभाष भोईर यांनी दूरध्वनीवरुन विनंती केली असल्यामुळे मी सदर लक्षवेधी सूचना पुढे ढकलत आहे.

यानंतर श्री.शिगम

अशुद्धीत पत्र / शीघ्रलेखासाठी नाही

पृ. शी. : जीवनदायी योजनेअंतर्गत शस्त्रक्रिया करण्यासाठी दर करार पत्रकानुसार यंत्रसामग्री खरेदी न करणे

मु. शी. : जीवनदायी योजनेअंतर्गत शस्त्रक्रिया करण्यासाठी दर करार पत्रकानुसार यंत्रसामग्री खरेदी न करणे यासंबंधी डॉ. दीपक सावंत,श्री. दिवाकर रावते, व डॉ. निलम गो-हे ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील दारिद्र्य रेषेखालील जनतेला अतिगंभीर आजारावंर शस्त्रक्रिया करण्यासाठी शासनाने सुरु केलेल्या योजनेत आवश्यक असणारी यंत्रसामुग्री दर करारावर खरेदी न करता संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधक तसेच जिल्हा शल्यचिकित्सक यांनी दर करारावर नसलेल्या खाजगी पुरवठादारांकडून खरेदी करणे, त्याबाबतची लाखो करोडो रुपयांची देयके खाजगी पुरवठादारांकडून शासनास सादर होणे, सदर गैरव्यवहाराची उच्च पातळीवरुन चौकशी होण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

प्रा. फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : द्रारिद्र्य रेषेखालील लोकांसाठी 1997 पासून जीवनदायी योजना राबविलेली आहे. मध्यंतरी जीवनदायी योजना बंद करुन राज्यातील 4 जिल्ह्यांमध्ये हेल्थ कार्ड योजना राबविली जाणार आहे असे मंत्री महोदयांनी सूचित केले होते. जानेवारी 2010मध्ये यासंदर्भात बैठक झाली होती. संपूर्ण राज्यातील जीवनदायी योजनेचा आढावा मंत्री महोदयांनी घेतला होता. माझे तीन प्रश्न आहेत. यंत्रसामग्रीसाठी दरकरार नाही असे निवेदनामध्ये नमूद केलेले आहे. प्रश्न असा आहे की, ओपन हार्ट सर्जरीसाठी सीव्हीटीएससाठी स्टेण्ट, बलून खरेदी केले जातात. अशा प्रकारच्या अनेक गोष्टी खरेदी केल्या जातात. या खरेदीसाठी दर करार पत्रक तयार केले जाते. परंतु डॉक्टरांकडून यंत्रसामग्रीची खरेदी दर करार प्रत्रकानुसार केली जात नाही. ज्यांच्या कडून दर करार पत्रक केले जाते ते कंपनीकडून तीन-तीन कोटीचे डिपॉझिट घेतात आणि कंपनीकडून अमूक प्रकारची 100 टक्के यंत्रसामग्री, अमुक प्रकारची 50 टक्के आणि अमुक प्रकारची 33 टक्के यंत्रसामग्री खरेदी केली जाईल असे कंपनीला सांगातात. तेव्हा दर करार पत्रकाप्रमाणे यंत्रसामग्री खरेदी न करणा-या डॉक्टरांवर कारवाई करण्यात येणार आहे काय ? दर करार पत्रकाप्रमाणे स्टेण्टची किंमत 50 ते 60 हजार रु. आहे. परंतु बाजारात त्याची किंमत लाखाच्या आसपास जाते. परिणामी जीवनदायी योजनेअंतर्गत दोन ऑपरेशन्स ऐवजी एकच ऑपरेशन होते. राज्यामध्ये जीवनदायी योजनेअंतर्गत एकूण किती ऑपरेशन्स झाली आणि त्यासाठी किती निधी लागला ?

प्रा. फौजिया खान : यंत्रसामग्री आर.सी.वर घेतली जात नाही असे लक्षवेधीच्या निवेदनामध्ये नमूद केलेले आहे. त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही. तरीही माननीय सदस्यांनी असे स्फेसिफिक प्रकरण लक्षात आणून दिले तर त्याबाबतीत कारवाई करण्यात येईल. ऑक्टोबर 2010पर्यन्त राज्यामध्ये 6404 रुग्णांवर उपचार करण्यात आले आणि त्यासाठी एकूण 53 कोटी रु.खर्च झालेला आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले की, आर.सी.वर औषधांची खरेदी डॉक्टर करीत असतील तर कारवाई केली जाईल. अशी उदाहरणे अनेक आहेत. ज्यावेळी रुग्ण हार्टसर्जरीसाठी डॉक्टरांकडे जातो त्यावेळी अँजिओप्लास्टी, अँजिओग्राफी करावयाची असल्यास स्टेंट टाकला जातो. जे.जे.रुग्णालयातील डॉ.बंग आणि इतर कार्डिओलॉजिस्ट अशा रुग्णांना स्टेंट उपलब्ध नसल्यामुळे तो बाहेरुन आणण्यास सांगतात. माझ्याकडे दर करारपत्राची प्रत उपलब्ध आहे. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्याकडे अनेक लोकांनी तक्रारी केलेल्या आहेत. या प्रकरणाची चौकशी करुन जीवनदायी योजनेतून अधिकाधिक शस्त्रक्रिया होण्यासाठी पुढाकार घेण्यात येईल काय? सभापती महोदय, सध्या जीवनदायी योजनेमधून हृदयावरील शस्त्रक्रियेकरिता जे.जे.रुग्णालय, नागपूर रुग्णालय आदी विविध रुग्णालयांमध्ये 450 रुग्ण प्रतिक्षा यादीवर आहेत. त्यांच्या शस्त्रक्रिया केव्हापर्यंत करण्यात येतील?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर मी यापूर्वीच दिलेले आहे. असे प्रकार होत असल्याचे लक्षात आणून दिल्यास जरुर कारवाई करण्यात येईल. सन्माननीय सदस्य याठिकाणी जी माहिती देत आहेत ती असत्य आहे असे मला म्हणता येणार नाही. जर स्पेसिफिक प्रकरण लक्षात आणून दिले तर त्याबाबत निश्चित विचार करता येईल. अशी प्रकरणे सन्माननीय सदस्यांनी निदर्शनास आणून दिली तर विचार करता येऊ शकेल. प्रतिक्षा यादीवर जे रुग्ण आहेत त्यांच्या शस्त्रक्रिया लवकरात लवकर करण्यात येतील.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, नागपूरच्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये फार मोठी प्रतिक्षा यादी आहे. एखादा दिवस निश्चित करुन त्यादिवशी बाहेरुन डॉक्टर्स बोलावून रुग्णांवरील शस्त्रक्रिया करण्याचा प्रयत्न केला जातो. प्रतिक्षा यादी संपविण्याकरिता हृदयावरील शस्त्रक्रिया करणारे तज्ज्ञ डॉक्टर्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये नेमले जातील काय? अन्यथा या योजनेचा काहीही उपयोग होणार नाही. ताबडतोब तज्ज्ञ डॉक्टर्स नेमून प्रतिक्षा यादी संपविण्यात येईल काय?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मागील आठवड्यात मंत्रीमहोदयांनी खाजगी रुग्णालयांचे डॉक्टर्स आणि इनचार्ज यांच्यासमवेत बैठक घेतली होती. येत्या 1 जानेवारीपासून विशेष मोहीम राबविण्याचे निश्चित करण्यात आले आहे. मार्च, 2011 अखेर विदर्भातील प्रतिक्षा यादीवरील सर्व रुग्णांच्या शस्त्रक्रिया करण्याचे ठरविले आहे. मोहीम हाती घेऊन सर्व शस्त्रक्रिया मार्चअखेर करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : प्रतिक्षा यादी केव्हापासूनची आहे?

प्रा.फौजिया खान : वर्ष सांगता येणार नाही. प्रत्येक रुग्णाची वेगवेगळी तारीख आहे.

उप सभापती : लक्षवेधी सूचनेवर चर्चा सुरु आहे. अशा प्रकारच्या रुग्णांबाबत खरे तर तातडीने उपाययोजना होणे अत्यंत आवश्यक आहे. मुळात हृदयावरील शस्त्रक्रियेचे रुग्ण वेटिंगमध्ये आहेत हे सांगणे शासनाला भूषणावह नाही. ही परिस्थिती अतिशय वाईट आहे. उद्या कदाचित एखादा रुग्ण दगावला तर त्याची जबाबदारी कोणाची राहणार आहे? त्यामुळे याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्या लक्षात घेता तातडीने उपाययोजना झाली पाहिजे. मी याठिकाणी शासनाला अशाप्रकारचे निर्देश देतो की, अशा प्रकारचा कोणताही रुग्ण वेटिंग लिस्टमध्ये आहे असे म्हणण्याची पाळी शासनावर येऊ देऊ नये.

प्रा.फौजिया खान : त्यामुळेच आपण विशेष मोहीम राबविण्याचे ठरविले आहे. वेटिंग लिस्ट नसावी म्हणून प्रत्येक रिजनमध्ये अशा प्रकारची मोहीम हाती घेत आहोत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आपल्या निर्देशाबद्दल मंत्रीमहोदयांनी काहीही उत्तर दिले नाही. पहिल्यांदा जीवनदायी योजना बंद करुन हेल्थ प्लॅन योजना चार जिल्हयात सुरु केली होती त्या योजनेचे काय झाले? सर्वसाधारण रुग्ण जीवनदायी योजनेचा लाभ घेण्यासाठी धाव घेतात. परंतु या योजनेमध्ये शस्त्रक्रिया होण्यास विलंब लागतो याची जबाबदारी कोणाची आहे? राज्य शासन जबाबदार नसेल तर कोण जबाबदार आहे? सभापती महोदय, आपण निर्देश दिले त्याबाबत मंत्रीमहोदयांनी कमीत कमी सजेशन फॉर ॲक्शन एवढे तरी म्हणावे.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, एक अत्यंत चांगली अशी गरिबाभिमुख, जनताभिमुख अशी ही योजना आहे. या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये त्रुटी आहेत, त्या त्रुटी दूर करुन तातडीने उपचार होतील यासाठी माननीय सभापती महोदयांनी निर्देश दिल्याप्रमाणे शासनाने कृती करावी. या योजनेची व्याप्ती वाढली आहे. अर्थसंकल्पामध्ये देखील तरतूद वाढविण्याची गरज आहे. तरच योजनेच्या लाभासंबंधीची व्याप्ती वाढू शकेल. स्वातंत्र्य सैनिकांचा देखील या योजनेत समावेश करण्याबाबत शासन विचार करील काय?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, डॉ.दीपक सावंत यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत आणि आपण जे निर्देश दिले होते त्याचा सन्मान करुन शासन 15 डिसेंबर, 2010 पासून विशेष मोहीम सुरु करीत आहे.

नंतर एन.1...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान .....

स्वातंत्र्य सैनिकांचा या योजनेत समावेश करण्यात आलेलाच आहे परंतु नव्याने 6 जिल्ह्यांमध्ये जीवनदायी योजनेचा स्कोप वाढविण्यासंबंधीची प्रक्रिया चालू आहे तसेच आरोग्य विमा योजनेसंबंधीची प्रक्रियाही शासन स्तरावर सुरु आहे.

श्री सय्यद जमा : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री दीपक सावंत ने कहा कि पिछली बार माननीय मंत्री श्री शेट्टी साहब के लेवल पर एक बड़ी मीटिंग लेकर नयी योजना बनाने का काम किया गया. माननीय मंत्री महोदया ने बताया कि इस संबंध में 15 दिसम्बर 2010 से एक मोहिम चलायी जाएगी. मैं माननीय मंत्री महोदया को बताना चाहूंगा कि हमारा राज्य जीवनदायी योजना के मामले में कई राज्यों से पीछे है. विदर्भ के किसी भी प्राइवेट हॉस्पीटल में बीपीएल के एक भी मरीज का ऑपरेशन नहीं किया जाता है. सुपर स्पेशिलिटी हॉस्पीटल के बारे में यहां पर बताया गया कि वहां पर वेटिंग लिस्ट चल रही है. इस बारे में आप पूरे राज्य के लिए चाहे जो योजना बनाए, लेकिन विदर्भ के बारे में मैं बताना चाहूंगा कि विदर्भ के अंदर एक भी प्राइवेट हॉस्पीटल, शासन के आदेश नहीं मानता है. उस बारे में शासन कुछ निर्णय लेगा क्या ?

मेरा दूसरा प्रश्न यह है कि इस वेटिंग लिस्ट को खत्म करने के लिए क्या शासन इस सदन में कुछ कमीटमेंट कर सकता है?

प्रा. फौजिया खान : महोदय, कार्पोरेट हॉस्पिटल्ससोबत आम्ही बैठक घेतली असून त्याच मोहिमेचा मी येथे उल्लेख केला आहे. तसेच या हॉस्पिटल्सनी शासनाला कमिटमेंटही दिलेली आहे. त्यांच्याकडून आमच्याकडे रुग्णांची संख्याही सांगण्यात आली असून अमुक इतक्या संख्येपुरती ताबडतोब ऑपरेशन्स करण्याचे त्यांनी मान्य केले आहे. अशा हॉस्पिटलपर्यंत रुग्णांना नेऊन सोडण्याचे काम करुन त्यांच्याकडून ही ऑपरेशन्स ताबडतोबीने करण्यात येतील.

श्री. भाई जगताप : महोदय, माननीय सभापती म्हणून आपण या विषयासंबंधी जी संवेदना व्यक्त केली त्याच्याशी संबंधितच माझा प्रश्न आहे की, नुकतीच जन्मलेली सहा महिन्यापर्यंतची जवळपास 800 बालके अशी आहेत की, त्यांच्या हृदयाला छेद आहे, त्यांना नवीन व्हॉल्व्ह बसविणे आवश्यक आहे अशी बालके सुध्दा प्रतिक्षा यादीवर आहे. वास्तविक एवढ्या लहान बालकांची मार्च महिन्यापर्यंत सहन करण्याची शक्ती देखील नसते. आतापर्यंत त्यातील दोन बालकांचा मृत्यू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप.....

देखील झालेला आहे. अशा प्रकारे 800 बालकांची ऑपरेशन्स त्वरित करण्याबाबत शासनाने कोणती पावले उचललेली आहेत ? तसेच मार्चपर्यंत ही बालके कदाचित मेलेली सापडतील कारण ती सस्टेन करु शकत नाही. म्हणून शासन एखादा धडक कार्यक्रम घेऊन ही ऑपरेशन्स पूर्ण करणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : महोदय, या 800 बालकांची तक्त्यासहित व तारखांसह संपूर्ण माहिती माझ्याकडे उपलब्ध असून त्यांच्या उपचारासंबंधीचे नियोजन कॉर्पोरेट हॉस्पिटल्सना बोलावून शासनाने केलेले आहे. तसेच ही संपूर्ण ऑपरेशन्स मार्चपर्यंत पूर्ण करण्यात येतील, त्यासंबंधीचा तक्ता मी आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवत आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : गटई कामगारांना अनुदान मिळत नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणे

मु. शी. : गटई कामगारांना अनुदान मिळत नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणे यासंबंधी सर्वश्री सुभाष चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय समाजकल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ऊन-पाऊस थंडीची पर्वा न करता रस्त्यावर चप्पल तसेच चामड्याच्या वस्तु बनविणाऱ्या गटई कामगारांना गटई कामासाठी अधिक मदत मिळावी, प्रशासकीय अधिकारी यांच्या मनमानी कारभारामुळे गटई कामगार अनुदानापासून वंचित राहत असणे, गटई कामगारांना आपला उदरनिर्वाह करण्यासाठी गटई कामगारांना शंभर टक्के अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेण्यात येणे, त्याचप्रमाणे त्यांना पत्र्याचे स्टॉल व 500 रुपये अनुदानही देण्याचा निर्णय घेण्यात येणे, परंतू या योजनेत संबंधित अधिकाऱ्यांना कोटयावधीचा भ्रष्टाचार करण्यात आल्यामुळे या योजनेची अंमलबजावणी होण्यास अनेक अडथळे निर्माण होऊन अनेक गरीब गटई कामगारांना शासनाच्या अनुदानापासून वंचित रहावे लागल्याचे आढळून येणे, शासनाकडून मंजूर झालेले अनुदान मिळत नसल्याने त्यांच्या व्यवसायाला खीळ बसणे, यामुळे त्यांच्यावर बेकारीची कुऱ्हाड कोसळून त्यांच्यावर उपासमारीची वळे येणे, यामुळे त्यांच्यात निर्माण होत असलेले तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया"

श्री.शिवाजीराव मोघे (समाजकल्याण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, दलित समाजातील दुर्बल घटक, दारिद्र्यरेषेखालील माणूस, जो रस्त्यावर बसतो, रस्त्याच्या कडेला उन्हा-तान्हात बसून दिवसरात्र शेकडो वर्षे काम करतो त्याला संरक्षण मिळण्याच्या दृष्टीने शासनाने एक योजना तयार केली आहे. त्यानुसार 500 रुपये अनुदान व एक स्टॉल अशी ही योजना 31 डिसेंबर, 1997 ला सुरु केली व ती गेल्या अनेक वर्षांपासून चर्मोद्योग महामंडळामार्फत राबविण्यात येत होती, आता ही योजना वेगळ्याच प्रकारे राबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. ते म्हणजे संचालकांमार्फत यासंबंधीचा आराखडा तयार करण्यात येणार आहे. माझा प्रश्न असा आहे की, सन 1997 पासून सन 2011 पर्यंत, जी पूर्वीची योजना होती त्या योजनेचे काय झाले ? तसेच उत्तरात सांगितले की, योजना सुरु झाल्यानंतर सुध्दा गटई कामगारांना असे स्टॉल्स सुरु करण्यासाठी पुन्हा आराखडा तयार करण्यात येणार आहे.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण .....

आराखडा निश्चित झाल्यानंतर समाजकल्याण विभागाच्या संचालकांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समिती मार्फत निविदा प्रक्रिया पूर्ण करुन गटई कामगारांना पत्र्याच्या स्टॉलचा पुरवठा करण्यात येईल" असे म्हटलेले आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, यापूर्वी यासंदर्भातील आराखडा तयार करण्यात आला होता काय, आराखडा तयार करण्यात आला असेल तर आजतागायत प्रती वर्षी, प्रत्येकी किती स्टॉल गटई कामगारांना उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत, संपूर्ण राज्यात गटई कामगारांना देण्यात आलेल्या स्टॉलची संख्या किती आहे, हा प्रोजेक्ट किती रुपयांचा आहे, यासंदर्भात निविदा काढण्यात आली होती काय, निविदाकारांची नावे काय आहेत, तसेच हा प्रकल्प केव्हा सुरु होणार आहे ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, आपल्या राज्यातील दुर्लक्षित चर्मकार बंधूसाठी ही योजना आहे. सुरुवातीला ही योजना ग्रामपंचायत तसेच "सी" वर्ग नगरपारिषेत सुरु करण्यात आली होती. आता या योजनेची व्याप्ती वाढविण्यात आलेली आहे. आता या योजनेची व्याप्ती महानगरपालिकेपर्यंत गेलेली आहे. परंतु हायकोर्टाच्या ऑर्डर्समुळे आता स्टॉल देण्याचे बंद झालेले आहे. माझ्याकडे आता जी माहिती आहे त्याप्रमाणे सन 2007-08 मध्ये 1111 गटई कामगारांना स्टॉल देण्यात आले होते, सन 2008-09 मध्ये 110 स्टॉल देण्यात आले होते, सन 209-10 मध्ये 1399 स्टॉल देण्यात आले होते. नवीन शासन सत्तेवर आल्यापासून म्हणजे सन 2010-11 मध्ये 11 नोव्हेंबर पर्यंत 4583 स्टॉलचे वाटप गटई कामगारांना करण्यात आलेले आहे. सन्माननीय सदास्यांनी गटई कामगारांसाठी कोणती व्यवस्था करण्यात आलेली आहे असा प्रश्न उपस्थित केलेला आहे त्यामुळे मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, लिडकॉमला यासंदर्भात 23 कोटी रुपये देण्यात आले असून त्यांनी आतापर्यंत 11 कोटी 44 लक्ष रुपये खर्च केलेले असून 12 कोटी रुपये शिल्लक आहेत. अगोदर गटई कामगारांसाठी जे स्टॉल दिले जात होते त्या स्टॉलच्या पत्र्याचा गेज कमी होता परंतु आता जाड गेजचा मॉडीफाय स्टॉल दिला जाणार आहे.यासाठी आपण नवीन टेंडर काढणार आहोत. यासंदर्भात आमचे जे टारगेट आहे त्या प्रमाणे 3770 ओपन टेंडर काढले जाईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, गटई कामगारांना स्टॉल देण्याची सुरुवात ग्रामपचांयती पासून सुरु करण्यात आली होती. अशा प्रकारचे स्टॉल ग्रामपंचायतीमध्ये 2 किंवा 4 च्या वर मिळालेले नाही. माझ्या तालुक्यात 400 गटई कामगार आहेत परंतु त्यातील 10 लोकांना सुध्दा अशा प्रकारचे स्टॉल पुरवण्यात आलेले नाही. आता हे स्टॉल महानगरपालिका व नगरपालिकांमध्ये पुरवले जात आहे व ग्रामपंचायत स्तरावर हे स्टॉल देण्याचे काम जवळपास बंद झालेले आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, यावर्षी विशेष योजना म्हणून ग्रामपंचायत स्तरावर गटई कामगारांना स्टॉल दिले जाणार आहेत काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, ग्रामपंचायतीमध्ये गटई कामगारांना आपण स्टॉल देणारच आहोत परंतु जेवढी मागणी येईल त्यांना स्टॉल देण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. ग्रामपंचायती, नगरपरिषदा तसेच अ,ब,क व ड वर्गाच्या नगरपरिषदांना सुध्दा अशा प्रकारचे स्टॉल उपलब्ध करुन देण्याचा आमचा प्रयत्न राहील.

श्रीमती शोभा फडणवीस : दोन वर्षापासून गटई कामगार स्टॉलची मागणी करीत आहेत त्यामुळे मागणी केलेल्या लोकांना आपण स्टॉल उपलब्ध करुन देणार आहात काय ? ज्या लोकांनी यापूर्वी स्टॉलची मागणी केली होती अशा लोकांना नव्याने मागणी करावी लागणार आहे काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, स्टॉलच्या संदर्भात आमच्याकडे 2300 ची मागणी नोंदविण्यात आलेली आहे. तसेच मागील वर्षी 1470 स्टॉल पुरवण्यात आले नव्हते ते सुध्दा दिले जाणार आहेत. समाज कल्याण अधिका-याकडे गटई कामगारांच्या संदर्भातील माहिती असते. जेवढी स्टॉलची मागणी असेल तेवढया प्रमाणात आम्ही स्टॉल उपलब्ध करुन देत असतो. ज्या गटई कामगारांनी स्टॉल मिळण्यासाठी अर्ज केले होते ते अर्ज सुध्दा स्वीकारले जातील तसेच नवीन अर्ज आले तर ते सुध्दा स्वीकारले जातील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याचे मुद्दे

पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परपवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, आज मीरा-भाईंदर महापालिकेत कडकडीत बंद पाळण्यात येत आहे. मीरा-भाईंदर महापालिकेत अनेक गोष्टी बेकायदेशीर होत आहे. या महापालिकेत पाण्याची दरवाढ व मालमत्तेची करवाढ करण्यात आलेली आहे. अशा प्रकारची करवाढ करावयाची असेल तर मुंबई प्रांतिक कायदा 1999 प्रमाणे कोणतीही पाणी दरवाढ,मालमत्ता करवाढ करावयाची असेल तर वर्षाच्या 20 फेबुवारी प्रर्यंत प्रस्तावाची मान्यता महासभेत घेणे बंधनकारक असते.

सभापती महोदय, परंतु करवाढ करतांना महासभेपुढे न जाता स्थायी समितीची मंजूरी घेऊन ही करवाढ करण्यात आलेली आहे. पाणी दरवाढ 50 टक्के व व्यापा-यांसाठी 300 टक्के केलेली आहे. मालमत्ता करात 70 टक्के करवाढ करण्यात आलेली आहे व नवीन मालमत्तेसाठी 140 टक्के करवाढ करण्यात आलेली आहे. या ठिकाणी जी काही करवाढ करण्यात आलेली आहे ती अत्यंत बेकायदेशीपणे करण्यात आलेली आहे. यासंदर्भात जेव्हा हायकोर्टात याचिका देण्यात आली त्यावेळेस हायकोर्टाने मीरा-भाईंदर महापालिकेला विचारणा केली की, ही करवाढ करतांना आपण शासनाची मंजुरी घेतली होती काय ?

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.....

मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आयुक्तांनी प्रतिज्ञापत्र दिलेले आहे की, करवाढ आणि दरवाढी संदर्भात मंजुरी घेण्याकरिता शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. असे असताना पाणी दरवाढ आणि करवाढ संबंधीची वसुली आणि दंड वसुली सुरु आहे. त्यामुळे तेथील जनतेत आणि व्यापारी वर्गामध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. या कर वाढ आणि दर वाढीच्या निषेधार्थ भाईंदर शहर बंद आहे. कर आणि दर वाढी संदर्भात शासनाची मंजुरी घेतल्याशिवाय ती आकारण्यात येऊ नये अशी माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे.

उपसभापती : मीरा-भाईंदर महानगरपालिकेने राज्य शासनाची मंजुरी न घेता पाणी दरवाढ आणि मालमत्तेची कर वाढ केलेली आहे असा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी मांडला. मी शासनाला सूचित करतो की, या प्रकरणी तातडीने लक्ष घालून योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.शिवाजीराव मोघे : होय.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपण मला एका महत्वाच्या विषयावर औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्याची परवानगी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानते.

सभापती महोदय, अधिवेशनाचा हा शेवटचा आठवडा आहे. सन 2008 मध्ये पुणे येथे झालेल्या राष्ट्रीय युवा क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने पुणे शहरात विविध कामांवर 450 कोटी रुपये खर्च झाले. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने 50 कोटी रुपयांची कामे केली असे सांगण्यात येते. राज्य क्रीडा विभागाने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी निधी दिला होता. हा निधी अर्थ विभागाने खर्च केला की क्रीडा विभागाने खर्च केला हे कोणाला माहीत नाही अशी परिस्थिती आहे. मी या ठिकाणी कोणाचे नाव घेऊ इच्छित नाही, त्या नेत्याचे काऊन्ट डाऊन सुरु आहे. त्यांना काँग्रेस कमिटीचा राजीनामा द्यावा लागला आहे. अधिवेशनाचा हा शेवटचा आठवडा आहे. तत्कालीन वित्त मंत्री माननीय श्री.सुनील तटकरे हे पुणे येथे आले असताना त्यांनी या संबंधातील हिशोब घेण्यात येईल असे सांगितले होते. आता विद्यमान उपमुख्यमंत्री यांचेकडे वित्त विभागाचा कार्यभार आहे. तेव्हा या राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धामध्ये झालेल्या खर्चाचा हिशोब घेऊन ज्यांनी गैरव्यवहार केला असेल त्यांच्यावर कारवाई करावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. दिनांक 7 डिसेंबर 2010 पासून कोल्हापूर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने कोणतीही पूर्व सूचना न देता किंवा पर्यायी जागेची व्यवस्था न करता मोठ्या प्रमाणावर तोडफोड सुरु केली आहे. या तोडफोडीची जवळपास 10 हजार लोकांना झळ पोहोचली आहे. फेरीवाल्यांना हटविण्यात आले आहे त्याचप्रमाणे दुकानदारांचे नावांचे बोर्ड कोणतीही पूर्व सूचना न देता तोडण्यात आले आहेत. राष्ट्रीय फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. तसेच त्यांना कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना न देता कारवाई करण्यात येत आहे. तेव्हा माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे की, अधिवेशन संपल्यानंतर लोकप्रतिनिधी आणि फेरीवाल्यांची एक बैठक घेऊन या प्रश्नावर तोडगा काढावा.

उपसभापती : कोल्हापूर शहरात रस्ता रुंदीकरण करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. त्यास विरोध नसला तरी याठिकाणी कोल्हापूर जिल्ह्यातील दोन मंत्री उपस्थित आहेत त्यांनी संबंधितांची आणि लोकप्रतिनिधींची एक बैठक घ्यावी.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आदिवासी भागात आय.टी.आय. मार्फत आदिवासी मुलांना प्रशिक्षण देण्यात येते. हे शिक्षण देणा-या शिक्षकांना 5000 रुपया ऐवजी 15000 रुपये पगार देण्याच्या संदर्भात या पूर्वी सभागृहात प्रश्न मांडण्यात आला होता त्यावेळी तत्कालीन राज्यमंत्र्यांनी त्याबाबतीत आश्वासन देऊनही ते न पाळल्यामुळे आदिवासी भागातील आय.टी.आय. शिक्षकांनी दिनांक 6.12.2010 रोजी आमरण उपोषण सुरु केले असून दिनांक 12.12.2010 रोजी दोन जणांना रुग्णालयात दाखल केले होते तेव्हा या बाबतीत शासनाने तात्काळ दखल घेऊन उपाययोजना करावी अशी मी औचित्याच्या मुद्याव्दारे शासनाला विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. नवी मुंबई, जिल्हा ठाणे येथील नेरुळच्या सेंट झेविअर्स हायस्कूलमध्ये 100 पेक्षा अधिक शिक्षक काम करीत आहेत आणि पाच हजारा पेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शिक्षकांच्या वेतनासंबंधीचा वाद तेथील व्यवस्थापना बरोबर सुरु असल्यामुळे गेल्या सहा दिवसापासून शिक्षकांनी काम बंद आंदोलन सुरु केलेले आहे.आज पासून सर्व विद्यार्थी आणि पालकही या आंदोलनात सहभागी झालेले आहे त्यांचे असे म्हणणे आहे की ,आमच्याकडून फी वसूल केली जाते पंरतु शिक्षकांना मात्र पूर्ण वेतन दिले जात नाहीत त्यामुळे विद्यार्थी आणि पालक देखील या आंदोलनात उतरले आहेत.त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेची गंभीर स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. शासनाने दखल घ्यावी अशी माझी औचित्याच्या मुद्याव्दारे शासनाला विनंती आहे. त्या ठिकाणचे आदोलन स्थगित करण्यात यावे व शाळा लवकर सुरु करावी यासबंधी आपण शासानाला निदेश दिले तर बरे होईल.

उप सभापती : या संदर्भात शासनाने लक्ष घालावे असे मी निदेश देतो.

श्री.भाई जगताप : याबाबतीत माननीय मंत्री महोदय काहीच उत्तर देत नाही.

उप सभापती : नेरुळ येथील सेंट झेविअर्स हायस्कूलसंबंधी सन्माननीय सदस्य श्री रामनाथ मोते यांनी जो औचित्याचा मुद्दा मांडला आहे त्याची शासनाने ताबडतोब दखल घ्यावी तसेच या शाळेमध्ये जो काही प्रश्न निर्माण झाला आहे तो त्वरित सोडवावा अशा सूचना जिल्हा शिक्षणाधिका-यांना द्याव्यात .

श्री.शिवाजीराव मोघे : याबाबतीत दखल घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र.पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मझा औचित्याचा मुद्दा आहे. लातूर येथे अंध श्रध्दा निर्मूलन समिती मार्फत लोकजागृतीची एक दिंडी काढण्यात येत असून त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले , शाहू छत्रपती महाराज यांचे फोटो तुडविण्यात आलेले आहे. विशिष्ट लोकांनी त्या दिंडीवर हल्ला केलेला आहे.या राज्याचे ज्येष्ठ नेते प्रा. एन.डी. पाटील आणि बाकीचे कार्यकर्ते या दिंडीमध्ये सामील झालेले असून 15 दिवस ही दिंडी चालणार आहे तिला पूर्णपणे संरक्षण दिले पाहिजे तसेच ज्या लोकांनी या दिंडीवर हल्ला केलेला आहे. त्यासबंधी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.त्यांच्याविरुध्द त्वरित कारवाई केली पाहिजे तसेच राज्य सरकारकडून या दिंडीला संरक्षण मिळाले पाहिजे यासाठी मी ही बाब औचित्याच्या मुद्याव्दारे शासनाच्या निदर्शनास आणत आहे.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी जो औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे तो अत्यंत महत्वाचा आहे. जागृती करण्यासाठी अंधश्रध्दा निर्मूलन समितीने मोहीम सुरु केली होती परंतु काही लोकांना जर ही बाब पटत नसेल तर त्यांनी आपला निषेध नोंदवावा पंरतु दिंडीतील लोकांना मारहाण करणे बरोबर नाही. तेव्हा ज्यांनी मारहाण केली आहे त्यांच्याविरुध्द कारवाई केली पाहिजे राज्यामध्ये अंधश्रध्दा वाढवणारे हे लोक आहेत. महाराष्ट्रातील प्रथा, परंपरा ते पुसून टाकू इच्छितात त्यामुळे त्यांना कडक शिक्षा करावी .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : यानंतर सन्माननीय सदस्या ॲड उषा दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

ॲड उषा दराडे : सभापती महोदय माझा औचित्याचा मुद्दा आहे. कै.हेमंत करकरे यांना मालेगाव्या तपासाच्या संदर्भात हिंदूवादी संघटनांनी मारण्याची धमकी दिली होती असे हेमंत करकरे यांनी श्री. दिग्विजय सिंग यांना सांगितले होते. याबाबतीत गेल्या दोन तीन दिवसापासून वर्तमानपत्रामध्ये आणि इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये सारखी बातमी येत आहे तेव्हा या संदर्भात राज्य शासनाने खुलासा करावा व लोकांच्या मनातील संभ्रम दूर करावा यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

डॉ नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड उषा दराडे यांनी महत्वाचा औचित्याचा मुददा मांडला असून कै. करकरे यांच्या हौतात्म्याचे राजकारण करता कामा नये. अशा प्रकारे श्रीमती करकरे यांनी अत्यंत तीव्र भावना व्यक्त केल्या होत्या. श्री. दिग्विजिय सिंग यांनी त्यांचे स्टेटमेन्ट मागे घेतले होते असे मी वाचले आहे.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा बरोबर नाही. त्यांनी आपले स्टेटमेंट मागे घेतलेले नाही, त्यांनी त्याबाबत खुलासा केला आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, मी जे बोललो त्याचा वेगळा अर्थ लावण्यात आला आहे. त्यामुळे त्यांनी आपले स्टेटमेंट मागे घेतले हे वाक्य कामकाजातून काढून टाकण्यात यावे अशी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुंखे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. भगवानराव साळुंखे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, या नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये वेगवेगळया प्रकारचे मोर्चे निघत असतात. शिक्षण क्षेत्रामध्ये विशेषत: बालवाडी, प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे मोर्चे निघतात. प्रत्येक वेळेला शासनातर्फे वेळकाढू धोरण स्वीकारले जाते. त्यामुळे नाराज होऊन राज्यातील सर्व शिक्षक संघटनांनी एक समन्वय समिती गठीत केली असून त्या संघटनेने आज दुपारी 3.00 वाजता मोर्चा काढण्याचे ठरविले आहे. त्यांची एकच मागणी आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी आता त्यांच्याशी बोलावे. त्यांच्या प्रत्येकाच्या जिव्हाळयाच्या मागण्या आहेत. ते कॉमन, समान व किमान मागण्या घेऊन येत आहेत. तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्याशी बोलावे अशी आपण शासनाला विनंती करावी. जेणेकरुन त्यांचे प्रश्न मार्गी लागणे सोपे होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिपकराव साळुंखे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. दिपकराव साळुंखे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, सोलापूर जिल्हयामध्ये एकमेव विद्यापीठ आहे. तेथील मॅनेजमेंट कौन्सिलची निवडणूक 16 डिसेंबरला कुलगुरुंनी जाहीर केली आहे. आपल्या सभागृहामधील दोन सन्माननीय सदस्य व विधानसभेमधील दोन सन्माननीय सदस्य हे मतदार आहेत. तसेच, चार अधिकारी त्यामध्ये मतदार आहेत. आपले अधिवेशन 16 डिसेंबर रोजी संस्थगित होत आहे. याबाबत विद्यापीठाच्या कुलगुरुंना माहीत असून सुध्दा आणि या अधिवेशनामध्ये दोन्ही सभागृहांचे माननीय सदस्य उपस्थित रहाणार आहेत हे त्यांना माहीत असून सुध्दा त्यांनी जाणीवपूर्वक 16 डिसेंबर रोजी निवडणुका ठेवल्या आहेत. त्यामुळे दोन्ही सभागृहामधील माननीय सदस्यांना मतदानामध्ये सहभाग घेता येणार नाही ही गंभीर बाब आहे. तेव्हा याबाबत आपण लक्ष घालावे अशी विनंती करतो.

उपसभापती : सोलापूर विद्यापीठ सिनेटची निवडणूक 16 डिसेंबर रोजी जाहीर करण्यात आली आहे. त्या निवडणुकीमध्ये आपल्या सभागृहातील दोन सन्माननीय सदस्य मतदार आहेत. आपले अधिवेशन सुरु असल्यामुळे व मतदार याठिकाणी असल्यामुळे त्या दिवशी त्यांना मतदान करणे शक्य होणार नाही. तेव्हा दि. 16 डिसेंबर रोजी होणारी निवडणूक एक-दोन दिवस पुढे ढकलण्याबाबत आपण कुलगुरुंना सूचना कराव्यात.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, ही बाब तपासून कायदेशीर कारवाई केली जाईल.

उपसभापती : आता सभागृहाची विशेष बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.15 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.28 ते 1.15 पर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावासंबंधी

सभापती : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये दोन प्रस्ताव आलेले आहेत. पहिला प्रस्ताव सकाळी 9 वाजून 8 मिनिटांनी आलेला आहे आणि दुसरा प्रस्ताव सकाळी 11 वाजून 44 मिनिटांनी आलेला आहे. या अधिवेशनाचा फक्त चार दिवसांचा अवधी शिल्लक आहे. आजचा दिवस सोडला तर या अधिवेशनाचे तीनच दिवस शिल्लक आहेत. यामध्ये अंतिम आठवडा प्रस्ताव आणि उद्या विरोधी पक्षातर्फे देण्यात येणाऱ्या विषयावरील प्रस्ताव असे दोन प्रस्ताव चर्चेला येणार आहेत. आज नियम 289 अन्वये पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, रामदास कदम, डॉ. नीलम गोऱ्हे, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री परशुराम उपरकर, किरण पावसकर यांनी पुणे जिल्ह्यातील लवासाच्या अनुषंगाने दिलेला आहे. हा विषय नियम 289 मध्ये कसा बसतो याबाबत सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात सांगावे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पुणे जिल्ह्यातील लवासा सिटी कॉर्पोरेशन या प्रकल्पाच्या संदर्भामध्ये अनेक अनियमितता झालेल्या आहेत आणि यातील ज्या मुख्य अनियमितता आहेत त्यामध्ये कृष्णा खोऱ्याची जमीन जसी या कॉर्पोरेशनला देण्यात आली तशीच दुसरी महत्वाची बाब अशी की, मी या लवासा परिसरातील गावांना तीन वेळा भेटी दिल्या आणि वेगवेगळ्या गावांमध्ये ग्रामस्थांची जी कोंडी झालेली आहे त्यामध्ये लवासा एक एक जमीन घेत सुटलेले आहे. गावकऱ्यांना पाणी, वीज यासारख्या सुविधांपासून वंचित राहावे लागते. आज ज्याप्रकारचे बांधकाम लवासामध्ये झालेले आहे त्यामध्ये वरसगाव धरणाचे जे पाणी पुणे शहर आणि आसपासच्या परिसराला मिळते ते त्यांनी परस्पर धरणातून घेतलेले आहे. पर्यावरणाच्या संदर्भात धरणामध्ये मातीचा भर घालण्याचे काम लवासाने केलेले आहे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री.जयराम रमेश यांनी लवासा कॉर्पोरेशनला नोटीस दिलेली आहे. आदिवासींना भूमिहीन म्हणून मिळालेल्या जमिनी लवासा कॉर्पोरेशन परस्पर घेत आहे. त्याबद्दलच्या केसेस कोर्टात चालू आहेत. लवासासारखे तिसरे शहर मुळशी तालुक्यामध्ये 5500 हेक्टरवर उदयास येत आहे. ग्रामपंचायत व स्थानिक स्वराज्य संस्थांचे अस्तित्व नाकारुन मोठमोठया धनदांडग्यांना जमिनी दिल्या जात आहेत याबद्दल सरकारची काय भूमिका आहे, सरकारचे काय कर्तव्य आहे हे जाणून घेणे आवश्यक असल्यामुळे आपण नियम 289 वरील प्रस्तावाच्या चर्चेला परवानगी द्यावी. सरकार ग्रामस्थांच्या बाजूने उभे आहे हे दाखविण्यासाठी आपण आम्हाला संरक्षण द्यावे. जेणे करुन केंद्रीय पर्यावरण विभागाच्या नोटीसबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट होईल. मी आपली आभारी आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी दिलेल्या नियम 289 वरील प्रस्ताव मी स्वीकारावा किंवा नाही याबाबतचा निर्णय घेण्यापूर्वी या विषयाबाबतची लक्षवेधी सूचना येत्या चार दिवसात सभागृहात येण्याची व्यवस्था केली जाईल.

नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या पहिल्या प्रस्तावाबाबत मी सांगेन की, माननीय सदस्यांनी जो विषय उपस्थित केलेला आहे तो आजच्या कामकाजपत्रिकेत समाविष्ट नसल्यामुळे मी या प्रस्तावाला अनुमती नाकारीत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे अधिवेशन सुरु होण्यापूर्वी लवासा हा विषय चर्चेचा विषय ठरला आहे. केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री.जयराम रमेश यांनी लवासा हा प्रकल्प बेकायदेशीर आहे असे म्हटलेले आहे. त्यांनी या कॉर्पोरेशनला नोटीस दिली आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या दृष्टीने हा तातडीचा विषय आहे. आमच्या पिण्याच्या पाण्याचे काय होणार अशी धास्ती पुणे शहरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेली आहे. म्हणून या विषयावर चर्चा होणे आवश्यक आहे असे आम्हाला वाटते. आपण आमचा प्रस्ताव नाकारला आहे, पण या प्रस्तावावर चर्चा झाली पाहिजे अशी आमची भूमिका आहे, तशी आपलीही भूमिका असली पाहिजे. सरकारची बाजू समोर येण्यासाठी हाच एक मार्ग आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : अधिवेशनाचा राहिलेला तीन दिवसाचा कालावधी विचारात घेता सन्माननीय सदस्यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे त्या अनुषंगाने आपल्याला विचार करावा लागेल. माझी आपल्याला विनंती आहे. येत्या दोन दिवसामध्ये विरोधी पक्षाकडून एक प्रस्ताव चर्चेला येणार आहे तसेच अंतिम आठवडा प्रस्ताव देखील आपल्याकडून दिला जाणार आहे. त्या प्रस्तावामध्ये जर हा विषय समाविष्ट केला तर ते योग्य होईल असे मला वाटते. त्यामुळे मी या प्रस्तावाला अनुमती नाकारलेली आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून बोलत असतात.)

मी यासंदर्भात सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, उद्या माझ्या दालनामध्ये विरोधी पक्ष नेते, गट नेते यांना बोलवितो. आज आपण नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिला आहे त्याबाबत तेथे काय करता येईल यावर विचार करण्यात येईल. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे येत्या दोन दिवसात विरोधी पक्षाकडून येणारा प्रस्ताव व अंतिम आठवडा प्रस्ताव या दोन प्रस्तावात हा विषय समाविष्ट करणे शक्य झाले तर त्या अनुषंगाने जरुर विचार करु.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये जवळपास 270 घोटाळे झालेले आहेत. आपण म्हणालात त्याप्रमाणे विरोधी पक्षाकडून येणा-या प्रस्तावाच्या वेळी या प्रस्तावाचा विचार केला जाईल. एवढे घोटाळे झालेले असल्यामुळे विरोधी पक्षांच्या प्रस्तावांमध्ये हा आणखी एक घोटाळा कसा काय समाविष्ट करावयाचा ?

सभापती : त्यावेळी काय करावयाचे ते मी पाहतो.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : तोंडी उत्तरे

राज्यातील विना अनुदानित शाळेत केलेली सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरण्याबाबत

(१) * ९०२३ श्री.वसंतराव खोटरे , श्री.दिलीपराव सोनवणे , श्री.भगवान साळुंखे : तारांकित प्रश्न क्रमांक ६८०३ ला दिनांक १६ जुलै, २०१० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विना अनुदानित शाळेत केलेली सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरण्याबाबतचा दिनांक २८ नोव्हेंबर, २००६ चा शासन निर्णय निर्गमित करतांना त्यामागे कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा उल्लेख करण्याचे राहून गेल्यामुळे व उच्च माध्यमिक शिक्षण हा माध्यमिक शिक्षणाचाच एक वरिष्ठ स्तरीय भाग असल्याने उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा समावेश करुन हा भेदभाव संपुष्टात आणण्यासाठी शासन निर्णयात सुधारणा करण्याच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकाने विनाअनुदानित शाळेत केलेली सेवा वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरली पाहिजे असा सुस्पष्ट धोरणात्मक निर्णय मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सन २००३ च्या याचिका क्रमांक ५०५६ मध्ये दिनांक, ४ डिसेंबर, २००३ रोजी दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, या प्रकरणी होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान, **श्री. राजेंद्र दर्डा** यांच्याकरिता : (1) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(2) संबंधित शिक्षकाने दाखल केलेल्या सदर याचिकेच्या निकालात मा. उच्च न्यायालयाने विनाअनुदानित सेवा वरिष्ठ श्रेणीसाठी ग्राह्य धरण्याचे आदेश दिले आहेत.

(3) निकालाच्या अनुषंगाने याचिकाकर्त्यास लाभ देण्यात आला आहे.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, हा प्रश्न सभागृहात बत्तीसवेळा आलेला आहे. या प्रश्नासंबंधी आपण सुध्दा माननीय शिक्षण मंत्र्यांना निदेश दिले होते. राज्यातील विना अनुदानित शाळांमधील केलेली सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राहय धरण्याबाबत 2 नोव्हेंबर, 2006 रोजीचा जी.आर.काढताना कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचा उल्लेख करण्याचे राहून गेल्यामुळे उच्च माध्यमिक शिक्षक हे माध्यमिक शिक्षणाचा भाग असल्यामुळे माध्यमिक शिक्षकांना यामध्ये समाविष्ट करुन हा भेदभाव संपुष्टात आणावा. त्यावेळी मंत्री महोदयांनी ही बाब शासनाच्या

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विचाराधीन आहे, असे सांगितले होते. दिनांक 23 जुलै रोजी तत्कालीन माननीय शिक्षण मंत्री श्री.पुरके यांनी उत्तर दिले आहे की, दि.28.11.2000 च्या जी.आर.मध्ये तसा उल्लेख नसून तशी दुरुस्ती करण्यात येईल. त्यावेळी ही चूक राहिली असल्याचे त्यांनी कबूल केले आहे. तरी देखील यामध्ये दुरुस्ती केली नाही. त्यामुळे शिक्षक कोर्टात गेले.

यानंतर श्री.शिगम

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा...

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, 71 शिक्षकेतर कर्मचारी न्यायालयामध्ये गेल्यानंतर न्यायालयाने त्यांच्या बाजूने निर्णय दिलेला आहे. शिक्षकेतर कर्मचा-यांनी न्यायालयामध्ये याचिका दाखल केली. याचिका क्रमांक...

सभापती : प्रश्नोत्तराच्या तासामध्ये सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारणे अपेक्षित आहे. एखादी बाब त्यांना सविस्तर कथन करावयाची असेल तर तसे कथन त्यांना करता येणार नाही.

श्री. वसंतराव खोटरे : तेव्हा हा जो धोरणात्मक प्रश्न आहे त्याबाबतीत शासन अधिवेशन संपण्यापूर्वी शासन निर्णय निर्गमित करील काय ?

प्रा. फौजिया खान : सन्माननीय सदस्यांचा प्रश्न समजलेला नाही.

श्री. वसंतराव खोटरे : विनाअनुदानित शाळेतील सेवेचा लाभ वरिष्ठ आणि निवडश्रेणी बरोबरच प्राथमिक आणि उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांना तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना दिला जाईल काय ?

प्रा. फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी न्यायालयाच्या निर्णयाचा उल्लेख केला. कोर्टाचा निर्णय वैयक्तिक स्वरुपाचा असला तरी याबाबतीत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्राथमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांनासुध्दा लाभ मिळावा यासाठी शिक्षण विभागाने मंत्री मंडळासमोर प्रस्ताव ठेवलेला आहे.

श्री. कपिल पाटील : माध्यमिक शिक्षकांच्या बाबतीत याबद्दलचा निर्णय 2005 साली झालेला आहे. त्यामध्ये उच्च माध्यमिक आणि प्राथमिक असा उल्लेख करण्याचे राहून गेले हे माननीय मंत्री महोदयांनी देखील कबूल केलेले आहे. माननीय न्यायालयाने मागची सेवा ग्राह्य धरावी असा निर्णय दिलेला आहे. समान न्याय संकल्पनेच्या निर्णयानुसार हा निर्णय प्राथमिक आणि उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना लागू करण्याचा हा विषय आहे. तेव्हा त्यांना पेन्शन आणि ग्रच्युईटी मिळण्याच्या संदर्भात मागील सेवा ग्राह्य धरण्याबाबत शासन ताबडतोबीने निर्णय घेईल काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा : सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे मागील काही अधिवेशनामध्ये हा प्रश्न सातत्याने मांडण्यात येत आहे. तो भाग निर्णयामध्ये समाविष्ट करण्याचे राहिले किंवा नाही या बाबतच्या तपासणीमध्ये मी जात नाही. परंतु विनाअनुदानित शाळेतील सेवेचा लाभ वरिष्ठ आणि निवडश्रेणी बरोबरच प्राथमिक आणि उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांना दिला पाहिजे याबद्दल मी सन्माननीय सदस्यांच्या मताशी सहमत आहे. विनाअनुदानित शाळेतील सेवेचा लाभ हा केवळ शिक्षकांपुरताच मर्यादित न ठेवता तो शिक्षकेतर कर्मचा-यांना दिला पाहिजे या सन्माननीय सदस्यांच्या भूमिकेशीही शासन तत्वत: सहमत आहे.

....नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा..... ता.प्र.क्र.9023....

सभापती महोदय, हा प्रश्न सोडविण्यामध्ये विलंब झाला हे खरे आहे. हा विषय अत्यंत तातडीने मंत्रिमंडळासमोर आणण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत, हे याठिकाणी रेकॉर्डवर सांगू इच्छितो.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या विषयाबाबत 28 नोव्हेंबर, 2006 रोजी जो निर्णय झाला तो निर्णय शिक्षक या व्याख्येमध्ये बसणाऱ्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षकांना लागू व्हावयास पाहिजे होता. तो निर्णय फक्त माध्यमिक शिक्षकांना लागू झाला, ही चूक झाली. ती चूक दुरुस्त होणे आवश्यक होते. दिनांक 19 एप्रिल, 2010 रोजी या सभागृहात याच विषयावरील माझी लक्षवेधी सूचना चर्चेला आलेली होती. त्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना माननीय मंत्रीमहोदयांनी असे सांगितले होते की, प्रस्ताव संचालनालयाकडून प्राप्त झालेला आहे. 27.41 कोटी रुपये खर्च येणार असून प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर गेलेला आहे. आता सन्माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, लवकरात लवकर प्रस्ताव कॅबिनेटपुढे आणणार आहोत. प्रश्न असा आहे की, दिनांक 19 एप्रिल, 2010 नंतर आतापर्यंत मंत्रिमंडळाच्या अनेक बैठका झाल्या. मंत्रिमंडळासमोर हा विषय गेला असेल तर त्यावर अद्याप चर्चा का झाली नाही? त्यामुळे पुढील मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये या विषयासंबंधी आग्रह धरुन मागील 4 वर्षापासून ज्या प्रश्नासाठी आम्ही भांडत आहोत त्या प्रश्नाला न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल काय? शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्याय दिला जाईल काय?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, हा प्रस्ताव कॅबिनेटपुढे गेला होता. कॅबिनेटपुढे प्रस्ताव जात असताना अशी नोंद करण्यात आली की, काही मुद्यांबद्दल त्रुटी असल्यामुळे मुख्य सचिवांशी चर्चा करावी. त्यानुसार जो खुलासा मागविला आहे त्याबद्दलची नस्ती प्रधान सचिवांनी सादर केली आहे. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी या दोघांनाही फायदा मिळाला पाहिजे म्हणून लवकरात लवकर कॅबिनेटपुढे हा विषय आम्ही निश्चितपणे आणू.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माजगांव हरिजनवाडी (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदूर्ग) येथे
भारत निर्माण योजनेत झालेला भ्रष्टाचार

(२) * ९८१८ श्री.परशुराम उपरकर , डॉ.दिपक सावंत , श्री.किरण पावसकर : सन्माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजगांव हरिजनवाडी (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदूर्ग) येथे भारतनिर्माण योजनेंतर्गत ७ लाख २८ हजार रक्कमेची विहिरीला मंजूरी देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विहिरीचे काम न करता ग्रामीण पाणीपुरवठा स्वच्छता समिती अध्यक्ष व सचिव यांनी परस्पर अडीच लाख एवढी रक्कम ठेकेदाराला दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामाचे तांत्रिक सेवा पुरवठादार म्हणून उपअभियंता, ग्रामीण पुरवठा उपविभाग, सावंतवाडी असूनही या झालेल्या ग्रामस्थांच्या तक्रारीकडे पंचायत समितीच्या व जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी कोणतीही दखल घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

श्री.रणजित कांबळे, प्रा.लक्ष्मणराव ढोबळे यांच्याकरिता : (१) होय.

(२) माजगांव हरिजनवाडी सार्वजनिक पिण्याच्या पाण्याची विहीर बांधकामाची प्रत्यक्ष पहाणी तसेच दप्तर तपासणी केली असता केलेल्या कामाचे मूल्यांकन रु.९०,०००/- इतके होत असताना ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या अध्यक्ष व सचिव यांचेमार्फत व २.५० लक्ष ठेकेदारास अदा केल्याचे दिसून आले.

(३) नाही. निधी खर्च करताना अनियमितता झाल्याचे निदर्शनास येताच फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(४) कामाची प्रत्यक्ष पहाणी तसेच दप्तर तपासणी करण्यात येवून प्रथम दर्शनी निधी खर्च करताना अनियमितता झाल्याचे जिल्हा परिषदेच्या निदर्शनास आल्याने संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबतची कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, या प्रकरणात गैरव्यवहार झाल्याचे शासनाने मान्य केले आहे. २.५ लाख रुपयांचा निधी काढण्यासाठी ज्यांनी एम.बी.तयार केली त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय? शाखा अभियंता श्री.गावडे यांनी अशाच प्रकारची अनेक कामे केली आहेत. त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात येईल? त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल काय?

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, उत्तरामध्ये या प्रकरणात गैरव्यवहार झाल्याचे शासनाने मान्य केले आहे. हे काम करताना एम.बी.ची एन्ट्री न घेता परस्पर सचिव आणि अध्यक्ष यांनी चेक लिहून दिले. त्यामुळे यामध्ये चूक झालेली आहे. या प्रकरणात जे कोणी दोषी आहेत त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल. या प्रकरणी एफआयआर दाखल करण्याचे आदेश दिले. परंतु ऑडिटमध्ये त्रुटी आहेत. त्यांनी कागदपत्रे सादर केलेली नव्हती. आता कागदपत्रे प्राप्त झाली आहेत. ऑडिट झाल्यानंतर एफआयआर दाखल करणार आहोत. संबंधित सेक्शनल इंजिनिअर ज्या ज्या टीएसपीची कामे करीत आहेत ती सगळी कामे त्यांच्याकडून काढून घेण्यात येतील आणि त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल. ज्या चुका त्यांनी केल्या आहेत त्यानुसार त्यांच्यावर कारवाई करणार आहोत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, का आमची दिशाभूल करीत आहात? ४५ दिवस अगोदर आमच्याकडून प्रश्न मागविले जातात. सप्टेंबर महिन्यात ही घटना घडलेली आहे. चार महिने उलटून गेले आहेत. या सदनामध्ये येत असताना मंत्रीमहोदयांनी या दोषी इंजिनिअरवर कोणती कारवाई केली, फौजदारी गुन्हा दाखल झाला का यासंबंधी उत्तर देणे अपेक्षित होते.

नंतर डब्ल्यू.१...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आपण सभागृहात सांगत आहात की जे झाले असेल त्याची चौकशी करण्यात येईल. आमची अशी मागणी आहे की, या प्रकरणी तातडीने नावानिशी फौजदारी गुन्हा दाखल करणार काय ? कारण 45 दिवस अगोदर प्रश्न दिलेले असतानाही संपूर्ण माहिती विभागाचे अधिकारी मंत्र्यांना देत नाहीत, याचा विचारही मंत्री महोदय करतील काय ?

श्री. रणजित कांबळे : महोदय, याप्रकरणी ऑडिट केल्याशिवाय एफआयआर दाखल करु शकत नाही. अशा प्रकारे या ऑडिटचा अहवाल आल्यानंतरच पुढील गुन्हा नोंदवावा लागेल.

सभापती : या प्रकरणात अशी परिस्थिती झाल्याचे दिसून येत आहे की, सरपंच व सचिव या दोघांच्या सहीने 2.50 लाख रुपयाचा अग्रिम देण्यात आला, प्रत्यक्षात 90 हजाराचेच काम झाले असल्याचे स्पष्ट होते. उर्वरित रक्कम एक तर अतिरिक्त राहिली असावी किंवा त्या रकमेचा अपहार झाला असावा. तसेच मंत्री महोदयांनी सांगितले की, "आम्ही त्याला सूचित केले आहे" परंतु संबंधितांवर गुन्हा दाखल होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने वरिष्ठ इंजिनिअरने कारवाई केली नसली तरी ती बाबही चुकीचीच आहे. म्हणून या प्रकरणात तातडीने पुढील कारवाई करणे आवश्यक आहे.

श्री. रणजित कांबळे : महोदय, प्रथम या प्रकरणात ऑडिट केले जाते. तसेच सचिव आणि अध्यक्ष यांनी कागदपत्रेच पुरविली नाहीत म्हणून प्रत्यक्ष ग्रामपंचायतीत जाऊन तेथील रेकॉर्ड जप्त करण्यात आले व त्याचे ऑडिट करण्यात आले. ऑडिटरच्या दृष्टीने ज्या क्वेरिज होत्या त्यांची पुर्तता झालेली आहे. आता ताबडतोब एफआयआर दाखल करण्यात येईल, तसेच टीएसपीचा हलगर्जीपणा आहे की कार्यकारी अभियंत्यांचा हलगर्जीपणा आहे असे आढळून आल्यास दोघांवरही कारवाई करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : महोदय, प्राथमिक गुन्हा सिध्द झाल्याचे मंत्री महोदय सभागृहात मान्यच करतात. अशा परिस्थितीत या जबाबदार कर्मचाऱ्यांना ताबडतोब निलंबित करता येते. कारण ते आपल्या हातात आहे. अशा कर्मचाऱ्यांना निलंबित करणार काय ?

श्री. रणजित कांबळे : महोदय, या प्रकरणात दोन भाग आहेत. एक म्हणजे जो धनादेश देण्यात आला तो कोणाचीही परवानगी न घेता रिलीज करण्यात आला. तसेच सरपंच आणि सचिव यांनी सही देऊन असा धनादेश दिला गेला. वास्तविक एम.बी. रेकॉर्ड केल्याशिवाय असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 9818..... श्री. रणजित कांबळे.....

पेमेंट करु शकत नाही परंतु तरीही त्यांनी तसे केले. ही बाब संबंधित उप अभियंत्यांच्या लक्षात आल्यानंतरही त्यांनी कारवाई केली नाही तसेच कार्यकारी अभियंत्यांनी सुध्दा विलंब का केला अशा प्रकारे चौकशीत आढळून आले तर दोघांनाही आवश्यक वाटल्यास निलंबित करुन त्यांची विभागीय चौकशी करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : महोदय, या सभागृहात जी कारवाई होते त्यातून संपूर्ण राज्यात असा संदेश जात असतो की, असा काही प्रकार केल्यानंतर आपल्याला क्षमा नाही. असा एक वचक तयार होतो. म्हणून सभागृहाची गरिमा राखण्यासाठी किमान या कर्मचाऱ्यांना प्रथम निलंबित करुन नंतर त्यांची चौकशी करावी तसेच त्यांच्यावर फौजदारी गुन्हा ताबडतोब दाखल करणार काय ?

श्री. रणजित कांबळे : महोदय, निलंबित करण्यापूर्वी प्रथम शो-कॉज नोटीस द्यावी लागते...

श्री. दिवाकर रावते : महोदय, सभागृहात कबूल करुन देखील माननीय मंत्री महोदय संबंधित अधिकाऱ्याला का वाचवित आहेत, हे मला समजत नाही.

श्री. रणजित कांबळे : महोदय, उत्तरात स्पष्टपणे म्हटले आहे की, सरपंच आणि सचिव यांनी सही करुन.....(अडथळा).....

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री. दिवाकर रावते : महोदय, प्रोसिजरप्रमाणे प्रथम प्रकरणात प्रथम निलंबित करुनच चौकशी करावी लागते, मंत्री महोदय मात्र सभागृहात वेगळीच प्रोसिजर सांगत आहेत. ते सांगत आहेत की, त्यांची विभागीय चौकशी करण्यात येईल. परंतु निलंबित करण्यापूर्वी अशी चौकशी कशी करणार आहे ?

श्री. रणजित कांबळे : महोदय, त्यांच्याकडील सर्व पुस्तके आपण जप्त केलेली असून एक महिन्याच्या आत या प्रकरणी संपूर्ण कारवाई करण्यात येईल, अशी मी ग्वाही देतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, 90 हजार रुपयांचे मूल्यांकन होत असतांना ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या अध्यक्ष व सचिव यांचेमार्फत 2.50 लक्ष रुपये ठेकेदारास देण्यात आलेले आहे असे उत्तरामध्ये स्पष्टपणे मान्य करण्यात आले आहे. असे असतांना ग्रामपंचायतीचा ग्रामसेवक, सचिव व संबंधित अधिका-यांना आपण कशासाठी वाचवित आहात, ज्यांनी भ्रष्टाचार केलेला आहे त्यांना आपण शिक्षा का करीत नाहीत, या लोकांना आपण कशासाठी पाठीशी घालीत आहात ?

प्रा. लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, मी सभागृहाला नम्रपणे सांगू इच्छितो की, संबधितांविरुध्द एफआयआर दाखल करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत अशा प्रकारची माहिती उत्तरात देण्यात आलेली आहे. आपल्या विभागाने संबंधित लोकांवर कारवाई करण्याबद्दलचा प्रस्ताव सीईओ यांना दिला होता परंतु सीईओ यांनी हा प्रस्ताव सीए कडून कन्फर्म करुन घ्यावा असे सांगितल्यामुळे यासंर्भातील सर्व माहिती सीए कडून ही माहिती तपासून घेण्यात आलेली आहे. त्यामुळे यांसदर्भातील खुलासा मागवून एक महिन्याच्या आत संबंधितांवर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

(विरोधीपक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी मंत्रीमहोदयांनी स्पष्टपणे असे सांगितले आहे की, निधी खर्च करतांना या ठिकाणी अनियमितता झालेली आहे, फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे. त्यामुळे आपण फौजदारी गुन्हा कोणा विरुध्द दाखल करणार आहात ? सरंपच, सचिव व पदाधिकारी तसेच अधिका-यांमार्फत या ठिकाणी भ्रष्टाचार झालेला आहे. या ठिकाणी केवळ 90 हजार रुपयांचे काम झाले असतांना 2.5 लक्ष रुपये या कामासाठी उचलण्यात आलेले आहेत. अधिका-यांच्या देखरेखीखालीच हा गैरप्रकार झालेला आहे. असे असतांना शासन संबंधित अधिका-यांना का पाठीशी घालीत आहे? ज्या अधिका-याकडे हे काम होते त्या अधिका-याला त्वरित सस्पेंड केले पाहिजे.ज्या अधिका-यांने चुकीचे काम केलेले आहे अशा अधिका-याला पाठीशी घालण्याचे काम शासनामार्फत केले जात आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, पाणी वापर समितीकडे पैसे दिले जात असतात. झालेल्या कामाचे व्हॅल्यूएशन केले जाते व त्यानंतर एमबी तयार करुन, साईन झाल्यानंतर चेक दिले जात असतात. परंतु या ठिकाणच्या ग्रामपंचायतीमध्ये एमबी न करताच सरपंच व ग्रामसेवकाने परस्पर पैसे दिलेले आहेत. या कामाबद्दल जेव्हा तक्रार झाली तेव्हा या कामाची तपासणी करण्यात आली होती. या कामाच्या टीएसपीचे काम सेक्शन इंजिनिअर करीत होते. या कामाची कागदपत्रे तयार न करताच परस्पर पैसे देण्यात आलेले आहेत. त्यामुळे या प्रकरणाची निश्चितपणे विभागीय चौकशी केली जाणार आहे एवढे या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती : सन्माननीय राज्यमंत्री महोदय, एवढे मात्र निश्चित आहे की, कोणतेही रेकॉर्ड न ठेवता सरपंच, सेक्रेटरी व ग्रामसेवकांनी या कामाच्या संदर्भात 2.50 लक्ष रुपये दिलेले आहेत. अवैध आहे. ज्यावेळेस तांत्रिक मोजमाप झाले तेव्हा केवळ 90 हजार रुपयांचेच काम झाल्याचे स्पष्ट झालेले आहे. 1.6 लक्ष रुपये शासनाच्या वापरात आलेले नाहीत. तसेच 1.60 लक्ष रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे सिध्द झालेले आहे. यासबंधात दोषी असेलेल्या ग्रामसेवक, सचिवांवर तातडीने ॲक्शन घेण्यास आपल्याला कोणती अडचण आहे ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, दिनांक 20.9.2010 रोजी संबंधितांविरुध्द एफआयआर दाखल करण्यासंबंधी आदेश दिले होते. परंतु गैरप्रकार झालेला आहे की नाही याची माहिती ऑडिट रिपोर्टमध्येच स्पष्ट होत असते.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9818...

श्री.रणजित कांबळे.....

....(अडथळा)...सभापती महोदय, मला माझे उत्तर पूर्ण करण्यासाठी आपण मला संरक्षण द्यावे.... यामध्ये कोणतेही राजकारण नाही...

सभापती :मी सन्माननीय राज्य मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, एफ.आय. आर. दाखल करणे हा वेगळा भाग आहे. त्यांनी कोणतेही आदेश न घेता ॲडव्हान्स दिला हा एका अर्थाने गुन्हा झालेला आहे. त्यांच्यावर विभागीय ॲक्शन घेणे हे आपले पहिले काम आहे. सदरहू कर्मचारी जिल्हापरिषदेचे कर्मचारी आहेत.... (अडथळा)..

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, ऑडिट रिपोर्ट आलेला आहे. आम्ही ताबडतोड एफ.आय.आर.दाखल करणार आहोत. या प्रकरणाची एक महिन्यात आत चौकशी करुन जे कोणी अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

सभापती : या प्रश्नाच्या संदर्भात सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या भावना तीव्र झाल्या आहेत. तेव्हा जे कोणी या प्रकरणी जबाबदार असतील त्यांच्यावर आपण ॲक्शन घेणार आहात काय याचे उत्तर मंत्रीमहोदयांनी द्यावे. अन्यथा मी हा प्रश्न राखून ठेवतो.

प्रा.लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये जे कोणी जबाबदार असतील त्यांना तात्काळ निलंबित करण्याबाबतची कारवाई 15 दिवसाच्या आत करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल असे सांगितले. हे जे कोणी कोण आहेत ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये ग्रामसेवक, सरपंच आणि टी.एस.पी.जे या प्रकल्पावर शाखा अभियंता म्हणून कार्यरत होते. या तिघांवर 15 दिवसांच्या आत कारवाई करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील अनुदानित संस्थामधील शिक्षक-शिक्षकेतरांना

5 तारखेच्या आत वेतन मिळण्याबाबत

(3) * 9074 श्री.भगवान साळुंखे , श्री.संजय केळकर , श्री.विनोद तावडे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील अनुदानित संस्थामधील शिक्षक-शिक्षकेतरांना किमान 5 तारखेपूर्वी प्रत्यक्ष वेतन मिळावे यासाठी लोकप्रतिनिधींनी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, या प्रकरणी होत असलेल्या विलंबाची काय कारणे आहेत ?

प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता : (1) होय.

(2) राज्य शासनाने शासन निर्णय विसप्र 0609/(69/10)/अर्थसंकल्प, दिनांक 16 जून, 2009 व शासन परिपत्रक क्रमांक विसप्र 0609/(69/09)/अर्थसंकल्प, दिनांक 16 जून, 2009 अन्वये आदेश काढून शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेळेवर वेतन अदा करणे संदर्भात संबंधितांना योग्य त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने शासनाने दिलेले उत्तर अपूर्ण आहे. अनुदानित संस्थांमध्ये राज्यातील अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळा, आश्रमशाळा, अपंग शाळा इत्यादी शाळांचा समावेश होतो. अनुदानित शाळांतील शिक्षकांचे आणि कर्मचाऱ्यांचे पगार महिन्याच्या 5 तारखेला होत नाहीत अशी तक्रार लोकप्रतिनिधींनी केली होती. असे असताना महिन्याच्या 15 व 20 तारखेला पगार होत आहेत. काही आश्रमशाळांतील शिक्षकांना 6-6 महिने पगार मिळत नाही. माध्यमिक शाळांतील शिक्षकांना 2-3 महिने पगार मिळत नाही. याबाबत आम्ही चौकशी केली तर "निधी उपलब्ध नाही", निधी आलेला आहे, परंतु वितरीत झालेला नाही" असे सांगण्यात येते. शिक्षकांचे पगार वेळेवर होत नाही याबाबत लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जे कोणी जबाबदार आहेत त्यांचा शोध शासनाने घेतला आहे काय, असल्यास, संबंधितांवर कारवाई करणार आहात काय, कारवाई केली नसेल तर करणार आहात काय, तसेच शिक्षकांना महिन्याच्या 5 तारखेला पगार मिळण्या बाबत शासन नवीन सुधारित पध्दत अनुसरणार आहे काय ?

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : खाजगी अनुदानित, जिल्हा परिषदा आणि महानगरपालिकेच्या अखत्यारीतील शाळेतील शिक्षकांना शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमातून वेतन देण्यात येते. त्यातील खाजगी अनुदानित शाळांच्या शिक्षकांचे वेतन वेळेवर होत आहे. शासनाने दिनांक 26 जून 2009 रोजी एक आदेश काढला होता आणि या शिक्षकांना वेतन देण्याच्या बाबतीत जे अनेक टप्पे होते त्यातील एक टप्पा कमी केला होता.वेतन देण्यासंबंधीचा प्रस्ताव पूर्वी शिक्षणाधिका-यांकडे येत असावयाचा पंरतु आता हा टप्पा कमी करण्यात आला व अधीक्षक ,वेतन पथक यांना डीडीओ केले आहे . त्यामुळे या शिक्षकांचे पगार वेळेवर होत आहेत. या शिवाय वेतन वेळेवर अदा करण्यामध्ये विलंब व्हावयाचा परंतु आता नव्याने अर्थसंकल्पीत प्रणाली सुरु करण्यात आली असून मार्च 2010 चे वेतन एप्रिल 2010 मध्ये देण्यासाठी वित्त विभागाने उणे प्राधिकार पत्रावर काढण्यास मान्यता दिली आहे. याच धर्तीवर मार्च 2011 चे वेतन एप्रिल 2011 मध्ये उणे प्राधिकार पत्रावर काढण्यास मान्यता देण्यात येईल. या शिवाय जिल्हा परिषदा ,महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या शाळेतील शिक्षकांना वेतन देण्यासबंधीची पध्दत वेगळी आहे.त्या पध्दतीनुसार त्या शिक्षकांना वेतन दिले जाते.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, शिक्षकांना वेळेवर वेतन दिले जाते असे जे उत्तर माननीय मंत्र्यांनी दिलेले आहे ते चुकीचे आहे.शिक्षकांचे वेतन वेळेवर न होता काही वेळा दोन तीन महिन्या नंतर होत असते. शासनाने परिपत्रक काढून एक वर्ष झालेले असले तरी त्याचे वेतन वेळेवर होत नाही.त्यामुळे संबंधिता विरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे, पाच तारखेपर्यंत पगार होतात काय, याबाबतीत निरनिराळया जिल्हयातून माहिती घेण्यात येणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सन्माननीय सदस्य अनुदानित अशासकीय शाळेबद्दल सांगत आहेत काय ? जिल्हा परिषदांच्या शाळेतील शिक्षकांचे वेतन करण्यासबंधीची प्रणाली वेगळी असल्यामुळे तेथे पगार मिळण्यास थोडा विलंब होत असतो. जिल्हा परिषदांच्या ज्या शाळा आहेत त्या ठिकाणी कोषागार अधिनियमाअंतर्गत कोषागाराकडून पगार काढला जात असल्यामुळे तेथे विलंब होत असतो.महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या ज्या शाळा आहेत त्या ठिकाणी वेतन देण्यासबंधीची प्रणाली त्यापेक्षा वेगळी आहे त्यामुळे काही वेळा हे पैसे दुस-या कामाकडे वर्ग केले जातात म्हणून वेतन मिळण्यास विलंब होत असतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9074.....

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील शिक्षकांचा पगार शालेय शिक्षण विभागाकडून दिला न जाता तो पगार ग्राम विकास विभागाकडून जिल्हापरिषदांच्या माध्यमातून दिला जातो. अशासकीय माध्यमिक शाळा, आश्रम शाळा,अपंग व्यक्तीच्या शाळा सगळया अनुदानित असून त्या शाळांचा पगार शिक्षण विभागाकडून केला जातो
आता उत्तर देतांना आपण असे सांगितले की, अधीक्षकांना डीडीओ केल्यामुळे लवकर पगार दिला जातो . लवकर पगार देण्यासंबंधी गेल्या वर्षी शासनाने निर्णय घेतला होता त्याप्रमाणे 1 तारखेला पगार करण्यात येईल असे शासनाने जाहीर केले होते. आमचे असे म्हणणे आहे की पाच तारखेच्या आत पगार करण्यात यावा . सातत्याने ज्या शाळा 20 आणि 40 टक्क्याच्या टप्प्यावर आहेत त्या शाळेतील शिक्षकांचे पगार वर्ष वर्ष होत नाहीत. प्लॅन आणि नॉन प्लॅन संबंधी शिक्षकाना काहीही देणे घेणे नाही. तो शासनाचा भाग आहे. प्लॅन असो अथवा नॉन प्लॅन असो या लेखा शीर्षाच्या अंतर्गत जेवढे पगार द्यावयाचे आहेत ते सर्व पगार पाच तारखेच्या आत करण्यासाठी कोणती कार्यप्रणाली अवलंबिणार येणार आहे आणि बजेटमध्ये तरतूद असतांना एखाद्या अधिका-यांने पगार वेळेवर केला नसेल तर त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे?

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / परिशिष्ट साठी नाही

ता.प्र.क्र. 9074....

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी याठिकाणी कोणत्या शाळांमध्ये एकेक वर्ष पगार होत नाही याबाबत स्पेसिफिक सांगितले तर...

(गोंधळ)

सभापती : सर्व माननीय सदस्य अशाप्रकारे एकाच वेळी उभे राहून प्रश्न विचारु लागले तर आपणास अपेक्षित असलेले उत्तर मंत्री महोदयांकडून मिळू शकणार नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्री महोदय जर धादांत असत्य बोलत असतील तर कसे चालेल?

सभापती : माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. ज्या प्राथमिक, माध्यमिक किंवा आश्रमशाळा अनुदानित आहेत त्यांच्या शिक्षकांचे पगार सुध्दा 6 तारखेपूर्वी होण्याच्या दृष्टीने माननीय सदस्यांनी अपेक्षा व्यक्त केली आहे. आणि त्याप्रमाणे शिक्षकांना वेळेवर पगार मिळावा यासाठी शासनाचा सातत्याने प्रयत्न आहे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मी आता सांगितले आहे की, या प्रणालीमध्ये आपण एक टप्पा कमी केला आहे. त्यामध्ये सुध्दा एक अडचण अशी आहे की,....

(गोंधळ)

सभापती : माननीय सदस्यांनी शांत रहावे. मंत्री महोदयांना त्यांचे उत्तर पूर्ण करु द्यावे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, संचालकांकडून हे पैसे डीडीओ यांचेकडे जातात. तेव्हा शाळांमधून त्यांचे पे-बिल मागवून घेणे हे त्यांचे काम आहे. परंतु काही शाळांकडून पे-बिल पाठविण्यास विलंब होतो, वेळेवर पे-बिल पाठविले जात नाहीत....

(गोंधळ)

सभापती : मंत्री महोदय, आपण उत्तर द्यावे.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, याठिकाणी आश्रमशाळेचा उल्लेख करण्यात आला. आश्रमशाळांचे वेतन शिक्षण विभागाकडून होत नाही तर ते सामाजिक न्याय किंवा आदिवासी विकास विभाग या विभागांकडून होत असते. याठिकाणी एक गोष्ट सांगितली पाहिजे की, शासनाची पैसे देण्याची इच्छा आहे त्याप्रमाणे शासन पैसे उपलब्ध करुन देते. माननीय सदस्यांनी याठिकाणी 5 तारखेला किंवा त्यानंतर पेमेंट होते असे सांगितले. त्याबाबत मी आपल्यामार्फत सांगू इच्छितो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ MMP/ KGS/ D/

ता.प्र.क्र. 9074....

श्री. राजेंद्र दर्डा....

की, शासनाने "सेवार्थ" नावाच्या एका सॉफ्टवेअरचा उपयोग एका जिल्हा परिषदेमध्ये केला आहे. त्या सॉफ्टवेअरचा उपयोग करुन आपण अधिक गतीने पेमेंट करु शकतो. त्यादृष्टीने नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग यांच्याबरोबर विचार विनिमय करुन वेतन अदा करण्यासाठी नवीन व्यवस्था अधिक सक्षमपणे व तातडीने करण्याचा प्रयत्न करु.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, हा विषय समजून घेणे आवश्यक आहे. प्लॅनमधील शिक्षकांचे पगार तर वेळेवर होत नाहीत, परंतु नॉन प्लॅनमधील शिक्षकांचे पगार सुध्दा होत नाहीत. प्लॅनमधील शिक्षकांचे पगार वर्षानुवर्षे रखडून रहातात, नॉन प्लॅनमधील शिक्षकांचे देय असलेले पगार महिन्याच्या शेवटी होतात. यामध्ये अडचण अशी आहे की, तुम्ही जी कार्यप्रणाली अवलंबिली आहे त्यामध्ये एक टप्पा कमी करुन चालणार नाही. तुमच्याकडे निधी उपलब्ध नसला तरी मायनस बिलातून पगार पोहोचविला पाहिजे तो पोहोचविणार काय? हा माझा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा की, तुम्ही ऑन लाईन पगार देण्याची यंत्रणा उभी केली तर मधल्या काळातील घोळ कमी होईल, ती यंत्रणा उभी करणार काय? तिसरा प्रश्न असा की, तुमचा निधी बँकांकडे उपलब्ध झाला नाही तरी एक तारखेला पगार देण्यास काही बँका तयार आहेत. माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांची रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक पगार देण्यास तयार आहे. त्याप्रमाणे आपण व्यवस्था करणार काय?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी अगोदर सांगितले आहे की, वित्त विभागाकडून उणे प्राधिकार पत्रावर पगार काढण्यासाठी मागील वेळी मान्यता देण्यात आली त्याच धर्तीवर मार्च महिन्याचे वेतन उणे प्राधिकार पत्रावर काढण्यास निश्चितपणे मान्यता मिळेल.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9074 ..... श्री. राजेंद्र दर्डा ....

मार्च-एप्रिलमध्ये निश्चितपणे पगार केला गेला. ज्या ठिकाणी 5 तारखेच्या आत वेतन अदा होणार नाही त्यासंबंधी प्रत्येक महिन्याच्या 5 तारखेपूर्वी वेतन अदा करण्यासाठी त्या ठिकाणचे जे आहरण व संवितरण अधिकारी आहेत त्यांना निर्देश देण्यात येतील आणि त्यांना फक्त निर्देशच देण्यात येणार नाही तर वेतन मंजूर करण्याच्या बाबतीत आहरण व संवितरण अधिकाऱ्याला जबाबदार धरण्यात येईल. ज्यांनी विलंबाने वेतन प्रदान केले त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी ऑन लाईन पगार करण्याच्या संदर्भात अत्यंत महत्वाचा मुद्दा उपस्थित केला. आज ऑन लाईन पगार अदा करण्यात येत नाही. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या कार्यालयातून बँकेत त्या त्या शिक्षकाच्या खात्यात पगार जमा होतो. खरे म्हणजे त्या ठिकाणी सॉफ्टवेअरचा उपयोग करुन ऑनलाईन पध्दतीने निश्चितपणे त्या शिक्षकांच्या खात्यामध्ये पगार जमा करु शकू. आज जिल्हा मध्यवर्ती बँका, कोऑपरेटिव्ह बँका यांच्या माध्यमातून पगार होतो. आपल्याला या ठिकाणी निश्चितपणे कोअर बँकींगचा उपयोग करता येईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यातील अनुदानित संस्थांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांची माफक मागणी आहे की, महिनाभर काम केल्यानंतर आम्हाला पुढच्या 5 तारखेच्या आत वेतन मिळावे. आता ते मिळत नाही. शासनाने काहीही उत्तर दिले तरी यामध्ये त्रुटी होत्या आणि 5 तारखेच्या आत आम्हाला वेतन मिळत नाही. या ठिकाणी शासनाने उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, वेळेवर पगार द्यावेत यासाठी शासनाने आदेश दिलेले आहेत. परंतु अद्यापही शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी करीत नाहीत आणि वेळेवर वेतन देत नाहीत. याला जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासन काय कारवाई करणार ? 5 तारखेच्या आत वेतन व्हावे म्हणून 7 डिसेंबर, 2010 ला आता तंत्रशिक्षण विभागाने सिस्टिममध्ये नवीन सुधारणा केलेली आहे. ज्यामुळे शिक्षकांना 5 तारखेच्या आत वेतन मिळू शकेल अशा प्रकारे सिस्टिममध्ये बेसिक सुधारणा करण्याचे शासनास मान्य आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी आताच दिलेले आहे की, जर काही जिल्ह्यांमध्ये असे झाल्याची स्पेसिफिक उदाहरणे असतील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9074 ..... प्रा. फौजिया खान ....

आणि वेळेवर पगार मिळाला नाही तर तेथील आहरण व संवितरण अधिकारी आणि जिल्ह्याचे शिक्षण अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल. त्या शिवाय शाळेने वेळेवर पेंडिंग बिल सादर केले नाही तर त्या शाळेच्या मुख्याध्यापकास जबाबदार धरण्यात येईल. माननीय मंत्रिमहोदयांनी हे सुध्दा सांगितले की, इ.सी.एस. पध्दतीने शिक्षकांच्या खात्यात डायरेक्ट पगार जमा व्हावा यासाठी शासन एक धोरण अवलंबिण्याचा विचार करीत आहे.

श्री. जयंत प्र. पाटील :सभापती महोदय, आपल्या राज्यातील काही मध्यवर्ती बँकांनी हे पगार 30 तारखेच्या आत देण्याची तयारी दाखविली होती. शाळेने बिल दिल्यानंतर त्याच्या अगेंस्ट 30 तारखेच्या आत पगार देण्याची तयारी दाखविली होती, हे खरे आहे काय ? त्यांना पगार दिल्यानंतर त्यामध्ये काही फरक निघाला तर तो पुढच्या महिन्यात अँडजस्ट करण्याची तयारी या बँकांनी दाखविली होती ही गोष्ट खरी आहे काय ? आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये अनुक्रमांक 36 वर "राज्यातील शिक्षकांचे पगार राष्ट्रीयकृत बँकेमार्फत सुरु करण्याबाबत" या विषयाच्या संदर्भातील प्रश्न आहे. या ठिकाणी गेल्या अधिवेशनामध्ये सहकारी बँकांमार्फत पगार देण्याचे सुरु होणार आहे असे सांगितले होते. आपल्या ज्या बँका आहेत त्या स्वत: पगार देण्यास तयार आहेत. मी प्रपोजल दिले होते. तसेच सिंधुदुर्ग बँकेने, रत्नागिरी बँकेने प्रपोजल दिलेले होते की, आम्ही पगार करण्यात तयार आहोत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य प्रश्न विचारतात पण शिक्षण खात्याकडे आर्थिक तरतूद नसते. वित्त विभाग त्यांना परवानगी देत नाही, ही वस्तुस्थिती आहे. सभापती महोदय, आपण या प्रश्नासाठी बराच वेळ खर्च केलेला आहे. शालेय शिक्षण खाते, माध्यमिक शिक्षण खाते मुद्दाम यामध्ये टाळाटाळ करते कारण पैसे उपलब्ध नसतात. पैसे उपलब्ध करुन देण्याची तयारी बँकांनी दाखवली तर त्यासाठी शासन तयार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. खंदारे...

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, शालेय शिक्षण विभाग याबाबत टाळाटाळ करीत नाही. सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या जिल्हा बँकेने व इतर जिल्हयातील जिल्हा बँकांनी प्रस्ताव दिले आहेत असे म्हटले आहे. ते प्रस्ताव निश्चितपणे तपासून घेण्यात येतील. शिक्षकांना जर वेळेवर पगार देणे शक्य होणार असेल तर ते प्रस्ताव निश्चितपणे स्वीकारले जातील.

श्री.दिवाकर रावते : मंत्री महोदयांनी मघाशी सांगितले की, शिक्षणाधिका-यांना व मुख्याध्यापकांना जबाबदार धरले जाईल. आपल्या कर्मचाऱ्यांना जबाबदार धरणे सोपे आहे. शाळेच्या मुख्याध्यापकांना शासन जबाबदार धरणार म्हणजे काय करणार आहे ? काल या सदनात चर्चा होत असताना सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी असे म्हटले होते की, काही संस्था चालक शिक्षकांना 1 हजार, 2 हजार इतके कमी वेतन देतात, बाकीचे वेतन ते गायब करतात. याबाबत शासन चौकशी करणार आहे काय आणि यासंबंधी चौकशी करीत असताना सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांच्यासारख्या सच्चा कार्यकर्त्यांना बोलवून चौकशी केली जाईल काय आणि असे जे संस्था चालक असतील त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.राजेंद्र दर्डा : सन्माननीय सदस्यांनी स्पेपिफिक संस्थेचे नाव द्यावे. माझ्या माहितीप्रमाणे शिक्षकांच्या खात्यावर संपूर्ण रक्कम जमा होते. तरी सुध्दा मी सन्माननीय सदस्यांना चर्चेला बोलवून त्यांनी विशिष्ट संस्थेबाबत माहिती दिली तर त्याच दिवशी त्या संस्थेवर कारवाई करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मंजूर झालेल्या विहिरीचे अनुदान मिळण्याबाबत

(४) * ९५५६ श्रीमती उषाताई दराडे , श्री.सतीश चव्हाण , श्री.हेमंत टकले : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात सन २००९-२०१० मध्ये विशेष घटक योजनेअंतर्गत १९५ शेतकऱ्यांच्या मंजूर झालेल्या विहिरीचे अनुदान दिनांक २८ ऑगस्ट, २०१० रोजीपर्यंत त्यांना मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर शेतकऱ्यांना विहिरीच्या अनुदानाची रक्कम तातडीने देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गुलाबराव देवकर, श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकरिता : (१), (२), (३) व (४) विशेष घटक योजना ही दोन आर्थिक वर्ष कालावधीची योजना आहे. बीड जिल्ह्यात सन २००९-२०१० मध्ये नवीन विहिर या बाबीसाठी १९७ लाभार्थींची निवड दिनांक १०.३.२०१० रोजी करण्यात आली होती. तथापि, त्या आर्थिक वर्षात विहिरीची कामे होवू न शकल्यामुळे लाभार्थींना अनुदान अदा करता आले नाही.

सन २०१०-२०११ मध्ये सदर लाभार्थींच्या नवीन विहिरींच्या कामासाठी रु.६८.०० लाख अनुदान पंचायत समिती स्तरावर सद्य:स्थितीत वितरीत करण्यात आले आहे. जसजशी विहिरींची कामे पूर्ण होतील तसतसे अनुदान अदा करण्यात येणार आहे.

ॲड.उषाताई दराडे : सभापती महोदय, लेखी उत्तरामुळे माझे समाधान झाले आहे.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील प्रत्येक विद्यापीठाने जेनेटिक्स सायन्स या विषयाशी संबंधीत पदवी, पदव्यूत्तर आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत

(५) * ९५८३ श्री.केशवराव मानकर , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.संजय केळकर : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानवी उत्पत्ती, वाढ आणि प्रजनन यासंदर्भात अत्यंत महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या आणि वैज्ञानिक युगात जगातील अनेक देशांमध्ये रोगांवर होत असलेल्या संशोधनांना सहाय्यभूत ठरणाऱ्या जेनेटिक्स सायन्स या विषयाशी संबंधीत पदवी, पदव्यूत्तर आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रम प्रत्येक विद्यापीठाने सुरु करण्यासंबंधी शासनाने सन २००३ मध्ये पत्र पाठविले, तथापि, मुंबई आणि पुणे विभागातील विद्यापीठे वगळता राज्यातील उर्वरीत विद्यापीठांमध्ये "जेनेटिक्स वरील पदवी, पदव्यूत्तर आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरुच करण्यात आले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,.

(२) असल्यास, शासनाने विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता सदर अभ्यासक्रम राज्यातील सर्वच विद्यापीठात नियमित (Compulsory) सुरु करण्यासंबंधी शासन स्तरावर कोणती तातडीची उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, याप्रकरणी होत असलेल्या विलंबाची काय कारणे आहेत ?

श्री.डी.पी.सावंत, श्री.राजेश टोपे यांच्याकरिता : (१) दिनांक १३.१२.२००२ रोजी नागपूर येथे झालेल्या विदर्भ वैधानिक विकास मंडळाच्या बैठकीत विदर्भामध्ये विदर्भ वैधानिक विकास मंडळाने जेनेटिक्स इंजिनिअरिंग विद्यापीठ निर्माण करण्याबाबतचा विचार करावा असे तत्कालीन माननीय राज्यपाल यांनी सूचित केले होते. या अनुषंगाने दिनांक २८.३.२००३ च्या पत्रान्वये शासनाने नागपूर विद्यापीठाकडून काही मुद्यावर माहिती मागविली होती. सदरचा अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत विद्यापीठांना शासन स्तरावरुन कोणतेही निदेश दिल्याचे आढळून येत नाही. तथापि, बहुतेक विद्यापीठांकडून सदरच्या अभ्यासक्रमाचा समावेश विज्ञान शाखेतील काही विषयामध्ये करण्यात आलेला आहे.

(२) व (३) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम ३७ मधील तरतुदीनुसार विद्यापीठातील अभ्यासक्रम विहित करण्यासाठी विषयनिहाय अभ्यासमंडळाची स्थापना करण्यात येते. तसेच उक्त अभ्यास मंडळाकडून विद्यापीठातील अभ्यासक्रम तयार करण्यात येतात.

सभापती महोदय, मी हे सुधारित उत्तर वितरित केलेले आहे.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. मानवी उत्पत्ती, वाढ आणि प्रजनन यासंदर्भातील हा विषय आहे. उत्तरात नमूद केले आहे की, "राज्यातील मुंबई, पुणे, सोलापूर आणि अमरावती विद्यापीठामध्ये जेनेटिक्स सायन्स हा

४....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अभ्यासक्रम सुरु करण्यात आलेला आहे. परंतु नागपूरसह अन्य विद्यापीठांमध्ये हा विषय सुरु झालेला नाही." सुधारित उत्तरात असे नमूद केले आहे की, राज्यपालांनी सूचित केल्याप्रमाणे दिनांक २८.३.२००३ रोजी शासनाने आदेश काढले होते. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, जेनेटिक्स सायन्स हा संशोधनाचा विषय असल्यामुळे नागपूर व अन्य विद्यापीठांनी हा विषय सुरु केलेला नसल्यामुळे या विद्यापीठांमध्ये हा अभ्यासक्रम केव्हा सुरु केला जाईल ? त्याचप्रमाणे महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम ३७ मधील तरतुदीनुसार विद्यापीठातील अभ्यासक्रम विहित करण्यासाठी विषयनिहाय अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात येते. त्याप्रमाणे या सहाही विद्यापीठांमध्ये विषयनिहाय अभ्यास मंडळाची स्थापना झाली आहे काय ? नागपूर विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांची क्षमता वाढविण्याच्या संदर्भातील हा अभ्यासक्रम शेवटच्या टप्प्यात सुरु आहे. त्यामुळे सन २०११-१२ या वर्षात जेनेटिक सायन्स हा विषय सुरु केला जाईल काय ?

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, दिनांक १३.१२.२००२ रोजी नागपूर येथे झालेल्या विदर्भ वैधानिक विकास मंडळाच्या बैठकीत राज्यपालांनी सूचित केले होते की, विदर्भात जेनेटिक्स इंजिनिअरिंग विद्यापीठ स्थापन करावे. या अनुषंगाने दिनांक २८.३.२००३ च्या पत्रान्वये शासनाने विद्यापीठांना विचारणा केली होती की, अशाप्रकारचा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी किती स्कोप आहे, किती विद्यार्थी या विषयाचे शिक्षण घेऊ इच्छितात. परंतु हा विषय सुरु करण्याबाबत शासनाने कोणतेही आदेश दिले नव्हते. विद्यापीठ अधिनियम, १९९४ प्रमाणे विद्यापीठे या स्वायत्त संस्था आहेत.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांचे बोर्ड ऑफ स्टडीज, फॅकल्टीज आहे. कोणता अभ्यासक्रम चालू करायचा हे मागणीनुसार ठरविले जाते आणि विद्यापीठ स्वत: त्याबाबतीत निर्णय घेते. डिमांड प्रमाणे विविध कोर्स चालू करावे लागतात. किती दिवसात हा विषय नागपूर विद्यापीठामध्ये सुरु करण्यात येईल, असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला. जेनेटिक इंजिनिअरिंगचा विषय मोठा आहे. जॉईण्ट बोर्ड ऑफ व्हाईस चॅन्सलर यांच्या स्तरावर चर्चा करुन विद्यापीठ स्तरावर हा निर्णय घेता येईल.

श्री सय्यद जमा : सभापति महोदय, माननीय मंत्री महोदय ने अपने उत्तर में कहा कि नागपुर युनिवर्सिटी एक स्वायत्त संस्था है. मेरा कहना है कि यदि वह स्वायत्त संस्था है तो फिर कोई कोर्स वहां की सीनेट में पास होने के बाद और एक्जीक्युटिव बॉडी में पास होने के बाद वह प्रस्ताव महाराष्ट्र सरकार के पास क्यों आता है और सरकार की परमीशन क्यों लेनी पड़ती है. चाहे शिक्षक अपाइंट करने हों या प्रोफेसर अपाइंट करने हों. उसकी परमीशन सरकार से आसानी से नहीं मिलती है. मैं बताना चाहता हूं कि मैं सीनेट का मेम्बर हूं इसलिए मुझे मालूम है कि सरकार के पास तीन अभ्यासक्रमों की फाइल पेंडिग है. नागपुर युनिवर्सिटी में पोस्ट ग्रेज्वुएट डिग्री इन कॉमर्स नहीं है,उसके लिए बच्चों को बाहर जाना पड़ता है.इसके अलावा मॉलिक्युलर सायंस से संबंधित कोर्स के लिए भी तीन साल से फाइल पेंडिग है तथा पोस्ट ग्रेज्वुएट डिग्री इन उर्दू कोर्स के लिए भी सरकार के पास फाइल पेंडिग है. इन अभ्यासक्रमों के लिए मैं सरकार के पास फॉलोअप कर रहा हूं. लेकिन वे फाइल क्लियर नहीं हो रही हैं. मुझे पूछना है कि क्या सरकार इन तीनों अभ्यासक्रमों की मंजूरी जल्द से जल्द देने का काम करेगी ?

श्री. राजेश टोपे : सन्माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्या प्रमाणे जेनिटिक्स सायन्स हा विषय सुरु करण्याच्या बाबतीत विद्यापीठाला स्वायत्तता असली तरी एखादा विषय राज्य शासनाला महत्वाचा वाटत असेल तर तो सुरु करण्याच्या बाबतीत शासन विद्यापीठाला सूचना देऊ शकते. फॉरेन्सिक सायन्सच्या बाबतीत शासनाने तसा निर्णय घेतला. मुंबई आणि औरंगाबाद विद्यापीठाला खास सूचना देऊन हा विषय तेथे सुरु करण्यात आला आणि त्यास अतिशय चांगला प्रतिसाद मिळालेला आहे. जेनेटिक्स सायन्स हा देखील महत्वाचा विषय असून सभागृहाच्या भावना लक्षात घेता सर्व विद्यापीठांना तशा प्रकारच्या सूचना देण्यात येतील. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पी.जी.कॉमर्स, मॉलेक्युलर सायन्स, पी.जी. उर्दू या बाबतीत पदांच्या मान्यतेचा विषय असेल तर त्यानुषंगिक परवानगी देता येईल.

डॉ. दीपक सावंत : उत्तरामध्ये संदिग्धता आहे. या विषयाच्या संदर्भात दि. 28.3.2003ला प्रस्ताव सादर करण्यात आला. आता आपण डिसेंबर 2010मध्ये आहोत.तेव्हा हा प्रस्ताव इतके दिवस प्रलंबित राहाण्याची कारणे काय आहेत ? उत्तरामध्ये असे नमूद केलेले आहे की "विद्यापीठातील अभ्यासक्रम विहीत करण्यासाठी विषयनिहाय अभ्यासमंडळाची स्थापना करण्यात येते. तसेच उक्त अभ्यासमंडळाकडून विद्यापीठातील अभ्यासक्रम तयार करण्यात येतात." तेव्हा या जेनेटिक्स सायन्सचा अभ्यासक्रम तयार करण्यात आलेला आहे काय ?

श्री. राजेश टोपे : आधीच्या उत्तरामध्ये असे सांगितलले आहे की, 10 विद्यापीठापैकी 4 विद्यापीठामध्ये हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आलेला आहे. बी.एससी. बायालॉजी या शाखेमध्ये बायालॉजी या विषयामध्ये जेनिटिक्स सायन्स विषयाचा एक पेपर आहे. या प्रमाणे 4 विद्यापीठामध्ये हा अभ्यासक्रम सुरु आहे. हा विषय एका पेपरपुरता सीमित न ठेवता त्या विषयाची व्याप्ती मोठी असल्यामुळे हा अभ्यासक्रम विकसित करण्याच्या सूचना विद्यापीठाला देण्यात येतील. विविध विषयाचा अभ्यासक्रम ठरविण्यासाठी अभ्यास मंडळ गठीत करण्यात येते. विषयनिहाय अभ्यासमंडळाच्या माध्यमातून अभ्यासक्रम तयार केला जातो.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

किवा सिलॅबस तयार केला जातो त्या अनुषंगाने तो अभ्यासक्रम खऱ्या अर्थाने सुरु होतो. सभापती महोदय, सभागृहाच्या भावना लक्षात घेता याबाबतच्या सूचना राज्य शासनाच्या वतीने सर्वच विद्यापीठांना देण्यात येतील.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला असला तरी आज सकाळी नियम 289 च्या सूचनेच्या अनुषंगाने भाष्य करीत असताना सभागृहामध्ये प्रश्नोत्तराच्या तासाचा काही वेळ वाया गेलेला आहे. तेवढा वेळ मी आज वाढवून देणार नाही. परंतु या अनुषंगाने मी असा निर्णय देतो की, पाच मिनिटे या मर्यादेपर्यंतच वेळ वाढविणे योग्य होईल. म्हणून मी पाच मिनिटे प्रश्नोत्तराच्या तासासाठी वेळ वाढवून देत आहे. माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी प्रश्न विचारावा.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, अतिशय महत्वाच्या विषयावर अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचा हा प्रश्न आहे. माझी शासनाला विनंती आहे की, आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्या कोणत्या पाश्चिमात्य विद्यापीठाचे अशा पध्दतीचे अभ्यासक्रम असतील त्या विद्यापीठांबरोबर कोलॅबरेशन करुन लवकरात लवकर अशा पध्दतीचे कोर्सेस आपल्याकडे सुरु करण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे काय?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, अतिशय चांगली सूचना आहे. सजेशन फॉर ॲक्शन.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा नागपूर विद्यापीठाशी संबंधित प्रश्न आहे. नागपूर हे उपराजधानीचे शहर आहे. नागपूर विद्यापीठ हे राज्यातील सर्वात जूने विद्यापीठ आहे. असे असताना शासनाकडे 2003 साली प्रस्ताव सादर होऊनही मागील 7 वर्षात या पी.जी.च्या प्रस्तावांना मान्यता न देण्याची कारणे काय आहेत? जेनेटिक्स सायन्सचा विषय सुरु करण्याबाबत इतर विद्यापीठांना मान्यता दिली गेली, परंतु नागपूर विद्यापीठाला त्यामधून वगळण्यात आले. पुढील शैक्षणिक वर्षापासून नागपूर विद्यापीठामध्ये हा विषय सुरु करण्यास मान्यता दिली जाईल काय?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना मी एवढेच सांगू इच्छितो की, कोणता अभ्यासक्रम सुरु करायचा हा विद्यापीठांचाच अधिकार आहे. यासाठी शासनाकडे येण्याची बिलकूल आवश्यकता नाही. तत्कालीन महामहीम राज्यपाल डॉ.पी.सी.अलेक्झांडर यांनी विदर्भ वैधानिक विकास मंडळाची बैठक घेतली, त्या बैठकीमध्ये या विषयाबाबत विचार व्यक्त केले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होते. त्या अनुषंगाने शासनाने नागपूर विद्यापीठाकडून माहिती मागविण्याचे काम केले. त्या माहितीच्या आधारे विचार करण्याची प्रक्रिया सुरु आहे. परंतु कोणत्याही विद्यापीठाला असा अभ्यासक्रम सुरु करावयाचा असेल तर तो त्यांचाच पूर्ण अधिकार आहे. असा अभ्यासक्रम केव्हाही सुरु करता येईल. त्यासाठी शासन दरबारी प्रस्ताव प्रलंबित आहे असा विषय नाही. सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन हा अतिशय महत्वाचा विषय असल्यामुळे राज्य शासनाच्या वतीने सर्वच विद्यापीठांना सूचना देण्याचे काम हे पॉझिटिव्हली आणि सेल्फ इनिशिएटिव्हली म्हणजे स्वतःच पुढकार घेऊन राज्य शासन करु पहात आहे.

...3..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्र व दुर्गम भागातील कायम विनाअनुदानित ज्युनिअर कॉलेज आणि अनुदानित कॉलेजातील कायम विनाअनुदानित तुकड्यांना अनुदान मिळण्याबाबत

(६) * ९४१४ श्री.कपिल पाटील , श्री.जयंत पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्र व दुर्गम भागातील कायम विनाअनुदानित ज्युनिअर कॉलेज आणि अनुदानित कॉलेजातील कायम विना अनुदानित तुकड्यांना अनुदान मिळण्याची कायम विनाअनुदानित उच्च माध्यमिक शिक्षण संघर्ष संघटनेने मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागण्यांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जनजाती सल्लागार नगरपरिषदेच्या ४३ व्या बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) सदर आदिवासी उपयोजनेतील अखर्चित निधी परत न पाठवता तो या अनुदानसाठी वापरण्याबाबत शासनाची काय भूमिका आहे ?

प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता : (१) होय,

(२) व (३) कायमविना अनुदानित तत्वावरील उच्च माध्यमिक शाळांना विना अनुदान तत्वावर आणण्याचा निर्णय अद्याप झालेला नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी तिसरा उपप्रश्न जो विचारला होता तो आदिवासी उपयोजनेतील अखर्चित निधी परत पाठविला जातो किंवा अन्य खात्याकडे वळता केला जातो याबद्दलचा होता. उच्च माध्यमिक शाळांना अनुदान देण्याबद्दलचा मुख्य प्रश्न आहे. प्रामुख्याने आदिवासी भागातील शाळांसाठी हा प्रश्न आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रात शाळा उभारण्यासाठी अन्य कोणता सोर्स उपलब्ध नसतो. त्यामुळे उपयोजना क्षेत्रातील अखर्चित निधी अन्य खात्याकडे वळता करण्याऐवजी शिक्षण खात्याकडे वळविण्यासंबंधी प्रयत्न केला जाईल काय? हायर सेकंडरी हायस्कूलसाठी असा निधी वापरला जाईल काय?

प्रा.फौजिया खान : सन्माननीय सदस्यांची सूचना अतिशय चांगली असून त्याबद्दल विचार करण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, उपप्रश्न क्रमांक ३ च्या संदर्भात उत्तर दिले आहे की, कायम विनाअनुदानित तत्वावरील उच्च माध्यमिक शाळांना विनाअनुदान तत्वावर आणण्याचा निर्णय अद्याप झालेला नाही. हा निर्णय किती दिवसात घेण्यात येईल?

नंतर २एफ.१...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 9414.....

प्रा. फौजिया खान : हा प्रश्न आदिवासी उप योजनेपुरताच मर्यादित असल्यामुळे त्याचे उत्तरही मर्यादितच राहील. कायम विना अनुदानित तुकड्या ज्या उच्च माध्यमिक शाळा व अनुदानित शाळांना जोडलेल्या आहेत त्यांच्यासंबंधीचा डिवीजनवाईज हा प्रश्न आहे. सन 2008 मध्ये राज्य सल्लागार परिषदेच्या बैठकीत हा निर्णय घेतला होता. त्यानंतर हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आला व असा निर्णय घेतला आहे की, आदिवासी आणि बिगर आदिवासी क्षेत्रातील प्रस्ताव एकत्रित आणावेत आणि सन 2009 मध्ये "कायम" हा शब्द काढण्याचा निर्णय घेण्यात आला. पण केंद्रशासनाचा राईट टू एज्युकेशन ॲक्ट आल्यामुळे 6 ते 14 वयोगटातील मुलांनाच मोफत आणि सक्तीचे शिक्षण हा कायदेशीर अधिकार असल्यामुळे उच्च माध्यमिक शाळांमध्ये त्या वयोगटातील मुले नसतात म्हणून फर्स्ट प्रायॉरिटीमध्ये त्यांचा विचार करण्यात आलेला नाही.

श्री. रामनाथ मोते : महोदय, आदिवासी विभागातील शाळांसबंधीचा हा प्रश्न असून जनजाती कल्याण समितीच्या सन 2004-05 च्या बैठकीत धोरणात्मक निर्णय झालेलाआहे. सन 2001 पासून राज्यात कायम विना अनुदानित धोरण सुरु केलेले असले तरी एक अपवाद म्हणून आदिवासी उप योजना क्षेत्रातील शाळांना सवलत देण्याचा निर्णय झाला आणि या सर्व शाळांना "कायम" हा शब्द काढून अनुदान देण्याचा निर्णय झाला. तरी या जनजाती कल्याण समितीच्या निर्णयानुसार आदिवासी विभागातील उच्च माध्यमिक शाळा 100 टक्के अनुदानावर आणण्याच्या संदर्भात अद्यापही धोरणात्मक निर्णय झालेला नाही, तो शासन घेणार आहे काय ?

श्री. राजेंद्र दर्डा : महोदय, जनजाती सल्लागार परिषदेने ज्या शिफारशी केल्या आहेत त्यासाठी आदिवासी विभागाने निधी उपलब्ध करुन दिल्यास आणि वित्त विभागाने त्याला मान्यता दिल्यास आदिवासी उप योजना क्षेत्रातील कायम विना अनुदानित उच्च माध्यमिक शाळांना अनुदानावर आणण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येईल.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे

सभापती : माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला मुद्दा मांडावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, योगायोगाने माननीय उप मुख्यमंत्री आज सभागृहात उपस्थित आहेत. राज्यात अवकाळी पावसामुळे जे नुकसान झाले त्यावर अधिवेशनाला सुरुवात झाल्यानंतर प्रथम दोन दिवस चर्चा होऊ शकली नाही. कारण दोन दिवस सलग सभागृह बंद पडले होते. त्याचे कारण असे होते की, शासनाने अवकाळी पावसात झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासंबंधीची घोषणा करावी, पण तशी घोषणा शासनाने केली नाही म्हणून 3 डिसेंबर, 2010 रोजी त्याच विषयावर सदनात चर्चा झाली. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी द्राक्ष बागायतदारांना दोन वर्षाचे व्याज माफ केले जाईल व त्यापोटी मागील दोन वर्षाचे 250 कोटी रुपये देणे ताबडतोब दिले जातील अशी घोषणा केल्यानंतर चर्चा सुरु झाली. अशी चर्चा सुरु झाल्यानंतर माननीय उप मुख्यमंत्र्यांनी त्या चर्चेला उत्तर दिले व राज्यातील अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना 1 हजार कोटी रुपये मदत म्हणून दिले जातील, अशी घोषणा केली. त्याचबरोबर माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी सदनात सांगितले होते की, यापुढे राज्यातील कोणत्याही शेतकऱ्याचे वीज कनेक्शन तोडले जाणार नाही व तोडलेले कनेक्शन जोडण्यात येईल. आज 13 डिसेंबर, 2010 हा दिवस उजाडला आहे. 12 डिसेंबर, 2010 पर्यंत राज्यातील पंचनामे पूर्ण होतील असे शासनाच्या वतीने सांगण्यात आले होते. परंतु असे पंचनामे न झाल्याने आजही राज्यातील शेतकरी संभ्रमात आहे. त्याचे कारण असे की, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी घोषणा केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी एमएसईबीच्या वतीने शेतकऱ्यांसाठी आदेश काढण्यात आले होते की, जोपर्यंत विजेची चालू देयके भरली जाणार नाहीत तोपर्यंत शेतकऱ्यांची विजेची कनेक्शन्स जोडली जाणार नाहीत, त्यांना चालू देयके भरावी लागतील....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

सभापती महोदय, 1 हजार कोटी रुपयांचा ब्रेकअप देण्यात आले होते. आतापर्यंत केवळ हरभरा पिकाचेच पंचनामे झालेले आहेत. खरीपाच्या कोणत्याही पिकाचे पंचनामे झालेले नाहीत. नागपूर येथे मोठया प्रमाणात संत्रा पिकवला जात असतो. नागपूर येथे संत्रा पिकाचे प्रचंड मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. केळी आणि पिकाच्या संदर्भात बोलले गेले परंतु नागपूरमध्ये पिकवल्या जात असलेल्या संत्र्यांच्या संदर्भात माननीय उपमुख्यमंत्रीमहोदयांच्या भाषणात काहीही उल्लेख झाला नव्हता. कापूस,ज्वारी, सोयाबीन या पिकाच्या नुकसान भरपाई संदर्भात या ठिकाणी माहिती दिली जाणार आहे की, नाही ? शासन केवळ हरभरा आणि भाताच्या पिकासाठीच नुकसान भरपाई देणार आहे याची माहिती सभागृहाला समजण्याची आवश्यकता आहे. आमच्या पश्चिम विदर्भात केवळ हरभरा पिकाचेच पंचनामे झालेले आहेत. अधिवेशन दोन दिवसात संपणार आहे त्यामुळे शेतक-यांचे जे वीज कनेक्शन कापले गेले आहे त्याबाबत शेतकरी अजूनही संभ्रमात आहे. वीज बोर्डाने सांगितले आहे की, जो चालू बिलापर्यंतचे पैसे भरेल त्याचेच आम्ही कनेक्शन कट करणार नाही. त्यामुळे या सर्व गोष्टीचा खुलासा त्वरित होण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी शेतक-यांसाठी 1 हजार कोटी रुपयांची घोषणा झाली परंतु ही घोषणा नेहमी प्रमाणेच झालेली आहे. विद्युत कनेक्शन कापले जाणार, शेतक-यांचे मागील थकबाकीचे 250 कोटी रुपये दिले जातील, द्राक्ष बागायतदारांना दोन वर्षाचे व्याज माफ केले जाईल अशी घोषणा झाली होती. त्यामुळे हे अधिवेशन संपण्याच्या आत यासंदर्भातील सर्व माहिती राज्य सरकारने दिली पाहिजे अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे सभागृहाच्या नेत्यांना विनंती करीत आहे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते मा. फुंडकर साहेबांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे. खरे तर राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी तसेच मी देखील याबाबत स्पष्टपणे माहिती दिली होती. अवकाळी पावसाळयामुळे राज्यातील वेगवेगळया भागातील शेतक-यांचे नुकसान झाले होते त्यासंदर्भातील पंचनामे येण्यामध्ये काही विलंब लागणार होता. म्हणून आम्ही 12-13 डिसेंबर, 2010 पर्यंत सर्व पंचनाम्याचे काम पूर्ण होईल असे सांगितले होते. कालच मुख्य सचिवांनी सर्व विभागीय आयुक्तांना बोलावले होते. अधिवेशनाच्या तिस-या आठवडयाचा आजचा पहिला दिवस

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ....

आहे. सर्व पंचनाम्याची माहिती आल्यानंतर फळबागांच्या संदर्भात वेगवेगळया पिकांच्या संदर्भात राज्य सरकारची भूमिका स्पष्ट करण्यात येईल. शासनाने जाहीर केलेले आहे की, सगळया कामाच्या बाबतीत शेतक-यांना 1 हजार कोटी रुपयांची मदत करण्याची भूमिका शासनाने घेतलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी दुसरा मुद्दा उपस्थित केला आहे की, आज शेतक-यांची विजेची कनेक्शन्स तोडली जात आहेत. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, अवकाळी पावसामुळे जे शेतकरी बाधित झालेले आहेत फक्त त्यांचीच कनेक्शन तोडली जाणार नाहीत असे दोन्ही सभागृहात मा. मुख्यमंत्र्यांनी आणि मी क्लिअर केलेले आहे. बाधित हा शब्द जाणीवपूर्वक वापरण्यात आला होता. जे शेतकरी बाधित नाहीत त्यांनी चालू विजेची बिले भरली पाहिजेत. जर वितरणच्या अधिका-यांच्या मनात द्विधा असेल किंवा त्यांचा गैरसमज झाला असेल तर त्यासंदर्भात पुन्हा क्लिअर सूचना वितरण कंपनीच्या मुख्य अभियंत्यांना देण्यात येतील व अधिवेशन संपण्याच्या आत नुकसानीच्या संदर्भात वेगवेगळया पिकांच्या बाबतीत मदत करण्याची भूमिका राज्य सरकारने घेतलेली आहे. या ठिकाणी विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले आहे की, आतापर्यंत फक्त हरभरा पिकाचेच पंचनामे झालेले आहेत परंतु सर्व पिकांचे पंचनामे तयार करण्यात यावे अशा सूचना देण्यात आल्या होत्या तसेच या सर्व पंचनाम्याची आकडेवारी आमच्यापर्यंत येऊ द्या अशाही क्लिअर सूचना देण्यात आल्या होत्या. तरी सुध्दा मा. विरोधी पक्ष नेत्यांनी विदर्भातील शेतक-यांच्या बाबतीत जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याबाबतीत विदर्भाच्या आयुक्तांना त्यासंदर्भात पुन्हा विचारण्यात येईल परंतु माझ्या माहिती प्रमाणे सर्व ठिकाणचे पंचनामे झालेले आहेत. काही ठिकाणी पंचनामे राहून गेले असतील तर त्याची माहिती घेतली जाईल व ज्यांचे पंचनामे राहिले असतील त्यांचे पंचनामे पूर्ण करुन घेण्याच्या संदर्भात सूचना दिल्या जातील.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्याबाबत

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहाचा सन्मान राखण्याकरिता मी औचित्याचा मुद्दा मांडत आहे. आज आपण प्रश्नोत्तराच्या तासाला पूर्ण न्याय देण्याचा प्रयत्न केला. प्रश्नोत्तराच्या तासामध्ये किती प्रश्नावर चर्चा होते यापेक्षा किती प्रश्नांना न्याय मिळतो हे महत्वाचे आहे आणि हे आपण लक्षात घेऊन प्रश्नांना न्याय देण्याचा प्रयत्न करता त्याबद्दल मी आपणास धन्यवाद देतो. परंतु आज एक खेदजनक अशी बाब घडली. आज प्रश्नोत्तराच्या तासामध्ये आपण प्रथमच चार वेळा माननीय मंत्रीमहोदयांना नकळत सांगण्याचा प्रयत्न करीत होता. आपण प्रश्नास न्याय देण्याचा प्रयत्न करुन सुध्दा माननीय मंत्रिमहोदयांनी आपला हट्ट सोडला नाही. या सदनाच्या सर्वोच्च स्थानाचा नकळत माननीय मंत्रीमहोदयांकडून आणि सरकारकडून अवमान झाल्याची भावना आमच्या मनात झालेली आहे. ही अत्यंत खेदजनक बाब आहे. आपण कधीही मध्ये बोलत नाही. परंतु आपण आज सतत चार वेळा सांगून सुध्दा माननीय मंत्रीमहोदयांनी त्याची दखल घेतली नाही. माननीय मंत्रीमहोदयांना "क" शब्दाचा अर्थ कारवाई हे देखील समजले नाही. कॅबिनेट मंत्री महोदयांनी उत्तर दिल्यानंतर राज्य मंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही 15 दिवसांत कारवाई करु. खरे म्हणजे ही चिंताजनक बाब आहे. या सर्वोच्च स्थानाचा सरकारकडून अवमान झालेला आहे. त्याच्या निषेधार्थ आम्ही सभात्याग करीत आहोत...

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण सर्वोच्च स्थानावर बसला आहात. आपण सुध्दा 30-40 वर्षे ग्रामीण स्तरावर काम केलेले आहे. त्यामुळे आपणास ग्रामीण प्रश्नाबाबत चांगली जाण आहे. आजच्या प्रश्नोत्तराच्या वेळी एका प्रश्नावर आपण सन्माननीय मंत्रीमहोदयांना वारंवार सूचना केल्या. आपण सूचना केल्यानंतर माननीय मंत्रीमहोदयांनी ऐकले नाही. यापूर्वी या सभागृहात असे कधी घडले नाही. आपण चार वेळा सूचना देऊनही मंत्रीमहोदयांनी उत्तर देण्याचा प्रयत्न केला. ही अत्यंत निंदनीय बाब आहे. या प्रकारामुळे आपला अवमान झाला आहे आणि हे योग्य नाही. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो मुद्दा मांडला त्यास आम्ही सहमती देऊन बहिर्गमन करीत आहोत.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती :सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी अशाप्रकारे सभात्याग करणे योग्य नाही. हे रेकॉर्डवर राहू नये. या सदनामध्ये प्रश्नोत्तरे किंवा अन्य कोणत्याही कामकाजामध्ये मंत्रिमहोदयांनी कोणती उत्तरे द्यावीत याबाबत कोणतेही आदेश वा निदेश देण्याच्या विरोधात मी आहे. किंबहुना सभापतींचे ते काम नाही. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी किंवा ज्या सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे त्यांनी माननीय मंत्रीमहोदयांकडून अचूक उत्तरे काढण्याचा प्रयत्न करणे हे त्यांचे काम आहे. प्रश्नास अचूक उत्तर देणे हे माननीय मंत्रीमहोदयांचे काम आहे. माननीय मंत्रीमहोदयांनी कोणती उत्तरे द्यावीत हे त्यांनी ठरवावयाचे आहे. अशी आपली कार्यपध्दती आहे. आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक दोन वरील प्रश्नाच्या संदर्भात "सचिवांनी कोणतीही पूर्व सूचना न घेता 2 लाख 50 हजार रुपये संबंधित ठेकेदारास दिले" एवढे मी सूचित करीत होतो. त्या व्यतिरिक्त मी माननीय मंत्रीमहोदयांना कोणतीही सूचना केली नाही. मी आताच सांगितले की, कोणताही आदेश वा निदेश देणे माझ्या मनाला पटत नाही. माननीय मंत्रीमहोदयांनी या सदनामध्ये अगदी खुल्या मनाने उत्तरे द्यावयाची आहेत. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी अत्यंत खुबीने त्यांच्याकडून प्रश्नांची उत्तरे काढून घेतली पाहिजेत किंवा तसा प्रयत्न करणे आवश्यक आहे. अशा पध्दतीचे वक्तव्य रेकॉर्डवर राहणे म्हणजे कळत नकळत माझ्यावर अन्याय केल्यासारखे होईल. माझा कोणाकडूनही अवमान झालेला नाही. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी बहिर्गमन करावयास नको होते.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते म्हणाले की, कॅबिनेट मंत्र्यांनी उत्तर दिल्यानंतर राज्य मंत्र्यांनी उत्तर देणे योग्य नाही आणि ही बाब ते माननीय उपमुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून देत होते...

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कॅबिनेट मंत्र्यांनी समाधानकारक उत्तर दिले होते त्याच्या विरुध्द राज्य मंत्र्यांनी उत्तर देत होते असे सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांचे म्हणणे होते.

सभापती : तसे नाही.विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना मी मघाशी विनंती केली होती तीच विनंती मी त्यांना पुन्हा करीत आहे....

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभागृहात येतात)

सभागृहात प्रश्नोत्तराच्या किवा अन्य कोणत्याही बाबीच्या संदर्भात अचूक व अत्यंत चांगल्या शैलीत प्रश्न विचारुन माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर घ्यावे या दृष्टीने सन्माननीय सदस्यांचा प्रयत्न असावा व योग्य पध्दतीने उत्तर देण्याच्या दृष्टीने सन्माननीय मंत्री महोदयांचा प्रयत्न असावा. मी मघाशी सांगितले होते की, मी कोणताही आदेश किंवा निदेश देत नाही तसेच या पुढच्या काळात मी या पदावर असेपर्यंत कोणताही आदेश वा निदेश देणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आपण अनेकदा सभागृहात सूचना दिलेल्या आहेत. गेल्या हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचनेवर चर्चा करीत असतांना दाई कीटसच्या संदर्भात सी.आय.डी. चौकशीचा अहवाल पुढील अधिवेशात सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल असे माननीय गृह मंत्री व माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी सांगितले असून त्याला एक वर्ष होऊनही या संवेदनशील विषयाचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला नाही. या अधिवेशनाच्या दहा दिवसाच्या कालावधीमध्ये मी दुस-यांदा हा मुद्दा सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे. या सरकारला काय झाले आहे हे मला समजत नाही मेळघाटच्या कुपोषणाच्या संदर्भात चर्चा करीत असतांना देखील मी हाच मुद्दा उपथित केला होता परंतु आजपर्यंत अशा प्रकारचा कोणताही अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला नाही ही दुर्देवाची गोष्ट असून हेच दुर्देव कुपोषित बालकांचे आणि विदर्भाचे आहे असे सांगून त्याचा मी निषेध करतो.

सभापती : निषेध गुळगुळीत होता कामा नये याची आपण काळजी घेतली पाहिजे.असे माझे व्यक्तिगत मत आहे.

डॉ.दीपक सावंत : मी सभागृहाबाहेर जाऊ काय ?

सभापती : सन्माननीय सदस्यांनी सभागृहाच्या बाहेर जाऊ नये.सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी उपस्थित केलेला औचित्याचा मुद्दा अत्यंत महत्वाचा आहे.दाई कीटसच्या संदर्भात जो काही गैरप्रकार झाला होता त्याची सी.आय.डी. चौकशी करण्यात येईल असे सन्माननीय गृह मंत्र्यांनी सभागृहात सांगितले होते त्यानुसार कोणती चौकशी करण्यात आली होती त्याचा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला नाही. या बाबतीत सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालावे आणि माननीय गृह मंत्र्यांना सांगून लवकरात लवकर हा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात येईल असे पहावे.

श्री.अजित पवार : होय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. शोक प्रस्ताव

मु.शी.: कै.नारायण गंगाराम सुर्वे,थोर कवी व कै. विठ्ठल गंगाराम उमप, लोकशाहीर यांच्या दु:खद निधनाबद्दल शोकप्रस्ताव

सभापती : विधान परिषदेच्या कामकाज सल्लागार समितीच्या दिनांक 9 डिसेंबर 2010 रोजी झालेल्या बैठकीमध्ये सर्वानुमते ठरल्यानुसार थोर कवी कै. नारायण गंगाराम सुर्वे व लोकशाहीर कै. विठ्ठल गंगाराम उमप यांच्या दु:खद निधनाबद्दल सभागृहाच्या वतीने शोक प्रस्ताव संमत करावयाचा आहे. निर्णयानुसार या प्रस्तावावर अन्य कोणी बोलणार नाही त्याप्रमाणे मी पुढील प्रस्ताव मांडतो.

" कै. नारायण गंगाराम सुर्वे, थोर कवी व कै. विठ्ठल गंगाराम उमप, लोकशाहीर यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते ."

थोर कवी कै. नारायण गंगाराम सुर्वे यांचा जन्म मुंबई येथे 15 ऑक्टोबर 1926 रोजी झाला. गिरणगावातील गिरणी कामगार वस्तीत त्यांनी आपले सर्व जीवन व्यतीत केले.

कै. सुर्वे यांनी अतिशय खडतर परिस्थितीतही सातवीपर्यंत शिक्षण घेतले होते. प्राथमिक शिक्षकाची सनदही त्यांनी प्राप्त केली होती. सुरुवातीस गिरणी कामगार, त्यानंतर काही काळ शाळेत शिपायाची नोकरी केली आणि त्यानंतर ते प्राथमिक शिक्षक झाले.

कै. सुर्वे यांच्यावर मार्क्सवादी विचारसरणीचा पगडा होता. 1958 च्या सुमारास त्यांनी काव्यलेखनास प्रारंभ केला. कामगार आणि कष्टकऱ्यांच्या वेदनेला त्यांनी आपल्या साहित्यातून शब्दांची धार दिली. त्यांनी त्यांच्या कवितांमधून सामाजिक क्रांतीचा जयघोष केला. त्यांची कविता महाराष्ट्राला भावली, गरिबांना आपली वाटली आणि धनवंतांनाही तिचे सांगणे नाकारता आले नाही. ती दाहक असूनही जाळणारी नाही आणि कठोर असूनही आघात करणारी नाही याचा प्रत्यय संपूर्ण महाराष्ट्राला आला.

कै. सुर्वे यांनी मराठीमध्ये विपुल लिखाण केले आहे. "ऐसा गा मी ब्रह्म", "माझे विद्यापीठ", "जाहीरनामा", "नव्या माणसाचे आगमन" हे त्यांचे गाजलेले काव्यसंग्रह. तसेच "माणूस , कलावंत आणि समाज" हा त्यांचा लेखसंग्रह गाजला आहे.

सभापती .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कै. सुर्वे यांनी कोकण मराठी साहित्य संमेलनाचे तसेच, 1995 मध्ये परभणी येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले होते. त्यांच्या साहित्यकृतींना महाराष्ट्र शासन, मध्यप्रदेश शासन, कुसुमाग्रज प्रतिष्ठान यांच्याकडून विविध पुरस्कार प्राप्त झाले. याशिवाय, भारत सरकारचा "पद्मश्री" पुरस्कार तसेच, सारस्वताच्या दरबारातील अन्यही अनेक सन्मान त्यांना प्राप्त झाले होते.

अशा या थोर कवीवर्याचे सोमवार दिनांक 16 ऑगस्ट 2010 रोजी दुःखद निधन झाले.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

लोकशाहीर कै. विठ्ठल गंगाराम उमप यांचा जन्म 15 जुलै 1931 रोजी झाला.

कै. उमप यांनी प्रथमपासून आंबेडकरी विचारांचा झेंडा खांद्यावर घेतला होता. त्या विचारांना वाहिलेली हजारोंवर गीते त्यांनी गायली. जीवनभर हाल अपेष्टा सहन करुन लोकमान्यता आणि प्रेम त्यांनी मिळविले. कविता, पोवाडे, शाहिरी व लोकनाट्याच्या माध्यमातून राज्याच्या जनतेच्या गळयातील ते ताईत बनले होते. **'गीत पुष्पांजली'**, **'माझी वाणी भीमाचरणी'**, **'असा मी झालो आंबेडकर'**, **'माझी आई भीमाई'**, **'आंबेडकरी शेरोशायरी'** इत्यादी गीतसंग्रह त्यांनी लिहिले. **'पहिल्या धारेची'**, **'रंग शाहिरीचे'** ही शाहिरी गीतेही त्यांनी रचली. त्यांनी आपल्या गीतांमधून आंबेडकरी समाज, त्यांची संस्कृती, शेतकरी व कामगारांची विविध आंदोलने, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, स्वातंत्र्यसंग्राम तसेच सामाजिक प्रश्नांविषयींची आस्था व्यक्त केली आहे. **'उमाळा'** हा त्यांचा गझलांचा संग्रहही प्रकाशित झाला आहे.

कै. उमप यांनी आपल्या प्रतिभेने महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक, व्यक्तिचित्रणात्मक, राष्ट्रपुरुष इत्यादींवर अनेक पोवाडे रचले आहेत. राष्ट्रीय बाण्याचे अस्सल काव्य म्हणून त्यांच्या पोवाड्यांचा उल्लेख केला जातो. त्यांना अनेक मान सन्मानांनी गौरविण्यात आले आहे.

कै. उमप हे खऱ्या अर्थाने लोकशाहीर होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात फिरुन त्यांनी प्रत्येक लोककला आणि भाषेचा जवळून अभ्यास केला. त्यांचे **'जांभूळ आख्यान'** इतके लोकप्रिय झाले की, विदेशातूनही या कार्यक्रमाला मागणी होती. **'आंबेडकरी जलसा'** हा त्यांचा प्रिय विषय होता. लोकगीते, कोळीगीते, भारुडे, गौळणी, शायरी व कव्वाली आदींवर त्यांचे प्रभुत्व होते किंबहुना, तोच त्यांचा आत्मा होता आणि खऱ्या अर्थाने शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी तो जपला.

अशा या थोर लोकशाहीराचे शुक्रवार दिनांक 26 नोव्हेंबर 2010 रोजी दु:खद निधन झाले.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा. अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ MMP/

सभापती ....

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

मी आता सभागृहाचे कामकाज 15 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक 2.44 ते 2.59 पर्यंत स्थगित झाली.)

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

पृ.शी./मु.शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. गुलाबराव देवकर (रोजगार व स्वयंरोजगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचे सन 2002-2003, 2003-2004, 2004-2005, 2005-2006, 2006-2007 या वर्षाचा अनुक्रमे पाचवा, सहावा, सातवा, आठवा व नववा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो

उप सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. प्रकाश सोळंके (पणन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे यांचा सन 2009-2010 या वर्षाचा बावन्नावा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन 2004-05 चा वर्षाचा बेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राजेंद्र मुळक (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन 2008-09 या कालावधीच्या लेख्यावरील लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचा सन 2008-2009 या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांचा सन 2008-2009 या वर्षाचा अलग लेखा परीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतो

उप सभापती : अलग लेखा परीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचा सन 2008-2009 या वर्षाचा महालेखापाल, महाराष्ट्र-1 यांचा लेख्यांवरील लेखा परीक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : लेखा परीक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. प्रकाश सोळंके (वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन 2005-2006 या वर्षाचा चौतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादितचा सन 2009-2010 या वर्षाचा चव्वेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. सचिन अहिर (पर्यावरण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा सन 2007-2008 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: विधानपरिषद नियम समितीचा अहवाल सादर करणे

श्री.उल्हास पवार (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नियम समितीचा सन 2010 चा दुसरा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

महोदय, विधानपरिषद नियम समितीच्या आज दिनांक 13 डिसेंबर, 2010 रोजी सभागृहास सादर करण्यात आलेल्या अहवालाच्या अनुषंगाने नियम समितीच्या अहवालातील शिफारशींमध्ये सुधारणा करण्याची नोटीस देण्यासंबंधातील नियम 219(1) व 219(3) मधील दहा दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती नियम 289 अन्वये स्थगित करण्यात येऊन सदरहू मुदत तीन दिवसांची करण्यात यावी असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : यानुसार ज्या सन्माननीय सदस्यांना नियम समितीच्या अहवालातील शिफारशींवर सुधारणा सुचवावयाच्या असतील त्या त्यांनी आजपासून तीन दिवसांच्या आत सुचवाव्यात.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

पृ.शी./मु.शी.: नियम स्थगित ठेवणे

श्री.उल्हास पवार (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव प्रस्तुत करतो की, "विधानपरिषद नियम समितीच्या आज दिनांक 13 डिसेंबर, 2010 रोजी सभागृहास सादर करण्यात आलेल्या अहवालाच्या अनुषंगाने नियम समितीच्या अहवालातील शिफारशींमध्ये सुधारणा करण्याची नोटीस देण्यासंबंधातील नियम 219 (1) व 219 (3) मधील दहा दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती नियम 289 अन्वये स्थगित करण्यात येऊन सदरहू मुदत तीन दिवसांची करण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: विशेषाधिकार भंगाच्या सूचनांसंबंधातील संबंधितांचे खुलासे विहित मुदतीत प्राप्त होणे

मु.शी.: विशेषाधिकार भंगाच्या सूचनांसंबंधातील संबंधितांचे खुलासे विहित मुदतीत प्राप्त होणे यासंबंधी माननीय उप सभापतींनी केलेली घोषणा

उप सभापती : आपल्या सर्वांना विदित आहेच की, सभागृहाशी निगडित कर्तव्ये निर्भिडपणे व नि:पक्षपणे पार पाडण्यासाठी सन्माननीय सदस्यांना घटनेने विशेषाधिकार प्रदान केलेले आहेत. विशेषाधिकारांचे हनन झाले आहे असे सन्माननीय सदस्यांना वाटले तर ते विशेषाधिकार भंगाची सूचना देतात. तथापि, विशेषाधिकार भंगाच्या सूचनांसंदर्भातील संबंधितांचे खुलासे विलंबाने प्राप्त झाले तर विशेषाधिकारांच्या मूळ हेतुला धक्का पोहोचण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी विशेषाधिकार भंगाच्या सूचनांची विहित वेळेत तड लागून सन्माननीय सदस्यांना न्याय मिळण्यासाठी मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

1) ज्या व्यक्तीविरुध्द विशेष हक्क भंगाची सूचना दिलेली आहे त्यांच्याकडून थेट खुलासा मागविण्यात येईल व सदरहू व्यक्ती जर शासकीय कर्मचारी/अधिकारी असेल तर त्या संबंधित विभागाचे माननीय मंत्री महोदय, तसेच त्या विभागाचे प्रमुख (सचिव, प्रधान सचिव) यांना खुलासा मागविणा-या पत्राची प्रत उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात येईल.

2) संबंधितांना खुलासा सादर करण्यासाठी 15 दिवसांची मुदत देण्यात येईल.

3) 15 दिवसात खुलासा प्राप्त न झाल्यास नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे (Principle of natural justice) 7 दिवसात खुलासा सादर करण्याबाबत स्मरणपत्र पाठविण्यात येईल व त्यानंतरही खुलासा प्राप्त न झाल्यास द्वितीय स्मरणपत्र पाठवून 7 दिवसात खुलासा सादर करण्यासाठी अंतिम संधी देण्यात येईल. सदरहू पत्रात विहित वेळेत खुलासा प्राप्त न झाल्यास याबाबतची गंभीर दखल घेऊन संबंधितांना विशेषाधिकार भंगाच्या सूचनेसंबंधी काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन पुढील योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 च्या सूचना

उप सभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, कपिल पाटील यांनी "चांदूरबाजार (जि.अमरावती) शहरात अवैध धंदे वाढल्याने सर्वसामान्य नागरिकांसह व्यापा-यांना त्रास होत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, कपिल पाटील यांनी " नागपूर जिल्हयात 1 हजार 880 मेगावॉट विजेची निर्मिती होत असूनही जिल्हयातील सुमारे 104 गावांमध्ये अद्याप विद्युतीकरण न झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभाती...

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, रामनाथ मोते व पाशा पटेल यांनी "मराठवाडा विभागातील कोल्हापूरी बंधा-यांना गेट नसल्याने मोठ्या प्रमाणात पाणी वाया जाऊन रब्बी पिके ओलिताखाली येत नसल्याने शेतक-यांचे नुकसान होत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, नागो गाणार, भगवान साळुंखे, संजय केळकर, विनोद तावडे व चंद्रकांत पाटील यांनी "अदिवासी क्षेत्रातील अनेक शासकीय आश्रमशाळांमध्ये स्वच्छतागृहांची, स्नानगृहांची व निवासाची पुरेशी सुविधा उपलब्ध नसल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर व विनोद तावडे यांनी "राज्यातील साखर कारखान्यांमध्ये ऊस गाळप करत असतांना वीज निर्मिती करता येत असल्याची बाब 15 वर्षापूर्वी सिध्द होऊनही तशी सहवीज निर्मिती करण्याच्या दृष्टीने तत्परता दाखविली नसल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी "राज्याच्या नियंत्रण नियमावली 1991 अन्वये मुंबई म्हाडासाठी राखीव असलेल्या जागा म्हाडास हस्तांतरित करणे बंधनकारक असतांनाही मुंबईतील सुमारे 5 लाख 94 हजार चौरस मीटर जागा अनेक विकासकांनी परस्पर बाजारभावाने विकून अंदाजे 1 हजार करोड रुपयाची शासनाची फसवणूक केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी "ठाणे जिल्ह्यातील मिरागाव, मिरा भाईंदर येथील सर्व्हे नं. 151 येथील जागा विकास आराखड्यात खेळाच्या मैदानासाठी राखीव असलेल्या भूखंडावर अतिफ पार्क ही इमारत उभी रहात असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती...

आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे व भगवान साळुंखे यांनी "दिनांक 7.12.2010 पासून कोल्हापूर महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने शहरातील फेरीवाल्यांना पूर्वसूचना न देता पोलीस बळाचा वापर करुन त्यांच्या विरुध्द कारवाई केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता व पांडुरंग फुंडकर यांनी "राज्यातील शासकीय कर्मचा-यांच्या सेवाशर्तीनुसार अकृषी विद्यापीठातील कर्मचा-यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करताना उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि. 7 ऑक्टोबर, 2009 रोजी वेगळी अधिसूचना काढून सहाय्यक कुलसचिव व शासनाचे वर्ग-1चे अधिकारी यांच्या वेतनात तफावत निर्माण केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तिल्हारी पाटबंधारे प्रकल्प करारानुसार गोवा राज्य 75 टक्के व महाराष्ट्र राज्य 25 टक्के असे असूनही महाराष्ट्र राज्यातील गोवा लगत असलेल्या गावातील प्रकल्पग्रस्तांना गोवा सरकारने करारानुसार नोकरीत सामावून न घेतल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर व चंद्रकांत पाटील यांनी "ठाण्यातील मॅग्डोनाल्ड या उपाहारगृहातील स्त्रियांच्या स्वच्छतागृहात मोबाईल कॅमेराद्वारे शुटींग होत असल्याचे उघडकीस आल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, रामनाथ मोते व पाशा पटेल यांनी "परळी, वैजनाथ (जि.बीड) येथील स्वस्त धान्य दुकानदारांना परळी तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागाकडून गहू, तांदूळ, साखर, रॉकेल लोकसंख्येच्या प्रमाणात मिळत नसल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया यांनी "अकोला जिल्ह्यातील माझोड येथे गावक-यांच्या परस्पर भांडणामध्ये अवैध व्यवसायकाची तक्रार घेऊन एकतर्फी कारवाई केल्याबद्दल तंटामुक्ती अध्यक्षांनी पोलीस अधीक्षकांकडे केलेल्या तक्रारीबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

अन्य 93च्या सूचनांना मी दालनातच अनुमती नाकारली आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने निकृष्ट दर्जाचे खरेदी केलेले यू बोल्ट

मु. शी. : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने निकृष्ट दर्जाचे खरेदी केलेले यू बोल्ट यासंबंधी सर्वश्री जयप्रकाश छाजेड, उल्हास पवार, मोहन जोशी व एस.क्यू. जमा,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयप्रकाश छाजेड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने दिनांक ८ एप्रिल,२००९ ते ७ एप्रिल,२०१० या काळात "यू बोल्ट" च्या पुरवठयासाठी मुंबईतील राजेश रिव्हेट इंडस्ट्रिज आणि पुण्यातील देसाई ऑटोकॉम इंडस्ट्रिज प्रा.लिमिटेड या कंपन्यांशी केलेला करार, सदर पुरवठादारांनी पुरवठा केलेल्या माचे नमूने दापाडो, नागपूर व औरंगाबाद येथील एसटीच्या मध्यवर्ती कार्यशाळांतील प्रयोगशाळांत तपासले असता ते निकृष्ट दर्जाचे असल्याचे आढळून येणे, या दोन्ही कंपन्यांशी एसटीने केलेल्या रेट कॉन्ट्रॅक्ट यनुसार नमूद केलेल्या दर्जाच्या तुलनेत प्रत्यक्ष पुरवठा झालेल्या मालाचा दर्जा सुमार असल्याचे प्रयोगशालेय चाचण्यांमध्ये आढळून येणे, मे.सिकन्स,मे.जे.जे.इंडस्ट्रिज आणि पूर्णदत्ता कंपनी या एकाच ग्रुपच्या कंपन्या असून कंपन्यांची नांवे बदलून मोठया प्रमाणात रिव्हेटचा पुरवठा करण्यात येणे, तसेच एमआरएफ या टायर उत्पादक कंपन्यांकडून एसटीने २००८ सालाच्या अखेरीस खरेदी केलेले टायर्समध्ये दोष आढळून आल्याने ते नामंजूर करण्यात येणे,मध्यवर्ती कार्यशाळांकडून याबाबतचे गोपनीय अहवाल एसटीच्या भांडार खरेदी तसेच यंत्र अभियांत्रिकी विभागांच्या महाव्यवस्थापकांना वेळोवेळी देण्यात येऊनही या कंपन्यांविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात न येणे, कंत्राटाचा कालावधी संपेपर्यंत एसटीने सदर कंपन्यांकडून मालाची खरेदी सुरुच ठेवणे, सदोष पार्टस्मुळे राज्यात बसचे वारंवार होणारे गंभीर अपघात,बसेसच्या सुरक्षिततेच्या दुष्टिने "यू बोल्ट,रिव्हेट व टायर्स" हे अत्यंत महत्वाचे पार्टस् असूनही प्रवाशांची सुरक्षितता ही बाब धाब्यावर बसवून सदोष मालाचा पुरवठा करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्यास शासनाकडून होत असलेली दिरंगाई, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही."

..५..

13-12-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) MM-5

MSS/ D/ KGS/ MMP/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 15.10

श्री.गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड : एस.टी.मार्फत राज्यामध्ये रोज 60 लाख प्रवाशांची वाहतूक होत असते. एस.टी.महामंडळाच्या गाड्यांना अपघात होऊ नये म्हणून एस.टी.गाडयांसाठी लागणारे यू बोल्ट, अन्य पार्टस्, टायर्स इत्यादी कमी दर्जाचे खरेदी करण्यात आल्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. उत्तरामध्ये कमी दर्जाचा माल आलेला आहे असे नमूद केलेले आहे.

एस.टी.महामंडळ लागणा-या पार्टस्ची सर्व रक्कम भरत असेल तर कमी दर्जाचा माल घेण्याचे कारण काय ?

...नंतर श्री.भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड.... लक्षवेधी सूचना क्रमांक 1....

त्याचबरोबर टायर खरेदी करीत असताना मागील वेळी सिएट कंपनीचे टायर खरेदी केले गेले. त्यावेळी योग्य निविदा पध्दत न वापरल्यामुळे एसटी महामंडळाचे दर आणि तामीळनाडू राज्य परिवहन महामंडळाचे दर यामध्ये तफावत आल्याने महामंडळाला 35 लाख रुपयांचा भूर्दंड सोसावा लागला. प्रश्न असा आहे की, प्रवाशांचे हित लक्षात घेऊन सरकार या प्रकरणाची गंभीरपणे चौकशी करणार आहे काय? जे अधिकारी या प्रकरणात दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई करणार काय? भविष्यात अशा त्रुटी राहू नयेत म्हणून पारदर्शक व्यवहार केला जाईल काय?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, गतवर्षामध्ये राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसचे 15 ते 56 अपघात झालेले आहेत. हे अपघात वेगाने बस चालविणे, चुकीच्या पध्दतीने घाट ओलांडताना ओव्हरटेक करणे, घाटामध्ये अचानक ब्रेक लागल्याने बस स्लीप होणे या व इतर कारणांमुळे हे अपघात झालेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला की, गुणवत्ता कमी असलेल्या पार्टमुळे हे अपघात घडतात. असा प्रकार अपघाताबाबत घडलेला नाही. मी अपघाताची वेगवेगळी कारणे सांगितली आहेत. मेकॅनिकल फेल्युअरमुळे एकही अपघात झालेला नाही. टायर खरेदीच्या संदर्भात त्यांनी प्रश्न उपस्थित केला. एसटी महामंडळाने जवळपास 76 हजार टायर्सची खरेदी केली. त्यामध्ये 60 हजार नायलॉन टायर्स व 16 हजार रेडियल टायर्सचा समावेश होता. यापैकी 44 टायर्स ट्रान्सपोर्टेशनमध्ये डॅमेज झालेले होते, त्यामुळे ते कंपनीला परत करण्यात आले आहेत. या खरेदीबाबत महामंडळाला कोणतेही नुकसान सहन करावे लागलेले नाही. कमी गुणवत्ता असलेले पार्ट का वापरले जातात असे माननीय सदस्यांनी म्हटले आहे. महामंडळामार्फत 11 प्रकारच्या यू बोल्टची खरेदी केली जाते. यू बोल्टची खरेदी करीत असताना त्याबाबत केंद्र शासनाच्या सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट, पुणे आणि ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया, पुणे या दोन्ही संस्थांकडे प्राथमिक चौकशी करुन महामंडळाच्या डेपोमध्ये तपासणी झाल्यानंतर हे बोल्ट या दोन्ही संस्थांकडे तपासणीसाठी पाठविले जातात. ही तपासणी करीत असताना 13 वेगवेगळया परिमाणांची तपासणी केली जाते. त्यामध्ये प्रामुख्याने मायक्रो स्ट्रक्चर, प्रूफ लोड, टेनसाईल्स स्ट्रेंग्थ, इलॉगेशन इत्यादी दर्जांची तपासणी त्याठिकाणी करण्यात आली. त्यामध्ये नियमानुसार जे रिझल्ट यावयास पाहिजेत त्यामध्ये महत्वाचे परिमाण म्हणजे टेन्साईल स्ट्रेंग्थकरिता किमान प्रती 100 कि./एम.एम. पात्रता असावयास पाहिजे, त्याऐवजी काही

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर.....

नमुन्यांमध्ये ती 96 ते 99 टक्के प्राप्त झालेली आहे. ही बाब फक्त आपल्याच राज्यापुरती मर्यादित नाही तर केंद्र शासनाच्या पातळीवर असलेल्या कमिटीच्या अध्यक्षतेखाली जी बैठक झाली त्या बैठकीमध्ये इतर राज्यांच्या परिवहन महामंडळांचे सदस्य आणि पदाधिकारी उपस्थित होते. तेथे असा उल्लेख झाला की, हा जो विषय आहे अशा पध्दतीच्या टेस्ट सर्वच राज्यांमध्ये कराव्या लागतात.....

नंतर 2ओ.1..

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर .....

तरी पुढील काळात यासंबंधीची उपाययोजना करावी लागेल. तसेच या बैठकीत केलेल्या शिफारशीनुसार एएसआरटीयू, नवी दिल्ली आणि सीआयआरटी, पुणे यांनी निश्चित केलेल्या मानकानुसार तपासणी करुन पार्ट खरेदी करता येतील अशीही सूचना केली आहे.

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, मी स्पेसिफिक प्रश्न विचारलेला आहे की, यू बोल्ट खरेदी केले ते सदोष आढळून आलेले आहेत काय ? तसेच एस.टी. च्या वर्कशॉपमधील वर्क्स मॅनेजरने पर्चेसिंग मॅनेजरला पत्र दिलेले आहे त्यात गाड्यांचे लाईफ कमी होते वगैरे उल्लेख केला आहे. तसेच त्यांनी अशा इन्फेरियर क्वॉलिटीच्या उपकरणांची चौकशी करुन ज्यांनी हा माल पुरविला त्या कंपनीला ब्लॅक लिस्टमध्ये टाकणार आहात काय ? या प्रकरणाची चौकशी सचिवांमार्फत न करता शासनाच्याच पातळीवर करावी अशीही आमची मागणी आहे. सीएट कंपनीकडून खरेदी केलेल्या टायरमध्ये त्रुटी होत्या त्या कमी केल्या, ग्रेडर कमिशन कमी केले म्हणून 35 लाखाचे नुकसान एस.टी. ला झालेले आहे, त्याची नुकसान भरपाई कोणाकडून करण्यात येणार आहे ?

श्री. गुलाबराव देवकर : महोदय, टायरमध्ये 35 लाखाचे नुकसान वगैरे झाल्याचे दिसत नाही. तर हे सर्व टायर्स कंपनीला परत केले आहेत. तसेच या कंपनीने यू बोल्ट पुरविले होते त्यांच्या मानकात सुध्दा किरकोळ स्वरुपाचा फरक आढळून आला म्हणून एस.टी.ने त्यांचे 10 लाख रुपये कपात केले अशा प्रकारे महामंडळाचे कोणतेही नुकसान झालेले नाही. तसेच या पार्टच्या खरेदीत एस.टी.ला अपघात होण्यास मदत झाली असेही म्हणता येणार नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड हे एस.टी. युनियनचे अध्यक्ष आहेत. त्यांचा संबंध एस.टी. शी अगदी जवळून येतो. मंत्री महोदय उत्तर देत आहेत की, यामध्ये कुठलीही अफरातफर अथवा भ्रष्टाचार झालेला नाही. असे नाही तर मग कंपनीचे 10 लाख रुपये पेमेंट कपात करण्याचे कारण काय ? टायर्स कंपनीला परत केले याचे कारण काय आहे ? अशा प्रकारे एस.टी.चा दर्जा व त्यासाठी खरेदी करण्यात येत असलेल्या पार्टच्या संदर्भात सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. माननीय मंत्री महोदय कोणत्याही प्रकारचे समाधानकारक उत्तर देऊ शकत नाहीत. तसेच सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील.....

यांनी सदर कंपनीला ब्लॅक लिस्टमध्ये टाकणार काय असाही प्रश्न विचारला. माननीय मंत्री महोदय मात्र भलतेच उत्तर देत आहेत. माझा या अनुषंगाने एकच प्रश्न आहे की, या कंपनीला ब्लॅक लिस्टमध्ये टाकून पुन्हा टेंडर पध्दतीमध्ये येण्यास बंदी घालणार काय ?

श्री. गुलाबराव देवकर : महोदय, याप्रकरणी अतिशय बारकाईने लक्ष घालण्यात येत असून कंपनीकडून खरेदी केलेल्या यू बोल्टची टेन्साईल स्ट्रेन्थ 0.1/2 ने कमी होती म्हणून आपण 10 लाख रुपये कपात केले. अशा प्रकारे आपले नुकसान झालेले नसून कंपनीचेच नुकसान केले आहे. तसेच टायरच्या संदर्भात सुध्दा असाच प्रकार झाला म्हणून आपण त्या कंपनीचे टायर्स परत केले. एस.टी. चे मात्र यामध्ये कुठलेही नुकसान झालेले नाही.

श्री. मोहन जोशी : महोदय, भ्रष्टाचाराला पाठीशी घालण्याचे काम उत्तरातून होत असल्याचे दिसते. सन्माननीय सदस्यांनी अत्यंत मुद्देसूद प्रश्न विचारला की, एस.टी. च्या वर्क मॅनेजरनी लेखी अहवाल दिला तरी देखील ही गोष्ट मंत्री महोदय नाकारीत आहेत.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी ...

माझा प्रश्न असा आहे की, या ठिकाणी ज्या तीन कंपन्यांची नावे दिलेली आहेत त्या तिनही कपंन्या एकाच ग्रुपच्या असून त्यांनी एसटीचे टेंडर मिळवलेले आहे. उत्तरामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की कायद्यानुसार चौकशी सुरु आहे. जर या कंपन्यांची चौकशी सुरु असेल तर या कंपन्यांना आपण ब्लॅक लिस्टेड का केले नाही ?या कंपन्यांनी निकृष्ठ प्रतीचे स्पेअरपार्ट पुरवले नसेल तर त्यांची चौकशी का केली जात आहे. या ठिकाणी मा. मंत्रीमहोदयांनी या विषयाच्या संदर्भात दिलेले उत्तर संबंधित कंपन्यांना पाठीशी घालणारे आहे.

सभापती महोदय, 10 वर्षापूर्वी ज्या रेटने एसटीवर जाहिराती लावल्या जात होत्या त्याच रेटने आजही जाहिराती लावल्या जात असल्यामुळे एसटी महामंडळाचे करोडो रुपयांचे नुकसान होत आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या भ्रष्टाचाराला पाठिशी घालणे चुकीचे आहे. एसटीला पुरवठा करणा-या तिनही कंपन्या एकाच मालकाच्या आहेत काय ? ज्या कंपन्यांनी एसटीचे नुकसान केलेले आहे अशा या तीन कंपन्यांना आपण ब्लॅक लिस्टेड करणार आहात काय ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, एस.टी.ला पुरवठा करणा-या कंपन्यांच्या संदर्भातील सविस्तर माहिती लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात देण्यात आलेली आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की,..

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, परिवहन हा विभाग माननीय मुख्यमंत्र्यांकडे आहे व कोणत्याही खात्यात भ्रष्टाचार झाला तर त्याला मी पाठिशी घालणार नाही. अशी त्यांनी स्पष्टपणे घोषणा केलेली आहे. त्यामुळे आपण जे काही उत्तर द्याल ते थेट माननीय मुख्यमंत्र्यांना जाऊन भिडते आपण जर भ्रष्टाचा-यांना पाठीशी घातले तर माननीय मुख्यमंत्र्यांनीच भ्रष्टाचाराला पाठीशी घातले असा त्याचा अर्थ होईल त्यामुळे माननीय राज्यमंत्र्यांनी सावध उत्तर द्यावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, परिवहन हा विभाग माननीय मुख्यमंत्र्यांकडे आहे याची मला जाणीव आहे व त्यामुळेच मी जास्त जबाबदारीने काम करीत आहे व जबाबदारीनेच उत्तर देत आहे. सभागृहाची मी कोणत्याही प्रकारे दिशाभूल करणार नाही. या ठिकाणी मी अतिशय व्यवस्थित उत्तर देत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर...

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी विचार व्यक्त केलेले आहेत की, एसटीला मटेरियल पुरवठा करणा-या तिनही कंपन्या एकाच मालकाच्या आहेत. परंतु यासंदर्भात मी खुलासा करु इच्छितो की, या तिनही कंपन्यांचे संचालक मंडळ वेगवेगळे असून त्यांचे अस्तित्व देखील वेगवेगळे आहे. त्यामुळे टेंडरच्या अधिनियमानुसार, कायद्यानुसार जे टेंडर भरण्यास पात्र असतात, त्यांना आपण टेंडर भरण्यापासून वंचित करु शकत नाही. जे लोएस्ट टेंडर असेल त्यालाच काम द्यावे लागते. त्यामुळे फसवणूक होणार नाही, जास्त भावाने टेंडर दिले जाणार नाही याची आम्ही काळजी घेतलेली आहे.

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, या ठिकाणी जे उत्तर दिलेले आहे त्यामध्ये तीनही कंपन्या एकाच ग्रुपच्या आहेत हे विभागाने मान्य केलेले आहे. असे असतांना आपण एकच कंपनी ब्लॅकलिस्ट का केली, बाकीच्या दोन कंपन्या आपण ब्लॅकलिस्टेड का केल्या नाहीत ? तीनही कंपन्यांचे रिपोर्ट फेल आलेले असतांना परिवहन विभागाने एकाच कंपनीला ब्लॅक लिस्टेड का केले आहे ? या कंपनीत येणारा माल आपण दुस-यांच्या मार्फत खरेदी करीत आहात. असे असतांनाही परिवहन विभागाने तीनही कंपन्यांना का ब्लॅकलिस्टेड केले नाही ? प्रश्नाचे उत्तर बरोबर येत नसल्यामुळे ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी अशी आपल्याला विनंती आहे.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, या तीनही कंपन्यातून ज्या कंपनीचा थोडया प्रमाणात दोष होता त्या कंपनीकडून आपण दंडही वसूल केला आहे व त्या कंपनीला ब्लॅकलिस्टेड देखील केलेले आहे. पुढील काळात ब्लॅकलिस्टेड कंपनीला यापुढे कधीही काम घेता येणार नाही अशा प्रकारची तरतूद करण्यात आलेली आहे एवढी मी या निमित्ताने माहिती देऊ इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :तासगांवकर इंजिनिअरींग कॉलेज, कर्जत येथील प्राध्यापकाने मुंबई विद्यापीठाचे खोटी कागदपत्रे तयार करुन मोठया प्रमाणात केलेला भ्रष्टाचार

मु. शी. :तासगांवकर इंजिनिअरींग कॉलेज, कर्जत येथील प्राध्यापकाने मुंबई विद्यापीठाचे खोटी कागदपत्रे तयार करुन मोठया प्रमाणात केलेला भ्रष्टाचार यासंबंधी सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, संजय केळकर, रामनाथ मोते वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"तासगांवकर इंजिनिअरींग कॉलेज, कर्जत येथील प्राध्यापक श्री.गणेश कामणकर यांनी मुंबई विद्यापीठाचे खोटे शिक्के बनवून व कोऱ्या उत्तर पत्रिका मिक्सींग करुन मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार व फसवणूक केली असल्याची तक्रार त्यांची पत्नी श्रीमती अपर्णा कामणकर यांनी कागदपत्रे-पुराव्यासह महात्मा फुले चौक पोलीस ठाणे, कल्याण येथे दाखल करणे,सदर प्रकरणी स्थानिक पोलीस ठाण्यातील अधिकारी यांनी श्री.कामणकर व त्यांचे साथीदार यांच्यावर कारवाई करण्यास टाळाटाळ करीत असल्याचे लक्षात येणे, श्री.कामणकर यांच्या विरोधात कागदपत्रे-पुराव्यासह तक्रार करणाऱ्या श्रीमती अपर्णा कामणकर यांना सदर गुन्ह्यामध्ये आरोपी केले असणे, अशाप्रकारे उत्तर पत्रिका व गुणपत्रिकांमध्ये फेरफार करुन फसवणूक करणाऱ्या प्रा. कामणकर व त्यांच्या साथीदारांवर त्वरित कारवाई करण्याची होत असलेली मागणी व तक्रार दाखल करणाऱ्या श्रीमती अपर्णा कामणकर यांना या आरोपातून मुक्त करण्याविषयी विनोद तावडे, विधान परिषद सदस्य यांनी मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री यांच्याकडे दि. १८ नोव्हेंबर, २०१० रोजी दिलेले निवेदन व सदर गुन्ह्याच्या तपास कामात दिरंगाई करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (गृह(शहरे) राज्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील हा विषय आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे याठिकाणी उपस्थित आहेत. एक विवाहित महिलेने आपला नवरा विद्यार्थ्यांना घरी उत्तर पत्रिका लिहिण्यास देतो आणि लाखो रुपये घेतो, विद्यापीठांचे खोटे शिक्के बनवितो अशा तऱ्हेची तक्रार पोलीस स्टेशनमध्ये केल्यानंतर पोलीस त्या महिलेलाच आरोपी करीत आहे. कारण आपला नवरा अशातऱ्हचे उद्योग करतो हे तिला पाच महिन्यांपासून माहीत असताना तिने पाच महिन्यांनतर तक्रार का केली असे सांगून तिलाच आरोपी केले आहे. एक विवाहित महिला शिक्षण क्षेत्रासारख्या पवित्र क्षेत्रात चाललेला भ्रष्टाचार रोखण्यासाठी आपल्या पती विरुध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करते...सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त आपणास कल्याण मधील केस माहीत आहे... जर असे प्रकार होत असतील तर कोणता नागरिक अशाप्रकारची तक्रार करावयास पुढे येईल ? त्या महिलेला माननीय उच्च न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन घ्यावा लागला. ती महिला 15 दिवस घराबाहेर लपून राहिली. तेव्हा या प्रकरणातील ॲ.सी.पी. आणि वरिष्ठ अधिकारी यांच्यावर शासन कारवाई करणार काय ? कारण श्री.कामणकर भ्रष्टाचार करुन लाखो रुपये कमवितो आणि त्या अधिकाऱ्यांना वाटतो म्हणून त्याला संरक्षण मिळत आहे. त्या महिलेने एक महिन्यापूर्वी सासरचे लोक हुंडा मागतात म्हणून तक्रार केली होती. त्या महिलेने पोलीस यंत्रणेवर विश्वास ठेवून सर्व काही सांगितले. तिच्या नवऱ्यावर कारवाई न करता उलट तिलाच अटक करण्याचा प्रयत्न झाला. हा संवेदशनशील विषय आहे. माननीय राज्यमंत्री महोदय हे माननीय मुख्यमंत्र्यांच्या विश्वासातील आहेत. त्यांच्या नावाची शिफारस हायकमांड कडून झालेली आहे. जनता आपल्याकडे बारकाईने पाहत आहे. तेव्हा त्या महिलेला न्याय देण्याच्या दृष्टीने आपण संबंधितांवर कारवाई करणार आहात काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी या प्रकरणाची पार्श्वभूमी सांगितली. श्री.गणेश कामणकर यांचा श्रीमती अपर्णा यांच्यांबरोबर दिनांक 14.7 रोजी विवाह झाला. दिनांक 8 रोजी त्यांनी आपला नवरा आणि सासरची मंडळी आपल्याला त्रास देतात म्हणून गुन्हा दाखल केला होता. त्या अनुषंगाने दिनांक 18 रोजी संबंधितांना अटक करण्यात आली होती. दरम्यान दिनांक 19 रोजी श्रीमती अपर्णा कामणकर यांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी. पाटील.....

केली की, गेली सहा महिने त्यांचा पती विद्यापीठांतील पेपर्स घरी आणून तपासतो आणि काही गोष्टी करतो. त्या तक्रारीची दखल घेऊन तपास सुरु केला. मधल्या काळात पहिला गुन्हा दाखल करण्यात आला होता त्यावर श्री.गणेश कामणकर यांना दिनांक 21 रोजी जामीन मिळाला. त्यानंतर जी तक्रार दाखल करण्यात आली, त्या संदर्भात मुंबई विद्यापीठ आणि, तासगाव इंजिनिअर्सचे प्राचार्य व परीक्षा नियंत्रक यांची चौकशी करुन दिनांक 19.11.2010 रोजी विद्यापीठ कायदा कलम 18 अन्वये रितसर 16 जणावंर गुन्हा दाखल करण्यात आला.

यानंतर श्री.गायकवाड...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील..

सन्माननीय सदस्यांनी जे काही सांगितले त्याप्रमाणे थोडी फार वस्तुस्थिती असली तरी या प्रकरणाबाबत एका महिलेने फिर्याद दिली आहे आणि घटनाक्रम सांगितला आहे. त्याप्रमाणे हा कालावधी साधारणपणे सहा महिन्यांचा होता. गेली सहा महिने या महिलेचे पती या गोष्टी करीत होते म्हणून पब्लिक प्रॉसिक्युटरच्या वतीने त्यांचे नाव टाकण्यात आले होते . या सगळया गोष्टीचा विचार करुन सी.आर.पी.सी. मधील कलम 169 प्रमाणे तपासामधील एखाद्या व्यक्तीचे नाव वगळण्याची तरतूद आहे त्याप्रमाणे या महिलेला न्याय देता येत असेल तर त्या महिलेचे नाव निश्चितपणे वगळण्याचा शासनाचा सकारात्मक दृष्टीकोन राहील.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी स्वत: सगळी माहिती घेतलेली आहे. त्या महिलेने असे सांगितले की चार पाच महिने माझ्या पतीकडे इंजिनिअरीगच्या अंतिम वर्षाची काही मुले येतात , त्यांच्याकडून काही तरी लिखाण करुन घेतले जात होते असे मी पाहिलेले आहे.त्यानंतर पैशाचा व्यवहार सुरु झाल्यामुळे मला संशय आला होता. यामध्ये काही गैरव्यवहार होत आहे असे तिला जेव्हा कळले त्यानंतर दहा दिवसात तिने तक्रार नोंदवली होती. एखाद्या महिलेने दहा दिवसात तक्रार करण्याची हिंमत केली असतांना तिला आरोपी केले जात असेल तर ते बरोबर नाही.तिचे नाव वगळण्याबाबत सकरात्मक दृष्टीकोन राहील असे उत्तर न देता ताबडतोब तिचे नाव वगळण्यात येणार आहे काय तसेच तिचे नाव अडकविणा-या अधिका-यांवर कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, या महिलेचे नाव या प्रकरणातून वगळण्याच्या सूचना रायगड जिल्हयाच्या पोलीस अधीक्षकांना देण्यात येतील त्याचबरोबर या संपूर्ण प्रकरणाची चौकशी डी. वाय. एस.पी. दर्जाच्या अधिका-याकडून करण्यात येईल आणि त्यामध्ये कोणताही अधिकारी दोषी आढळून आल्यास त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :कोकण परिसरातील नॉन बॅकीग संस्था तसेच इन्व्हेस्टमेन्ट कंपन्यात झालेला कोटयावधी रुपयांचा घोटाळा,

मु. शी. :कोकण परिसरातील नॉन बॅकीग संस्था तसेच इन्व्हेस्टमेन्ट कंपन्यात झालेला कोटयावधी रुपयांचा घोटाळा, यासंबंधी सर्वश्री परशुराम उपरकर, किरण पावसकर,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.परशुराम उपरकर (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह.मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" सिंधुदूर्ग जिल्हयातील व कोकण परिसरातील नॉन बॅकींग संस्था तसेच इन्व्हेस्टमेट कंपन्यामधील संचयनी, कामधेनू, कल्पतरु, पगोडा फॉरेस्ट अशा वित्तीय संस्थांनी कोटयावधी रुपयांचा केलेला घोटाळा, संचयनी कोकण विभागातील अधिकारी श्री लाड, संचयनी हौसिंगचे श्री सतीश सावंत यांच्यावर ठाणे विशेष न्यायालयात खटला चालविण्यास विलंब होणे, चौकशीमध्ये या दोन्ही अधिका-यांच्या नावे व नातेवाईकांच्या नावे संचयनी संस्थेकडून निर्माण झालेली स्थावर व जंगम मालमत्ता आढळणे,याबाबात शासनाने तातडीने सखोल चौकशी करुन संबंधितावर कडक कारवाई करण्याची आवश्यकता तसेच नागरिकांचे बुडलेले पैसे त्यांना परत मिळण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलण्याची आवश्यकता याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका "

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- निवेदना नंतर -

श्री.परशुराम उपकर : सभापती महोदय, संचयनी, कामधेनू, कल्पतरु, पगोडा फॉरेस्ट अशा अनेक वित्तीय संस्थेमध्ये लोकांनी पैसे गुंतवले होते आणि ते पैसे या कंपनीच्या संचालकांनी बुडवले होते.या ठेवीदारांचे बुडालेले पैसे या कंपनीकडून वसूल करण्यासाठी शासनाकडून कोणंती कारवाई करण्यात येणार आहे ? श्री.लाड आणि श्री.सावंत यांच्याकडे जी मालमत्ता आहे ती मालमत्ता विकून पैसे वसूल करण्याची कारवाई केव्हा करण्यात येणार आहे , सील लावलेली मालमत्ता विकून ठेवीदाराचे पैसे केव्हा परत देण्यात येणार आहेत ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, संचयनी, कामधेनू, कल्पतरु आणि पगोडा फॉरेस्ट या वित्तीय कंपनीमधील घोटाळा 2009 साली घडलेला आहे. या नॉन बॅकीग इन्स्टिटयुशन आर. बी. आय ॲक्टखाली स्थापन केल्या होत्या. या कंपन्यांमध्ये ज्यावेळी गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले होते त्यावेळी राज्य शासनाने महाराष्ट्र प्रोटेक्शन ऑफ इंटरेस्ट ऑफ डिपॉझिटर्स अध्यादेश 1999 साली काढला होता त्या अध्यादेशाचे 2000 साली कायद्यात रुपांतर केले होते आणि या कायद्यान्वये संबंधिताविरुध्द कारवाई करण्यात आली होती. मधल्या काळात या कायद्याला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते.कंपनी ॲक्ट असो वा आर.बी.आय.च्या काही तरतुदी असो त्या तरतुदीला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले असल्यामुळे 2005 साली हा कायदा उच्च न्यायालयाने अवैध ठरविला होता त्यासंबंधी शासनाने सर्वोच्च न्यायालयात अपील केले होते. संचयनी,कामधेनू वा इतर कोणतीही कंपनी असली तरी तिची मालमत्ता जप्त करुन सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ...

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. सतेज पाटील....

एस.एन. बॅनर्जी या कंपनीकडे सुपूर्द करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे कामधेनू, कल्पतरु इत्यादींच्या मालमत्तेची प्रकरणे सी.आय.डी. कडे सुपूर्द करुन दोषारोप पत्र दाखल करण्यात आले असून हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे असे मला सांगावयाचे आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, संभावित गुन्हेगार कोण आहेत? लोकांची फसवणूक होऊ नये म्हणून यामधील आरोपींची नावे आपण सांगणार काय?

श्री. सतेज पाटील : सभापती महोदय, प्रत्येक प्रकरणामध्ये वेगवेगळे आरोपी आहेत. संचयनीमध्ये गजानन लाड, सतीश सावंत आहेत. त्याचप्रमाणे कामधेनूमध्ये वेगळे आरोपी आहेत. ही सर्व नावे मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मंत्री महोदयांकडे आरोपींची चार-पाच नावे आहेत ती त्यांनी सांगितली पाहिजेत.

श्री. सतेज पाटील : सभापती महोदय, कल्पवृक्षमध्ये प्रवीण सुर्वे, संतोष बाबू पावसकर, उमेश खाडे, शांताराम चाफेकर अशी चार नावे आहेत. संचयनीमध्ये मॅनेजरचे नाव आहे. प्रशांत तळी, कमलाकर मांगले, सुरेश घाणेकर अशी नावे आहेत. प्रत्येक प्रकरणांमध्ये कमीत कमी पाच ते सहा नावे आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यात शिक्षण सेवक योजनेला 10 वर्षे होऊन देखील शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ न होणे

मु.शी.: राज्यात शिक्षण सेवक योजनेला 10 वर्षे होऊन देखील शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ न होणे यासंबंधी ॲड. उषा दराडे, सर्वश्री दिलीपराव सोनवणे, कपिल पाटील, वसंतराव खोटरे, विक्रम काळे, सतीश चव्हाण, रामनाथ मोते, पांडुरंग फुंडकर, भगवान साळुंखे, संजय केळकर, विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री नागो गाणार, अनिल तटकरे, विजय सावंत,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात शिक्षण सेवक योजना सुरु होऊन १० वर्ष पूर्ण होणे, सदरच्या दहा वर्षात महागाईत दहा पट्टीने वाढ होणे, मात्र शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ न होणे, शासकीय कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात प्रतिवर्ष जानेवारी, जुलै या महिन्यात वाढ दिली जाणे, दि. ३ मार्च, २०१० च्या बैठकीत शिक्षण सेवकाचे मानधन रुपये ६००० केल्याची बातमी दूरचित्रवाणीवरुन प्रसिध्द केली जाणे, मात्र अचानक सदर घोषणा शासनाकडून मागे घेण्यांत येणे, त्यामुळे शिक्षण सेवकाची झालेली घोर निराशा व त्यांच्यात निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने शिक्षण सेवकाच्या मानधनात तातडीने वाढ करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यांत येत असलेली उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. राजेंद्र दर्डा (शालेय शिक्षणमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मला अशी माहिती पाहिजे की, सन्माननीय मंत्री महोदयांना निवेदनामध्ये काही बदल करावयाचा आहे काय?

श्री. राजेंद्र दर्डा : नाही.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, या निवेदनाच्या दुसऱ्या क्रमांकाच्या परिच्छेदामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, "शासन निर्णय दि.20.10.2008 अन्वये राज्यातील शिक्षण सेवकांचे मानधन निश्चिती, अप्रशिक्षित शिक्षण सेवकांसाठी वेतनश्रेणी, त्यांना सेवेत कायम करणे व अन्य बाबीसंबंधात अभ्यास करुन शासनास सुस्पष्ट शिफारशी करण्यासाठी शिक्षण संचालक, प्राथमिक, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती. त्यानुसार सदर समितीने त्यांचा अहवाल सादर केला असून समितीच्या शिफारशी शासनाच्या विचाराधीन आहेत."
सभापती महोदय, शासनाला सादर करण्यात आलेल्या या अहवालामध्ये कोणत्या शिफारशी करण्यात आल्या आहेत? हा अहवाल शासनाला केव्हा सादर करण्यात आला. या अहवालामध्ये महागाई भत्ता व इतर भत्त्यांच्या संदर्भात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करणार काय? शिक्षण सेवकांचा कालावधी तीन वर्षावरुन एक वर्षाचा करणार काय? तसेच, त्यांना 3 हजार रुपयांचे मानधन दिले जाते त्यामध्ये वाढ करणार काय?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे प्राथमिक शाळांतील शिक्षण सेवकांचे मानधन वाढविण्यासंदर्भात व इतर गोष्टींसंदर्भात तत्कालीन शिक्षण संचालक श्री. पवार यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. त्या समितीने आपल्या अहवालामध्ये विविध शिफारशी केल्या आहेत. माननीय सदस्यांना हव्या असल्यास त्या मी वाचून दाखवितो...

उप सभापती : आवश्यकता नाही.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, ज्या महत्वपूर्ण शिफारशी होत्या त्यापैकी प्रशिक्षित प्राथमिक शिक्षण सेवकांचे मानधन 3 हजार रुपयांवरुन 7 हजार रुपये वाढविणे हा एक भाग होता. दुसरी शिफारस महागाई भत्ता व मानधनामध्ये वाढ करण्यासंदर्भात केली होती. त्यामध्ये नियमित शिक्षकांना ज्यावेळी सहावा वेतन आयोग लागू केला जाईल तेव्हापासून प्रशिक्षित शिक्षकांच्या मानधनात वाढ करावी अशी शिफारस होती.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा ....

याच पध्दतीने पुरेसे विद्यार्थी डी.एड. उत्तीर्ण होत असल्यामुळे अप्रशिक्षित शिक्षण सेवकांची नेमणूक करु नये, शिक्षण सेवकाचा कालावध्णी 3 वर्षावरुन 2 वर्षे करण्यात यावा अशा शिफारशी होत्या. हा अहवाल 3 जानेवारी, 2009 राजी प्राप्त झाला.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, हा प्रश्न या पूर्वी चार वेळा सभागृहासमोर आलेला आहे. यासंदर्भात जी पवार समिती नेमली त्या समितीने अहवाल देऊन दोन वर्षे झालेली आहेत. 3 मार्च, 2010 रोजी हा विषय मंत्रिमंडळासमोर गेलेला होता आणि त्या दिवशी सगळ्या दूरदर्शन वाहिन्यांवर संपूर्ण राज्यामध्ये बातमी येणे सुरु झाले की, शिक्षण सेवकांच्या मानधनामध्ये वाढ केलेली आहे, कॅबिनेटचा निर्णय झाला आहे. अशा पध्दतीने एक प्रकारे शिक्षण सेवकांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम सरकारने केले. निर्णय झालेला नसताना दूरदर्शन वाहिन्यांवर अशा प्रकारचे वृत्त प्रसारित झाले. याची गंभीर दखल सरकारने घ्यावयास पाहिजे होती आणि न झालेला निर्णय किमान पुढच्या बैठकीमध्ये तरी घ्यावयास पाहिजे होता. परंतु तसा निर्णय अजूनही झालेला नाही. आता डायनॅमिक शिक्षण मंत्री या खात्याला लाभलेले आहेत. आता आमच्या आशा पल्लवीत इ ालेल्या आहेत. जेव्हा जेव्हा प्रश्न येतो तेव्हा तेव्हा शासनाकडून उत्तरात सांगण्यात येते की, विचाराधीन आहे. शासन नुसताच विचार करते की, काम सुध्दा करते ? आज रोजंदारी कर्मचाऱ्याला सुध्दा दिवसाला 200 रुपये मिळतात पण जो शिक्षक ज्ञान देण्याचे पवित्र काम नि:स्वार्थ भावनेने करतो, पिढी घडविण्याचे काम करतो त्यांना दिवसाला 100 रुपये देतो. रोजंदारी कर्मचाऱ्यांपेक्षाही शिक्षण सेवकाला कमी मानधन देतो. आता हे अधिवेशन संपण्यासाठी तीन दिवस शिल्लक राहिलेले आहे. आमचे असे म्हणणे आहे की, पुढील अधिवेशनात तरी हा प्रश्न विचारण्याची पाळी आम्हा शिक्षक आमदारांवर येऊ नये याची गंभीर दखल माननीय नवीन शिक्षण मंत्र्यांनी घ्यावी. त्यांच्याकडून आमच्या अपेक्षा आहेत, आशा आहेत. पुढील अधिवेशनाच्या आत शासन हा निर्णय घेणार काय, पवार समितीने ज्या शिफारशी केलेल्या आहेत त्या सगळ्या शिफारशी शासन स्वीकारणार काय, शिक्षण सेवकांचे मानधन पुढील अधिवेशनाच्या आत वाढविण्याचा निर्णय शासन घेणार काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी प्रश्न खूप डेव्हलप केलेला आहे. या प्रश्नाचे उत्तर मी थोडक्यात देऊ की, डेव्हलप करु असा प्रश्न माझ्यासमोर आहे. ही गोष्ट खरी आहे की, 3 मार्च, 2010 रोजी हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आणण्याचे ठरले होते. परंतु त्या दिवशी त्या बैठकीत हा विषयच आला नाही. मात्र त्यावेळेला इलेक्ट्रॉनिक चॅनेल्सने हे दाखविले ही बाब सत्य आहे. त्यांनी हे कसे दाखविले, काय दाखविले याची वेगळी चौकशी सुरु झाली. महत्वाचा भाग असा आहे की, शिक्षण सेवकाला मिळत असलेले 3 हजार रुपये, 4 हजार रुपये, 5 हजार रुपये जे मानधन आहे त्याचे कोणीही समर्थन करणार नाही. माझे स्वत:चे याबद्दलचे मत असे आहे की, हे मानधन निश्चितपणे वाढले पाहिजे. याबद्दल माझ्या मनामध्ये कोणतीही शंका नाही. कारण शिक्षक हा शिक्षण देण्याचे काम करतो. त्यामुळे शासन याबाबतीत लवकरात लवकर निर्णय घेईल.

उप सभापती : माझी सर्व शिक्षक सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण लेक्चर न देता स्पेसिफिक प्रश्न विचारावा.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे : तत्कालीन शिक्षण मंत्र्यांनी दिनांक 25.3.2010 आणि दिनांक 16.7.2010 रोजी उत्तर दिले होते की, हा विषय मंत्रिमंडळासमोर आलेला आहे. प्राथमिक शिक्षण सेवकांना 7000, माध्यमिक शिक्षण सेवकांना 8,500 आणि उच्च माध्यमिक शिक्षण सेवकांना 11,500 रुपये वेतन देण्याचे सूचित केले होते. हा विषय तातडीने मंत्रिमंडळासमोर येईल. अधिवेशन संपण्यापूर्वी घेण्यात येईल. आता मात्र एक महिन्याच्या आत निर्णय घेण्यात येईल असे उत्तर दिले जात आहे. म्हणून यापूर्वीच्या शिक्षण मंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे हे अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबतचा निर्णय घेण्यात येईल का ?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, पुढील 3 दिवसामध्ये याबाबत निर्णय घेणे शक्य होणार नाही. परंतु शिक्षण सेवकांचा प्रश्न अनेक महिन्यांपासून प्रलंबित आहे हे सत्य आहे. या प्रश्नाबाबत माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्री यांच्याबरोबर गेल्याच आठवडयात चर्चा केलेली आहे. शिक्षण सेवकांबरोबर राज्यात कृषी सेवक आहेत, ग्रामसेवक आहेत. परंतु शिक्षण सेवक हे भावी पिढी घडविण्याचे काम करतात याची शासनाला जाणीव आहे. त्यामुळे पुढील एक किंवा दीड महिन्याच्या आत वित्त विभागाच्या माध्यमातून हा विषय मी मंत्रिमंडळासमोर आणणार आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची आहे काय असे मी सुरुवातीलाच मंत्री महोदयांना विचारले होते, परंतु त्यांनी नाही असे उत्तर दिले होते. मी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. त्यावेळी झालेल्या प्रश्नोत्तराच्या वेळी तत्कालीन शिक्षण मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांनी 3 हजार, 4 हजार व 5 हजार याऐवजी 7 हजार, 8 हजार 500 व 11 हजार 500 रुपये मानधन वाढीचा निर्णय घेतलेला आहे. या निवेदनात असे नमूद केले आहे की, शिक्षण सेवकांच्या मानधन वाढीचा विषय अजूनही शासनाच्या विचाराधीन आहे. हे उत्तर विसंगत आहे. या सभागृहात घोषित केलेल्या निर्णयाची केवळ अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. ती अंमलबजावणी शासन तातडीने करणार काय ?

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सगळयांना कल्पना आहे की, असे निर्णय मंत्रिमंडळाच्या माध्यमातूनच घ्यावयाचे असतात. त्यासाठी मंत्रिमंडळासमोर जावे लागते. त्यामुळे मी माझ्या यापूर्वीच्या उत्तरावर ठाम आहे. अद्याप याबाबत शासनाचा निर्णय झालेला नाही. म्हणूनच मी अगोदर म्हटल्याप्रमाणे हा विषय मी मंत्रिमंडळासमोर आणणार आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, पवार समितीने यासंदर्भात शिफारस केलेली आहे, असे सांगण्यात आले आहे. शिक्षण विभागाने ही शिफारस स्वीकारुन प्रस्ताव पाठविला आहे काय, मूळ बातमी मानधन वाढीसंबंधीची होती. म्हणून पवार समितीच्या शिफारशी स्वीकारुन शिक्षण विभागाने हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर पाठविला आहे काय, असल्यास केव्हा पाठविला आहे आणि त्याबाबत शासन किती काळ आग्रह धरणार आहे ?

श्री.राजेंद्र दर्डा : पवार समितीच्या अनुषंगाने शिक्षण विभागाने मंत्रिमंडळासमोर आणावयाचा प्रस्ताव तयार केलेला आहे. मंत्रिमंडळासमोर हा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतरच त्या अहवालात कोणत्या शिफारशी होत्या ते दिसून येईल. परंतु कोणत्याही परिस्थितीत पुढील अधिवेशन संपण्यापूर्वी हा विषय मंत्रिमंडळासमोर आणण्यात येईल.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

विशेष उल्लेखाच्या सूचना

पृ.शी.: रत्नागिरी जिल्हयातील देवराई-देवरहाटी जमिनींची अधिकार अभिलेखात वन, वन संवर्गातील किंवा झुडपी जंगल अशी नोंद नसणे

मु.शी.: रत्नागिरी जिल्हयातील देवराई-देवरहाटी जमिनींची अधिकार अभिलेखात वन, वन संवर्गातील किंवा झुडपी जंगल अशी नोंद नसणे

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"रत्नागिरी जिल्हयात वन जमीन म्हणून अधिसूचित न झालेले 2800.00 हे. आर देवराई-देवरहाटीचे क्षेत्र आहे. त्यामध्ये गाव देव/देवीची देवळे वगैरे आहेत. सदरचे देवराई-देवरहाटी जमिनी अधिकार अभिलेखात वन, वन संवर्गातील किंवा झुडपी जंगल अशा नोंदी नाहीत. मा.सर्वोच्च न्यायालयाचे व्याख्येनुसार सदर क्षेत्राचे अधिकार अभिलेखात वन किंवा वन संवर्गातील किंवा झुडपी जंगले म्हणून नोंद नसल्यामुळे हे वनक्षेत्र या संज्ञेत येत नाही, असा अहवाल पत्र क्रमांक महसूल/कार्या-3/जमीन(3) कावि-354, दि.29.7.1997 नुसार प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम

MSS/ KGS/ D/ KTG/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 15:55

श्री. रामदास कदम ....

याठिकाणी ग्रामपंचायत, सामाजिक संस्था, इतर संस्था यांच्याकडून वारंवार देवरहाटीतील जागा नळपाणी योजना, धार्मिक कार्य, ग्रामपंचायत कार्यालय, सभागृह, अंगणवाडी शाळा, व्यायाम शाळा, सभामंडप, स्वच्छतागृह इत्यादी कारणासाठी मिळणेबाबत अर्ज प्राप्त होत असून ही जागा वन खात्याकडे वर्ग करण्यात आलेली नसल्याने सार्वजनिक हिताच्या बाबीकरिता वापरण्यास मनाई करण्यात येत आहे. तरी याबाबत मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी दिलेल्या अहवालानुसार परवानगी देण्याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राष्ट्रीय मूल्यांकन समितीमध्ये मराठी भाषचे ज्ञान असलेल्या सदस्याची नियुक्ती करण्याबाबत

मु. शी. : राष्ट्रीय मूल्यांकन समितीमध्ये मराठी भाषचे ज्ञान असलेल्या सदस्याची नियुक्ती करण्याबाबत श्री.दिवाकर रावते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री.दिवाकर रावते यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"राज्यातील सर्व महाविद्यालये आणि विद्यापीठे यांचे मूल्यांकन राष्ट्रीय मूल्यांकन समिती (नॅक) करते. परंतु ही समिती जे मूल्यांकन करते त्यात नियमितता नसते व अनेक गंभीर त्रुटी असतात. तसेच ह्या समितीचे जे सदस्य महाराष्ट्रात येतात ते अमराठी असतात व त्यांना मराठी भाषाही येत नसते. त्यामुळे महाराष्ट्रातील प्राध्यापक आणि हजारो संबंधितांना मराठीतून कामकाज करण्याचा राज्याचा नियम मोडून अकारण दुस-या भाषेत सादरीकरण करावे लागते. कामगिरी चांगली असूनही केवळ सादरीकरण परक्या भाषेत केल्याने अनेक संस्थांना उच्च मानांकन मिळत नाही व शुल्क निश्चिती, केन्द्र शासनाची अनुदाने, देणग्या, प्रकल्प निधी आणि अन्य अनेक न्याय लाभापासून अनेक चांगल्या संस्था वंचित राहतात. या सर्वांवर उपाय म्हणजे एक तर मराठी भाषेचे ज्ञान असणा-या सदस्यांना समितीतून पाठवण्यास राज्य शासनाने नॅक संस्थेला भाग पाडावे. तसेच राज्यात 20.12.2010 पासून होणरा नॅक समितीचा दौरा जिथे आहे तिथे स्थगित करावा आणि मराठी भाषेचे ज्ञान असणा-या सदस्यांची नियुक्ती झाल्यानंतरच हा दौरा करण्यास विनंती करावी व महाराष्ट्रातील महाविद्यालयीन विद्यापीठांनी आपले सादरीकरण शासनाच्या मराठी कामकाजाच्या नियमानुसार कटाक्षाने मराठी भाषेतच करावे याकडे लक्ष वेधण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे. शासनाने यावर कृपया निवेदन करावे."

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांचे स्मारक उभारण्याबाबत

मु. शी. : डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांचे स्मारक उभारण्याबाबत श्री. सुभाष चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री.सुभाष चव्हाण यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"आंतरराष्ट्रीय कीर्तिचे महान व्यक्तिमत्व म्हणून मान्यता लाभलेले स्व.पूज्य डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांचा जन्म 10 ऑक्टोबर, 1910 रोजी सोलापूर येथे झाला. नोकरी निमित्त आपला वेंगुर्ल्यातील असलेला ऐतिहासिक राजवाडा सोडून डॉ. कोटणीस यांचे वडील 1920 मध्ये सोलापूरला गेले व काही काळानंतर ते परत वेंगुर्ले येथे परतले. डॉ.कोटणीस यांच्या शालेय जीवनाचा शुभारंभ येथूनच सुरु झाला.

डॉ.द्वारकानाथ कोटणीस यांनी परिस्थितीशी झगडत चीनमध्ये थोर मानवतावादी काम केले. असंख्य लोकांचे प्राण वाचविले. त्यामुळे चिनी जनतेच्या मनामध्ये त्यांच्या स्मृती कायम जागृत राहिल्या आहेत. त्यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरु आहे. डॉ. कोटणीस कुटुंबियांचा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले येथे मारुती मंदिर नजिक वाडा होता. त्या वाड्यात स्वातंत्र्यपूर्व काळात देशभक्तीच्या बैठका होत असत. त्यामुळे तो वाडा "काँग्रेस भवन" म्हणून ओळखला जात असे. या ठिकाणी त्यांचे शासनाच्या वतीने एक भव्य स्मारक व्हावे म्हणून प्रयत्न सुरु आहेत. परंतु वेंगुर्ले नगरपरिषदेच्या मुख्याधिका-यांनी, प्रशासनाने तो ऐतिहासिक कोटणीस वाडा जमीनदोस्त करुन उद्ध्वस्त केलेला आहे. तेथे आज मोठे कमर्शियल कॉम्प्लेक्स उभारलेले आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. तरी अशा थोर व्यक्तीच्या आठवणीसाठी हा वाडा आरक्षित करुन त्यांचे एक भव्य स्मारक शासनाने उभारावे."

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत मत / शुद्धीसाठी नाही

पृ. शी. : उच्च माध्यमिक शाळांमध्ये गणित व संख्याशास्त्र विषयांचा कार्यभार वाढल्यामुळे वाढीव पदांना मान्यता मिळणे

मु. शी. : उच्च माध्यमिक शाळांमध्ये गणित व संख्याशास्त्र विषयांचा कार्यभार वाढल्यामुळे वाढीव पदांना मान्यता मिळणे याबाबत श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री.रामनाथ मोते यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

सन्माननीय सभापती महोदय, राज्यातील उच्च माध्यमिक विभागातील गणित व संख्याशास्त्र या विषयांचा कार्यभार वाढल्यामुळे नवीन पदांना मान्यता देण्याच्या संदर्भात अद्यापही शासनाकडे प्रस्ताव प्रलंबित आहे. शासनाने अद्याप त्या पदांना मान्यता दिलेली नाही. अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने जाहीर करुनही राज्यातील 1067 माध्यमिक शाळांमधील अर्धवेळ ग्रंथपाल तुटपुंज्या वेतनावर काम करीत आहेत. त्यांचा प्रश्न शासनाने अद्याप सोडविलेला नाही. रात्रशाळांच्या संदर्भात शासनाने एक समिती गठित केली होती. त्या समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झालेला आहे. अद्यापही शासनाने या अहवालाच्या संदर्भात कोणताही निर्णय घेतलेला नाही. त्याचप्रमाणे प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे नियमानुसार अनुज्ञेय आहेत त्याचा प्रस्ताव शासन स्तरावर आलेला आहे. या प्रस्तावाला शासनाने अद्याप मान्यता दिलेली नाही. म्हणून शासनाच्या या वेळकाढू धोरणामुळे प्रलंबित प्रश्नांच्या संदर्भात शासनाने तातडीने दखल घेऊन निर्णय घ्यावा अशी विनंती या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यातील पाणी टंचाई दूर करण्यासंबंधी हाती घेण्यात आलेल्या जलस्वराज्य प्रकल्पाला मुदतवाढ मिळणे

मु. शी. : राज्यातील पाणी टंचाई दूर करण्यासंबंधी हाती घेण्यात आलेल्या जलस्वराज्य प्रकल्पाला मुदतवाढ मिळणे याबाबत ॲड.उषा दराडे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : मा□□य सदस्या ॲड.उषा दराडे यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडते.

सभापती महोदय, राज्यातील तीव्र पाणी टंचाई असलेल्या गावातील पाणी प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी शासनाने जागतिक बँकेच्या सहाय्याने 26 जिल्हयात जलस्वराज्य प्रकल्प राबविण्याचा निर्णय 2005 मध्ये घेतला. लोकसहभागातून सुरु झालेल्या या प्रकल्पासाठी शासनाने कर्मचाऱ्यांची भरती करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार एका जिल्हयात 10 ते 15 कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली.अशाप्रकारे सुमारे 350 कर्मचारी कार्यरत असताना सदर प्रकल्पाची मुदत सप्टेंबर, 2010 मध्ये संपली आहे. त्यामुळे या कर्मचाऱ्यांवर नोकरी संपुष्टात येण्याची टांगती तलवार आहे. सदर कर्मचाऱ्यांना शासन सेवेत समाविष्ट करण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात या कर्मचाऱ्यांना न्याय देण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील बामणोली महसूल हद्दीतील अतिक्रमण

मु. शी. : अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील बामणोली महसूल हद्दीतील अतिक्रमण याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : मा□□य सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, आर्थिक वर्ष संपत असताना महसूल खात्याला महसुलामध्ये तूट निर्माण झाल्यास अतिक्रमिकांच्या माध्यमातून दंड वसूल करुन पैसा गोळा करण्याचे काम शासनामार्फत केले जाते. गावठाण विस्ताराच्या बाबतीत 100 वर्षापूर्वी घेतलेला निर्णय अद्यापही तसाच आहे. 100 वर्षापासून गावठाण विस्तार झालेला नाही. त्यादृष्टीने अलिबाग तालुक्यातील बामणोली महसुलातील गावठाण विस्तारात अलिकडच्या काळात जी घरे बांधली आहेत ती तोडण्यात यावीत किंवा त्यांच्याकडून दंड वसूल करण्याचे काम महसूल विभागामार्फत सुरु आहे. या सभागृहात अशा अतिक्रमणाबाबत मी दोन-तीन वेळा प्रश्न उपस्थित केला होता. तत्कालीन महसूलमंत्री श्री.नारायण राणे यांनी हा प्रश्न योग्य आहे असे सांगून आश्वासन दिले होते की, जे फॉरेस्ट जाहीर झाले आहे त्या अगोदर जी घरे बांधली आहेत त्यांना संरक्षण देण्यात येईल. शासन दिलेले आश्वासन पाळत नाही. त्यादृष्टीकोनातून जी अतिक्रमित घरे आहेत त्यांना रेग्युलराईज करण्याचे काम शासनाने करावे अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यात घटत असलेले मुलींचे प्रमाण व वाढत असलेली सोनोग्राफी तपासणी केंद्रे

मु. शी. : राज्यात घटत असलेले मुलींचे प्रमाण व वाढत असलेली सोनोग्राफी तपासणी केंद्रे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

सभापती महोदय, 2011 च्या जनगणनेनुसार ज्या जिल्हयात कमी मुली जन्माला येतात किंवा जन्माआधी मारुन टाकल्या जातात त्याच जिल्हयांमध्ये जास्तीत जास्त सोनोग्राफी मशिन्स आहेत. मुलींच्या संरक्षणासाठी जो कायदा आहे त्या कायद्यानुसार केंद्र सरकारने बंधनकारक केले आहे की, प्रत्येक राज्यामध्ये या कायद्याच्या कलम 16 (अ) नुसार दर चार महिन्यांनी याच्या मॉनिटरिंगसाठी पर्यवेक्षीय समिती नेमली पाहिजे आणि दर चार महिन्यांनी समितीची बैठक झाली पाहिजे.

नंतर 2एक्स.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

माझ्याकडे सातारा येथील दलित महिला आयोगाच्या ॲडव्होकेट देशपांडे यांचे पत्र आहे. त्यांनी माननीय आरोग्य मंत्री श्री. सुरेश शेट्टी यांच्याकडे गेल्या दोन वर्षांपासून पाठपुरावा सुरु केला आहे की, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा यांची मुदत संपून दोन वर्षे झालेली आहेत. तसेच ही समिती आता कामच करीत नाही. अशा वेळी आरोग्य विभागाने त्याची दखल न घेतल्यानें त्यांनी शासनाला तशी नोटीस पाठविली व कोर्टात जाण्याची तयारी चालविली आहे. तरी देखील राज्य शासनाने कोणतीही हालचाल केलेली दिसत नाही. त्यावरुनच मुलींच्या जन्माच्या संदर्भात उपेक्षेची भूमिका माननीय आरोग्य मंत्री व शासनाच्या आरोग्य मंत्रालयाने घेतल्याचे दिसत आहे. म्हणून माझी मागणी आहे की, सध्या हिवाळी अधिवेशन सुरु आहे व हे अधिवेशन संपण्यापूर्वी ही समिती ताबडतोब गठित करावी आणि कायद्याचे उल्लंघन करणारी जी रुग्णालये आहेत त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करावी व मुलींच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती तरतूद करावी, अशीही या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने मागणी करते.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MMP/ D/

पृ.शी.: मानवी अवयव व त्यांच्याशी संबंधित अवयवांचा व्यापार करण्यास प्रतिबंध करणे

मु.शी.: मानवी अवयव व त्यांच्याशी संबंधित अवयवांचा व्यापार करण्यास प्रतिबंध करणे या विषयावरील माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचा ठराव

डॉ. विजयकुमार गावित (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 106 अन्वये खालील ठराव मांडतो.

"ज्याअर्थी, संसदेने, रोग निवारणाच्या प्रयोजनांसाठी, मानवी अवयव काढून टाकणे, त्यांची साठवण करणे व त्यांचे प्रतिरोपण करणे आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक मानवी अवयवांचा व्यावसायीक व्यापार करण्यास प्रतिबंध करणे यांसाठी तरतूद करण्यासाठी, मानवी अवयव प्रतिरोपण अधिनियम, 1994 (1994 चा 42) अधिनियमित केला होता;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियम लागू करण्यामध्ये विवक्षित त्रुटी असल्याचे निदर्शनास आल्यामुळे, मानवी अवयव प्रतिरोपण अधिनियम, 1994 मध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, भारताच्या संविधानाच्या सातव्या अनुसूचीच्या सूची दोन च्या नोंद 6 मध्ये येणाऱ्या अशा एखाद्या कायद्याचा विषय आणि अस्सल प्रकरणामध्ये, अवयवांचे प्रतिरोपण करणे सुकर होण्याच्या दृष्टीने आणि मानवी अवयवांच्या बेकायदेशीर व व्यावसायीक व्यवहारांकरिता प्रतिबंधात्मक शास्तीची तरतूद करण्याकरिता, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद 249 व 250 मध्ये तरतूद करण्यात आली असेल त्या व्यतिरिक्त, उपरोक्त बाबींच्या संबंधात, संसदेला राज्यासाठी कायदा करण्याचा कोणताही अधिकार नाही;

आणि ज्याअर्थी, संसदेने, कायद्याद्वारे, उक्त अधिनियमातील सुधारणा महाराष्ट्र राज्याला लागू करणे इष्ट असल्याचे या सभागृहाला दिसून आले आहे;

त्याअर्थी, आता, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद 252 च्या खंड (2) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, हे सभागृह याद्वारे, संसदेने, कायद्याद्वारे, महाराष्ट्र राज्यात उक्त अधिनियमाच्या सुधारणा विनियमित कराव्यात यासंबंधातील बाबींसाठी ठराव करीत आहे."

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित .....

महोदय, सन 1994 च्या प्रत्यारोपण कायद्यामध्ये या अनुषंगाने आपण सुधारणा करीत आहोत. पूर्वी आपण अवयव ट्रान्सप्लांट करण्यासाठीची जी पध्दत होती त्यात फक्त एकच अवयव ट्रान्सप्लांट करीत होतो. परंतु आता शरीरातील पेशी सुध्दा ट्रान्सप्लांट करण्याची तरतूद आपण या अनुषंगाने करीत आहोत. पूर्वी कुटुंबाच्या व्याख्येत जवळचे नातेवाईक, मुलगा, मुलगी, आई-वडील तसेच भाऊ-बहीण एवढेच अंतर्भूत होते. आता त्यात आजी-आजोबा आणि नातवंडे यांचाही समावेश करीत आहोत. त्याचबरोबर डोनर व रेसिपियन्ट यांच्याकडून प्रत्यारोपण करताना त्यांच्यात समन्वय साधण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन व्हावे म्हणून देखील या दुरुस्तीच्या माध्यमातून प्रयत्न करीत आहोत. त्याचबरोबर प्रत्यारोपण ज्याला करावयाचे आहे त्या पेशंटची यादी राष्ट्रीय पातळीवर तयार करुन डोनर मिळाल्यानंतर ज्याचा क्रमांक पहिला असेल त्याला जर त्याचा अवयव मॅच होत असेल तर असे प्रत्यारोपण करता येईल, त्यामुळे यामध्ये काम करणाऱ्या संस्था, एनजीओज अथवा दलाल मोठ्या प्रमाणात पैसे उकळत होते व त्याचा त्रास पेशंटला होत होता. आता या कायद्यामुळे जास्तीचे पैसे आता पेशंटना द्यावे लागणार नाहीत व सर्वांनाच न्याय मिळू शकेल. असे प्रकार थांबविण्यासाठी ही दुरुस्ती करीत आहोत. तसेच हे काम करणाऱ्या ज्या एनजीओज आहेत त्यांचे रजिस्ट्रेशन करावे लागणार व त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी एक समिती देखील गठित केली जाणार आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

(सभापतीस्थानी मा.तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

डॉ. विजयकुमार गावित....

अशा पध्दतीची माहिती घेऊन त्यावर निश्चितपणे नियंत्रण ठेवले जाईल. पूर्वी खोटी माहिती देणा-याला अगोदर फार कमी शिक्षा होत होती परंतु आता खोटी माहिती दिली तर दोन वर्षाच्या ऐवजी पाच वर्षे, सात वर्षाच्या ठिकाणी दहा वर्षे, 10 हजार रुपये दंड होता तो आता 5 लक्ष रुपये करण्यात आलेला आहे व अगोदर 20 हजार रुपये दंड होता तो आता 20 लक्ष रुपये सूचवलेला आहे. पूर्वी भारतातील नागरिक परदेशी माणसाला सुध्दा आपला अवयव डोनेट करु शकत होता परंतु आता फक्त आपल्याच देशातील आपल्याच देशातील माणसाला अवयव डोनेट करु शकणार आहे. परदेशातील माणसाला अवयव डोनेट करावयाचे असल्यास त्याला आपली परवानगी घ्यावी लागणार आहे. डोनर किंवा रिसीपियंट या दोघानाही प्रतिज्ञापत्र द्यावे लागणार आहे. अशा पध्दतीने या कायद्यात बदल करावा अशा सूचना आपण केंद्रशासनाला पाठवित आहोत व त्यामुळेच या ठिकाणी आपण नियम 160 अन्वये शासकीय ठराव आणलेला आहे.

ठराव प्रस्तुत झाला.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : माननीय सभापती महोदय, या ठिकाणी वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी शासकीय ठराव मांडलेला आहे त्यावर माझे विचार प्रदर्शित करण्यासाठी मी उभा आहे. दि ट्रान्सप्लँट व्हयूमन ऑर्गन हा कायदा 1992 मध्ये प्रस्तावित करण्यात आला होता व यासंदर्भातील बिल लोकसभेत मांडले गेले होते. त्यानंतर हे बिल सिलेक्ट कमिटीपुढे पाठविण्यात आले होते. 21 डिसेंबर, 1993 साली सिलेक्ट कमिटीने यासंदर्भातील आपला अहवाल लोकसभेला दिला. 1994 मध्ये हा कायदा प्रचलित झाला. आपल्याकडे हा कायदा नसल्यामुळे आपण यासंदर्भात केंद्रशासनाकडे बोट दाखवत असत. अनुच्छेद 249 व 250 मध्ये यासंदर्भातील तरतूद करण्यात आलेली आहे कारण ते कन्करन्ट लिस्टमध्ये येते. आता हा विषय आपल्याकडे आलेला आहे. जगामध्ये मानवी अवयवाची तस्करी मोठया प्रमाणात सुरु आहे. खरे म्हणजे हा गुन्हा आहे. हा कॉरपोरेट जगतातील मोठा क्राईम आहे असे म्हटले तर ते चूकीचे होणार नाही. आपल्या देशात बेवारस प्रेत मोठया प्रमाणात मिळत असल्यामुळे या व्यवसायात आपल्याकडील ब-याच व्यक्ती गुंतलेल्या आहेत.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले की, परदेशातून कोणताही अवयव आणून तो ट्रान्सप्लान्ट करण्यासाठी प्रतिबंध आहे. आता आपल्याकडे कॅडबल लिव्हर ट्रान्सप्लान्टची सोय झालेली आहे. मृत व्यक्तीच्या शरीरातील अवयव काढून तो दुसऱ्या व्यक्तीच्या शरीरात ट्रान्सप्लान्ट करण्याची सोय आता आपल्याकडे झाली आहे. आतापर्यंत आपण अशाप्रकारची शस्त्रक्रिया परदेशात जाऊन करीत होतो. एखाद्याला किडनी पाहिजे असेल तर त्याच्या कुटुंबातील व्यक्ती शोधून किंवा एखादा डोनर शोधून त्याची किडनी मॅच होते किंवा कसे हे पाहिले जात होते. कुटुंबातील व्यक्तीची किडनी ट्रान्सप्लान्ट करावयाची असेल तर कोणत्याही प्रकारची अडचण येत नाही. आज देशात दररोज 10 लाख लोक या आजाराचे शिकार बनत आहेत असा रिपार्ट आहे. महाराष्ट्रात आणि मुंबईत किडनीचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. ज्यांचे डायलेसीस फेल होते त्यांना किडनी ट्रान्सप्लान्ट शिवाय पर्याय नाही. किडनी ट्रान्सप्लान्ट करावयाचे असेल तर वैद्यकीय शिक्षण विभागाकडे अर्ज द्यावा लागतो. त्यानंतर तो समितीसमोर येतो. तोपर्यंत त्या रुग्णाचे डायलेलीस सुरु असते. काही रुग्णांना नेहमी डायलेलीस करावे लागते. काहींना आठवड्यातून एकदा डायलेलीस करावे लागते तर काहींना महिन्यातून एकदा डायलेलीस करावे लागते. डायलेलीस झाल्यानंतर ती व्यक्ती दुसऱ्या दिवशी फार मोठे काम करु शकत नाही. त्या व्यक्तीमध्ये जास्त काम करण्याचे त्राण नसते.

सभापती महोदय, किडनी ट्रान्सप्लान्ट करण्यासाठी आपल्याला अनेक अडचणीतून जावे लागते. अनेक रुग्ण असे आहेत की, ज्यांना डायलेलीसचा खर्च परवडत नाही. आय.सी.यु.चा खर्च परवडत नाही. फार कमी सरकारी रुग्णालयात डायलेलीसची व्यवस्था आहे. डायलेसीससाठी दिवसाला 1500 ते 1600 रुपये फी आकारली जाते. शिवाय डायलायझर 7-8 वेळा वापरल्यानंतर त्याचे आयुष्य संपते. या सर्व गोष्टींचा विचार केला तर किडनी ट्रान्सप्लान्ट सोईचे पडते. किडनी व्यवस्थित मॅच झाली तर रुग्ण किमान 7-8 वर्षे जगू शकतो. प्रत्येक माणसाला दोन किडन्या असतात. एखादी किडनी दिली म्हणून त्यांच्या दैनंदिन आयुष्यामध्ये काही फरक पडत नाही. परंतु किडनी देणार कोण हा महत्वाचा प्रश्न आहे. अशावेळी रस्त्यावरील भिकाऱ्यांच्या किडन्या काढल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

जातात. एखाद्या रुग्णाला किडनीची अत्यंत आवश्यकता असते त्यावेळी कायद्यामध्ये लवचिकता आणणे गरजेचे असते. कारण किडनी ट्रान्स्प्लान्ट करण्याकरिता अर्ज दिल्यानंतर तो अर्ज समिती समोर जातो आणि त्या समितीची तीन महिन्यांतून एकदा बैठक होते. शिवाय त्या समितीचा रिपोर्ट येण्यासाठी सहा महिने लागतात. या कालावधीत रुग्ण दगावू शकतो ही बाब लक्षात घेतली पाहिजे.

सभापती महोदय, आपल्याकडे स्टेम सेलची बँक आहे. सातव्या महिन्यात गर्भवती महिलेचे स्टेम सेल घेतले जाते. ते बँकेमध्ये स्टोअर केले जातात. त्या गर्भाला पुढील आयुष्यामध्ये स्टेम सेल ची गरज असेल तर त्या बॅकेतून ते घेऊ शकतात. अशाप्रकारच्या नवनवीन गोष्टी येत आहेत. स्टेम सेलची गरज असेल तर बँक नेहमी ॲक्टीव्हेट असली पाहिजे. त्यासाठी पाच हजार रुपये भरुन स्टेम सेल त्या बँकेत प्रीझर्व्ह केले जातात.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत .....

सभापती महोदय, या किडनीच्या व्यापारामध्ये अनेक अडचणी आहेत. आपण जर एखाद्या किडनी डोनर्स बरोबर आणि किडनी पेशंटच्या कुटुंबियाबरोबर संवाद साधला तर त्यांच्याकडून दु:ख ऐकावयास मिळेल. हे दु:ख सहन करण्या पेक्षा किडनी नको परंतु पेंशटचे निधन झाले तरी चालेल असे त्यांच्याकडून आपल्याला सांगितले जाईल. आता आपण जो ठराव करीत आहोत त्यानुसार आपल्याकडे हक्क आलेले आहेत. या सगळया बाबी लक्षात घेतल्या पाहिजेत. किडनी दाता व किडनी घेणारा या दोघांच्या अडचणी लक्षात घेतल्या पाहिजेत प्रत्येक वेळी यामध्ये काही तरी व्यापार आहे, यामध्ये कोणी तरी किडनी विकत आहे अशा प्रकारच्या पूर्वग्रह दूषित भावनेतून समिती काम करीत असते ती भावना दूर केली पाहिजे. किडनी घेणा-याला खरोखर किती गरज आहे हे पाहणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रकरणात किती पैसे घेतले आहेत याचा विचार करता कामा नाही एखाद्या प्रकरणामध्ये पैसे घेतले असतील व यामध्ये काही डॉक्टर्स गुंतलेले असतील, हे जरी खरे असले तरी ती व्यक्ती किती ॲक्युट नीडमध्ये आहे हे मानवतावादी दृष्टीकोनातून पाहण्याची गरज आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, या देशामध्ये, राज्यामध्ये आणि मुंबई शहरामध्ये अशी किती तरी माणसे आहेत की ज्यांच्याकडे सामाजिक बांधिलकीची जाणीव असून त्या व्यक्ती स्वत: होऊन किडनी देण्यास तयार आहेत. ज्या प्रमाणे नेत्रदान करणा-यांकडून फॉर्म भरुन घेतो त्याप्रमाणे माझी बॉडी ॲनाटॉमीचे डिसेक्शन करण्यासाठी देण्यास तयार आहे किंवा माझ्या मृत्यू नंतर काही तासात माझे ऑर्गन्स मी डोनेट करण्यास तयार आहे किंवा माझा जर ब्रेन डेड झाला आणि माझ्या संवेदना संपल्या तर माझ्यातील ऑर्गन्स मी देण्यास तयार आहे असा फॉर्म भरुन घेतल्यानंतर त्याची यादी तयार करणे आवश्यक आहे. इतकेच नव्हे तर भाजलेले अनेक रुग्ण असल्यामुळे त्यांच्यासाठी स्कीन बॅंक देखील करणे आवश्यक आहे. किडनी आणि लिव्हरची जेवढी आवश्यकता आहे तेवढीच किंबहुना त्यापेक्षा जास्त भाजलेल्या रुग्नांना स्कीनची गरज आहे.त्यासाठी देखील प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. भाजलेल्या व्यक्तीमध्ये पुन्हा स्कीन ट्रान्सप्लान्ट करण्यासाठी टिश्यूज पाहिजे असतात व त्यासाठी बँक आवश्यक आहे.दुर्देवाने ते स्टोअर करण्याची व्यवस्था आज फार थोडया ठिकाणीच आहे.त्यामुळे भाजलेल्या व्यक्तीला स्कीन ट्रान्सप्लान्टेशन करण्यासाठी स्कीन बॅंक अत्यंत महत्वाची आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत .....

सभापती महोदय, कॉर्निया ट्रान्सप्लान्टचा व्यापार सध्या सुरु आहे असे मी माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांना सांगणार आहे. माननीय मंत्री श्री अनिल देशमुख माझ्या मताशी सहमत होतील असे मला वाटते. मुंबईमध्ये या विषयाशी संबंधित एक आंतरराष्ट्रीय रॅकेट कार्यरत आहे. नेत्रदान करावयास पाहिजे असे शासनाकडून वारंवार सांगितले जाते.एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर एक दोन तासाच्या आत त्याचे डोळे काढून घेतले जातात आणि ते स्टोअर केले जातात. या विषयाच्या संदर्भात परवा मी प्रश्न विचारला होता परंतु वेळेच्या अभावी तो दुर्दैवाने चर्चेला आला नाही.नेत्रदानाच्या निमित्ताने कॉर्निया स्टोअर करणा-या आय बॅकसुध्दा आज बंद व्हावयास लागल्या आहेत. या आय बॅका दक्षिण भारतामध्ये मोठयाप्रमाणावर व्यापार करीत आहेत.एल.व्ही. प्रसाद सारखी मोठ मोठी हॉस्पिटल तेथे कार्यरत आहेत. आपल्याकडे मृत व्यक्तीचे कॉर्निया काढले जातात आणि त्याठिकाणी नेऊन विकले जातात.कारण त्यासंबंधीचा हिशोब कोणाकडेही नसतो. मी जर कॉर्निया देण्यासाठी फॉर्म भरला असेल वा माझ्या कुटुंबातील व्यक्तीने फॉर्म भरला असेल तर माझा व माझ्या कुटुंबियातील व्यक्तीचा मृत्यू कधी होणार आहे हे देवच सांगू शकेल. त्यामुळे याचे अकाऊन्टींग ठेवता येणार नाही म्हणून प्रथम आपल्याला अकाऊन्टींग सिस्टीम तयार करावी लागणार आहे.जे बेहिशोबी कॉर्निया असतात ते मोठ मोठया हॉस्पिटल्समध्ये पाठविले जातात व त्याचे 70 - 80 हजार रुपये घेतले जातात जे.जे. हॉस्पिटलच्या माध्यमातून डॉ. लहाने यांनी या संबंधीचा प्रस्ताव तयार केला होता तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी त्या कक्षाचे उद्घाटन सुध्दा केले होते. कॉर्निर्याची तस्करी मोठया प्रमाणावर होण्याची शक्यता आहे ..

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नोंदी

डॉ. दीपक सावंत...

कॅडेव्हर लिव्हर ट्रान्सप्लॉटसाठी लिव्हर काढून घेण्याची सोय फक्त मुंबईच्या के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये आहे. अशाप्रकारची सोय अजूनही जे.जे. हॉस्पिटलमध्ये झालेली नाही किंवा महाराष्ट्रातील दुसऱ्या कोणत्याही हॉस्पिटलमध्ये याची सोय झालेली नाही. कॅडेव्हर लिव्हर ट्रान्सप्लॉटकरिता आपल्याकडे अनेक मृतदेह येतात. त्या मृतदेहामधून आपल्याला लिव्हर मिळू शकते. लिव्हरची एक मोठी बँक होऊ शकते, परंतु काही तासातच त्यांचे ट्रान्सप्लॉट करणे आवश्यक आहे. त्याचे स्टोअरेज करण्याची कॅपॅसिटी आपल्याकडे नाही आणि त्यासाठी आवश्यक असणाऱ्या बेसिक गोष्टीदेखील आपणाकडे नाहीत. यामधील तज्ज्ञ डॉक्टर सुध्दा हाताच्या बोटावर मोजण्याइतके आहेत. जे. जे. हॉस्पिटलमध्ये तीन वर्षानंतर परवा किडनी ट्रान्सप्लॉट ऑपरेशन करण्यात आले. डॉ. बहादूर यांनी हे किडनी ट्रान्सप्लॉटचे ऑपरेशन केले. हे ऑपरेशन एक वर्षानंतर झाले असे मंत्री महोदयांचे म्हणणे आहे. परंतु माझ्या माहितीप्रमाणे दीड ते दोन वर्षानंतर असे ऑपरेशन झाले आहे. मला आपल्याला असे विचारावयाचे आहे की, आपण फक्त कायदे बनविणार आहोत काय, गरीब माणसांनी यासाठी कुठे जायचे, गरीब माणसांनी हिंदूजा, जसलोक आणि लिलावतीमध्ये जायचे काय? त्यांनी कुठे जायचे व काय करावयाचे याबाबत यामध्ये काय नोटिफाय केले आहे हे त्यांना माहित नाही, किडनी ट्रान्सप्लॉटसाठी, आणि लिव्हर ट्रान्सप्लॉटसाठी कोणते हॉस्पिटल नोटिफाय आहे हे त्यांना माहीत नसते. त्यामुळे त्या लोकांची दिशाभूल होते. या संदर्भात लोकांमध्ये अवेअरनेस नाही. राज्य सरकार फक्त कायदा बनविते, परंतु तो बनवीत असतांना त्याबाबत लोकांमध्ये अवेरनेस आणण्याच्या बाबतीत आपण 100 टक्के अपयशी ठरलो आहोत. किडनी ट्रान्सप्लॉट किंवा लिव्हर ट्रान्सप्लॉट करण्याबाबत असलेले नियम किती लोकांना माहित आहेत त्यासाठी राज्य सरकारने नियमावली तयार केली आहे काय हे काम कोण करु शकते? रिसिपिएंटच्या काय अडचणी असतात, याची माहिती कुठेच मिळत नाही. त्यामुळे या लोकांचे फावते, तस्करी करणाऱ्या लोकांचे फावते. यामध्ये मेडिकल प्रोफेशनचे लोक आहेत, दलाल आहेत. ज्याप्रमाणे रक्ताचा काळाबाजार होतो त्याप्रमाणे याचा देखील काळाबाजार होतो. आज आपल्याला रक्त पुरवठयासाठी सुध्दा नियम तयार करण्याची गरज आहे. कोणत्या बँकेने किती रुपयांमध्ये रक्त विकावे, प्लेटलेट

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विकावेत, किंवा प्लाझ्मा विकावा याचे सुध्दा नियम करणे आवश्यक आहेत. या कायद्याच्या अंमलबजावणीकरिता मेडिकल, एज्युकेशन आणि रिसर्च या विभागांनी अतिशय प्रोॲक्टिव्ह होणे आवश्यक आहे. पुढील काळाची गरज ओळखून अशाप्रकारच्या अनेक ट्रान्सप्लॉंटसाठी, जीव घेणाऱ्या गोष्टींसाठी आपण लक्ष देण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, अनेक लोक सांगतात की, मी जर ब्रेन डेड झालो तर माझे अवयव ट्रान्सप्लॉंट करा. परंतु त्यासाठी आपणाकडे फॉर्म उपलब्ध आहेत काय? आपण जर कायदा बनवू पहात आहोत तर मग अशाप्रकारची सूची आपण तयार केली आहे काय? हा फॉर्म कुणी भरावा, कसा भरावा, त्यामध्ये कोणते कॉलम असावेत ही उपलब्धता आपण करुन देत नाही.

सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगू इच्छितो की, वैद्यकीय शिक्षण विभागासाठी पहिल्यांदा आपल्याला एक डॉक्टर मंत्री मिळालेला आहे.त्यामुळे आपण देखील आपल्या ज्ञानाचा सर्वत्र फायदा करुन ध्यावा. काय करावयास पाहिजे व काय करावयास नको हे आपण लोकांना सांगावे. सभापती महोदय, या कायद्यामध्ये खूप विस्तृत माहिती दिली आहे. यामधील दोन गोष्टी मी आपणास सांगू इच्छितो. या कायद्याचे काय होणार आहे ते आपण मला सांगावे. टिम्पॅनिक मेब्रेन म्हणजे जर कुणी आपल्या कानामध्ये काडी घातल्यामुळे कानाच्या आतील पडदा फाटला तर त्यावर उपचार करण्यासाठी देखील आपण कायदा बनविला होता. त्याप्रमाणे आपण 1982 मध्ये कॉर्निओसाठी कायदा बनविला होता. त्या कायद्याचे नाव असे आहे की, "Ear Drum and Ear Bone Authority for Use in Therapeutic Purposes Act, 1982 hereby repealed". आता या कायद्याचे सध्याचे स्टेटस काय आहे? आता हा कायदा रद्द झाला आहे. आपण कायदा करण्यासाठी ज्या गोष्टी करीत आहात त्या कायद्याला धरुन आहेत की नाहीत याबाबत आपणाकडून उत्तर अपेक्षित आहे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

अशा अनेक गोष्टी आहेत. मिसलेनियसमधील चॅप्टर 7 मध्ये काय म्हटलेले आहे हे मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांची क्षमा मागून इंग्रजीमध्ये वाचून दाखवितो. यामध्ये असे म्हटले आहे की,

"Power to make rules.- (1) The Central Government may, by notification, make rules for carrying out the purposes of this Act.

(2) In particular, and without prejudice to the generality of the foregoing power, such rules may provide for all or any of the following matters, namely :-

(a) the manner in which and the conditions subject to which any donor may authorise removal, before his death, of any human organ of his body under sub-section (1) of section 3;"

यामध्ये 'ए' ते 'ओ' पर्यंत विविध पावर्स दिलेले आहेत त्याचे नेमके काय होणार आहे ? राज्य सरकार आपल्या कायद्यामध्ये हे अंतर्भूत करणार आहे की नाही, ही बाब महत्वाची आहे. जाता जाता मी एवढेच सांगेन की, हे सर्वोच्च सभागृह आहे. या सभागृहामध्ये अशा प्रकारच्या कायद्यावर प्रकाश टाकणे आणि तो जनसामान्यांपर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी माननीय मंत्रिमहोदयांना खूप मेहनत घ्यावी लागणार आहे. कारण आपल्या जनतेला हा कायदा समजावून सांगणे आणि या कायद्यातील ज्या काही वाईट गोष्टी आहेत त्याला आळा घालणे महत्वाचे आहे. मी ज्या ज्या गोष्टी सांगितल्या त्याबाबतीत शासनाने चौकशी करावी आणि त्याबाबत या भविष्य काळामध्ये सभागृहामध्ये सगळे सांगितले तर बरे होईल. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जमा (महाराष्ट्र विधान सभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, माननीय मंत्री महादय ने अभी यहां पर जो प्रस्ताव रखा है, उस प्रस्ताव पर मैं अपने विचार रखने के लिए यहां पर खड़ा हुआ हूं.

माननीय सभापति जी, यहां पर यह प्रस्ताव रखने वाले माननीय मंत्री जी भी डाक्टर हैं और इस प्रस्ताव पर मुझ से पहले बोलने वाले माननीय सदस्य श्री दीपक सावंत भी डाक्टर हैं. ये दोनों ही माननीय व्यक्ति मेडिकल के बारे में विस्तृत जानकारी रखते हैं. माननीय सदस्य ने जो सुझाव यहां पर दिए हैं, वे सुझाव काफी स्वागत योग्य हैं. मैं अपनी ओर से यहां पर सिर्फ दो-तीन बातें ही जोड़ना चाहता हूं. डाक्टर दीपक सावंत ने यहां पर अभी बताया कि इस प्रस्ताव को पास करना संवैधानिक जरुरत है. इसलिए यह प्रस्ताव हमें यहां पर पास करना पड़ेगा.

हमारा यह ऑर्गन ट्रांसप्लांट कानून 1994 में बनाया गया था. उस वक्त यह चीज प्रिलिमिनरी स्टेज में थीं. अब इसमें नयी-नयी चीजें आ गयी हैं. अब इसमें स्टेमसेल तथा दूसरी बहुत सारी नयी चीजें आ गयी हैं. अब मेडिकल सायंस में बहुत डॅवलपमेंट हो गयी हैं. सभागृह से मेरा भी यह अनुरोध रहेगा कि माननीय सभागृह इस प्रस्ताव को पास कर दे. क्योंकि यहां पर यह प्रस्ताव पास नहीं किया गया तो फिर संसद में इस प्रस्ताव से संबंधित बिल में संशोधन नहीं हो पाएगा. डाक्टर दीपक सावंत ने भी यहां पर कहा कि वह कानून बहुत ही कॉम्प्रिहेंसिव बना था. लेकिन अब के समय के अनुसार वह कानून थोडा संयुक्तिक नहीं लग रहा है. इसलिए उसमें बहुत सारी बातें शामिल करने की आवश्यकता है. मेडिकल सायंस अब बहुत डॅवलप हो रही है. उन बातों का जिक्र यहां पर माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत ने अपने भाषण में भी किया है.

पिछली बार जब यह एक्ट पास हुआ था तो उस समय हमारे देश के प्रधानमंत्री माननीय नरसिंह राव थे. तब यह बिल सिलेक्ट कमेटी के पास गया था और पूरे देश में इस बिल पर विस्तृत रुप से चर्चा हुई थी. उस समय ज्यादातर चर्चा किडनी के बारे में हुई थी. अब इसमें कॉर्निया तथा लीवर जैसे नये आइटम शामिल हो गये हैं.

मैं माननीय मंत्री जी का ध्यान दो-तीन बातों की ओर आकर्षित करना चाहता हूं. मेरा कहना है कि आपके मंत्रालय की ओर से मुंबई के अंदर एक या दो दिन का एक सेमिनार या वर्कशॉप आयोजित की जानी चाहिए. उस सेमिनार में महाराष्ट्र के मेडिकल एक्सपर्ट के अलावा.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जमा. . .

इंटरनेशनल मेडिकल एक्सपर्ट एवं लोक प्रतिनिधियों, तथा कुछ एन.जी. ओज. को भी शामिल किया जाना चाहिए. हमारी विधान परिषद में काफी होशियार माननीय सदस्य हैं तथा विधान सभा में भी काफी होशियार माननीय सदस्य मौजूद हैं. उन सभी को इस सेमिनार में आमंत्रित करना चाहिए. उस सेमिनार के अंदर जो सुझाव आएं, उन सुझावों की एक विस्तृत रिपोर्ट तैयार करके वह रिपोर्ट इस प्रस्ताव के साथ दिल्ली भेजी जानी चाहिए.

अभी यहां पर बताया गया कि सन् 1982 का एक्ट रिपील हो गया, कॉर्निया के बारे में हो, कान के जर्म्स बारे में तथा अब रेटीना के बारे में समस्याएं आ रही हैं. उसका कारण डॉयबिटीज है. डॉयबिटीज के कारण नयी-नयी बीमारियां हो जाती हैं.

हमारा राज्य प्रोग्रेसिव राज्य है. इसलिए इस दिशा में हमें विचार करना चाहिए. और कुछ अच्छे सुझाव हमें इस प्रस्ताव के साथ केंद्र को भेजने चाहिए. ये अच्छे सुझाव हमें एक सेमिनार के माध्यम से मिल सकते हैं. इसलिए सेमिनार आयोजित करने का काम सरकार को करना चाहिए.

दूसरी बात मुझे किडनी ट्रांसप्लांट करने के बारे में कहनी है. मुझे कहना है कि आज से लगभग 20 साल पहले स्थिति इस प्रकार की थी कि यदि हम किसी व्यक्ति को रक्तदान करने के लिए कहते थे तो कोई भी व्यक्ति रक्तदान करने के लिए आसानी से तैयार नहीं होता था. किसी कारखाने में किसी कामगार का एक्सीडेंट हो जाने पर जब उसको रक्त की जरुरत पड़ती थी तो उसके साथ काम करने वाला दूसरा कामगार अपने साथी कामगार के लिए आसानी से रक्त दान नहीं करता था. रक्तदान करने के बजाय वह कामगार अपने गांव भाग जाता था. इस प्रकार की स्थिति पहले थी. लेकिन अब ऐसी स्थिति नहीं है. अब लोगों को मालूम पड़ गया है कि रक्तदान करने से कुछ नुकसान नहीं होता, बल्कि उसके रक्तदान करने से किसी दूसरे व्यक्ति की जान बच जाती है. इसलिए लोग बिना किसी परेशानी के अपनी खुशी से दूसरे व्यक्ति को रक्तदान कर देते हैं. उसका कारण यही है कि सरकार की ओर से बड़े पैमाने पर जन जागरण किया गया है. इसलिए मेरा कहना है कि यह जो प्रस्ताव हमारे सामने आया है इस बारे में भी एक विस्तृत कानून बनाया जाना चाहिए. . . .

. . . 4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जमा. . .

इस प्रस्ताव में यह बात शामिल होनी चाहिए कि डोनर्स का रेग्युलेशन कैसे होगा. क्योंकि मरीज के रिश्तेदार डोनर्स को जबर्दस्ती ले आते हैं और पैसे देकर जबर्दस्ती ऑर्गन डोनेट करा लेते हैं. इसलिए डोनर्स के बारे में, ट्रांसप्लांट करने के बारे में तथा उसके स्टोरेज के बारे में एवं उसकी कॉस्ट के बारे विचार किया जाना चाहिए. जो बातें माननीय सदस्य डॉक्टर दीपक सावंत ने यहां पर कहीं हैं, उन बातों को मैं यहां पर दोहराना नहीं चाहता.

लेकिन एक बात मैं यहां पर यह जरुर कहना चाहूंगा कि सर्जरी के बाद पेशेंट की केयर करने में बहुत खर्च आता है. मरीज के रिश्तेदार किडनी तो ले लेते हैं, लेकिन सर्जरी के बाद लगभग 6 महीने या एक साल तक उसकी केयर करने का खर्च बहुत ज्यादा है. उस बारे में भी हमारी पार्लमेंट को विचार करना चाहिए. ऑर्गन ट्रांसप्लांट तो बड़े सरकारी हॉस्पीटल में भी किया जा सकता है. लेकिन हमें इस बात पर ध्यान देना होगा कि जो गरीब आदमी है, मध्यम वर्ग का आदमी है वह सर्जरी के बाद के इस महंगे खर्च को कैसे उठा पाएगा ? इसके उपाय की व्यवस्था भी इस कानून में होनी चाहिए. इन सब बातों पर विचार करना चाहिए और उन समस्याओं का हल कैसे निकाला जा सकता है, इस बात की जानकारी भी हमें इस प्रस्ताव के साथ केंद्र सरकार को भेजनी चाहिए. ट्रांसप्लांट से रिलेटेड और ऑर्गन डोनेट करने से संबंधित जो भी कानून हैं, उनको मिलाकर एक कॉम्प्रिहेंसिव कानून बनाया जाना चाहिए. अभी यहां पर माननीय सदस्य बता रहे थे कि ट्रांसप्लांट की स्टेज तो काफी बाद में आती है. उससे पहले डायलॅसिस करने की जो स्टेज है, उसकी भी पूरी व्यवस्था हमारे यहां पर नहीं है. हेमोडॉयलसिस की व्यवस्था भी नहीं है.

इसलिए मेरा कहना है कि इस प्रस्ताव को पास करने के साथ-साथ हमें एक सायंटिफिक बेस पेपर भी भेजना चाहिए. माननीय मंत्री महोदय खुद भी डाक्टर हैं, इसलिए मुझे पूरी उम्मीद है कि इस प्रस्ताव को पास करने के साथ-साथ अपने कुछ अच्छे सुझाव भी इस प्रस्ताव के साथ संसद को भेजेंगे. माननीय सदस्य डॉक्टर दीपक सावंत के सुझावों को समर्थन देते हुए मैं अपनी बात समाप्त करता हूं. धन्यवाद.

-0-

अशोधित पाठ / अशोधित नहीं

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अत्यंत चांगला कायदा आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी याबाबत कायद्यातील त्रुटींचे विवेचन केलेले आहे. त्यांच्या व मंत्री महोदयांच्या बोलण्यातून असे आले की, ऑर्गन डोनर्सची व रिसीपन्टची यादी तयार केली जाईल. पूर्वीच्या व्यवस्थेनुसार डोनर्सना आणण्यासाठी आर्थिक मदतीच्या माध्यमातून प्रभावित करावे लागत होते किंवा हा माझा पेशंट आहे त्याला अवयव मिळाला पाहिजे या भावनेतून आपण प्रचाराचे काम करीत होतो. परंतु आता जी व्यवस्था तयार होणार आहे त्यामध्ये मोटिवेशनचा फॅक्टर कशा पध्दतीने प्रत्यक्षात उतरविणार आहोत ? ज्या पध्दतीने ब्लड डोनेशनसाठी शासनाच्या व एनजीओजच्या माध्यमातून प्रचार मोहिम राबविण्यात आली, त्याचा परिणाम असा झाला की, अनेक मंडळी ब्लड डोनेशनसाठी कॅम्पस् आयोजित करतात आणि तेथे ब्लड डोनेशन केले जाते. हजारो तरुण मुले या कॅम्पमध्ये सहभागी होत असतात. शासन या अवयवांबाबत प्रचार मोहिम राबविणार आहे काय ? सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितल्या प्रमाणे जर अशी मोहिम हाती घेतली तर हे जे अवयव आहेत त्याचा काळा बाजार होणार नाही. तसेच हे अवयव व्यवस्थित राहतील याची काळजी घेतली पाहिजे. अनेक वेळा कॉर्निया, किडनी, मरण पावलेल्या माणसाचे लिव्हर काढले जाते त्याचे जतन नीट केले नाही तर ते वाया जाते अशा बातम्या वृत्तपत्राच्या माध्यमातून वाचत असतो.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे...

या सर्व गोष्टी आज अत्यंत सिंक्रोनाईज पध्दतीने करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, माझ्या मनामध्ये आणखी एक शंका येते. मृत झाल्यानंतर किंवा ब्रेनडेड झाल्यानंतर ऑर्गन देण्याच्या बाबतीत लेखी इच्छा प्रदर्शित केलेली असते. अनेक वेळेला एखादी व्यक्ती मृत्यू पावल्यानंतर त्या व्यक्तीच्या नातेवाईकांना माहीत नसते. अवयव दान करण्याच्या बाबतीत शासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच अन्य व्यक्ती फॉर्म भरुन देतात. म्हणजे डिक्लेरेशन देतात. त्याबाबतीत फालोअप करणे, कोऑडिनेशन करणे आवश्यक आहे .त्यासाठी शासनाने यंत्रणा उभी केली पाहिजे हे मला या निमित्ताने शासनाला सुचवावयाचे आहे.

सभापती महोदय, तिसरा मुद्दा असा आहे की, निकड आवश्यकता आणि डोनर यांची सांगड घातली न गेल्यामुळे अनेक महिने प्रकरणे प्रलंबित राहातात. अशा प्रकारचे एक प्रकरण माझ्या समोर आले होते. परिस्थिती नसताना त्या व्यक्तीला महागड्या पध्दतीचा उपचार अवलंबावा लागत होता. अवयव प्रतिरोपणाच्या बाबतीत सिंगल समिती न बनविता एक 100 डॉक्टरांची समिती नेमून तिच्या सब-समित्या केल्या आणि त्या समित्यावर कोण कोण डॉक्टर्स आहेत हे डोनरला कळविले तर या प्रक्रियेमध्ये पारदर्शकता राहील. सभापती महोदय, एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून समाजामध्ये ज्या ज्या अडचणी आहेत त्यानुषंगाने मला जे काही मुद्दे सूचले ते मी येथे मांडलेले आहेत. शासन त्यावर निश्चितच विचार करील. हा एक अतिशय चांगला ठराव असल्यामुळे या ठरावाला पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपवितो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जमा :सभापति महोदय, मैं अपने भाषण में एक बात कहनी भूल गया. इसलिए वह बात मैं अब यहां पर कहना चाहता हूं. मैं बताना चाहूंगा कि कल नागपुर के अखबारों में सभी ने पढ़ा होगा कि डॉक्टर विकास महात्मे आंखों के डाक्टर हैं. उनको महामहिम राष्ट्रपति जी द्वारा पिछले साल पदमश्री से सम्मानित भी किया गया है. उन्होंने अपनी धर्मपत्नी तथा अपने लड़के के साथ खुद की बॉडी डोनेट करने का निर्णय लिया है. इस बात की प्रशंसा सदन में होनी चाहिए. इसलिए यह बात मैंने सदन के सामने रखी है. यह दान उन्होंने अपनी खुशी से किया है. उनका यह काम बहुत ही प्रशंसनीय है. यही मुझे कहना है.

--

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्याच्या वैद्यकीय शिक्षण मंत्री महोदयांनी एक अतिशय महत्वाचा आणि देशातील नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित असलेला कायदा आज या सभागृहामध्ये चर्चेसाठी आणलेला आहे. मला आज या सभागृहामध्ये असल्याचे वेगळे समाधान या कारणासाठी आहे की, एखादी गोष्ट चर्चेसाठी येत असताना त्या विषयाचे सर्व पैलू आपण लोकांसमोर आणले पाहिजे, शासनासमोर मांडले पाहिजेत आणि त्यामधून योग्य असा मार्ग स्वीकारण्याची आपली तयारी असली पाहिजे. कायदा हा आपल्या जागी समर्थ असतो.कायदा करताना अनेक गोष्टींचा विचार निश्चितच केलेला असतो. तरीही जेथे कायदा आहे तेथे पळवाटा आहेत अशी प्रचलित म्हण आहे. त्यामुळे या पळवाटांचा उपयोग करुन या कायद्याला वळसा घालून या व्यवस्थेत काम करणारी जी मंडळी आहे त्यांच्या बाबतीत शासन नक्की काय करणार आहे असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो.

सभापती महोदय, दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येक राज्यात आणि देशात सुध्दा पर्यटन व्यवसाय वाढविण्यासाठी मोठी स्पर्धा सुरु झालेली आहे. ब-याच वेळा असे वाचनात येते की, आपल्या देशामध्ये विशेषत: मुंबई सारख्या शहरामध्ये मेडिकल टुरिझम नावाचे नवे टुरिझम मोठया प्रमाणावर येत आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

केरळ राज्याने तर आघाडीच घेतली आहे. जोपर्यंत बाह्य उपचारासाठी किंवा इतर काळजी घेण्यासाठी जे वैद्यकीय निकष आहेत त्याबाबत त्यांचा उपयोग जरुर करता येईल. कारण कदाचित डॉलरच्या तुलनेत रुपयांमध्ये या देशातील उपचार योजना पुष्कळदा स्वस्तात मिळू शकते अशा प्रकारची आहे किंवा अशा प्रकारच्या सोयी सुविधा निर्माण करुन चांगल्या दर्जाची कॉर्पोरेट हॉस्पिटल्स बहुधा पंचतारांकित हॉटेलांसाठी झाली आहेत. या पंचतारांकित हॉटेलच्या दरांपेक्षा त्यांचे दर कमी असल्यामुळे कित्येक प्रवासी अशा हॉस्पिटलमध्ये मुक्कामाला येण्याची संख्या मोठया प्रमाणात वाढू लागली आहे. आतापर्यंत जी काही चर्चा झाली त्यानुसार प्रतिरोपण करण्याची जी प्रक्रिया आहे त्यातील दोन महत्वाचे भाग असे आहे की, प्रत्यक्ष जिवंत व्यक्तीकडून जिवंत व्यक्तीला दिले जाणारे अवयवाचे रोपण किंवा मृत्यू झाल्यानंतर जे अवयव अजूनही टिकून आहेत आणि जे कमीत कमी वेळेत काढून घेतल्यानंतर त्याची योग्य जपणूक आणि साठवणूक करुन योग्य अशा व्यक्तिना त्याचा उपयोग करण्यासाठी ठेवता येण्याजोगी यंत्रणा.

आपल्या राज्यातील किंवा देशातील एकूण आरोग्य व्यवस्था जी आहे त्यात केवळ मेडिकल डॉक्टर्सचा प्रश्न नसून त्यासाठी लागणारे जे इन्फ्रास्ट्रक्चर आहे ते इन्फ्रास्ट्रक्चर जोपर्यंत उभे राहणार नाही तोपर्यंत सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी जे कॉर्नियाचे उदाहरण दिले, आय बँकेच्या संदर्भात सांगितले, मला वाटते आपल्यापेक्षा श्रीलंका देश एक्स्पोर्टबाबत फुशारकी मारतो. श्रीलंका देशाचे म्हणणे आहे की, आम्ही सगळ्यात जास्त कॉर्निया एक्स्पोर्ट करतो. जगामध्ये आमचा प्रथम क्रमांक आहे. यादृष्टीने छोटया छोटया स्तरावर, केंद्रस्थानापासून जिल्हा ते गाव पातळीपर्यंत प्रा.आ.केंद्रापर्यंत आपण जातो त्यावेळेला तेथील व्यवस्था किती तुटपुंजी आहे याचा अनुभव आपल्यालाही आपल्या अनुभवातून आलेला असेल. मला वाटते की, छोटासा प्रयोग मागे नाशिक जिल्हयाच्या सरकारी हॉस्पिटलमध्ये आम्ही करुन पाहिला होता. नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाईंड या संस्थेमध्ये ज्यांनी ज्यांनी नेत्रदानाचे फॉर्म भरले किंवा जिथे नेत्रदान शक्य आहे त्या ठिकाणी सिव्हिल हॉस्पिटल आणि एनजीओ यांच्या टीमने जाऊन आय बॉल काढून घ्यायचे आणि व्यवस्थित ठेवायचे आणि आपल्याच भागातील संबंधित रेसिपिएंटना शोधून तयार ठेवायचे. एनजीओ आणि सिव्हिल हॉस्पिटल यांच्या सहयोगातून यादी तयार ठेवायची आणि डोनर व रेसिपिएंट यांची परस्पर जोडणी आहे ती त्याठिकाणी व्यवस्थितपणे व्हावी. जितक्या मोठ्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

स्थळावर यादी तयार करण्याचे काम करण्यात येईल आणि फर्स्ट कम फर्स्ट सर्व्ह बेसीसवर करावयास गेलो तर मला वाटते या सगळ्या योजनेमध्ये मोठया प्रमाणात त्रुटी राहण्याची शक्यता आहे. म्हणून या स्वस्त व्यवस्थेची शास्त्रीय पध्दतीने मांडणी करुन त्यासाठी आवश्यक असणारे इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण करुन स्थानिक पातळीवर त्याचे विकेंद्रीकरण करुन ज्या ज्या गोष्टी करता येणे शक्य आहे अशासाठी आपल्याला कायद्याद्वारे तरतूद करता आली तर त्याचा अधिक परिणाम होऊन चांगला उपयोग होण्याची शक्यता या निमित्ताने मला सांगावीशी वाटते.

सभापती महोदय, मेडिकल प्रोफशन हा व्यवसाय महत्वाचा आहे. समाजामध्ये कित्येक शतकापासून आपल्याला माहिती आहे की, डॉक्टरांचे स्थान समाजामध्ये एक वेगळया प्रकाराने समजले जाते. त्याच्याकडे अतिशय मानवतेचे काम दिलेले असते. त्यामुळे इंडियन मेडिकल असोसिएशन असेल किंवा वेगवेगळ्या पॅथीचे तज्ज्ञ असतील या सगळ्यांना सहभागी करुन आपण याबाबत व्यवस्थित कार्यक्रम तयार केला पाहिजे. त्यायोगे लोकशिक्षणाद्वारे या प्रतिरोपणाबाबत जे ज्ञान आहे, ज्या कायद्यातील तरतुदी आहेत आणि जे प्रत्यक्षात रोजच्या व्यवहारात आणता येणे शक्य आहे.....

नंतर 3जी.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले .....

अशा सर्व बाबींचा सर्वसमावेशक विचार करुन या कायद्याचा अतिशय चांगल्या पध्दतीने उपयोग होऊ शकतो. तसेच हा कायदा परिणामकारक रितीने अमलात आणण्याच्या दृष्टीने, किंवा कायदा प्रत्यक्ष अमलात आल्यानंतर त्यात ज्या उणीवा व अडचणींना सामोरे जाताना सुध्दा वेळोवेळी त्या समस्या सुटतील अशा प्रकारची यंत्रणा निर्माण करण्याची व्यवस्था जरुर करावी. या निमित्ताने एक या व्यवसायातील लोकांची, सामान्य नागरिकांची व्यापक अशी चर्चा होऊन जनजागृती होणे आवश्यक आहे. मला सुचवावेसे वाटते की, केवळ एमबीबीएस किंवा एमडी या पदव्यांवरच अवलंबून न राहता मुलभूत वैद्यकीय ज्ञान प्राप्त होण्यासाठी बारावी नंतरचे काही पॅरामेडिकल कोर्सेस केलेल्यांच्या माध्यमातून या धोरणाचा प्रचार आणि प्रसार केला तर आपण जे विधेयक आणू पाहत आहात ते खऱ्या अर्थाने सार्थकी लागेल, असे मला वाटते. एवढे बोलून या ठरावाला समर्थन करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, प्रत्यारोपण कायद्यात सुधारणा करण्यासाठी जो ठराव शासनाकडून आलेला आहे त्या ठरावावर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, सर्वश्री. एस.क्यू.जमा, प्रकाश बिनसाळे आणि श्री. हेमंत टकले यांनी अत्यंत चांगल्या गोष्टींचा उहापोह केला तसेच मार्गदर्शनही केले, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. ज्या गोष्टींचा पुढील काळात आपल्याला निश्चित फायदा होऊ शकतो अशा काही बाबी त्यांनी उध्दृत केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी प्रामुख्याने उपस्थित केली ती गोष्ट खरी आहे की, ट्रान्सप्लांट काय असते आणि ते कुठे केले जाते, ही माहिती जनतेला आपण अद्यापही देऊ शकलो नाही, त्यामुळे डोनर आणि रेसिपियन्ट सुध्दा पुढे येत नाहीत. त्यासंबंधीची चर्चा सत्रे किंवा अधूनमधून काही फिलिंग्ज असतील अशी चर्चा सत्रे घेण्याचे प्रयत्न शासनाकडून केले जातील. ज्याच्या माध्यमातून डॉक्टर्स किंवा पॅरा मेडिकल संस्था, अथवा असा व्यवसाय करणारे लोक असतील त्याचबरोबर अशा प्रकारची कामे करणाऱ्या संस्था किंवा सोशल वर्कर्स यांनाही इन्व्हॉल्व्ह करुन घेऊन जास्तीत जास्त जनजागृती कशी करता येईल यादृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर यासाठी आवश्यक ते इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप करण्याची गरज असून किडनी ट्रान्सप्लांटच्या केसेस बऱ्याच दिवसांमध्ये होत नाहीत. अशा केसेस दर पंधरा दिवसातून तीन चार वेळा किंवा आठवड्यात एक-दोन वेळा कशा घेता येतील यादृष्टीने इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप केले जाईल. तसेच सन्माननीय सदस्यांनी कॉर्नियाच्या बाबतीत उल्लेख केला. त्या अनुषंगाने प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी एक आय-बँक आणि कॉर्निया बँक निर्माण करण्याबाबत पुढे काय झाले अशीही विचारणा करण्यात आली. हे खरे आहे की, सर्वसाधारणपणे यासंबंधीचे चित्र निराशाजनक आहे. या सर्व गोष्टींना चालना देण्याच्या दृष्टीने शासनामार्फत प्रयत्न करण्यात येतील, जनजागृती निर्माण करण्यासाठी देखील पावले उचलली जाती. तसेच इअर बोन ड्रम तसेच कॉर्निया यासंबधीची माहिती सदस्यांनी विचारली, ती माहिती माझ्याकडे सध्या नसली तरी यासंबंधीची माहिती घेऊन पटलावर ठेवण्यात येईल. तसेच यासाठी आपण जी समिती नेमण्याचा विचार करीत आहोत त्यामुळे खूप वेळ लागतो कारण अशा केसेस इमर्जन्सीमध्ये मोडतात, तसेच मधूमेहाचे पेशंट्स यात जास्त असल्याने केव्हा काय घडेल हे सांगता येत नाही, अशीही शंका सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केली.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित....

यासाठी टाईम बाऊंड प्रोग्राम केला तर त्याचा फायदा निश्चितपणे रुग्णांना मिळू शकतो म्हणूनच यासाठी टाईम बाऊंड प्रोग्रामची निश्चितपणे व्यवस्था केली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. स्कीन बँक तसेच इतर अवयवांची बँक सुरु करण्याची आवश्यकता आहे. आता आपल्याकडे मोठया प्रमाणात ट्रान्सप्लाट होत आहे. विद्रुपपणा नष्ट करण्यासाठी सुध्दा स्नायू आणि इतर पार्टचा वापर केला जातो आहे. त्यामुळे अशा प्रकारचे रुग्ण आपल्या जीवनात रेग्युलर ॲक्टीव्हीटी सुरु करु शकतील यासाठी निश्चित प्रयत्न केले जातील. असे करण्यासाठी आपल्याला मोठया प्रमाणात जनतेमध्ये, डोनरमध्ये जनजागृती करावी लागणार आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी ब्लड बँक आणि ब्लड कम्पानंटच्या संदर्भात विषय उपस्थित करण्यात आलेला आहे. यासाठी आपल्याला निश्चितपणे कडक कायदा करावा लागणार आहे. ब्लड आणि कम्पोनंटमध्ये भरपूर नफा घेऊन विकले जात आहेत. त्यामुळे यासंदर्भात आपल्याला रिस्ट्रीक्शन कशा प्रकारे आणता येईल यासाठी चर्चा करुन मार्ग काढला जाईल. रक्त आणि रक्तातील घटक उपलब्ध करुन देण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न केले जातील.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी सांगितले आहे की, यांसदर्भात कॉऑर्डीनेटर नेमण्याची आवश्यकता आहे. आम्ही कोऑर्डीनेटर नेमणार असून तो केवळ डोनर, रेसीपियन एवढयापुरता मर्यादित न राहता बाकीच्या लोकांनाही मार्गदर्शन मिळू शकेल यासाठी आपल्याला निश्चितपणे सुधारणा करता येऊ शकेल. तसेच यासंदर्भात आपल्याला काय व्यवस्था करता येऊ शकेल हे बघणे गरजेचे आहे. बरेचसे लोक शरीराचे दान करीत असतात किंवा शरीराच्या अवयवाचे दान करीत असतात परंतु त्या व्यक्तींचा मृत्यू झाल्यानंतर ते अवयव काढावयाचे आहेत की, नाही याची माहिती नसते त्यामुळे यासंदर्भातील संपूर्ण माहिती वेबसाईटवर टाकून आपल्याला ज्यांनी शरीराचे किंवा अवयवाचे दान केलेले आहे ते आपल्याला काढता येऊ शकेल यासाठी आपल्याला व्यवस्था करावी लागणार आहे.

सभापती महोदय, याविषयाच्या संदर्भात पार्ट ट्रान्सप्लँट करतात त्यांना बोलावून त्यांच्या सूचना आपल्याला घेता येतील. तसेच सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांना सूचना सूचवावयाच्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित....

असतील तर त्यांनीही सूचना सूचवाव्यात. यासंदर्भात जेव्हा बैठक आयोजित करण्यात येईल तेव्हा सन्माननीय सदस्यांना सुध्दा बोलावण्यात येईल तसेच यामध्ये ज्या काही पळवाटा आहेत त्या बंद करण्यासाठी प्रयत्न केला जाईल. या कायद्याचा फायदा योग्य माणसाला मिळावा यासाठी निश्चितपणे प्रयत्न केले जातील. माझी सभागृहाला विनंती आहे की, या ठिकाणी एक चांगले बिल आणलेले आहे. या बिलामध्ये ब-याचशा त्रुटी होत्या, पळवाटा होत्या त्या कमी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. याच्या पुढील काळात यासंदर्भात आपल्याला जे काही नियम करावे लागतील ते सुध्दा केले जातील= आम्ही जो अधिनियम आणला आहे तो सभागृहाने मान्य करावा अशी विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशनबाबत

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आताच एक बातमी समजली आहे की, साखर संघाचे अध्यक्ष श्री.चंद्रशेखर घुले यांच्या कारखान्यावर सुमारे पाच हजार ऊस शेतकऱ्यांचा मोर्चा गेला होता. ऊसास चांगला भाव मिळावा अशी त्यांची मागणी होती आणि त्यासंबंधीचे निवेदन घेऊन तो मोर्चा कारखान्यावर गेला होता. असे असताना त्या मोर्चावर कारखान्यातून दगडफेक आणि ऊसाची कांडी फेकण्यात आली. शिवाय पोलिसांनी देखील मोर्चावर लाठीमार करुन हवेत गोळीबार केला. यामध्ये पाच-सहा शेतकरी जखमी झाले आहेत. आपल्या पिकाला रास्त मिळावा अशी मागणी शेतकऱ्यांनी करु नये काय ? शेतकऱ्यांच्या मोर्चा भाव वाढवून मिळावा असे निवेदन घेऊन कारखान्यावर गेला होता. पुणे जिल्ह्यातील सोमेश्वर कारखान्यामध्ये ही घटना घडली आहे. शेतकऱ्यांचा मोर्चा निघू नये यासाठी कलम 144 लावण्यात आले होते. पोलिसांनी हवेत गोळीबार केला,मोर्चावर लाठीमार केला. त्यामध्ये शेतकरी जखमी झाले अशा निरनिराळ्या अफवा पसरत आहेत. सर्वात महत्वाची बाब अशी की, हा सर्वपक्षीय मोर्चा होता. तेव्हा माननीय गृह मंत्र्यांनी या संदर्भातील वस्तुस्थिती सभागृहासमोर मांडावी.

उपसभापती : सभागृहापुढील कामकाज संपण्यापूर्वी शासनाकडून या संदर्भातील निवेदन करण्यात यावे.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा व विधीग्राहीकरण) विधेयक 2010

L.A. BILL NO. LXXVI OF 2010

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.)

श्री.भास्कर जाधव (नगर विकास राज्यमंत्री) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2010 चे वि.स.वि.क्र.76 - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक-76 महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रश्न मतास टाकून संमत झाला

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 4 विधेयकाचे भाग झाले

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 76 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो

प्रश्न मतास टाकून संमत झाला

उप सभापती : सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 76 संमत झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : नगरपरिषदा , नगरपंचायती व औद्योगिक नगरी

(सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. XII OF 2010

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE.

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि. प. वि. क्रमांक 12 महाराष्ट्र नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस व सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांचा प्रस्ताव आहे. त्यांच्यापैकी कोणीही एकाने तो मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही.)

उपसभापती : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 53 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.प.वि. क्रमांक 12 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : सन 2010 चे वि.प.वि. क्रमांक 12 संमत झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये यापूर्वी माझे सहकारी मित्र माननीय सदस्य श्री. कपिल पाटील व आम्ही म्हाडाच्या कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती वेतनासंदर्भात एक विषय मांडला होता. त्या संदर्भात एक वर्षभरामध्ये बैठक घेऊन निर्णय घ्यावा असे हायकोर्टाने राज्य सरकारला निर्देश दिले होते. एक वर्ष झाले तरी त्याबाबत बैठका न झाल्यामुळे सरकारने सहा महिन्यांची मुदत वाढवून घेतली. त्याबाबत माननीय सभापतींनी सभागृहामध्ये असे सांगितले होते की, या संदर्भात माझ्या दालनामध्ये बैठक घेऊन माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर बोलून हा विषय संपवू. दरम्यानच्या काळात माननीय सभापतींच्या दालनामध्ये बैठका ठरल्या, परंतु त्यांच्या प्रकृती अस्वाथ्यामुळे त्या पुढे ढकलण्यात आल्या. त्यानंतर सहा महिन्यांचा कालावधी संपत आल्यामुळे शासनाने म्हाडाच्या कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती वेतनासंदर्भातील निर्णय परस्पर अमान्य करुन माननीय मुख्यमंत्र्यांची सही घेऊन परत पाठविला. मुळात कोर्टाने निर्देश दतांना असे म्हटले आहे की, याबाबत शासनाने बैठक घेऊन निर्णय घेण्यात यावा. परंतु तसे केले नसल्यामुळे माझी आपणास विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्री नवीन आहेत, सरकार नवीन आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांना आपण आग्रहपूर्वक सांगावे. कारण शासनाने त्याबाबत कारणे देतांना असे म्हटले आहे की, ही योजना एमएसईबी किंवा इतर महामंडळामध्ये नाही. सभापती महोदय, त्यांची केस वेगळी आहे आणि म्हाडा व प्रदूषण नियंत्रण मंडळाची केस वेगळी आहे. म्हाडाकडे स्वत:चा फंड आहे. त्यामुळे त्यांना त्यांचाच पैसा मिळणार आहे, सरकारला त्यामध्ये पैसे टाकण्याची गरज नाही. उद्या म्हाडा जर तोटयात गेले तर ती पेन्शन योजना स्थगित करण्याबाबत म्हाडाचे कर्मचारी लिहून देण्यास तयार आहेत. म्हणून हे अधिवेशन संपण्यापूर्वी शासनाने पुन्हा बैठक घ्यावी. त्या बैठकीला कर्मचारी संघटनेचे प्रतिनिधी व माननीय सदस्यांना बोलाविण्यात यावे आणि हा प्रश्न सोडविण्यात यावा असे आपण या संदर्भात शासनाला निदेश द्यावेत अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी या सभागृहामध्ये म्हाडाच्या कर्मचाऱ्यांचा विषय गेल्या तीन वर्षापासून सातत्याने मांडीत आहे. त्या खात्याचे मंत्री असतांना माननीय श्री. सुरेश दादा जैन यांनी विधानसभागृहामध्ये त्या संबंधी स्पष्ट आश्वासन दिले होते.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

मी पत्र पाठवून आश्वासन समितीपुढे हा विषय साक्षीला घ्यावयास लावला. आश्वासन समितीच्या साक्षीमध्ये सर्व अधिकाऱ्यांनी ते मान्य केले. तरीही ते ऐकावयास तयार नाहीत. म्हणून मी तत्कालीन मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याकडे एक बैठक घेतली तसेच तत्कालीन अर्थमंत्री श्री. जयंत पाटील यांच्याकडेही बैठक घेतली. त्यानंतर त्यांनी सांगितले की, म्हाडाला पेन्शन द्यावयाची असेल तर म्हाडाने ठराव द्यावा. म्हाडाने ठराव दिला की, आमच्या निधीतून आम्ही हे करु. अधिकाऱ्यांनी जर एकदा ठरविले की त्यांना काही द्यावयाचे नाही तर द्यावयाचेच नाही अशी त्यांची भूमिका आहे. शासनाची जी महामंडळे आहेत त्यासंदर्भात शासनाने एक धोरण घेतलेले आहे. या महामंडळातील 99 टक्के महामंडळे बुडालेली आहेत. आता फक्त कार्यकर्त्यांना त्यावर नेमावयाचे आणि गाडी देऊन फिरावयास लावावयाचे एवढ्यापुरतीच ती महामंडळे शिल्लक आहेत. अशा महामंडळातील कर्मचाऱ्यांना पेन्शन योजनेचा लाभ मिळणार नाही पण त्यामध्ये म्हाडाला घुसवले. म्हाडा हे काही शासन अनुदानित नाही. उलट कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे चुकारे देण्याकरिता शासनाने म्हाडाकडून 700 कोटी रुपये घेतले होते. ज्या म्हाडाने सरकारला कर्ज दिले ते म्हाडा अनुदानित कसे असू शकेल. परंतु म्हाडाला अनुदानितमध्ये टाकले. उद्या कोर्टात उभे राहून सांगतील की, शासनाचा निर्णय आहे की, ज्या अनुदानित संस्था आहेत त्यांना पेन्शन द्यावयाचे नाही. त्यामध्ये म्हाडाला घातलेले आहे. मी पत्र लिहिले की, म्हाडा हे अनुदानित नाही. म्हाडा स्वत: पेन्शन देण्यास तयार आहे. त्यांचा ठराव आहे. निधीची उपलब्धता आहे. अर्थ खात्यावर कोणताही ताण येत नाही. शासनाच्या तिजोरीतील पैसे जात नाहीत. पण अर्थ खात्याचे वाकडे शेपूट सरळ होण्यास तयार नाही. एवढा हट्टीपणा हे लोक का करतात हे मला समजत नाही. ही 70-80 वर्षे वयाची मंडळी आता मृत्यूच्या दरवाज्यामध्ये उभी राहिलेली आहेत ते मागे वळून बघतात की, आम्हाला जाता जाता पेन्शन मिळेल काय ? सर्व मान्य झालेले आहे, मंजूर झालेले आहे आणि म्हाडाचे 70-80 लोक राहिलेले आहेत. पेन्शनचा नियम लागू झाला तर आता अस्तित्वात असलेल्या लोकांना तो लागू होईल. वयोवृध्द झालेले 70-80 वर्षे वयाचे, आधीच मृत्यूच्या पायरीवर उभे असलेले लोक आहेत. म्हणून मी माझ्या पत्रात असा प्रश्न विचारला की, आपले आई-वडील त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. दिवाकर रावते ....

ठिकाणी असते तर आपल्याला काय वाटले असते ? एवढ्या क्रूरपणे त्यांची चेष्टा करण्याचा हा जो प्रकार अधिकाऱ्यांकडून चाललेला आहे तो फार भयानक, तापदायक आणि चीड आणणार आहे. खरोखर यांना काय बोलावे हे कळत नाही. म्हणून मी आपल्याला विनंती करतो की, यासंदर्भामध्ये सरकारला काही देणे लागत नाही. शासनाच्या तिजोरीवर भार येत नाही आणि सरकारने जे निकष लावलेले आहेत त्यामध्ये म्हाडा ही संस्था बसत नाही म्हणून तो निर्णय तातडीने करावा. सरकारने सभागृहामध्ये आश्वासन दिलेले आहे. कोणीही उठले आणि मागितले असे नाही. त्या खात्याचे तत्कालीन मंत्री महोदय श्री. सुरेशदादा जैन यांनी सांगितले होते. आश्वासन समितीपुढे हा निर्णय झाला. संबंधित अधिकाऱ्यांनी साक्षीमध्ये सांगितले की, आम्ही पंधरा दिवसामध्ये प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे ठेऊन मान्य करतो. याला सरकारची मान्यता लागणार हे बरोबर आहे. पण सरकारने मान्यता देण्याकरिता एवढी आडकाठी करु नये. आपल्याच खात्यामध्ये वर्षानुवर्षे सेवा केलेल्या कर्मचाऱ्यांना अशा प्रकारे क्रूरतेने आणि चेष्टेने वागवू नये अशी मी आपल्या माध्यमातून जाणीवपूर्वक विनंती करतो. एक चांगला विषय सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी उपस्थित केल्याबदद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सुरुवातीलाच माझ्या नावाचा उल्लेख केला म्हणून मी फक्त एक मिनिट बोलणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी हा विषय अतिशय विस्तृतपणे मांडलेला आहे त्यामुळे मी त्याची पुनरावृत्ती करणार नाही. 80-90 वर्षे वयाच्या घरात असलेल्या म्हाडाच्या जुन्या कर्मचाऱ्यांना किमान शेवटचे काही दिवस तरी दिलासा देणार आहोत की नाही, हा प्रश्न आहे. म्हाडा शासनाकडे एकही रुपया मागत नाही. हे कर्मचारी नव्या योजनेमध्ये सामील होण्याची कोणतीही शक्यता नाही कारण ते सेवानिवृत्त होऊन आता 20-25 वर्षे झालेली आहेत. जे म्हाडाने मंजूर केलेले आहे, शासनाने देण्याचे मान्य केलेले आहे ते किती काळ अडविणार एवढाच प्रश्न आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, आपण पुढाकार घ्यावा. माननीय मुख्यमंत्र्यांकडे दोन्ही बाजूच्या सदस्यांची मागणी एकत्र घेऊन हा प्रश्न या अधिवेशनाच्या काळात निकाली काढावा अशी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. या ठिकाणी जे सांगण्यात आले ते मी पुन्हा बोलणार नाही. पण एक गोष्ट या सभागृहाला निश्चितपणे अवगत करु इच्छितो की, म्हाडाने ही पेन्शन द्यावी म्हणून एकदा नव्हे तर दोन किंवा तीन वेळा ठराव केला आणि आर्थिकदृष्टया सर्व व्यवस्थितपणे पाहून, त्या ठिकाणी सिनियर आय.ए.एस.अधिकारी म्हाडाचे उपाध्यक्ष म्हणून काम करतात त्यांनी याचा संपूर्णपणे अभ्यास केल्यानंतरच हा प्रस्ताव म्हाडाने शासनाकडे पाठविला.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे.....

आता नवीन कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू नाही. परंतु काही लोकांनी विशिष्ट कालावधीत काम केलेले आहे. ज्यांना पेन्शन योजना लागू नाही. आज या लोकांचे वय 80 ते 90 वर्षापर्यंत झालेले आहे. श्री.रांगणेकर नावाचे गृहस्थ या लोकांचे नेते आहेत. ते मागील 5-6 वर्षांपासून शासन दरबारी खेटे मारत आहेत. त्यामुळे शासनाने त्यांच्या प्रश्नाबाबत पॉझिटिव्ह ॲटिट्यूट ठेवून हा प्रश्न सोडवावा अशी मी शासनाला विनंती करतो.

उप सभापती : दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी या प्रश्नाबाबत आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वत: जातीने लक्ष घालावे आणि लवकरात लवकर किंवा पुढील अधिवेशनापूर्वी संबंधितांची एक बैठक बोलवून निर्णय घ्यावा असे मला वाटते. कारण हा प्रश्न खूप दिवसांपासून प्रलंबित राहिलेला आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबई मोटार वाहन कर (दुसरी सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. LXXIX OF 2010

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY MOTOR VEHICLES TAX ACT, 1958 AND MOTION FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE)

श्री.गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 79 मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, 1958 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधानपरिषदेसमोर मांडण्याची शिफारस केली आहे.

सभापती महोदय, सभागृहासमोर हे जे विधेयक सादर करण्यात आलेले आहे. त्यामध्ये वेल्फेअर फोरम, केंद्र सरकार व इतर याचिकेच्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाने प्रदूषण करील तो कर भरेल अशी सावधगिरीची संकल्पना मांडण्यासंबंधी सूचना केली होती. त्याचप्रमाणे या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाने प्रदूषण करणा-या वाहनांच्या मालकांना जबाबदार धरण्यात यावे असे सूचित केले होते. या दोन्ही सूचनांबाबत शासनाने लाल समिती गठित केली होती. लाल समितीच्या सूचना, सर्वोच्च न्यायालयाची मार्गदर्शक तत्वे यांना अनुसरुन जी 15 वर्षांची जुनी झालेली वाहतुकेतर वाहने आहेत या वाहनांना 15 वर्षानंतर 5 वर्षांचा एकत्रित प्रदूषण कर भरण्याची तरतूद केलेली आहे. त्याप्रमाणे 8 वर्षे झालेली वाहतूक करणारी जी जुनी वाहने आहेत, अशा वाहनांवर पर्यावरण कर लावण्याची तरतूद या विधेयकात केलेली आहे. आपल्याला कल्पना आहे की, 2000 पूर्वी जी वाहने उत्पादित होत होती त्यावेळी प्रदुषणाची मानके आजच्या तुलनेमध्ये बरीच उदार होती. परंतु आज आपण पाहतो की, नवीन वाहनांमधून पूर्वीच्या वाहनांपेक्षा कमी प्रदूषण होत आहे. म्हणून जुनी वाहने रस्त्यावरुन कमी व्हावीत किंवा त्यातून होणारे प्रदूषण कमी कसे करता येईल यादृष्टीने उपाययोजना कराव्यात. 1991 पूर्वी पेट्रालवर चालणाऱ्या वाहनांच्या

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर.....

तुलनेत 2005 नंतरच्या वाहनांमध्ये मोनोक्साईड कार्बनचे प्रमाण 9 ते 14 पटीने जास्त असल्याचे दिसून येते. या प्रदुषणामुळे नागरिकांचे जीवनमान अवघड झालेले आहे. लोकांना अनेक प्रकारच्या व्याधींना सामोरे जावे लागत आहे. या सगळया गोष्टींचा विचार करुन जुनी वाहने रस्त्यावरुन कमी व्हावीत किंवा या वाहनांपासून कर वसूल करुन, स्वच्छ इंधन असेल, प्रदूषण यंत्रणा सुधारण्यासाठी नियंत्रण करणे, सार्वजनिक व्यवस्था सक्षम करणे, वाहनांच्या उपकरणांची चाचणी करण्यासाठी आधुनिक केंद्रे उभारणे,.....

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे)

यानंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुलाबराव देवकर ....

अशा प्रकारच्या काही योजना आपण हाती घेत आहोत. म्हणून हे विधेयक या ठिकाणी सादर केलेले आहे. या विधेयकाला मान्यता द्यावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

तालिका सभापती : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी प्रस्ताव दिलेला आहे. त्यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही.)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 79, मुंबई मोटार वाहन कर (दुसरी सुधारणा) विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, परिवहन विभागाचे हे एक अतिशय महत्वाचे असे कर वसुली विधेयक आहे. परिवहन कर या नावाने हा नवीन कर वसूल होणार आहे. याबाबतीत तक्रार करावयाची नाही. हा कर लावणे आवश्यक आहे. या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाचा हवाला दिलेला आहे. सरकारला जेव्हा जाग येत नाही त्यावेळी न्यायालय सरकारला गदागदा हलविते आणि सरकारने काय करावे हे सांगते. अनेक गोष्टींबाबत न्यायालय सरकारला निर्देश देत असते. त्यामुळे आता न्यायालय सरकार चालवित आहे असे म्हटले जात आहे. सभापती महोदय, अशी परिस्थिती का निर्माण होते, सरकारला निर्देश देण्याची वेळ न्यायालयावर का येते, या प्रश्नांचा मंत्री महोदयांनी कधी गांभीर्याने विचार केला आहे काय ? ही बाब केवळ परिवहन खात्यापुरतीच मर्यादीत नाही. कर वसुलीच्या बाबतीत बोलायचे झाले तर परिवहन खाते प्रामाणिकपणे काम करते का ? परिवहन विभागाच्या अधिका-यांनी प्रामाणिकपणे कर वसुली केली पाहिजे. तशी वसुली केली जाते काय, कर वसुली केली जात नसेल तर त्याबाबतीत शासनाकडे तक्रारी आलेल्या आहेत काय ? मध्ये वर्तमानपत्रामध्ये अनेक बातम्या छापून आल्या होत्या.

सभापती महोदय, मला आपल्याला विनंती करावयाची आहे की, मी अतिशय गंभीर मुद्दा उपस्थित करणार आहे. तो मुद्दा आतंकवादाशी निगडित आहे. त्या मुद्याशी गृह विभागाचा संबंध असल्यामुळे माननीय गृहमंत्री सभागृहामध्ये हजर असणे आवश्यक आहे. कारण त्या मुद्याचे उत्तर परिवहन मंत्री देऊ शकणार नाहीत. गृहमंत्री महोदयांनाच त्या मुद्याचे उत्तर द्यावे लागेल. प्रकरण अत्यंत गंभीर आहे. कर वसुलीच्या बाबतीत मोठा हलगर्जीपणा झाला होता. त्यामुळे भ्रष्टाचार विरोधी पथकाने संभाजीनगर, ठाणे, पुणे येथील परिवहन विभागाच्या विविध कार्यालयावर धडाधड धाडी टाकल्या. भ्रष्टाचार विरोधी पथक सापळा रचते आणि त्यानंतर धाडी टाकल्या जातात. त्या प्रमाणे सापळा रचून भराभर धाडी टाकण्यात आल्या. या धाडी का पडल्या हे काही कळायला मार्ग नव्हता. परिवहन विभागाचे रेकॉर्ड कार्यालयातच असते ना ? तेव्हा अशा धडाधड धाडी पडाव्यात

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

असे काय घडले याचे विश्लेषण मंत्री महोदयांनी करावे. या प्रकरणी परिवहन विभागाच्या आयुक्तांनी आणि सचिवांनी गृह खात्याच्या सचिवांना जाब विचारला होता काय, या धाडीमध्ये कोणत्या कर्मचा-याला वा अधिका-याला अटक करण्यात आली होती काय, गृह खात्यातील कोणाला तरी हाताशी धरुन ह्या धाडी टाकण्यात आल्या होत्या काय, कुणाच्या दबावाखाली या धाडी टाकल्या होत्या काय ? या परिवहन खात्यामध्ये वाहनांचे रजिस्ट्रेशन होते या पलिकडे या खात्यामध्ये काय चालते हे सर्वसामान्य लोकांना कधी कळत नाही. धाडी पडल्यानंतर या ठिकाणी फार मोठे काही चालू आहे अशा प्रकारचे वातावरण निर्माण झाले.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

वृत्तपत्रामध्ये बातमी छापून आली. परिवहन आयुक्तांनी चौकशीचे आदेश दिले. तेथील कारभार बरोबर चालत नाही. नंतर त्रिसदस्यीय समिती नेमली त्याबाबतही वृत्तपत्रात बातमी छापून आली. त्रिसदस्यीय समिती मौजमजा करुन निघून गेली. परिवहन आयुक्त हे सर्वोच्च पद आहे. त्या खात्याचा सर्व कारभार आयुक्त पाहतात आणि धोरणात्मक भूमिका सचिव पार पाडतात. परिवहन आयुक्त खात्याच्या सर्व कारभाराला जबाबदार असतात. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर या कायद्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी परिवहन आयुक्तांची आहे. ते पद आयएएस दर्जाचे आहे. उच्च पदस्थ अधिकाऱ्यांना तेथे कारभार व्यवस्थितरित्या चालत नाही म्हणून जावे लागले. त्यांना काही गैर आढळले म्हणून समिती नेमली. तेथील अधिकारी एवढे ताकदवान आहेत की, त्यांनी समितीला गुंडाळून ठेवले. त्या समितीचा अहवाल आला नाही. मी अहवालाबाबत भाष्य करणार नाही. कारभार कसा चालला आहे त्या संदर्भातील भाग महत्वाचा आहे. ती धाड कशाकरिता टाकण्यात आली? धाड का पडली याचा शोध घेतल्यानंतर असे लक्षात आले की, या परिवहन खात्यामध्ये काहीतरी गंभीर घडले असले पाहिजे. अन्यथा पोलीस खाते मागे लागले नसते. इतकी वर्षे मी त्या भागात समाजकार्य करीत आहे. खोलवर जाता जाता असे कळले की, या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिनांक 23 मार्च, 2010 रोजी तारांकित प्रश्न क्रमांक 6502 विचारला होता. प्रश्न काय होता? "बोगस नोंदणी झालेल्या 28 वाहनांचा वापर अतिरेकी कारवायांकरिता होऊ शकतो याबाबतचे पत्र केरळ राज्य सीआयडीने राज्य सीआयडीला दिले होते हे खरे आहे काय? घटना कर वसुलीची आहे. काय निर्माण झाले? दुचाकी वाहनांची बोगस नोंदणी केली आणि या वाहनांचा वापर अतिरेकी कारवायांकरिता होऊ शकते अशा प्रकारचे पत्र केरळ राज्याच्या सीआयडीने दिले हे खरे आहे काय?" शासनाने उत्तर काय दिले? तत्कालीन परिवहन मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिनांक 12.4.2010 रोजी उत्तर दिले. "होय, पत्र आले होते."

सभापती महोदय, दुसरा प्रश्न असा होता की, "असल्यास सदर विषयी अतिरिक्त पोलीस महासंचालक (गुप्तवार्ता) यांनी पोलीस आयुक्त, मुंबई यांना पत्र देऊन सूचना दिलेली होती हे खरे आहे काय?" या प्रश्नाचे उत्तर देताना मंत्रीमहोदयांनी "हे खरे आहे" असे म्हटले. हा गृह खात्याचा विषय आहे. परिवहन खात्याचा हा विषय नाही. ब्रिफिंग घेऊन त्या विभागाकडून जी माहिती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

मिळाली ती माहिती परिवहन मंत्र्यांनी उत्तरामध्ये दिली. नाही म्हणत असताना पुढे होय असे म्हटले आहे. पुढे म्हटले आहे की, "तथापि पोलीस महासंचालक (गुप्तवार्ता) यांनी आयुक्त, नवी मुंबई आणि पोलीस अधीक्षक, रायगड या संबंधितांना कळविले होते." म्हणजे कुठेतरी पाणी मुरते आहे. तुमच्या उत्तरात नाही म्हणायचे आणि मग हळूच सांगून टाकायचे. उत्तर तुमचेच आहे.

तिसरा प्रश्न असा होता की, असल्यास, सदर गंभीर सूचनेच्या आधारे मुंबई पोलिसांनी या संदर्भात कोणती कारवाई केली, ती निदर्शनास आली आहे का? या प्रश्नाचे उत्तर असे दिले की, पोलीस अधीक्षक, रायगड यांनी पेण पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर नोंद क्रमांक 55/2009 अंतर्गत आयपीसी संहिता कलम 465, 467, 468, 470, 471, 472, 420 आणि कलम 120 (ब) नुसार कारवाई केली आहे. गंभीर गुन्हा कुठे घडला? कलम 120(ब) लावण्यात आले त्या अर्थी कटकारस्थान करणे. या कलमांतर्गत गुन्हा दाखल केला असून या प्रकरणी आठ आरोपींना अटक केली आहे. सदर गुन्ह्याचा तपास सीआयडी करीत आहे.

नंतर 3पी.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

त्यात पुढे असे म्हटले आहे की, ज्या अधिकाऱ्यांनी खोट्या कागदपत्रांच्या आधारे नोंदणी करुन शासनाचा कोट्यवधी रुपयाचा महसूल बुडविला आणि त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे त्या अधिकाऱ्यांवर शासन मोक्का अंतर्गत कारवाई करणार आहे काय ? त्याला उत्तर दिलेले आहे की, प्रस्तुत प्रकरण न्यायप्रविष्ट असून याबाबत सीआयडीमार्फत चौकशी सुरु आहे. परंतु न्यायालयात काय काय घडले आणि आता शासन त्याबाबत नक्की काय करणार आहे याचा खुलासा होणे आवश्यक आहे. एक गंभीर घटना अशी आहे की, या राज्यात अशाच प्रकारे नोंदणी केलेल्या 700 हाय स्पीडच्या इम्पोर्टेड बाईक आल्या असून ही नोंदणी मुंबई आणि रायगडमध्ये झालेली आहे. यासंबंधी गेल्या वर्षभरात शासनाने मात्र कोणतीच कारवाई केलेली दिसत नाही. आम्ही विरोधी पक्षात राहून शासनाचे वाभाडे काढतो पण आता आपले लोक सुध्दा प्रश्न विचारु लागले आहेत. कारण देशाच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या अधिवेशनातच 12242 क्रमांकाचा हा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. हुसैन दलवाई यांनी विचारलेला आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, पेण, जि. रायगड व मुंबई येथील अंधेरी या उप नगरात परदेशातून आलेल्या वाहनांची नोंदणी केली आहे. तसेच शासनाचा करही बुडविलेला आहे. या कराची वसुली ताबडतोब झालेली नाही, हे खरे आहे काय ? वास्तविक कोर्टाच्या निर्णयानुसारच हे उदयास आलेले आहे. पहिला प्रश्न आतंकवाद्यांशी संबंधित असून अशा प्रकारे कर वसुलीमध्ये टाळाटाळ होत असेल तर या प्रकरणी केलेल्या चौकशीबाबतची माहिती सुध्दा सभागृहात द्यावे लागेल. तसेच या प्रश्नाला काय उत्तर दिले आहे यासंबंधीची चर्चा सभागृहात झाल्यानंतर त्यांना उत्तर पाठवावे लागेल, अन्यथा हा प्रश्न स्थगित ठेवावा लागेल. एकाच प्रकरणात सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी पोलीस खात्याशी संबंधित मुद्दा मांडला असे पोलिसांचे म्हणणे आहे. तसेच सन्माननीय सदस्य श्री. हुसैन दलवाई यांनी आपल्या प्रश्नात शासनाने या अनुषंगाने काय कारवाई केली असा प्रश्न विचारलेला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

या मोटर सायकलवरील किती कर चुकवला गेला आहे याची मी माहिती देणार आहे. या सर्व मोटारसायकली प्रथम कलकत्त्यामध्ये आल्या, तेथून त्या मोटरसायकल्स मारुती ट्रेडर्स डिस्ट्रीब्यूशन कंपनीकडून मुंबईत आणल्या गेल्या व तेथून त्या रजिस्ट्रेशनसाठी पेणला पाठविल्या गेल्या. मोटरसायकलचे सर्व सुटे पार्ट आणण्यात आले होते परंतु या सुटे पार्टचे रजिस्ट्रेशन केलेच जात नाही. रजिस्ट्रेशन केवळ असेम्बल वाहनाचेच होत असते व रजिस्ट्रेशन झाल्यानंतरच वाहनाला नंबर मिळत असतो. या मोटरसायकलचे सुटे पार्ट केवळ 1 ते 10 हजार रुपयांमध्ये आणले गेले होते. नॉमिनल किमंत देऊन हे पार्ट आणण्यात आले होते. परंतु एका दुचाकीची खरी किंमत 10 लाख ते 15 लाखापर्यंतची होती. दुचाकीचे पार्ट आणून त्याची नोंदणी करण्यात आली. या ज्या दुचाकी होत्या त्या सर्व इम्पोर्टेड होत्या. इम्पोर्टेड मालावर एक्साईज, कस्टम, ऑक्ट्रॉय भरावा लागता असतो परंतु या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा टॅक्स भरला गेला नाही. या इम्पोर्टेड दुचाकीच्या संदर्भातील माहिती लोकमत दैनिकामध्ये नेहमी देण्यात येत होती. खरे म्हणजे या दैनिकाला धन्यवादच दिले पाहिजे. लोकमत दैनिकाने इम्पोर्टेड दुचाकीची मालिकाच सुरु केली होती. लोकमत दैनिकाच्या इम्पोर्टेड दुचाकीच्या मालिकेवरुन उच्च न्यायालयाच्या जज्सने सुमोटो जनहित याचिका दाखल केली होती. मराठी माणूस असल्यावर कसा फायदा होतो हे आपल्याला यावरुन दिसून येईल. या पीआयएल मध्ये म्हटले आहे की, "The Editor of 'Lokmat' Newspaper-Petitioner V/s Maharashtra State Road Transport Officers-Respondents" सभापती महोदय, आतापर्यंत पत्रावरुन पीआयएल दाखल केल्याचे माझ्या ऐकिवात होते परंतु वर्तमानपत्रातील माहितीवरुन पीआयएल दाखल केल्याचे माझ्या तरी पाहण्यातील हे पहिलेच उदाहरण आहे. यामध्ये जो फायनांशिअल लॉसेस झालेले आहेत त्याबाबत उच्च न्यायालयाने आपल्या पीआयएलमध्ये असे म्हटले आहे की, "....the average value of the vehicles is shown at Rs. 1 lakh as against the reported value of each vehicle in the range of Rs. 7 to 14 lakhs by the Directorate of Revenue Intelligence. The rate of motor vehicle tax for imported motor bike is 7% and

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

therefore each vehicle should have fetched on an average Rs. 70,000 to Rs. 80,000 motor vehicle tax. While the actual receipt of tax per vehicle does not exceed Rs. 7000 to Rs. 10,000" खरे म्हणजे प्रत्येक दुचाकीच्या मागे 70 ते 80 हजार रुपये टॅक्स भरावयास पाहिजे होता. परंतु तसे मात्र झालेले नाही. "...I further submit that the loss of motor vehicle tax along with the interest would work out to be around Rs. 5 to Rs. 6 crores." या सर्व प्रकरणामध्ये शासनाचे 5 ते 6 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात जे प्रतिज्ञापत्र दिलेले आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की,"....Central Governments have suffered huge losses in regard to motor vehicle tax (Rs. 5 to 6 crores estimated), custom duty (Rs. 40 to 50 Crores estimated.) I further submit that losses if any on account of Sales tax, octroi, etc. will have to be separately worked out as could be revealed after thorough investigations by the Crime Investigation Department." यातील कलम 120 (बी) कटकारस्थान करणे हा सर्वात महत्वाचा आहे. तो या ठिक्राणी लावण्यात आला आहे.

सभापती महोदय, दिनांक 14 सप्टेंबर, 2009 रोजी श्री.संगीतराव, सचिव, परिवहन विभाग यांनी सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. म्हणजे विभागाची खात्री झाली आहे की, असे प्रकार होतात. त्यास आता एक वर्ष झालेले आहे. त्यानंतर रायगड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री.प्रताप दिगांवकर यांनी तत्कालीन परिवहन आयुक्त श्री.दीपक कपूर यांना दिनांक 18 मे, 2009 रोजी पत्र लिहिले. त्या पत्रामध्ये पुढीलप्रमाणे उल्लेख आहे... "It also transpires in the investigation that approximately 400-450 vehicles have been registered on the basis of bogus and forged documents by the active racket. Also according to the facts disclosed during investigation there is wide possibility of direct/indirect involvement of the officers and staff of Dy. R.T.O. Pen Office. So it is requested to conduct thorough legal enquiry in this regard at your level. During enquiry, if you find any bogus and forged documents are used for the registration purpose, then please lodge F.I.R. against concerned persons at your level." त्यांनी आयुक्तांना लिहिले आहे की, या सर्व प्रकरणाची चौकशी करुन माझ्याकडे तक्रार नोंदवावी. त्यानंतर श्री.डिगीकर यांनी दिनांक 4 जून रोजी पोलीस आयुक्त, परिवहन यांना मराठी भाषेत पत्र लिहिले. ते संपूर्ण पत्र वाचण्यासारखे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

परिवहन आयुक्तांनी ते नजरेखालून घालणे आवश्यक आहे. त्या पत्रामध्ये असा उल्लेख आहे की, ".....एका आरोपीने या गुन्हयातील 15 हायस्पीड मोटार बाईक पेण, आर.टी.ओ.कार्यालयात नोंदविण्यासाठी त्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्याशी आर्थिक देवाण घेवाण केली होती. तसेच या गुन्ह्यातील 15 मोटार सुपर बाईकची नोंदणी करताना त्या पेण येथे आणल्या नव्हत्या. ज्यांच्या नावावर सदर गाड्यां रजिस्ट्रर्ड करण्यात आल्या त्या व्यक्ती देखील हजर नव्हत्या,

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

पोलीस अधीक्षक पुढे असे म्हणतात की, " यातील अटक केलेला आरापी इम्रान चव्हाण व नादर अली हे दोघेही परदेशातील यामाह, होंडा सुझुकी या कंपन्याच्या मोटार बाईकचे सुटे पार्ट आयात करुन त्यावर कमी कस्टम डयुटी भरुन ते मुंबई येथे आणून त्याची बांधणी करुन बेकायदेशीर मोटार बाईक तयार करुन फरारी आरोपी झकीर पटेल यांच्याकडून बनावट कागदपत्रे आर.टी.ओ. कार्यालयात सादर करुन त्याची नोंदणी करुन घेऊन गि-हाईकांना विकत असत." आरटीओ पेण कार्यालयातील नोंदणी करणारे अधिकारी व कर्मचारी यांनी अशा मोटार बाईकची नोंदणी करुन घेतांना आरोपीनी सादर केलेल्या कागदपत्रांची खात्री करुन घेऊन नंतर सदर गाडयांची नोंदणी करणे गरजेचे होते . कटकारस्थानात दाखल होणे यासबंधीचे कलम क्रमांक 120 ब असून तो भाग मी आपल्याला वाचून दाखवत आहे. सभापती महोदय, अशा प्रकारचा गुन्हा घडत असतांना पेण आर.टी.ओ. कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी आवश्यक ती दक्षता घेतली नसून कर्तव्यात हलगर्जीपणा केल्याचा आरोप केलेला आहे.अशा पध्दतीचा गुन्हे करण्यासाठी संधी प्राप्त करुन दिली आहे, असे स्वत: डिगीकर यांनी आयुक्तांना पत्र दिले होते, त्या पत्राची प्रत पोंलीस महासंचालक, आयुक्त गुप्त वार्ता विभाग, विशेष पोलीस निरीक्षक कोकण विभाग,सचिव, परिवहन विभाग, मंत्रालय इत्यादींना पाठविली आहे.ते पत्र सर्वोच्च न्यायालयाला सादर केलेल्या कागदपत्रामध्ये जोडण्यात आले आहे.आतंकवादाचा संशय पोलिसांना का आला असेल या बाबत मी विचार करीत होतो.परदेशातून मोटार बाईक आल्या आणि त्या कोणी तरी खरेदी केल्या होत्या परंतु ते सर्वच व्यवहार खोटे आहेत.700 मोटार बाईकच्या व्यवहारामध्ये कोणाचेही पत्ते मिळत नाही.स्थानिक पत्ते देण्यात आले होते त्या पत्यावर पोलीस गेले असतांना त्या व्यक्ती तेथे राहत नसल्याचे त्यांना आढळून आले होते. मूळ पत्ता देशातील अनेक राज्यातील अनेक गावांचा देण्यात आला आहे. हायस्पीड मोटार बाईक रजिस्टर झाल्या आहेत म्हणजे या गाडया येथे आल्या ही गोष्ट खरी आहे.परंतु पेण कार्यालयात मात्र कधीच आल्या नाहीत फक्त कागदोपत्री त्या आल्याचे दाखविण्यात आले होते व कागदोपत्री फक्त शिक्का मारला जात होता. या मोटार बाईकची नोंदणी करण्याकरिता महाराष्ट्र राज्याचीच नोंदणी का केली होती असा मला प्रश्न पडला आहे. देशामध्ये इतर राज्ये असतांना त्या राज्याची निवड त्यांनी केली नाही.त्यांनी महाराष्ट्र राज्याची निवड का केली होती ? याचा शोध पोलीस घेतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

या ठिकाणी मी आपल्याला नावे वाचून दाखवतो त्याप्रमाणे सय्यद महंमद अमीर, शमसुद्दीन जाल हुसेन,दाऊद दस्तगीर पटेल,अब्बास निहाल अब्बास, सुरजीत दास,समीर अहमद, मुस्ताकअली मकरंद, इमरत उर्फ बबलू, या बबलुच्या नावाचा चार पाच एन्ट्रीज आहेत.त्याचबरोबर राहूल सुरेश, झरी पोरबंदरवाला, मोर्या एन्टरप्रायझेस, राजू शेख इत्यादी नावे त्या यादीमध्ये आहेत.ही सगळी नावे वाचल्यानंतर पोलिसांना संशय का आला असेल ? त्यांनी असे म्हटले आहे की, एवढया हाय स्पीड डिझेल मोटार बाईक आल्या परंतु त्या संपूर्ण देशात त्या कोणत्या ठिकाणी गेल्या हे कोणीही पाहिलेले नाही. आर.टी.ओ. कार्यालयातील एकाही कर्मचा-याने एकही मोटार बाईक पाहिलेली नाही 50 लाखाची मोटार बाईक आल्यानंतर त्यावर बसून तर बघू असेही त्यांना वाटले नाही.या गाडीला कीक मारल्यानंतर ती 50 च्या वेगाने रस्त्यावरुन चालावयास लागेल. या मोटार बाईक आणणा-यांची आणि नेणा-यांची नावेसुध्दा मी नंतर सांगणार आहे.

नंतर श्री.सरफरे`

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे उच्च न्यायालयामध्ये जे पत्र दाखल झाले आहे हे पत्र सचिवांनी लिहिले असून त्यांच्या पत्रामधील मजकूर आपणास वाचून दाखवितो. "प्रति, परिवहन आयुक्त, प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई - पश्चिम येथील आयात दुचाकी वाहनांच्या नोंदणीसंदर्भात ही वाहने निश्चितपणे भारतातील इतर राज्यांमध्ये सुध्दा विकली गेली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. ही शक्यता लक्षात घेता प्रस्तुत प्रकरणी सीमा शुल्क विभाग या केंद्र शासनाच्या विभागाचा देखील संबंध येत असल्याकारणाने हा तपास केंद्रीय गुप्तचर विभागाकडे देण्यात यावा असे वाटते." ही सर्व बाब आपण सी.बी.आय.कडे द्यावी असे सचिवांनी या पत्रामध्ये परिवहन आयुक्तांना लिहिले आहे. हा इंटरस्टेट गुन्हा निर्माण झाल्यामुळे यामध्ये हिंदुस्थानचा संबंध आहे. ही बाब आपल्या खात्यापुरती मर्यादित नाही. ही केस कोर्टामध्ये दाखल झाल्यानंतर माहितीच्या अधिकाराखाली ही सर्व पत्रे कोर्टाकडून आपल्याला मिळविता येतात. सभापती महोदय, या माहितीमध्ये नवीन काही नाही. माझ्याकडे कोर्ट मार्शल आणि आर.के.धवन, मीरा वर्मा यांच्या संदर्भात उच्च न्यायालयाने दिलेल्या ऑर्डरमध्ये म्हटले आहे. या मांडण्यात आलेल्या विधेयकावरुन हे सरकार उच्च न्यायालयाचा खूप आदर करीत आहे हे आपण बघितले आहे. यात असे म्हंटले आहे की,"Upon hearing counsel the Court made the following Order.'We are told that pursuant to the Order passed by the High Court, the Petitioners had been placed under suspension'....."

सभापती महोदय, मला हे समजत नाही की, सकाळी आमच्या नामदार श्री.लक्ष्मणराव ढोबळे साहेबांनी व नामदार श्री. रणजित कांबळे साहेबांनी तुमचा "आदर्श" तरी गिरवायचा? "आदर्श" हा शब्द आता लोकप्रिय झाला आहे. दोन हजार, पाच हजार वर्षापूर्वी या शब्दाला किती तरी मोठा मान होता. आपले सरकार किती कर्तृत्ववान आहे. त्यांनी या "आदर्श" शब्दाचा पार बट्टयाबोळ करुन टाकला आहे. आता आदर्श बोलायला भिती वाटते. मी साधे शर्टावर "आदर्श" लिहिले तर मला सभागृहाबाहेर काढण्यात आले. तुम्ही आपली कातडी वाचविण्याकरिता त्यांचे निलंबन केले. तेव्हा हे चार-पाच अधिकारी सुप्रिम कोर्टामध्ये गेले. मी त्यांच्या वकिलांची नावे सांगितली तर माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील त्यांची एका तासाची फी किती आहे हे सांगतील. त्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले की, "We are told that pursuant to the Order passed by the High Court, the

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ D/ KTG/ MMP/

श्री. दिवाकर रावते .....

Petitioners had been placed under suspension. The learned counsel submits that order was passed pursuant to the High Court Order, and the High Court had not heard the Petitioners....." एवढे सर्व ऐकल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्यावर कारवाई करण्यास सांगितले. परंतु तुम्ही त्यांना निलंबित केले. त्याविरुध्द आपले कर्मचारी सुप्रिम कोर्टामध्ये गेले होते. त्यामध्ये अब्दूल, करीम, मसूद वगैरे हे सर्व बाहेरचे लोक आहेत. हे मराठी नाहीत व कोकणी देखील नाहीत. ते जर मराठी बोलले असते तर मला आनंद झाला असता. ते जर कोकणी असते तर मराठी बोलले असते. यात पुढे असे म्हटले आहे की, "...The petitioners would be at liberty to approach the High Court in the pending matter...."

(माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई "ते कुठले आहेत" असे बसून म्हणतात)

त्यापैकी काही दुबईमध्ये आहेत. हे अधिकृतपणे रेकॉर्डवर आहे म्हणून सांगत आहे. हा आतंकवादाचा विषय मी पुढे मांडणार आहे. यामध्ये एक दुबईमधील आहे व तो सापडत नाही. ही गंमतीची गोष्ट नाही. हिंदुस्थानातील या मातीवर प्रेम करणाऱ्या सर्व मुसलमानांवर माझे प्रेम आहे. याचे कारण ते आमचे भारतीय आहेत. परंतु इथे रहाणारे आणि या मातीशी बेईमानी करणारेही आहेत, या मातीशी गद्दारी करणाऱ्यांना कापून काढले पाहिजे या मताशी तुम्ही आणि मी आपण दोघेही सहमत आहोत.

(माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई "ते हिंदू असले तरीसुध्दा" असे बसून म्हणतात.)

तुम्ही मला मुसलमानांबद्दल प्रश्न विचारला, ते कुठले आहेत? मी हिंदू-मुसलमानांबद्दल विषयसुध्दा काढला नाही. तुम्ही पटकन विषय कशाला काढला? त्यापैकी एक दुबईत गेला. म्हणून मी सांगितले की, या देशामध्ये राहणारा मुसलमान जो या देशावर प्रेम करतो, तो माझा भारतीय आहे त्याच्यावर माझे प्रेम आहे.

(यानंतर श्री. बरवड)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंदी

श्री.दिवाकर रावते ....

या देशामध्ये राहणारा मग कोणीही असो, जो या देशाशी बेईमानी करतो त्याला कापून काढले पाहिजे असे तुमचे आणि आमचे मत आहे. तुम्ही गांधीवादी असाल तर उभे राहून म्हणाल की, नको नको, त्याला तुरुंगात टाकू.

सभापती महोदय, यामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "The Petitioners would be at liberty to approach the High Court in the pending matter and the High Court may give reasonable opportunity of being heard. We vacate the interim order passed by this Court on 14.9.2009 and direct the investigation be carried on by the police...." सुप्रीम कोर्टाने सांगितले की, आम्ही यांना दिलेले इंटेरिम काढून टाकतो. उच्च न्यायालयाने हे बघावे असे सर्वोच्च न्यायालय म्हणते. त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, "...direct the investigation be carried on by the police and the department in accordance with law." हे प्रकरण वाचल्यानंतर उच्च न्यायालयाला सुध्दा असे वाटले की, हे आपल्या हाताबाहेरचे काम आहे, यांना तिकडेच जाऊ द्या आणि हे सर्वोच्च न्यायालयाला पाहू द्या.

श्री. सचिन अहिर : आपण हे सगळे इंग्रजीमध्ये वाचत आहात.

श्री. दिवाकर रावते : आपण कोर्टात जे काही कराल ते माहितीच्या अधिकारामध्ये मिळते. कारण ते ओपन डॉक्युमेंट आहे. कोर्टातील डॉक्युमेंट नसेल तर ते मिळणे कठीण जातें. सरकारकडून एखादी माहिती मिळविणे हे फारच कठीण आहे. काही तरी कारणे सांगतील.

श्री. सचिन अहिर : मी माझे शब्द मागे घेतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझ्या हातामध्ये महादेव आदिशप्पा गुंडेवाडी ॲडिशनल एस.पी. ऑफ पोलीस, क्राईम इन्व्हेस्टीगेशन डिपार्टमेंट, एमएस, कोकण भवन, नवी मुंबई यांचे उच्च न्यायालयामध्ये केलेले प्रतिज्ञापत्र आहे. हे प्रतिज्ञापत्र त्यांनी 15 एप्रिल, 2010 रोजी केलेले आहे. आपल्या सरकारचे सगळे म्हणणे काढत काढत मी डिसेंबर पर्यंत, तुमच्यापर्यंत येणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांचा असा प्रश्न आहे की, एक वर्ष झाले, काय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/DD/ MMP/

श्री.दिवाकर रावते ....

करता ? म्हणून मी हे सगळे सांगत आहे.

सभापती महोदय, "The Editor, Lokmat Vs. The State of Maharashtra & Others." या प्रकरणामध्ये त्यांनी जे प्रतिज्ञापत्र केले ते मी सगळे वाचत नाही. यामागचा जो खरा सूत्रधार आहे त्याबद्दल यामध्ये असे म्हटले आहे की, "I say and submit that I verified the witness statements recorded by my predecessor. I also conducted enquiries with the accused who were on bail as well as witnesses to find out the whereabouts of the other accused. I arrested wanted accused namely Sameer Quasm Daitar on १९.०३.२०१० and was produced before Judicial Magistrate First Class, Pen and was remanded." त्यानंतर असे म्हटले आहे की, "In his statement he has disclosed that he used to receive the illegal gratification to be paid to RTO officers as well as papers for the registration of Super Bikes either directly from wanted Nadir Qazim Haji Akbar Ali or sometimes through the accused Imran Chauhan (arrested and is on bail). Based on the disclosures made in his interrogation I have examined the following witnesses and recorded their statements :" यामध्ये कोण आहेत ?

"(i) Shri Mahesh Sudhakar Pore : He is working as an agent in RTO office, Pen...

(ii) Shri Sanjay Hiraman Koli : He is working as an agent in RTO office, Pen..."

मी एक प्रश्न विचारला की, कलकत्ता येथून इथपर्यंत पेणलाच रजिस्ट्रेशन करण्याचे कारण काय ? या ठिकाणी सर्व देण्यासाठी या ठिकाणी एजंट होते. तिकडे असे करत नसतील. यामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "The statements of these witnesses have confirmed the revelations made by Sameer Daitar that the officers at office of the Dy RTO,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/DD/ MMP/

Shri Divakar Ravte contd....

Pen viz. Shri Kharmate Dy. RTO, Shri Thanekar MV Inspector, Shri Shejwal MV Inspector and Shri Abba Patil were regularly paid illegal gratification other than legal remuneration for processing the papers of imported Super Bikes. They were handing over the papers as well as the illegal gratification to the RTO officers. It is further disclosed from the statements of the arrested accused Sameer Daitar and the witnesses that none of the applicants mentioned on the application form for the registration of Super Bikes were present before the RTO officers at the time registration nor the Super Bikes were brought to RTO offices for inspection."

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सर्व कागदावर आहे. त्यात पुढे असे म्हटले आहे की, "This is in absolute contravention to the mandatory provisions of M V Act. In order to strengthen the evidence the statement of Shri Mahesh Pore has been recorded before Judicial Magistrate First Class, Pen under the provisions of section १६४ Cr.P.C." त्यात पुढे असे म्हटले आहे की, "I say and submit that arrested accused Sameer Daitar was interrogated specifically to know the perpetrator /source of the forged documents used for the registration of Super Bikes. He disclosed that the wanted accused Zakir Hussein Patel and Nadir Ali used to hand over to him the said documents. This is in conformity with the disclosures made by one of the arrested accused Shahid Hussein Mirza who had pointed out that it was Zakir Hussein Patel who used to prepare the forged documents for the registration of Super Bikes."

"I say and submit that during the course of investigation on 08/04/2010 the wanted accused Mohammad Tajjudin Choudhary was arrested." महंमद चौधरी ही नावे वाचण्यासारखी आहेत. त्यात पुढे असे म्हटले आहे की, "His interrogation disclosed that he used to import the spare parts of Super bikes through one Prashant Shah from Kolkatta port. The clearing and forwarding agent M/s. P.G. Modak & Sons, Kolkatta has cleared the Cargo of the Super bikes (the spare parts) and were sent to Maharashtra Motors through Maruti Courier. Shri Mohammad Choudhary who is the proprietor of the Maharashtra Motors.....". त्यात पुढे असे म्हटले आहे की, "I say and submit that in all two accused in this case are absconding namely

(i) Nader Kazim Haji Ali Akbar.

(ii) Zakir Hussein Patel.

It is learnt that the accused Zakir Patel is reported to be hiding in India....."

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.दिवाकर रावते.....

सर्वात हे महत्त्वाचे आहे. त्यांचा ठावठिकाणा नाही. त्यात पुढे असे म्हटले आहे की, "...whereas it is confirmed from Dy. Commissioner of Police, Immigration, Hyderabad that the accused Nader Kazim Haji Ali Akbar has left India on 02.03.2009 for Dubai." ते पळाले आहेत. ॲडिशनल पोलीस आयुक्त यांनी हायकोर्टात लेखी ॲफिडेव्हिट दिलेले आहे. तो वर्षभर दुबईत पळाला आहे. त्यात पुढे असे म्हटले आहे की, "As such a Non Bailable Standing Warrant of arrest against him has been obtained from Judicial Magistrate First Class." हे आंतरराष्ट्रीय काम आहे. सध्या हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयामध्ये आहे.

यानंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

माझ्याकडे अवर सचिव, गृह विभाग, मंत्रालय यांना लिहिलेले पत्र आहे.

तालिका सभापती : कामकाज संपेपर्यन्त सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभागृहाची वेळ वाढविल्याबद्दल धन्यवाद. सभापती महोदय, अवर सचिव, गृह विभाग मंत्रालय यांना लिहिलेल्या पत्रामध्ये फिर्यादींची नावे दिलेली आहेत ती वाचण्यासारखी आहेत. इम्रान उर्फ बबलू इक्बाल चौहान, शैलेश दत्तात्रेय रेडीज, शाहीद हुसेन मिर्झा, जुल्फीकार अब्दुल रशिद खान, गुड्डू उर्फ तौफिक अब्दुलरशिद कुरेशी, जॉनी मार्शल परेरा, मुसा इब्राहीम शेख, नादीर अली, जाकीर पटेल अशी नावे आहेत. ही सगळी नावे काय सांगतात ? या पत्रामध्ये असे लिहिलेले आहे की, श्री. मोरे, पोलीस उपनिरीक्षक, रायगड यांनी अवर सचिव, गृह विभाग मंत्रालय, यांना हे पत्र लिहिलेले आहे. मी सर्व पत्र वाचून सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. मी फक्त त्यातील महत्वाचे मुद्दे वाचतो. पत्रामध्ये असे नमूद केलेले आहे की. "या गुन्ह्याच्या तपासकामी पाहिजे असलेले आरोपी नादीर काझीम हजी अकबर उर्फ नादीर अली याची माहिती घेतली असता तो भारतातून परदेशात हैद्राबाद एअरपोर्ट येथून गेला असल्याचे दिल्ली सी.एफ.बी. यांच्याकडून समजल्याने, हैद्राबाद एअरपोर्टकडे पत्र पाठवून तो नक्की कोणत्या देशात गेलेला आहे याची माहिती काढून त्याच्या विरुध्द रेडकॉर्नर नोटीस काढण्याची तजवीज ठेवलेली आहे. बोगस नावाने नोंदणी केलेल्या मोटारबाईक संबंधी रेडकॉर्नर नोटीस काढण्यापर्यन्त आपल्या देशातील पोलिसांना जावे लागले. रायगडचे पोलीस उपनिरीक्षक श्री. मोरे यांचे हे पत्र आहे. हा गंमतीचा विषय नाही.

दुसरा आरोपी झाकीर हुसेन महंमद पटेल याचा पासपोर्ट क्रमांक जी 8648276 जन्म तारीख 7.11.1971, नॅशनॅलिटी इंडियन, हा ईके 506 या विमानाने दिनांक 11.11.2008 रोजी हिंदुस्थानात आल्याची नोंद असून त्याच्या प्रयाणाची नोंद नाही. तो कुठे गेला ते सापडत नाही. विमान सापडले, पासपोर्ट सापडला. पण तो कुठे गेला हे सापडत नाही. त्याची अद्यावत माहिती घेऊन पुढील तजवीज करीत आहोत. सदर गुन्ह्यातील मोटारवाहने रजिस्टर करताना पासपोर्टचा वापर करण्यात आलेला आहे. म्हणजे हे प्रकरण कुठे चालले आहे बघा. त्याबाबत माहिती काढली असता असे आढळून येते की, बहुतांश पासपोर्टधारकानी त्यांचा पासपोर्ट स्वत:हून वाहनाच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

रजिस्ट्रेशनसाठी दिलेला नसून त्यांच्या पासपोर्टचा कुणी तरी गैरवापर केल्याचे आढळून आले आहे. तसेच गुन्ह्याच्या तपासात असेही निष्पन्न झाले आहे की, मोटारवाहन रजिस्टर करताना दिलेले पत्ते खोटे असून त्या पत्त्यावर नमूद व्यक्ती राहातात नसल्याचे किंवा त्यापूर्वीही राहात होती असेही आढळून आले नाही व जे राहात ते आर्थिक दुर्बल घटकातील असून त्यांना असे वाहन खरेदी करणे शक्य नाही व त्यांनी असे वाहन खरेदी केलेले नाही. त्यांनी झोपडपट्टीचे पत्ते दिलेले आहेत. त्या पत्रामधे पुढे म्हटलेले आहे की, मोटार वाहनांचे रजिस्ट्रेशन करताना आरोपीने प्रथम विमा हप्ता रिसिट वापरलेली आहे. त्याबाबत माहिती घेतली असता 1) श्री. नलिन अरविंद ललित 2) श्री पुरुषोत्तम पंढरीनाथ मोरालकर 3) अविनाश शंकर देशमुख यांच्याकडे विचारपूस केली असता सदरहू गुन्ह्यातील आरोपीने रजिस्ट्रेशनसाठी सादर केलेली एफ.पी.आर. वरील विमा पॉलीसी नंबर बरोबर असून ज्याचे नावे विमा पॉलीस काढण्यात आलेली आहे ती व्यक्ती खोटी आहे, असे आढळून आलेले आहे. काही प्रतिज्ञापत्रे ती करणा-याचे नाव व स्वाक्षरी नसताना करण्यात आली असल्याचे दिसून येते. त्याबाबत व त्या प्रतिज्ञापत्रांच्या सत्यतेबाबत त्यांचा शोध घेतला. त्यांच्यापैकी 1) एसा.बी.कुरेश, नोटरी नंबर 885 यांनी 177 मोटार बाईकसाठी प्रतिज्ञापत्रे नोटरी केलेली आहेत.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

श्री.बी.एम.पाटील, नोटरी नं.4041 यांनी 30 मोटारबाईकसाठी प्रतिज्ञापत्र नोटरी करुन दिले. श्री.रमेशचंद्र तिवारी, नोटरी नं.3361 यांनी 21 मोटारबाईकसाठी प्रतिज्ञापत्र नोटरी करुन दिले. श्री.एम.बी.सोनावणे, नोटरी नं.516, श्री.ए.ए.खान, नोटरी नं.476 या दोघांनी प्रत्येकी 17 मोटारबाईकसाठी प्रतिज्ञापत्र नोटरी करुन दिल्याचे आढळून आले. यांचे रजिस्ट्रेशन रद्द केले का? सहा महिन्यात कोणती कारवाई केली हे सभागृहाला सांगितले पाहिजे. नोटरी म्हणजे सरकारचा शिक्का असतो. त्याचा दुरुपयोग केल्यानंतर इंडियन पिनल कोड अंतर्गत कोणती कारवाई केली हे सांगावे लागेल. शेवटी ही सर्व वकील मंडळी आहेत.

सभापती महोदय, सदर नोटरींनी नोटरी करुन देत असताना नोटरीचे कागदपत्रे आयडेंटीफाय करणारे वकील अवधेशकुमार यादव आणि रत्नाकर मिश्रा यांचे जबाब नोंदविण्यात आले आहेत. त्यांच्या सांगण्याप्रमाणे त्यांनी एकाही प्रतिज्ञापत्र करणाऱ्या इसमाला समक्ष पाहिलेले नाही. फक्त एजंटने आणून दिलेल्या कागदपत्रांवर त्यांनी स्वाक्षरी केली आहे. ही त्यांची नेहमीची प्रचलित पध्दत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच ही पध्दत कायदेशीर नसल्याचेही त्यांनी कबूल केले आहे. हा विषय येथपासून नोटरीपर्यंत आला. कसे चुकीचे चालले आहे ते मी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. पावत्यांवरील पॉलीसी नंबरप्रमाणे दुसरा खातेदार असून बनावट पावत्यांसाठी वापरलेला पावतीचा फॉर्मेट हा देखील खोटा असल्याचे समजून आले आहे. तसेच भोपतराव यांच्याकडून असे समजले होते की, ताडदेव येथील दमणवाला एजंट आयातीत सुपरबाईकच्या नोंदणीसाठी एक बंद पाकिट उपप्रादेशिक परिवहन अधिकारी श्री.खरमाटे यांना देत असे व ते पाकिट श्री.महेश पोरे यांच्यामार्फत पोच करीत असे. असे समजल्याने दमणवाला व पोरे यांच्याकडे चौकशी केली असता ते दोघेही या हकीगतीला दुजोरा देत नाहीत. अशाप्रकारचा अहवाल पोलीस उप अधीक्षक श्री.मोरे यांनी गृह विभागाच्या (परिवहन) अवर सचिवांकडे सादर केला. त्या पत्रात त्यांनी म्हटले आहे की, सुपर मोटार बाईकपैकी 442 आयातीत वाहनांची नोंदणी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे दिनांक 1.1.2007 पासून केलेली आहे. त्यामध्ये 351 मोटार वाहनासंबंधीची कागदपत्रे बनावट आहेत. वरीलप्रमाणे त्रुटी असून बहुसंख्य वाहने रायगड जिल्हयातील पनवेल तालुका परिसरात तात्पुरता पत्ता देऊन नोंदविण्यात आलेली आहेत व एवढ्या मोठ्या प्रमाणात आयातीत वाहनांची नोंदणी बनावट कागदपत्रांच्या आधारे होत असताना वर नमूद

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

वाहन निरीक्षक व नोंदणी प्राधिकाऱ्यांनी योग्य ती खबरदारी घेतल्याचे दिसून येत नाही. यामध्ये भ्रष्टाचार झाला असल्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून याबाबत त्यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे त्यांच्या आर्थिक व्यवहाराबाबत व मालमत्तेबाबत चौकशी होण्यासाठी चौकशी प्रस्तावित आहे. गृह विभागाच्या अवर सचिवांना लिहिल्यानंतर, दिनांक 4.1.2010 रोजी म्हणजे जानेवारीमध्ये हे पत्र लिहिल्यानंतर गृह सचिवांनी या संदर्भात कोणती कारवाई केली? संबंधितांची मालमत्ता तपासण्याबाबत श्री.महेश मोरे, पोलीस उपअधीक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, रायगड यांनी त्यांच्या पत्रात गृह विभागाच्या सचिवांना या संदर्भात स्पष्ट सूचना केलेली होती.

सभापती महोदय, "In the High Court of Judicature at Mumbai, Civil Appellate Side, PIL No. 159 of 2009" त्यामध्ये न्यायालयाचे जे आदेश आहेत ते संपूर्ण आदेश मी वाचणार नाही. तीन पानी आदेश आहेत. महत्वाचा भाग मी वाचून दाखवितो. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे.एस.भाटीया आणि न्यायमूर्ती एफ.आय.रिबेल्लो यांनी दिलेल्या आदेशातील महत्वाचा भाग मी वाचून दाखवितो. त्यात असे म्हटलें आहे की, "Similarly our attention is invited to para २१ of the affidavit wherein it is set out that the Director of Revenue Intelligence vide its report dated १.६.२००९ has confirmed that ९०% of bills of entries are false. The diary has been seized from the agent whose statement has been recorded under section १०८ of the Customs Act. Similar is the communication of २.५.२००९ addressed by Mr. J.P. Singh, Deputy Director of D.R.I. MZU Mumbai who was Secretary of State Transport and State Excise wherein it is pointed out that based on preliminary statement of Mr. Shivkumar Shetty, R.T.O. Agent was recorded under section १०८ which reveals that payment of bribes to various levels of officers at R.T.O. to get his work done and that he had also submitted in written notebook maintained by him with details of payments made to the Offices at R.T.O. Office.

...३/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

"Our attention is also invited to communication of ११.६.२००९ addressed to Transport Commissioner, Maharashtra State by the R.T.O. Konkan Region Thane which shows that from the report sent from the Director Revenue Intelligence, ३२ vehicles were registered and the bills of entry was for spare parts. ३५१ were based on forged bills of entries and ५० bills of entries were not available. Further in respect of ७५% of the vehicles, sales certificates were not enclosed and other details.

Considering this prima facie material, we are not satisfied with the averments made by the Investigating Officer that this amounts to irregularities."

नंतर 3वाय.1..

अप्रमाणित प्रत / प्रमाणित नाही

श्री. दिवाकर रावते .....

सभापती महोदय, हे सर्वोच्च न्यायाधीशांचे जज्मेंट असून त्यात त्यांनी असे रिमार्क्स मारलेले आहेत. अधिकाऱ्यांनी आपल्याला कितीही कागदपत्रे पुरविली तरी या प्रकरणाला सामोरे जाण्यासाठी काय करावयाचे आहे हे शासनानेच पहावे. परंतु केवळ माहितीसाठी म्हणून मी हे सायटेशन वाचून दाखविले.

श्री. गुलाबराव देवकर : महोदय, सन्माननीय सदस्यांनी अनेक चांगल्या सूचना केल्या असून त्यांचे स्वागतच करतो. आपण सभागृहात परिवहन करासंबंधीचे विधेयक सादर केलेले आहे. मला कदाचित सन्माननीय सदस्यांएवढे कायद्याचे ज्ञान नाही, तसेच त्यांचा या विभागाचा मंत्रीपदाचा अनुभव सुध्दा दांडगा आहे. त्यांनी आपल्या भाषणातून त्यांनी अत्यंत चांगल्या सूचना केलेल्या आहेत. ज्या 700 बाईक्स आपल्या राज्यात आलेल्या आहेत त्यांच्या स्पेअर पार्टच्या माध्यमातून, स्पेअर पार्टच्या नावाने जो कर चुकविण्यात आला आहे आणि हे प्रकरण सध्या सीआयडीकडे चौकशीसाठी सुपूर्द करण्यात आले आहे. आपण जरी या अनुषंगाने प्रश्न विचारले तरी यावर सभागृहात जास्त भाष्य करणे योग्य ठरणार नाही, काही ठराविक मुद्यांवरच बोलता येईल. म्हणून मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, आपण उपस्थित केलेल्या ठराविक मुद्यांच्या संदर्भातच सभागृहात आश्वासन देता येईल, अथवा जास्तीची माहिती हवी असेल तर ती माहिती सुध्दा मी देऊ शकतो. तसेच आपण ज्या ज्या सुधारणा सुचविल्या त्या देखील यामध्ये अंतर्भूत करण्याबाबत विचार करता येईल, कारण आपला या खात्याचा अनुभव चांगला असून त्याचा फायदा नक्कीच होईल.

श्री. दिवाकर रावते : महोदय, मी बऱ्याच वेळेपासून उभा असल्याने कदाचित मंत्री महोदयांच्या लक्षात आले असावे म्हणून मला दोन मिनिटे विश्रांती देण्यासाठी ते उभे राहिले, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. मंत्री महोदयांना या विभागाची माहिती नाही असे मी म्हणणार नाही पण त्यांच्याकडे हा विभाग नवीनच आहे, असे मला वाटते. प्रश्न असा आहे की, आतंकवाद्यांशी निगडित जी गोष्ट असेल ती गंभीर असते. कारण तशी पोलीस रेकॉर्डमध्ये नोंद आहे. मला कळते की मी हे वाचत आहे, आपल्यालाही ते कळते पण जनतेला यासंबंधीची माहिती नसते आणि या माध्यमातून जनतेला माहिती व्हावी, जनतेपर्यंत ही माहिती जावी म्हणून मी बोलत

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ D/ MMP/

श्री. दिवाकर रावते .....

आहे. लोकमत या दैनिकात यासंबंधी छापून आल्यानंतर गृह विभागाचे सचिव श्री. संगीतराव यांनी स्वत: म्हटले होते की, याप्रकरणी सीबीआय मार्फत चौकशी केली पाहिजे पण ती गोष्ट त्यांच्या अधिकारात नव्हती म्हणून झाले नाही. सुदैवाने हा विभाग आता माननीय मुख्यमंत्र्यांकडे आहे. तसेच माननीय मुख्यमंत्री हे राज्य स्वच्छ करण्यासाठी आलेले असल्याने मी एवढा वेळ हे मुद्दे मांडत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

आतंकवादाचा जेव्हा विषय येतो तेव्हा आपण सर्वांनी त्याचा विरोध केला पाहिजे. आतंकवादाच्या संदर्भात शासनाला मध्ये मध्ये चुकीची माहिती दिली जात असेल, बटन दाबत असेल तर ते योग्य नाही. माननीय मंत्रीमहोदयांना या विषयाचे ज्ञान असेलच असे काही नाही. परंतु आतंकवादाशी मुकाबला करतांना त्यामध्ये माझा मुलगा जर त्यामध्ये आढळला तरी मी माफ करणार नाही तर बाकीच्यांचे आपण काय घेऊन बसला आहात? आतंकवादाच्या विषयाच्या बाबतीत आप्त-स्वकीय असे न मानता त्याला रस्त्याला लावले पाहिजे. कळत नकळत आपल्या हातून गुन्हा घडला असेल , आतंकवादाशी काही संबंध नसेल परंतु पश्चाताप हा झालाच पाहिजे. ती बाब लक्षात घेऊन आपल्या खात्यावर सुड उगवता कामा नये परंतु आता तेच चालले आहे. आपण कोणाला मदत केली याची त्यांना माहितीही नसेल परंतु तो अधिकारी निलंबनाचा सूड घेऊन आपल्या खात्यातील लोकांवर सूड उगवत असेल तर ते गैर आहे. मी या खात्याचा मंत्री होतो. आपण कोणालाही विचारा मी कोणाच्याही बाबतीत असे कधी वागलो नाही. सभागृहात असतांना सुध्दा मी असे कधीच करीत नाही. परंतु आज जो विषय आहे तो फार गंभीर आहे. दुबईला पळालेला, ज्याच्या विरुध्द रेड अलर्ट नोटीस निघालेली आहे ती व्यक्ती काही साधी नाही. अशा व्यक्तीची फाईल रिइन्सेटकरिता आली असेल तर त्यावर सही करणा-यांनी त्यासंदर्भात विचार केला पाहिजे. या विषयाची जाणीव आपल्याला व्हावी यासाठी हे सर्व सांगावे लागत आहे. आपल्या हातून हे पाप होऊ नये यासाठी मी हे सांगत आहे. मंत्र्याकडे खालून फाईल आल्यानंतर मंत्रीमहोदय त्यावर सही करीत असतात. सर्व विषयाच्या संदर्भात मंत्र्यांना सर्व काही माहिती असते असे काही नाही. मी आपल्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, मी परिवहन खात्याचा मंत्री असतांना माझ्याकडे एक नस्ती आली होती त्या नस्तीवर एका व्यक्तीला रिइन्स्टेट करावे असे लिहिले होते. मी या ठिकाणी हे सर्व अधिकृतपणे सांगतो आहे. अतिशय महत्वाचा विषय असल्यामुळे मी हे सर्व बोलत आहे. माझ्याकडे जी फाईल आली होती त्या फाईलवर मुख्यमंत्री महोदयांनी असे लिहिले होते की, "संबंधित इसमाचा पुनर्रविचार अजिबात करण्यात येऊ नये". मुख्य सचिवांनीही त्यावर सदर इसमास कधीही, कोणीही रिइन्स्टेट करण्याचा विचारही करु नये असे लिहिले होते. तरी सुध्दा आमच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

एका मंत्र्याच्या ती व्यक्ती जवळची असल्यामुळे आमच्या एका मत्र्यांनी त्यांचा काही संबंध नसतांना ती नस्ती मागवली व मला विनंती केली की, "आपला माणूस आहे जरा बघून घ्या". मुख्यमंत्री आणि मुख्यसचिवानी सदर व्यक्तीला रिइन्स्टेट करु नये असा रिमार्क्स लिहिलेला असल्यामुळे माझ्या सारख्या व्यक्तीकडून त्या नस्तीवर या जन्मात तरी सही होऊ शकणार नाही. ही फाईल बंद करुन परत पाठवून दिली. माझा सहकारी मंत्री नाराज झाला. मी ज्यावेळेस मुंबईहून संभाजीनगरला जात होतो त्यावेळेस संबंधित अधिकारी मला भेटला व मी त्याला विचारले, तुम्ही येथे कुठे ? तेव्हा त्याने मला सांगितले की, मी आता संभाजी नगरला जॉईंट झालो आहे. या व्यक्तीला रिइन्स्टेट कोणी केले? तुमची सत्ता आल्यानंतर तुमच्या एका संबंधित मंत्र्यांनी रिइन्स्टेट केलेले आहे. मी कुणाचेही नाव घेत नाही. सत्तेमध्ये आपण काय करतो हे पाहिले पाहिजे. चुकून या प्रकरणात अशी चूक होऊ नये यासाठी मी हा विषय मांडत आहे. कर वसुलीच्या संदर्भात नेमके कसे होत असते हेच मी सांगितलेले आहे. आपण माझे मित्र आहात, आपण माझ्याकडून मार्गदर्शन मागितले म्हणून मी आपल्याला मार्गदर्शन केलेले आहे. अफेडेव्हीट इन रिप्लाय हे जे अफेडेव्हीट आहे ते ॲडीशनल सुपरिटेंडंट ऑफ पोलीस यांचेच आहे. हे प्रतिज्ञापत्र मी अगोदरचे जे प्रतिज्ञापत्र वाचले हाते त्याच्या नंतरचे आहे. हे प्रतिज्ञापत्र सर्वोच्च न्यायालयात करण्यात आलेले आहे. हे प्रतिज्ञापत्र जून 2010 मध्ये करण्यात आले होते.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

या ॲफीडेव्हीट-इन-रिप्लाय मधील काही भाग मी आपणांस वाचून दाखवितो. त्यात असे म्हटले आहे की, "In this regard documentary evidence about clearing of the consignment i.e. copies of Bills of Entry, Invoices and Customs duty paid receipts from the said company have been collected. I have also recorded statements of Anwar Usman Gani Shaikh, aged 57 years and Almeen Abdul Dodia aged 42 years both R.T.O. agents; who submitted papers to R.T.O. offices at Pen and Andheri for registration of the vehicles assembled by the accused Mohhamad T. Choudhary. Both of them admitted having registered 20-25 super bikes at both the R.T.O.offices. They also admitted having never brought the vehicles at R.T.O. offices at the time of registration."

सभापती महोदय, दिनांक 22 जानेवारी 2009 रोजीचे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना "अधिकारी कशा प्रकारे टॉर्चर करतात" याबाबत पत्र लिहिलेले आहे. त्या पत्रावर उप सचिवांनी पुढीलप्रमाणे शेरा लिहिलेला आहे. "This is very serious allegation made by an officer in writing to RTO, Thane after getting a report on factual position from Commissioner Transport." त्याबाबत पुढे काही कार्यवाही झाली नाही. तो रिमार्क तसाच राहिला.

सभापती महोदय, माननीय मुख्य न्यायाधीश श्री.अे.के.खानविलकर यांच्या या संदर्भात स्पीकिंग ऑर्डर्स आहेत. मी आता याठिकाणी ज्या बाबी सांगत आहे त्या परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांना नवीन वाटत असतील. कारण त्यांनी या बाबींकडे कधी गांभीर्याने पाहिले नाही. माननीय मुख्य न्यायाधीश श्री.अे.के.खानविलकर म्हणतात की, "....as per the records available registered 443, 116 and 53 registrations respectively. We are surprised that despite these allegations have been publicly known, how come no action has been taken against these three Officers and it is

..2..

श्री.दिवाकर रावते.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

informed that they are still working on their respective posts." त्यात पुढे असे म्हटले आहे की, "It is also brought to our notice that inquiries were conducted and certain reports have been submitted by the Transport Secretary, Transport Commissioner and Department of Revenue Intelligence (DRI). In the above circumstances and at least to prevent further loss to Government Revenue and further damage to the public trust and working of the RTO office, it is essential that this Court should issue directions at this stage itself:-" पुढे असे म्हटले आहे की, "We direct the Principal Secretary-Transport to forthwith take action against the named three officers and on perusal of the Report, if considered appropriate, they should be placed under suspension forthwith." एवढे झ ाल्यावरही विभागाने काही केले नाही. हा न्यायालयाने निर्णय दिला. त्यामध्ये म्हटले आहे की, "The Competent Authority should also consider if there is indication of commission of a criminal offence, in that event, it should also take appropriate steps." मुख्य न्यायाधीश श्री.खानविलकर यांनी ऑडर्स दिल्यानंतर विभागाने कार्यवाही केली.

सभापती महोदय, माझ्याकडे श्री.ए.सी.धर्माधिकारी यांचे आदेश आहेत. त्यातील सर्वच आदेश मी वाचत नाही. परंतु जे महत्वाचे आहे ते मी वाचतो. "It is clarified that these directions are without prejudice to the criminal proceedings which may be pending against the concerned officers/persons or which may be instituted hereafter."

यानंतर श्री.गायकवाड...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नोंदी

श्री.दिवाकर रावते.....

तुम्ही त्यांना निलंबित करु नका तर त्यांच्याविरुध्द क्रिमिनल प्रोसिडींग्ज सुरु करा असे सांगण्यात आले होते त्याप्रमाणें या अधिका-याच्या विरुध्द क्रिमिनल प्रोसिडींग्ज सुरु केले किंवा नाही याबाबतीत आपण खुलासा करावा. मला त्याबाबत काहीही म्हणावयाचे नाही.परंतु माझ्या माहिती प्रमाणे अजूनही क्रिमिनल प्रोसिडींग्ज सुरु करण्यात आलेली नाही. तर त्या अधिका-यांना निलंबित केलेले आहे त्याचप्रमाणे एस जे.काथावाला या न्यायमूर्तीनी जे आदेश पारित केले होते त्यात शेवटी त्यांनी असे म्हटले होते की "Since the chargesheet has already been filed, we extend the time limit..."या ठिकाणी मी तुम्हाला प्रश्न का विचारत आहे आणि मला येथे एवढया वेळ का उभे रहावे लागत आहे ? त्यांना न्यायमूर्तीनी सांगितले असतांना अधिका-यांनी असे सांगितले की , अजूनही आमचे शोधणे सुरु आहे. आपण जो काही वेळ दिलेला आहे त्यावेळेत आम्हाला ही माहिती देता येणार नाही. असे अधिका-याने उच्च न्यायालयात सांगितले असून उच्च न्यायालयाने असे सांगितले की, "Since the chargesheet has already been filed, we extend the time limit stipulated in para ५ of our order dated १st July, २०१० till the date of filing the chargesheet and we make it clear that any action being taken by the investigating officer under sub-section (८) of section १७३ of Criminal Procedure Code does not require any further orders of this Court." वारंवार वेळ मागण्यासाठी आमच्या समोर येऊ नका तर तुमच्याकडे पूर्ण माहिती आल्यानंतर या.न्यायालयाने असे आदेश दिल्यानंतर अधिका-यांचे फावले त्यामुळे ते प्रकरण तेथेच पडले आहे. न्यायालयाच्या एका आदेशाचा फायदा अधिका-यांनी घेतला आहे. वारंवार येऊन वेळ मागत बसण्यापेक्षा हे प्रकरण मोठे आहे, इंटरनॅशनल केस आहे, रेड अलर्ट जाहीर झालेला आहे, एक आरोपी दुबईला पळालेला आहे, एक हिंदुस्थानात फिरत आहे मोटारबाईक कोठे गेल्या हे माहीत नाही, ज्यांनी खरेदी केल्या त्यांचे पत्ते माहीत नाहीत त्यामुळे मी जी काही नावे वाचली आहेत ती पाहिल्यानंतर पोलीस खात्याला आतंकवाद्यांकडून मोटार सायकली वापरल्या जातात असा संशय आला आहे. त्यामुळे ही गंभीर घटना असून शोध घेण्याकरिता बराच वेळ लागेल हे उच्च न्यायालयाने मान्य केले असून सगळा तपास झाल्यानंतर आमच्याकडे या असे अधिका-यांना उच्च न्यायालयाने सांगितले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, श्री.जे.पी सींग, डेप्युटी डायरेक्टर, डायरेक्टोरेट ऑफ रेव्हेन्यू इंटेलिजन्स, मुंबई यांनी सेक्रेटरी, ट्रान्सपोर्ट आणि स्टेट एक्साईज यांना पत्र लिहीले होते आणि त्याची कॉपी ट्रान्सपोर्ट कमिशनर, महाराष्ट्र राज्य यांना मार्क केली आहे. या पत्राच्या पॅरा क्र. ३ मध्ये असे म्हटले आहे की, "During the course of Investigation, statement of one Shri Shivkumar K. Shetty, an R.T.O. agent at Andheri R.T.O. was recorded under Section १०८ of the Customs Act, १९६२ on २६.०२.२००९ (copy enclosed). He revealed payment of bribe to various levels of officers at RTO office to get his work done. He has also submitted hand written note-books maintained by him with details of payments made to the officers at the R.T.O. office." माजी पंतप्रधान श्री नरसिंह राव यांची एक डायरी सापडल्यामुळे संपूर्ण देशात हलकल्लोळ माजला होता व अनेक खासदार अडचणीत आले होते .परंतु आता मी जे वाचून दाखविले आहे त्या डायरीमध्ये सर्व अधिकाऱ्यांना दिलेल्या पैशाचे डिटेल्स आहेत. असे देशातील सर्वोच्च खात्याचा अधिकारी सांगत आहे आणि त्याची प्रत वाहतूक आयुक्तांना पाठविण्यात आली होती. त्याचबरोबर पॅरा 4 मध्ये असे म्हटले आहे की, "On the basis of preliminary verification, mentioned in para २ the documents were sent to various Custom Houses, from where these were shown as cleared as per the Bill of entry (forged), for verification. As soon as the verification report is received from the respective Customs Houses, the result would be informed to your office. Further, the actual Bills of entry under which the parts of the said motorbikes were imported are also been scrutinized for import licensing and valuation angle." याचा अर्थ असा की, इम्पोर्ट डयुटी आणि इम्पोर्ट लायसेन्सच्या बाबतीत ते कलकत्ता येथे शोधत बसले आहेत. माननीय मत्री महोदयांकडे ही माहिती आहे किंवा नाही हे मला माहीत नाही. अधिका-यांनी तुमच्याकडे माहिती दिली किंवा नाही हे मला माहीत नाही..

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, मला याठिकाणी आपणास एक विनंती करावयाची आहे. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मांडलेले प्रकरण अतिशय भयानक आहे. व ते ज्या पध्दतीने सभागृहामध्ये मांडीत आहेत याचा अर्थ ते अतिशय अभ्यास करुन मांडीत आहेत. खरे म्हणजे अशावेळी सभागृहामध्ये सिनियर कॅबिनेट मंत्री उपस्थित असणे आवश्यक आहे. कारण कॅबिनेट मंत्र्यांनी संपूर्ण डिपार्टमेंट संभाळले असल्यामुळे तेच त्याचे योग्य उत्तर देऊ शकतील. हे संपूर्ण प्रकरण केवळ भ्रष्टाचाराचे नाही. यामध्ये 700 मोटर बाईकचे स्पेअर पार्ट आणून त्यांचे असेंब्लिंग करण्यात आले आहे, ज्यांची किंमत 10 ते 15 लाख रुपये आहे. त्यांचे रजिस्ट्रेशन करता येते की नाही? याबद्दल माझ्या मनामध्ये शंका आहे. याकरिता या विधेयकावरील चर्चा आता स्थगित करुन ती आपण पुढे ढकलावी व दुसऱ्या विधेयकावरील चर्चा सुरु करावी. माननीय सदस्यांनी या विधेयकावरील चर्चा थांबवावी असे मी मुळीच म्हणणार नाही. या विधेयकावर सविस्तरपणे मुद्दे मांडण्याचा त्यांना अधिकार आहे. त्यामुळे सभागृहाचा वेळ घेण्यासाठी ते भाषण करीत आहेत अशाप्रकारचे शब्द मी वापरलेले नाहीत. त्यांनी याठिकाणी पुराव्यानिशी आपले म्हणणे मांडले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: पुणे जिल्हयातील सोमेश्वर येथे शेतकऱ्यांनी काढलेल्या मोर्चावर पोलिसांनी केलेला लाठीमार व गोळीबार

मु.शी.: पुणे जिल्हयातील सोमेश्वर येथे शेतकऱ्यांनी काढलेल्या मोर्चावर पोलिसांनी केलेला लाठीमार व गोळीबार या विषयावर श्री. पांडुरंग फुंडकर यांनी उपस्थित केलेल्या पॉईंट ऑफ इन्फर्मेशनबाबत माननीय गृहमंत्र्यांचे निवेदन

श्री. आर. आर. पाटील (गृह मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "पुणे जिल्हयातील सोमेश्वर येथे शेतकऱ्यांनी काढलेल्या मोर्चावर पोलिसांनी केलेला लाठीमार व गोळीबार" या विषयासंबंधी उपस्थित केलेल्या पॉईंट ऑफ इन्फर्मेशनबाबत मी पुढील निवेदन करीत आहे.

"आज सोमवार, दिनांक 13 डिसेंबर 2010 रोजी पुणे ग्रामीण जिल्हयातील वडगांव निंबाळकर ह्या हद्दीतील सोमेश्वर सहकारी साखर कारखाना येथे शेतकरी कृती समितीचे अध्यक्ष श्री. सतीश शिवाजीराव काकडे यांच्या वतीने "काटा बंद" आंदोलन घोषित करण्यात आले होते. सदर बंदच्या अनुषंगाने सोमेश्वर सह. साखर कारखान्याच्या परिसरामध्ये सी.आर.पी.सी. 144 प्रमाणे संचारबंदी लागू करण्यात आली होती. या बंदच्या घोषणेच्या अनुषंगाने श्री.काकडे यांच्या नेतृत्वाखाली 400 ते 500 कार्यकर्ते करंजे पूल चौक येथे जमून सोमेश्वर कारखान्याच्या दिशेने येत होते. परंतु कारखाना परिसरामध्ये संचारबंदी लागू करण्यात आल्याने सदरचा मोर्चा कारखान्यापासून 500 मीटर अंतरावर अडविण्यात आला. त्यावेळी श्री. काकडे यांनी सहभाग घेऊन "कारखान्याचा काटा बंद करायचा आहे, सर्वांनी कारखान्यामध्ये प्रवेश करावा", अशी चिथावणी दिली. त्यामुळे श्री. काकडे यांच्यासह 30-35 कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन सरकारी वाहनामध्ये बसवित असतांना, आजूबाजूच्या कार्यकर्त्यांनी दगडफेक करण्यास सुरुवात केली. सदर दगडफेक बंद करण्याबाबत मेगा फोनवरुन सूचना देण्यात आल्या. तरीही दगडफेक बंद होत नसल्याने जमावास पांगविण्यासाठी 7 अश्रूधूरांच्या नळकांडया फोडण्यात आल्या व जमावावर सौम्य लाठीमार करण्यात आला. यावेळी गोळीबार करण्यात आलेला नाही. या नंतर जमाव तेथून निघून गेला. सदर घटनेत 31 आंदोलनकर्त्यांना अटक करण्यात आली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील....

या घटनेमध्ये 14 पोलीस अधिकारी व कर्मचारी जखमी झाले आहेत. कोणीही आंदोलनकर्ते जखमी झाल्याचे आढळून आलेले नाही. जमावाने केलेल्या दगडफेकीमध्ये वाहनांचे सुमारे 40 ते 50 हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. या प्रकरणी वडगाव निंबाळकर पोलीस ठाणे येथे भाग-5 गुन्हा रजिस्टर नं.167/2010 भादंवि कलम 143, 147, 148, 149, 427, 353 मुंबई पोलीस कायदा कलम 135 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या ठिकाणी योग्य तो पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला असून परिस्थिती नियंत्रणात आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या मोर्चेकऱ्यांच्या मागण्या काय होत्या? खरे म्हणजे या मोर्चामधील कार्यकर्ते निवेदन देण्यासाठी जात असतांना त्यांना त्यापासून रोखण्यात आले. पोलिसांनी त्यांना त्याठिकाणी अडविल्यामुळे पुढील प्रकार घडला हे खरे आहे काय? या लाठीहल्ल्यामध्ये 7 ते 8 शेतकरी गंभीररित्या जखमी झाले आहेत हे खरे आहे काय?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, मी आता केलेल्या निवेदनामध्ये शेतकरी गंभीररित्या जखमी होऊन त्यांना दवाखान्यामध्ये ॲडमिट केल्याचे आढळून आलेले नाही. बऱ्याच वेळा लाठीचार्ज झाल्यानंतर लोक निघून जातात अशी परिस्थिती बघावयास मिळते. या संदर्भात मी घेतलेल्या माहितीनुसार या घटनेमध्ये कुणीही जखमी झाल्यामुळे ॲडमिट झालेले नाही. पहिली उचल 2200 रुपये द्यावी म्हणून शेतकऱ्यांनी मोर्चा काढला होता. त्यांनी शांततेच्या पध्दतीने मोर्चा काढण्यास सरकारची हरकत नाही.

(यानंतर श्री. बरवड)

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ....

पण हे कारखाना बंद करण्यासाठी, काटा बंद करण्यासाठी आले होते.

श्री. पांडुरंग फुंडकर : त्या ठिकाणी आधी कलम 144 लागू केले होते. म्हणजे आपण मोर्चा काढण्यासाठी बंदी करीत होता.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, त्या परिसरात त्यांना रीतसर कारखान्याच्या कार्यालयावर निवेदन द्यावयाचे असेल, शासकीय कार्यालयामध्ये निवेदन द्यावयाचे असेल तर काही हरकत नाही परंतु एखादा काखाना बंद करण्याचे आंदोलन जर कोणी हाती घेतले आणि जमाव जर कारखान्यात गेला तर अशा पध्दतीने प्रतिबंधात्मक उपाययोजना केली नाही तर मारामाऱ्या होतील. म्हणून कलम 144 घोषित करण्याचा मॅजिस्ट्रेटने घेतलेला निर्णय योग्य आहे. 30-31 लोकांना अटक करण्यात आल्यानंतर त्यांना घेऊन जात असताना मोर्चातील लोकांनीच पोलिसांवर दगडफेक केलेली आहे. त्यामध्ये पोलीस जखमी झाले आहेत. त्या ठिकाणी कोणी शेतकरी जखमी झाले असतील तर त्याची माहिती घेऊ. कोणी जर तसाच गेला असेल, ॲडमिट न होता गेला असेल, कोणी खाजगी दवाखान्यामध्ये गेला असेल तर त्याची माहिती घेऊ. मी माहिती घेतली. मध्यंतरी एक अफवा अशी उठली आणि मलाही एसएमएस आले की, त्या ठिकाणी गोळीबार झाला. सभापती महोदय, मी पूर्ण चौकशी केली. त्या ठिकाणी कोणताही गोळीबार झालेला नाही. जो लाठीचार्ज झालेला आहे तोही अतिशय सौम्य स्वरुपाचा झालेला आहे. पोलिसांनी त्यांच्या पध्दतीप्रमाणे अगोदर अश्रुधुराच्या नळकांड्या फोडणे, सौम्य लाठीचार्ज करणे, जमाव आटोक्यात आणणे याच उपाययोजना त्या ठिकाणी केलेल्या आहेत. यासंदर्भात महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांची जी आंदोलने काही ठिकाणी शेतकरी संघटनेमार्फत होत आहेत त्यांना मी आवाहन करीन की, पोलीस काही त्यांचे शत्रू नाहीत. पोलिसांनी शेतकऱ्यांवर लाठीचार्ज किंवा गोळीबार करु नये अशा आमच्या अप्रत्यक्ष नेहमीच सूचना आहेत. पण तरी सुध्दा आपल्या जर काही मागण्या करावयाच्या असतील तर शांततेच्या पध्दतीने कराव्यात. काही नेते स्वत:चा ऊस कारखान्याला घालतात आणि दुसऱ्यांचा ऊस तोडावयास गेले की, तोड बंद, वाहतूक बंद अशा पध्दतीच्या भूमिका घेत आहेत. हेही योग्य नाही. म्हणून कोणीही कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करु नये. सनदशीर मार्गाने त्यांना आंदोलन करण्याचा पूर्णपणे अधिकार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय गृहमंत्री त्या प्रसंगापुरते बोलले असते तर वेगळे होते पण त्यांनी अपील केले आहे. मी आपल्याला सांगतो की, ही मागणी काही आजची नाही. 2200 रुपयांचा पहिला भाव द्यावा यासंदर्भात श्री. शरद पवार साहेबांनी सुध्दा आपले मत मांडलेले आहे. या सभागृहाचे नेते आणि माननीय उप मुख्यमंत्री यांनीही आपले मत मांडलेले आहे. हे आंदोलन दिवसेंदिवस चिघळत चालले आहे. हे आंदोलन आज चालू नसून महिना दीड महिन्यापासून चालू आहे. हे आंदोलन चिघळत राहण्यापेक्षा सरकारने एक ठोस भूमिका घेणे आवश्यक आहे, असे आपल्याला वाटत नाही काय ? आपण शेतकऱ्यांना अपील करीत आहात. हे अपील कोणी केले पाहिजे ? एक तर हे अपील सहकार मंत्र्यांनी, पणन मंत्र्यांनी आणि कृषी मंत्र्यांनी केले पाहिजे. त्यांच्या वतीने आपण अपील केले त्याबद्दल आनंद आहे. आपण जी भावना व्यक्त केली ती योग्य आहे की, पोलीस काही त्यांचे शत्रू नाहीत. पण कारखाना कोणाचा आहे ? कारखाना शेतकऱ्यांचा आहे. जे कोणी कारखाना चालवू इच्छितात त्यांना त्यांनीच निवडून दिलेले आहे. त्यांची एवढी हिंमत नाही काय की आपण शेतकऱ्यांमध्ये जावे, त्यांच्याबरोबर बसून त्यांचे म्हणणे ऐकावे ? एकतर्फी आंदोलन चालू आहे. आंदोलन हे आंदोलन असते. माननीय मंत्री महोदय यासंदर्भात बोलले म्हणून मी बोलतो. आपण आता मंत्रिमंडळामध्ये हा विषय आपल्यामार्फत मांडावा आणि सरकारला यासंदर्भातील ठोस भूमिका जाहीर करावयास सांगावे. सरकारची नक्की भूमिका काय आहे हे एकदा शेतकऱ्यांना कळू द्या. ते तरी जाहीर करावयास सांगावे असे मी आपल्या माध्यमातून सांगतो. हा आपल्या खात्याचा विषय नव्हता.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे आंदोलन का चिघळले ? सरकार यामध्ये काहीच भूमिका घेण्यास तयार नाही. शेतकरी ऊसाला भाव मागत आहेत. याबाबतीत सरकार गप्प आहे. सरकारने यामध्ये भूमिका घेऊन भाव जाहीर केला पाहिजे. त्यामुळे शेतकऱ्यांना काही गोष्टी स्पष्ट होतील. दुसरे म्हणजे कारखान्यातून त्या शेतकऱ्यांवर काही दगडफेक झाली का याची माननीय मंत्री महोदयांनी चौकशी करावी.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, कारखान्याच्या आतून दडगफेड झाली का याची मी निश्चितपणे चौकशी करीन. पण आता माझ्याकडे जी माहिती आहे ती माझ्या स्थानिक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ....

अधिकाऱ्याकडून फोनवरुन घेतलेली माहितीच मी सदनामध्ये देत आहे. या 31 लोकांना अटक करीत असताना आणि वाहनांमध्ये बसवित असताना वाहनांवर आणि पोलिसांवर आंदोलनकर्त्यांनीच दगडफेक केलेली आहे. अशी माहिती मला उपलब्ध झालेली आहे. दराच्या बाबतीत सरकारची स्पष्ट भूमिका आहे की, त्या कारखान्यांनी ऊसाचा जो मिनिमम दर केंद्र सरकारने घोषित केलेला आहे त्यापेक्षा कमी दर देता उपयोगाचे नाही. त्याचबरोबर कारखान्यांनी कारखाने काटकसरीने चालवून शेतकऱ्यांना जेवढा जास्तीत जास्त दर देता येणे शक्य आहे तेवढा द्यावा ही सरकारची भूमिका आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेब तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब यांनी काही तपशील सांगितलेला आहे पण हा पुणे जिल्ह्याचा विषय आहे म्हणून मला सांगितले पाहिजे की, 2200 रुपये भाव कोल्हापूर, सांगली, पुणे सर्वत्र लागू असण्याची अपेक्षा असताना,

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

आपण जशी नेत्यांची नावे घेतली नाहीत, त्याप्रमाणे मी सुध्दा नेत्यांची नावे घेत नाही. परंतु एका प्रभावशाली नेत्यांनी शेतक-यांना 1500 रुपयेच भाव मिळावा यादृष्टीने पुणे जिल्हयातील साखर कारखान्यांना अप्रत्यक्षरित्या आदेश दिलेले आहेत. आज शेतकऱ्यांमध्ये असंतोष खदखदत आहे. पुणे जिल्हयातील काही कारखान्यांना 1500 रुपयांच्या वर भाव देणे शक्य नसल्यामुळे या कारखान्यांची मुस्कटदाबी चालू आहे. कालपासून तेथे 144 कलम लावलेले आहे. त्यामुळे शांतपणे निवेदन देणे सुध्दा शक्य होत नाही. प्रत्येक ठिकाणी धरपकड व्हायची शक्यता आहे. तिसरे असे की, मंत्री महोदयांनी ही अफवा असे म्हटले आहे. परंतु दैनिक सकाळच्या एसएमएसमधून तेथे हवेत गोळीबार झाला असे आम्हाला कळले आहे. त्या वृत्तपत्राबद्दल विश्वासार्हता असल्यामुळे आम्ही त्याबद्दलचा विषय गांभीर्याने घेतलेला आहे. मी खास करुन विनंती करते. पुणे जिल्हयातील साखर कारखान्यांना 1500 पेक्षा जास्त भाव न देण्याचा कोणाचा आदेश असल्यामुळे पुण्यात जास्त असंतोष आहे काय ? याबाबत संबंधितांना विश्वासात घेऊन चर्चा करावी. अन्यथा, पोलीस विरुध्द शेतकरी असा प्रत्येक ठिकाणी संघर्ष उभा राहणार आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, पोलीस व शेतकरी यांचा संबंध येऊ नये म्हणूनच मी आवाहन केले आहे. राज्यामध्ये शांतता रहावी म्हणून मी आवाहन केले आहे. माझी ही स्पष्ट भूमिका आहे की, त्या कारखान्यामध्ये जो जास्तीत जास्त भाव निघत असेल तो त्यांनी शेतक-यांना दिला पाहिजे. सगळयाच कारखान्यांचे दर सारखेच नसतात. त्या कारखान्यावर कर्ज किती आहे, ऊसाचे गाळप किती होत आहे, कर्मचारी किती आहेत, कर्जापोटी किती व्याज द्यावे लागते, याचा विचार करावा लागतो. सरकारने अमुक दर ठरविला तर तो दर काही कारखाने देऊ शकणार नाहीत. पण काही कारखाने सरकारने ठरविलेल्या दरापेक्षाही जास्त दर देण्याची शक्यता आहे. ऊसाचे दर सरकार ठरवित नाही तर कारखाने ठरवितात. म्हणून सरकारचे कारखान्यांना सुध्दा आवाहन आहे की, त्यांच्या कारखान्याचा दर कमी निघत असेल तर तो कमी का निघत आहे त्याची कारणे त्यांनी सभासदांना समजावून सांगावीत. कारण ते त्यांचे सभासद आहेत. सरकारला यामध्ये कोणताही हस्तक्षेप करावा लागू नये आणि साखर कारखान्यांनी शेतक-यांना जास्तीत जास्त दर द्यावा हीच सरकारची भूमिका आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी पेण आर.टी.ओ.बाबत आपले विचार मांडले आहेत. त्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी पेण आर.टी.ओ.बाबत सभागृहात वेगळी चर्चा घडवून आणावी अशी मागणी केली आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांच्या मागणीला पाठिंबा देत आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे या बिलावर बोलत असताना आर.टी.ओ. कार्यालयाबाबत खूप गंभीर आरोप करीत आहेत. त्यामुळे पेण आर.टी.ओ.संबंधी या अधिवेशनामध्ये या सभागृहात एक तासाची खास चर्चा व्हावी अशी मी आपल्याला विनंती करीत आहे.

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहाच्या कामकाजासंबंधी

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे भाषण संपल्यानंतर सभागृहाचे कामकाज थांबवावयाचे का ?

श्री.दिवाकर रावते : हे विधेयक पूर्ण होऊ द्यावे.

उप सभापती : उद्या पुन्हा या विधेयकावरील चर्चा सुरु करता येईल.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेवरील अर्ध्या तासाच्या दोन चर्चा होणे आवश्यक आहे. कारण त्या सुध्दा महत्वाच्या असल्यामुळे आपल्याला टाळता येणार नाहीत.

उप सभापती : हे विधेयक रात्री 10 वाजेपर्यंत चालले तर तेवढा वेळ आपण सभागृहात थांबणार आहात काय ?

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, याबाबत चर्चा झाली त्यावेळी आपण सभागृहामध्ये नव्हता.

उप सभापती : मी माझ्या दालनातून ही सर्व चर्चा ऐकलेली आहे. माझ्याकडे याबाबत सूचना आलेल्या आहेत. हे जरी खरे असले तरी आज सकाळी 11 वाजता सभागृहाचे कामकाज सुरु झालेले आहे. आता संध्याकाळचे 7 वाजत आहेत. माझे याबाबत काही म्हणणे नाही, माझ याबरोबर तालिका सभापती यांना सुध्दा सभागृहात बसावे लागते.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, अर्ध्या तासाच्या चर्चा उद्या घेण्यात येणार असतील तर माझी काही हरकत नाही.

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबई मोटार वाहन कर (दुसरी सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. LXXIX OF 2010

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY MOTOR VEHICLES TAX ACT, 1958 AND MOTION FOR REFERRING THE BILL TO JOINT SELECT COMMITTEE.)

(चर्चा पुढे सुरु....)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांनी माझ्या भाषणातील मुद्यांची गांभीर्याने नोंद घेतली आहे त्याबद्दल मी मनापासून सर्वांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, भारत सरकारचे वित्त मंत्री म्हणजे वित्त मंत्रालयाने नोंद घेतली आहे. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, मिनिस्ट्री ऑफ फायनांस, डायरेक्टोरेट ऑफ रेव्हेन्यू इंटेलिजन्स या विभागांनी याची नोंद घेतलेली आहे. त्यांचे दिनांक 7-8-09 चे पत्र आहे. त्या पत्रातला विषय मी आपणांस वाचून दाखवितो. त्यात असे म्हटले आहे की, "Fraudulent imports of superbikes-Investigations conducted by DRI so far-Reg."

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पान क्रमांक 2 वरील 7व्या परिच्छेदामध्ये असे म्हटलेल आहे की, "७.For the purposes of RTO registration of these bikes, as the genuine Bills of Entry were not available for the import of these bikes, the racketeers used the services of a master forger Zakir Patel, for forging fake Bills of Entry showing import of complete superbike and this was then submitted to the RTO for registration of the vehicle. चुकीचे आणि बोगस डॉक्युमेण्ट करणारा हा झकीर पटेल आहे. इण्टेलिजन्स डिपार्टमेण्टने हे म्हटलेले आहे. परिच्छेद क्रमांक 8मध्ये असे म्हटलेले आहे की, "८. The documents used for registration of these vehicles were called for from the various RTOs. The Bills of Entry were referred to the individual custom ports. It was confirmed from the customs authorities at these ports that the Bills of Entry were fake and fabricated, in most of the cases. (Details of the bikes registered on the basis of fake Bills of Entry are enclosed as Annexure-A)."

दिल्लीच्या मिनिस्ट्री ऑफ फायनान्सच्या डिपार्टमेंट ऑफ रेव्हेन्यू इंटेलिजन्सने सेक्रेटरी, ट्रान्सपोर्ट ॲण्ड स्टेट एक्साईज, होम डिपार्टमेण्ट, मंत्रालय यांना जे पत्र दिलेले आहे.. त्या पत्रातील परिच्छेद क्रमांक 10 मध्ये असे लिहिलेले आहे की, "१०. In addition to the ७५ bikes initially detained during the investigations, १४ more such bikes have been seized till now. A total amount of Rs. १.६१ crores has also been recovered towards customs duty evaded on those bikes in respect of which violations under Customs Act, १९६२ have been detected." श्री. जे.पी.सिंग, डेप्युटी डायरेक्टर यांनी आपल्या ट्रान्सपोर्ट कमिशनरला संपूर्ण 700 मोटारबाईकची यादी दिलेली आहे. ज्या मोटारबाईक रजिस्टर करण्यात आल्या त्या 700 मोटारबाईकचे नंबर त्यांनी परिवहन विभागाच्या सचिवांना दिले. त्या सचिवांनी पुढे काय केले हे मंत्रीमहोदयांना माहीत असावे. रिजनल ट्रान्सपोर्ट ऑफिसर, कोकण रिजन यांनी ट्रान्सपोर्ट कमिशनर, महाराष्ट्र, यांना पत्र लिहिले आहे. मी सर्व पत्र वाचत नाही. त्यामधील शेवटचा भाग मी वाचतो. महत्वाचा भाग असा आहे की, ही जी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सगळी बनवाबनवी केलेली आहे. त्यात असे म्हटले आहे की, "It is further submitted that whether the investigation may be carried out by the local Police or be entrusted to the C.I.D. may be decided by the Police Department and the Government. As the Customs Department of Government of India is concerned in this episode whether the investigation may entrusted to the C.B.I. may also be considered." हे सर्व पाहून स्थानिक अधिका-यांची मती गुंग झालेली आहे. या प्रकरणी परिवहन आयुक्तांना असे पत्र दिलेले आहे की या प्रकरणी सी.बी.आय. इन्क्वायरी करावी. परंतु मंत्री महोदयांनी ती केली नाही. अजूनही ते पत्र सी.बी.आय.कडे दिले नाही. ही कारवाई कशासाठी थांबविली हे कळायला काही मार्ग नाही. हेच कोकणचे अधिकारी परिवहन आयुक्तांना असे लिहीत आहेत की, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, पेण येथील मोटारवाहन निरीक्षक किंवा नोंदणी अधिकारी यांचा प्रस्तुत प्रकरणात सहभाग, संगनमत आहे किंवा कसे हे पोलीस तपासात निष्पन्न होईलू. त्यानुसार पुढील कारवाई करता येईल. प्रस्तुत तपास स्थानिक पोलिसांकडून करावा किंवा गुन्हे अन्वेशन विभागाकडे सोपवावा याबाबतचा निर्णय पोलीस विभाग आणि प्रशासनाने घ्यावा. प्रस्तुत प्रकरणी कस्टम या केन्द्र शासनाच्या विभागाचा देखील संबंध येत असल्याने हा तपास केन्द्रीय गुप्तचर विभागाकडे देण्याचा विचार करण्यात यावा असे मला वाटते. अशा प्रकारचे हे पत्र दिनांक 11 जून रोजी दिलेले आहे.

श्री. नितीन देशपांडे, ॲडिशनल गव्हर्नमेण्ट प्लिडर, हायकोर्ट यांना गुंडेवाडी, सहायक पोलीस अधीक्षक यांनी जी माहिती दिलेली आहे त्यातील महत्वाची माहिती मी वाचतो.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नोंद

श्री.दिवाकर रावते.....

त्यांच्या माहितीतील मुद्दा क्रमांक-4 मी वाचून दाखवितो, " In this regard documentary evidence about clearing of the consignment i.e. copies of the Bills of Entry, Invoices and Customs duty paid receipts from the said company have been collected. I have also recorded statements of Anwar Usman Gani Shaikh, aged 57 years and Almeen Abdul Dodia, aged 42 years both the R.T.O. agents;..." या संदर्भात मी मघाशी नमूद केले आहे की, त्यांनी आपल्या प्लिडरला उच्च न्यायालयात सांगण्याकरिता हा मुद्दा लिहिला होता. मी शेवटचा मुद्दा वाचून दाखवितो.

सभापती महोदय, आतापर्यंत मी या संदर्भात या सदनापुढे जे आणले ते मी निर्माण केलेले नाही. ती माझी शोधयात्रा नाही. हा जो विषय आहे तो अत्यंत गंभीर आहे. यामध्ये जे जे अडकले आहेत त्यांना मोक्का लावला जात नाही तोपर्यंत त्यांना कोर्टाकडून जामीन मिळतो. कोर्ट जामीन देत असल्यामुळे कस्टडीतून बाहेर आल्यानंतर त्यांचे एवढे सामर्थ्य आहे की, दुबईपर्यंत संबंध पोहोचलेले आहेत. रेड ॲलर्टची नोटीस मिळाली. अनवधानाने त्यांनी केले असे मानले तरी पोलिसांनी कलम 120(ब) लावला आहे. त्यामुळे कृपा करुन या प्रकरणातून सुटलेले आरोपी पुरावे नष्ट करणार असतील, एसीबीला रेड टाकावी लागत असेल, माहिती घ्यावी लागत असेल तर गांभीर्याने विचार झाला पाहिजे. एसीबी रेड का टाकते? काय पकडले? कर वसुली करण्याचे काम त्यांच्याकडे दिले आहे. परिवहन खात्याचा काही संबंध नाही. गृह विभागाकडून काम होत नाही म्हणून तुमच्याकडे जबाबदारी दिली आहे. त्यांच्याकडून 9 कोटी रुपये कर वसूल होत होता, तुमच्या खात्याने 200 कोटी रुपये कर वसूल केला. गृह खात्याच्या अंतर्गत असलेल्या एसीबीने रेड का टाकली? तुमच्या खात्याला बदनाम करण्याकरिता टाकली का याचा खुलासा झाला पाहिजे. रेड कशाकरिता टाकली?

सभापती महोदय, ठाण्याच्या रेडबद्दल आपल्याला चांगली माहिती आहे. ठाणे परिवहन कार्यालयात दोनवेळा रेकॉर्ड जाळण्यात आले, असे पोलीस रेकॉर्डमध्ये नमूद केले आहे. परिवहन विभागाचे सचिव श्री.संगीतराव यांनी लिहिले आहे. तुम्ही सांगितले म्हणून मी वाचले नाही. पहिली आग लागली त्यावेळीच गांभीर्याने घेतले असते तर दुसरी आग लावता आली नसती असे परिवहन विभागाचे सचिव श्री.संगीतराव लिहितात. खात्यामध्ये घोळ चालला आहे. तो नष्ट

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

करायचा प्रयत्न होत आहे. आतंकवाद्यांनी हा देशाशी खेळ चालविला आहे. पोलिसांना संशय आहे. या मोटारबाईक जर उद्या आतंकवाद्यांच्या हाती गेल्या तर त्यांचा वापर केल्यानंतर काय निर्माण होईल? लादेनची कॅसेट मी दाखविली ती अत्यंत गंभीर आहे. मानवी बॉम्ब तयार होत आहेत. तुम्हाला उद्या तपासता येणार नाही. कुठेही सिक्युरिटी नाही. रस्त्यावर उभे राहतील आणि बॉम्ब फोडतील. हा गंभीर विषय आहे. आंतरराष्ट्रीय विषय आहे. आंतरराज्य विषय आहे. केंद्र सरकारची विविध खाती यामध्ये अडकली आहेत. कर वसुलीच्या संदर्भात प्रस्ताव आणला त्या निमित्ताने कर वसुली कशाप्रकारची चालली आहे हे निदर्शनास आणून दिले आहे. अधिकाऱ्यांनो कोणाची मर्जी करु नका.....

नंतर 4एच.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

अशा प्रकारे अधिकार आपल्याकडे घेऊन असा दबाव निर्माण केला जातो त्यामध्ये विनाकारण आमचे माननीय गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील बदनाम होतील. कारण अशा प्रकारे रेड मारल्या जातात, अमुक ठिकाणी रेड मारली, मग त्यांचे बी.पी. वाढते, पैसे खाऊन पूर्वी आरामात झोपत होते पण आता त्यांना झोप सुध्दा लागत नाही, हे थांबणार की नाही याचा खुलासा झाला पाहिजे. अशा प्रकारे या शासनामध्ये कुठल्याही नावाचा दुरुपयोग होत असेल आणि राज्य चालवित असताना अशा प्रकारे भयग्रस्त वातावरण निर्माण होत असेल तर त्यात नाहक गृह मंत्री बदनाम होत असतील तर ते थांबले पाहिजे. कारण हे अत्यंत गंभीर प्रकरण आहे. काहीही कारण नसताना त्यांना गुंतविण्याचा प्रयत्न कोणी करीत असेल तर ते सहन करुन घेणार नाही. म्हणून अशा प्रकरणांमध्ये मोक्कासारखे कायदे लावले पाहिजेत. ज्यांच्यामध्ये रेड कॉर्नर नोटीसेस इश्यू झाल्या आहेत अशा प्रकरणात सीआयडी चौकशी करणार असाल तर संबंधित अधिकारी त्यात गुंतलेले असावेत अशी शंका येते म्हणून याबाबत उचित कारवाई झाली पाहिजे असे सुचवून माझे भाषण पूर्ण करतो.

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, हे विधेयक सभागृहात मांडत असताना त्यांनी सांगितले की, सुप्रिम कोर्टाचे निदेश आहेत म्हणून आम्ही हे विधेयक आणले आहे. मला या निमित्ताने असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, हे सभागृह सार्वभौम असून कायदे बनविणारे आहे आणि कायदा कसा बनवावा हे सुप्रिम कोर्ट किंवा हाय कोर्टाने सांगू नये. कोर्टाने फक्त या सभागृहाने बनविलेल्या कायद्यामुळे अन्याय झाल्यास त्याबाबत निर्णय द्यावयाचे असतात. त्यामुळे डायरेक्ट इनडायरेक्ट हे राज्य कोर्टच चालविते की काय असे वाटू नये म्हणून या बाबीचा विचार करणे आवश्यक आहे. मंत्री महोदय या खात्याला तसे नवीनच आहेत.

तीन दिवसापूर्वी विधि व न्याय विभागाचे एक विधेयक सभागृहात आणले होते. शासनाने सांगितले होते की, उच्च न्यायालयाच्या निदेशाप्रमाणे हे विधेयक शासनाने आणले होते. हे विधेयक मान्य करीत असताना ते मागे घेण्यास भाग पाडले होते. कारण कायदे मंडळालाच कायदे बनविण्याचा अधिकार आहे आणि उच्च किंवा सर्वोच्च न्यायालय त्यासाठी निदेश देऊ शकत नाही म्हणून या सभागृहाचा वेगळा सन्मान आहे. या सभागृहात कोर्टाविषयी जरी बोललो तरी तसे बंधन नाही, कारण अशा प्रकारची नोंद सभागृहाच्या कामकाजात होणे योग्य नाही. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी पेण तालुक्याच्या बाबतीत सांगितले होते पण त्याबाबत बरेच बोलण्यासारखे आहे. रायगड जिल्ह्यात 85 हजार कोटीची गुंतवणूक होत असून त्यामुळे वाहतुकीत प्रचंड वाढ होत आहे. आरटीओचे कार्यालय जिल्ह्याच्या ठिकाणी असले पाहिजे. या कार्यालयातील कारकून आणि शिपाई हे ठाण्याहून स्वत:च्या गाडीने येतात, इतका पैसा त्यांच्याकडे आहे. म्हणून या विधेयकाच्या निमित्ताने माझी अशी मागणी आहे की, आरटीओचे कार्यालय हे अलिबागला आणले पाहिजे तसेच संबंधित अधिकाऱ्यांची व त्यांच्या मालमत्तेची सुध्दा चौकशी होऊन कारवाई झाली पाहिजे. एवढे बोलून मला विचार मांडण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार व्यक्त करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 79 वर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. या बिलाचा उद्देश अतिशय चांगला आहे. राज्यातील वाहतूक वाहनांवर आणि वाहतुकेतर वाहनांवर "पर्यावारण कर" बसविण्याकरिता हे विधेयक आणण्यात आले आहे. या बिलाचे मी स्वागत करतो. या बिलातील "क" ते "झ" पर्यंतचे जे पोट कलम आहे त्यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी माहिती देण्याची आवश्यकता आहे. वाहनांची निरीक्षण केंद्रे स्थापन करणे व विकसित करणे याबाबतीत माहिती दिलेली आहे. आपण वाहनांची निरीक्षण केंद्रे स्थापन करणार आहात. आपण वाहन निरीक्षण केंद्र एका जिल्हयात एक करणार आहात की, तालुकावाईज करणार आहात हा खरा प्रश्न आहे. या केंद्रामध्ये जे अधिकारी राहणार आहेत ते कोण असणार आहेत ? मोटर मॅकेनिकल इंजिनिअर हा अधिकारी म्हणून त्या ठिकाणी राहणार आहे काय ?

सभापती महोदय, (ख) प्रदूषण तपासणी केंद्राचे जाळे निर्माण करणे व विकसित करणे. ही बाब अतिशय चांगली आहे. परंतु फिरत्या वाहनांकडून प्रदूषणाचे सर्टीफिकेट दिले जाते. प्रदूषणाचे सर्टीफिकेट एकदा दिले की, मग त्या वाहनाकडून कितीही प्रदूषण झाले तरी त्या वाहनाविरुध्द काही कारवाई होत नाही. खरे म्हणजे या फिरत्या वाहनाकडून संबंधित गाडीकडून किती प्रदूषण होते आहे हे तपासले जात नाही. त्यामुळे यासंदर्भात राज्य सरकारकडून विशेष उपाययोजना केली जाणार आहे काय ?

सभापती महोदय, पोट कलम (ग) मध्ये "हवेची गुणवत्ता तपासणी केंद्रे स्थापन करणे व विकसित करणे यावर माझे विचार मांडणार आहे. आपण यासंदर्भातील गुणवत्ता कशी तपासणार आहात हा खरा प्रश्न आहे.

सभापती महोदय, प्रत्येक पेट्रोल पंपावर हवा भरण्याची यंत्रणा असणे आवश्यक असते. या मशिनवरुन आपण हवेची गुणवत्ता कशी तपासणार आहात ? याबाबतही खुलासा होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पोट कलम (ड) मध्ये म्हटले आहे की, संकरित तंत्रज्ञान किंवा सौर उर्जेवर चालिवण्यात येणा-या वाहनांच्या वापरास प्रोत्साहन देणे ही बाब उदधृत केलेली आहे. पोट कलम (घ) मध्ये स्वच्छ इंधनाचा वापर करण्यास प्रोत्साहन देणे या विषयावर मी आता माझे विचार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर.....

मांडणार आहे. केंद्रसरकारकडून राज्य शासनाला रॉकेलवर मोठया प्रमाणात सबसिडी मिळत असते. रॉकेलचा उपयोग 100 टक्के घरगुती वापरसाठी होतो का? हा खरा प्रश्न आहे. राज्य शासनाला केंद्रसरकारकडून जे काही रॉकेल मिळते त्या रॉकेलच्या 80 टक्के रॉकेल टॅक्सीज, ट्रॅक्टर, ट्रक, मोटारसायकल मध्ये वापर होत असतो. या वाहनामुळे मोठया प्रमाणात प्रदूषण होत असते. यासाठी तीन यंत्रणा कार्यरत आहेत. आरटीओ, पोलीस व राजस्व. यामध्ये तहसिलदार, नायब तहसिलदार यांना याबाबत अधिकार दिलेले आहेत. जी वाहने रॉकेलवर चालतात ती जर पकडली तर त्यांच्याकडून फाईन नंबर एक मधून 2000 रुपये घेतले जातात व नंबर दोनच्या फाईनमध्ये जास्तीचा फाईन घेऊन वाहन सोडले जातात. त्यामुळे ज्या वाहनांमध्ये रॉकेलचा वापर होतो अशा वाहंनावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. वाहनांमध्ये इथेनॉलचा वापर केला तर ते आम्ही समजू शकतो परंतु गोरगरीबांसाठी देण्यात येणा-या रॉकेलचा वापर इंधन म्हणून केला जातो त्यांच्या बाबतीत आपण कोणती कठोर उपाययोजना करणार आहात त्याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी देण्याची आवश्यकता आहे. रॉकेलवर चालणारे वाहन सापडले तर त्याला सहा महिने तरी सस्पेंड केले पाहिजे असे मला वाटते. मला माननीय मंत्रीमहोदयांना सांगावयाचे आहे की, आपल्या राज्यात रॉकेलचा वापर इंधन म्हणून सर्रासपणे केला जातो त्याला प्रतिबंध घालण्याची आवश्यकता आहे. रॉकेलवर चालणा-या वाहनांवर बंधन घातले तरच आपल्याकडील प्रदूषण कमी होऊ शकेल.

सभापती महोदय, पोट कलम (ज) मध्ये म्हटले आहे की, योग्य ते प्रमाणपत्र देणे किंवा त्याचे नूतनीकरण करणे यासाठी प्रगत वाहन तपासणी स्थानके स्थापन करणे. हा जो भाग आहे त्यामध्येच आम्हाला खरा संशय येतो. यासाठी जी काही यंत्रणा काम करते ती यंत्रणा आपले काम बरोबर करीत नाही. मागच्या बिलाच्यावेळी बोलतांना मी सांगितले होते की, ढवरी नाक्यावरुन जे वाहन येते त्याच्याकडून केवळ 500 रुपयांची पावती घ्यावयाची असते परंतु त्या वाहन चालकांकडून 1500 रुपयांची पावती घेतली जात असते. त्यामुळे यासंदर्भात कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर.....

सभापती महोदय, आपण वाहनाचे 5-5 वर्षांनी नूतनीकरण करणार आहात. मोटरसायकल 15 वर्षानंतर खरे म्हणजे निरुपयोगी होत असते त्यामुळे मोटरसायकलचे आपण नूतनीकरण कसे करणार आहात याचीही माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी देण्याची आवश्यकता आहे. काल आम्ही मुंबईत टॅक्सीने प्रवास करीत होतो. टॅक्सी ड्रायव्हरला विचारले की, "हे वाहन केव्हाचे आहे"? तेव्हा त्याने सांगितले की, "साहेब, या वाहनाची मुदत दोन महिन्यांनी संपणार आहे". त्यामुळे अशा टॅक्सीजना आपण मुंबईत परवाना देणार आहात काय हा खरा प्रश्न आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर.....

आर.टी.ओ.कार्यालयातील अधिकाऱ्यांना दानदक्षिणा दिल्यास सहज कोणत्याही वाहनास परवानगी देण्यात येते. ज्या चांगल्या गाड्या असतील त्यांना सवलत देण्यास हरकत नाही.

सभापती महोदय, या विधेयकाच्या पृष्ठ 5 वर विशेष उपयोगिता वाहन, फिरते चिकित्सालय, रुग्णवाहिका, क्ष-किरण व्हॅन, ग्रंथालय व्हॅन, फिरती कार्यशाळा, कॅश वाहन, शववाहिका, प्राण्यांची रुग्णवाहिका, अग्निशमन वाहने या वाहनांवर 2.5 कर आकारण्यात येणार आहे. सर्वसामान्य माणसांना सेवा देणारी ही सर्व वाहने आहेत. या वाहनांवर कर आकारण्यात येऊ नये किंवा त्यांना यातून सूट देण्यात यावी अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मुंबई मोटार वाहन कर (दुसरी सुधारणा) विधेयक, 2010 यावर सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील व श्री.केशवराव मानकर यांनी आपले विचार मांडताना काही मौलिक सूचना केल्या. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मोटार सायकलबाबत अतिशय सविस्तर सांगितले. त्या संदर्भात पाच-सात मिनिटांमध्ये खुलासा करणे मला शक्य होणार नाही. याठिकाणी परिवहन संदर्भात ज्या सूचना करण्यात आल्या त्या बाबत सविस्तर चर्चा झाली पाहिजे आणि तशी चर्चा निश्चितपणे घडवून आणण्याचा प्रयत्न केला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी पर्यावरणाच्या नावाने वसुली करणारे अधिकारी प्रामाणिकपणे काम करतात काय असा मुद्दा उपस्थित केला. परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांकडे काही जबाबदाऱ्या सोपविलेल्या आहेत. परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी किती वसुली केली हे याठिकाणी सांगणे गरजेचे आहे. परिवहन अधिकाऱ्यांनी सन 2007-08 मध्ये 2200 कोटी रुपये वसूल केले. सन 2008-09मध्ये 2600 कोटी रुपये वसूल केले. सन 2009-10 मध्ये 3 हजार कोटी रुपये वसूल केले. परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांना दरवर्षी टार्गेट देण्यात येते त्याप्रमाणे अधिकारी काम करीत असतात.

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले की, परदेशी बनावटीच्या 700 मोटार सायकल्स आयात कर चुकवून रजिस्टर्ड करण्यात आल्या. तेव्हा हा बुडालेला कर वसूल करण्यात आला काय असा प्रश्न विचारला. याबाबत सांगू इच्छितो की, एकूण 80 मोटर सायकल्स आयात करण्यात आल्या होत्या. त्यांच्याकडून 29 लाख रुपये कर वसूल केलेला आहे. उर्वरित वाहनांकडून कर वसुलीचे काम सुरु आहे. या वसुलीमध्ये गुंतागुंत अधिक आहे. या प्रकरणाची चौकशी सी.आय.डी.करीत आहे. तरी देखील अधिकाधिक वसुली कशी करता येईल याबाबत आमचा प्रयत्न सुरु आहे.

सभापती महोदय, सुपर बाईक प्रकरणी पेण, आर.टी.ओ.ने पोलीस स्टेशनमध्ये एफ.आर.आय.दाखल केलेला आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी काही पत्रांचे वाचन केले. आर.टी.ओ.च्या अधिकाऱ्यांविरुध्द माननीय न्यायालयाने कोणतेही आरोप केलेले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर.....

नाहीत वा काही आक्षेप घेतलेले नाहीत. तरी सुध्दा अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी सुरु केलेली आहे. आर.टी.ओ.अधिकाऱ्यांविरुध्द फौजदारी कारवाई करण्यात आलेली नसून सी.आय.डी.मार्फत चौकशी सुरु होती. त्या चौकशीमध्ये देखील काही आढळले नाही किंवा गुन्हा दाखल केलेला नाही.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर...

सभापती महोदय, औरंगाबादच्या संदर्भात या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी असा उल्लेख केला होता की, त्या ठिकाणी अचानक धाड टाकण्यात आली किंवा अचानकपणे भेट दिली. त्या बाबतीत मी आपल्याला सांगू इच्छितो की, नेहमीच्या कामाचा आढावा घेत असतांना औरंगाबाद येथे भेट घेण्याचे काम अधिका-यांनी केले होते. काही वाहन धारकांनी नवीन वाहनांची कागदपत्रे अद्याप मिळाली नसल्याची तक्रार केली होती. त्याप्रमाणे प्रादेशिक परिवहन अधिका-यांनी त्वरित कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या होत्या आणि त्यामध्ये आता सुधारणा झाली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, काही अधिका-यांनी जाणीवपूर्वक चुकीचा कर गोळा केला असेल किंवा एखाद्या अधिका-यांनी कर वसुली टाळली असेल व ही बाब जर सिध्द झाली तर शासनाच्या दृष्टीने तो अधिकारी गुन्हेगार आहे किंवा नाही ? आता माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, काही रक्कम वसूल झालेली आहे आणि बाकीची रक्कम वसूल व्हावयाची आहे. असे असताना देखील अधिकारी निर्दोष आहेत, हे आपण रेकॉर्डवर सांगत आहात.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, बाईक मोटारच्या प्रकरणासंबंधी मी सांगितले होते की, या प्रकरणामध्ये सीआयडीने अधिका-यांवर कोणताही ठपका ठेवलेला नाही.

श्री.दिवाकर रावते : क्रिमिनल केसेस दाखल करा, असे सांगण्यात आले होते.

श्री.गुलाबराव देवकर : 700 मोटार बाईकच्या बाबतीत आपण जो मुद्दा मांडला होता, त्याबाबतीत मी सांगितले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, पोलीस अधिकारी, सीआयडी यांनी असे म्हटले होते की, एवढया मोठया प्रमाणावर बाईक येथे येत असतांना या अधिका-यांनी लक्ष द्यावयास पाहिजे होते. परंतु त्यांनी याकडे लक्ष दिले नाही. ते सहजपणे हा प्रकार करीत गेले, हा गुन्हा नाही काय ? 80 वाहनांकडून 29 लाख रुपये जमा झालेले आहेत. अजूनही काही कोटी रुपये जमा झालेले नाहीत. हा गुन्हा होऊ शकत नाही काय ? गुन्हा होत नसेल तर आपण त्या अधिका-याला उद्या रिझ्युम करुन घ्यावे.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, त्यांची खात्यामार्फत विभागीय चौकशी करण्यात येत आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सहा महिन्यात जर चौकशी पूर्ण झाली नाही तर त्याला कामावर घेऊन चौकशी चालू राहते. या बाबतीत आपण जाणीवपूर्वक वेळ काढत आहात असे आम्हास वाटते.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, एवढया मोठया प्रमाणावर बाईक आल्या आणि त्यांचे रजिस्ट्रेशन झाले. याची चौकशी न करता ही सहजपणे् गोष्ट घडलेली आहे काय ? त्यांना सस्पेन्ड करुनच चौकशी झाली पाहिजे. परंतु तसे न करता पुन्हा त्यांना कामावर का घेतले जात आहे ? शासनाने या संदर्भात गंभीरपणे लक्ष दिले पाहिजे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, रिइन्स्टेट करण्याची फाईल आपल्याकडे आली आहे काय ?

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, संबंधित अधिका-याला रिईन्स्टेट करुन पुन्हा कामावर घेण्यात येत आहे, अशी माझी माहिती आहे. जोपर्यंत सदर चौकशी पूर्ण होणार नाही तोपर्यंत त्या अधिकाऱ्याला रिईन्स्टेट करणार नाही असे आपण या ठिकाणी सांगावे.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, असा प्रस्ताव अजून माझ्या समोर आलेला नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अधिवेशन संपल्यानंतर रिईन्स्टेट करण्यात येणार आहे, अशी आमची माहिती आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझ्या हातून फार मोठे पाप घडले असल्यामुळे मी सभागृहाची, संपूर्ण राज्याची आणि आरटीओच्या अधिका-यांची माफी मागतो. एक मोठा भ्रष्टाचार काढण्याचा मी प्रामाणिकपणे प्रयत्न केला आहे. माननीय उच्च न्यायालयाच्या चार न्यायमूर्तीचे जज्जमेट मी वाचून दाखवले आहे. आमच्या अधिका-यांनी कोणताही गुन्हा केलेला नाही, असे माननीय मंत्री महोदयांनी रेकॉर्डवर सांगितल्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. मी माझे सगळे स्टेटमेन्ट मागे घेतो.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, अधिका-यांनी गुन्हा केलेला नाही, असे मी म्हटलेले नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अधिका-यांना माननीय मंत्री महोदय क्लिन चीट देत आहेत. तेव्हा अधिका-यांच्या बाबतीत माननीय मंत्र्याना काय म्हणावयाचे आहे ? अशाच प्रकारे तुमचा कारभार चालू द्या. त्याबाबतीत मला काहीही म्हणावयाचे नाही.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, अधिका-यांनी गुन्हा केलेला नाही असे मी स्वत: कधीही म्हणणार नाही. बाईक प्रकरणाच्या सीआयडी चौकशीमध्ये अधिका-यांना दोषी धरलेले नाही, असे मी म्हटलेले आहे.

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, एका प्रश्नामध्ये हा प्रकार घडल्याचे मान्य करण्यात आलेले आहे. असे असतांना हा प्रकार घडलेला नाही, असे सीआयडी कसे म्हणू शकते ?

उप सभापती : माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, याबाबतीत सन्माननीय सदस्यांच्या भावना अत्यंत तीव्र आहेत. त्यामुळे या प्रकरणात जे कोणी अधिकारी दोषी असतील त्यांच्याविरुध्द गुन्हे दाखल करावयास पाहिजे.

श्री.गुलाबराव देवकर : संबंधित अधिका-याना सस्पेंड करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : त्यांना पुन्हा कामावर घेण्यात येणार आहे, अशी आमची माहिती आहे.

श्री.गुलाबराव देवकर : जर ते अधिकारी दोषी आढळून आले तर आपण त्यांना सोडून देणार नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : त्या अधिका-याला रिईन्स्टेट केले जाणार नाही असे आपण सांगावे.

श्री.गुलाबराव देवकर : रिईन्स्टेट करण्याचा प्रस्ताव अजून आलेला नाही. चौकशी अंती जे कोणी अधिकारी दोषी आढळून येतील त्यांच्याविरुध्द कडक कारवाई केली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, रिईन्स्टेट करण्याच्या प्रस्तावावर शेवटच्या अधिका-याची सही झालेली आहे, असे कागद हाती येऊ शकतील. त्याची झेरॉक्स प्रत आणून तुम्हाला दाखविणे बरोबर होणार नाही. परंतु माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागवली तर तुमच्या विरुध्द हक्क भंगाचा प्रस्ताव येऊ शकतो. तेव्हा आपण मंत्री पद गमावू नका.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आता काही काम करावयाचे नाही असे ठरविलेले असतांना

श्री. दिवाकर रावते...

एवढे वाचन केल्यानंतर गव्हर्नमेंट ऑफ इंडिया.....सी.बी.आय. ची चौकशी जाहीर करा. तुमचे अधिकारी निर्दोष आहेत तर मग सी.बी.आय. ची चौकशी जाहीर करा.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांना माहीत आहे की, माहिती घेण्याच्या संदर्भात आपण आमच्यापेक्षा पुढे आहात. मंत्री म्हणून माझ्याकडे फाईल आलेली नसल्यामुळे मी कोणत्या आधारावर सांगणार?

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी सांगितले आणि मंत्रिमहोदय म्हणतात की, माझ्याकडे फाईल आलेली नाही. हे अधिवेशन संपल्यानंतर फाईल तुमच्याकडे येणार आहे त्यावेळी तुम्ही त्या फाईलवर सही करणार आहात काय?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, फाईल आल्यानंतर कायदेशीर सल्ला घेतला जाईल, मत घेतले जाईल व कायद्यामध्ये बसत नसेल तर होणार नाही.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड ते 6 (दोन्ही सम्मिलित), खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.

उप सभापती : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 14 डिसेंबर, 2010 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन: भरेल. सभागृहाची विशेष बैठक सकाळी 10.00 ते 11.30 वाजेपर्यन्त पेण अर्बन बँकेसंदर्भातील चर्चा व 11.30 ते 1.00 वीजेची अपूर्ण चर्चा (मंत्र्यांच्या उत्तरासह) होईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.15 वाजता भरेल.

(सभागृहाची बैठक 7 वाजून 28 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 14.12.2010 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

*****

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही